
महाराष्ट्राचे शिल्पकार

राजा रयतेचा
श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर

रविंद्र बेडकिहाळ



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

महाराष्ट्राचे शिल्पकार

राजा रयतेचा
श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर

रविंद्र बेडकिहाळ

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

एच-१५५
१

➢ **पुस्तकाचे नाव :** महाराष्ट्राचे शिल्पकार राजा रयतेचा श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर

➢ **लेखक :** श्री. रविंद्र बेडकीहाळ

➢ **आयएसबीएन :** ९७८–९३–९३५९९–६५–०

➢ **प्रथमावृत्ती :** २०२३

➢ **प्रकाशक :**
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई – ४०० ०२५.

➢ **मुद्रक :**
व्यवस्थापक,
शासकीय फोटोझिंको मुद्रणालय,
फोटोझिंको मुद्रणालय आवार,
जी. पी. ओ. नजीक, पुणे – ४११ ००१.

➢ **मुखपृष्ठ व अंतर्गत मांडणी :**
रोहित वाकडे, सुरेंद्र प्रिंटर्स अँड स्टेशनर्स, फलटण, जि. सातारा


➢ **किंमत : रुपये ८२/–**



फलटण संस्थानचे भूतपूर्व अधिपती तथा
श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर यांचे वडिल

श्रीमंत मुधोजीराजे नाईक निंबाळकर,
राजेसाहेब, फलटण.

(१८५३ – १९१६)



राजे रयतेचे

श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर,

राजेसाहेब, फलटण.

(१८९६ ते १९७८)



फलटण संस्थानच्या भूतपूर्व राणीसाहेब तथा
श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर यांच्या पत्नी
श्रीमंत लक्ष्मीदेवी नाईक निंबाळकर,
राणीसाहेब, फलटण.





मुधोजी मनमोहन राजवाडा, फलटण.

अध्यक्षांचे मनोगत

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत ज्यांनी विविध क्षेत्रात क्रांतिकारी कार्य केले आहे, अशांची चरित्रे प्रकाशित करुन त्यांचे कार्य नव्या पिढीला ज्ञात व्हावे या दृष्टीकोनातून महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने 'महाराष्ट्राचे शिल्पकार' अशी ग्रंथमालिका सुरु केली आहे. यामध्ये महाराष्ट्राचे शिल्पकार राजा रयतेचा श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर यांचे चरित्र रविंद्र बेडकिहाळ यांनी लिहिले आहे व मंडळाने प्रकाशित केले आहे. त्यामध्ये त्यांनी श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर यांच्या कार्यकर्तृत्त्वाचा शोध घेतला आहे.

फलटण संस्थानचे नाईक निंबाळकर हे राज घराणे महाराष्ट्राच्या इतिहासातील एक प्राचीन घराणे आहे. या राजघराण्यातील श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर यांनी फलटण संस्थानचे राजे म्हणून दि.१५/११/१९१७ पासून राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतली होती. फलटण संस्थानचा विकास होण्यासाठी त्यांनी शिक्षण, ग्रामीण विकास, पाणीपुरवठा योजना, साखर कारखाने, आरोग्य, सहकार, कृषि औद्योगिक, महिला विकास इत्यादी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. 'राजा' म्हणून त्यांची ८ मार्च १९४८ पर्यंतच्या ३१ वर्षांच्या कारकीर्दीचा व नंतर फलटण संस्थान भारतीय संघराज्यात स्वखुषीने विलीन केल्यानंतर लोकप्रतिनिधी म्हणून १४ मे १९७२ पर्यंतच्या कारकीर्दीचा समग्र आढावा या चरित्रात घेतला आहे.

महाराष्ट्राचे बांधकाम व पाटबंधारे मंत्री म्हणून त्यांनी कोयनाधरण प्रकल्पाचे ऐतिहासिक काम केले. तसेच सहकारी क्षेत्रातील साखर कारखानदारी दुष्काळी भागासाठी शेती पाणी पुरवठ्यासाठी पाटबंधारे योजना ही महत्त्वाची कामे केली. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांचा प्रतापगड या इतिहास घडविणाऱ्या गडावरील अश्वारुढ पुतळा उभारणीमध्येही त्यांचा पुढाकार होता.

राजा म्हणून संस्थानकालीन राजघराण्यातील महिलांची पडदा पद्धत बंद करण्यासाठी स्वत:च्या पत्नी श्रीमंत लक्ष्मीदेवी राणीसाहेब यांच्यापासून राज्यारोहण प्रसंगीच्या पहिल्याच दरबारात ही पद्धत बंद करण्याचा ऐतिहासिक व क्रांतिकारी

निर्णय त्यांनी घेतला होता. संस्थानकाळात मुलींना मोफत शिक्षण, शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी प्रयत्न, समाजोद्धाराची दृष्टी, स्वदेश उन्नतीची जाणीव, सामाजिक सुधारणांचे विचार, अंधश्रद्धेतून चालत आलेल्या रुढी, परंपरा बंद करणे आणि श्रीमंत मालोजीराजेंचा पुरोगामी व प्रगल्भ दृष्टीकोन रविंद्र बेडकिहाळ यांनी या चरित्रात लिहीला आहे.

डॉ.सदानंद मोरे

अध्यक्ष,

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

लेखकाचे मनोगत

महाराष्ट्रातील मध्ययुगीन अशा ७०० वर्षाची परंपरा असलेल्या फलटण संस्थानचे २५ वे तसेच शेवटचे अधिपती असलेले श्रीमंत मालोजीराजे मुधोजीराजे नाईक निंबाळकर यांचे चरित्र महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाच्या 'महाराष्ट्राचे शिल्पकार' या योजनेखाली लिहायला मिळाले हे मी माझे भाग्यच समजतो. कारण या रयतेच्या राजाची कारकीर्द त्यांच्या उतारवयात मला जवळून पाहायला मिळाली होती. मी फलटण जि.सातारा येथे पत्रकार व लेखक म्हणून कार्यरत असताना १९६८ ते १९७८ या कालावधीत श्रीमंत मालोजीराजे ज्या-ज्या वेळी त्यांच्या मुधोजी मनमोहन राजवाड्यात निवासी असत त्या-त्या वेळी दररोज संध्याकाळी मला त्यांच्याबरोबर दोन-तीन तास घालविण्याची अपूर्व संधी मिळाली होती. त्यातून त्यांचे चरित्र आणि चारित्र्य जवळून अनुभवण्याची संधीही मला मिळाली होती.

श्रीमंत मालोजीराजे यांची फलटण संस्थानचे अधिपती (राजा) म्हणून कारकीर्द १५ नोव्हेंबर १९१७ ते ८ मार्च १९४८ अशी ३१ वर्षांची होती. नंतर लोकप्रतिनिधी व रयत सेवक म्हणून त्यांची कारकिर्द १४ मे १९७२ पर्यंतची होती. त्यापैकी पहिल्या 'राजा' म्हणूनच्या कारकिर्दीत त्यांनी पहिल्या दिवसापासूनच दरबारातील राजघराण्यातल्या महिलांची पडदा पद्धत स्वतःच्या पत्नीपासूनच; राणीसाहेबांपासून बंद करायला सुरूवात केली. तसेच दरबारात व संस्थानमधील सर्व मंदिरातून हरिजनांना प्रवेश, राजघराण्यातील देवदेवतांना दिला जाणारा मध्ययुगीन काळापासूनचा मटण दारूचा नैवेद्य बंद करून आपल्या पुरोगामी सुधारणांची नांदी केली हे खरोखरच ऐतिहासिक असे होते. त्यानंतर त्यांचे पिताश्री कै.मुधोजीराजे यांनी केलेल्या स्त्री शिक्षण, स्थानिक स्वराज्य संस्था स्थापन, कृषि सुधारणा, पाणीपुरवठा, स्थानिकांना उद्योग, शेतकऱ्यांना मदत, इत्यादी पुरोगामी धोरणामध्ये श्रीमंत मालोजीराजेंनी आणखी काही सुधारणा करून फलटण संस्थान सर्व क्षेत्रात आघाडीवर ठेवले. मुलींना मोफत शिक्षण, कला, संस्कृती, साहित्य, नाट्य, शासन, क्रीडा, बँकींग, सहकारी संस्था, ग्रामपंचायती स्थापना, साखर कारखाना, शेती व पिण्याच्या पाणी पुरवठ्यासाठी निरा उजवा

कालवा, संस्थानमध्ये छोटी धरणे, आरोग्य, रस्ता बांधणी, वाहतूक व वीज पुरवठा अशा अनेक क्षेत्रात त्यांनी भक्कम पायाभूत काम केल्यामुळे खऱ्या अर्थाने ''रयतेचा राजा'' ही संज्ञा लोकांकडूनच त्यांना प्राप्त झाली. 'राजा' म्हणून त्यांनी विविध क्षेत्रातील मान्यवरांना फलटणला बोलावून त्यांना मदत तर केलीच पण, त्यांच्या विद्वत्तेचा लाभ प्रजाननांना दिला.

८ मार्च १९४८ रोजी फलटण संस्थान ६५ लाख रुपयांच्या रोख शिलकेसह, संस्थानच्या प्रशासकीय इमारती, दरबार सभागृहासह अधिकार गृहाच्या इमारती, विमानतळ यासह त्यांनी भारतीय संघराज्यात विलीन केले. नंतर लोकप्रतिनिधी, सार्वजनिक बांधकाम, सहकार, पाटबंधारे मंत्री, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष अशा विविध पदांवरून त्यांनी महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी उल्लेखनीय कार्य केले. त्यामध्ये त्यांच्या या काळातील सर्वोच्च कामामध्ये महाराष्ट्राची भाग्य लक्ष्मी ठरलेल्या कोयना धरणाचे व राज्यातील अनेक जिल्ह्यातून त्या-त्या नद्यांवर उभारलेली धरणे, राज्यात अनेक ठिकाणी सहकारी साखर कारखान्यांची उभारणी व त्यासाठी शासनाचे भाग भांडवल देण्याचा ऐतिहासिक निर्णय, संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेसंबंधी पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचे मत परिवर्तनात सहाय्यभूत ठरलेला प्रतापगडावरील उभारलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ भव्य पुतळा या संस्मरणीय कामांचा समावेश आहे.

खऱ्या अर्थाने महाराष्ट्राच्या विकासात महाराष्ट्राचे शिल्पकार ठरलेल्या या रयतेच्या राजाचे चरित्र लिहिण्याची संधी मला महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे अध्यक्ष ज्येष्ठ विचारवंत डॉ.सदानंद मोरे व मंडळाच्या प्रशासकीय प्रमुख मीनाक्षी पाटील यांच्यामुळे मिळाली. तसेच यासाठी फलटण संस्थानचे सध्याचे अधिपती व महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती मा.ना.श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर, त्यांचे बंधू श्रीमंत रघुनाथराजे नाईक निंबाळकर व श्रीमंत संजीवराजे नाईक निंबाळकर यांचेही मार्गदर्शनपर सहकार्य मिळाले. तसेच माझ्या पत्नी सौ.अलका, सहाय्यक अमर शेंडे, रोहित वाकडे यांचीही मदत झाली. या सर्वांचा मी आभारी आहे.

फलटण.

दि. ३१/०५/२०२२

(रविंद्र बेडकिहाळ)

अनुक्रमणिका

१. प्रजाविकास व लोकशाही पुरस्कर्ते नाईक निंबाळकर राजघराणे	- १२
२. नारायणराव ते मालोजीराजे	- २४
३. श्रीमंत युवराज मालोजीराजे यांचे शिक्षण व विवाह	- २७
४. श्रीमंत मालोजीराजेंची कारकीर्द सुरू	- ३१
५. फलटण संस्थान- शिक्षणात अग्रेसर	- ३५
६. फलटण संस्थानमध्ये विद्वानांचे कौतुक	- ३९
७. फलटण संस्थानमधील महिलांचे संघटन	- ५१
८. अन्य संस्थांनाही सढळ हाताने मदत	- ५६
९. फलटण संस्थानची कृषि औद्योगिक प्रगती	- ६४
१०. संस्थानिकांच्या संघटनेतील मुख्य सूत्रधार	- ७५
११. फलटण संस्थान विलीनीकरण	- ९२
१२. रयत सेवक म्हणून दुसरी 'इनिंग'	- १०४
१३. काँग्रेस पक्षासाठी विशेष योगदान	- ११३
१४. प्रतापगडावरील शिवस्मारक - काँग्रेसला नवसंजीवनी	- ११६
१५. दैनिक विशाल सह्याद्री - काँग्रेस पक्षाचे मुखपत्र	- १२४
१६. उच्च व कृषि शिक्षणासाठीही विशेष प्रयत्न	- १२७
१७. .....अखेरचे पर्व....महानिर्वाण	- १३२
१८. मान्यवरांच्या शब्दात श्रीमंत मालोजीराजे	- १५६

१. प्रजाविकास व लोकशाही पुरस्कर्ते नाईक निंबाळकर राजघराणे

पूर्व इतिहास

फलटण संस्थानचे राजघराणे नाईक निंबाळकर हे घराणे ऐतिहासिकदृष्ट्या शिवपूर्वकालीन महाराष्ट्रातील खूप जुने घराणे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या आधीपासूनचे हे घराणे असल्यामुळे भोसले- नाईक निंबाळकर यांची पूर्वीपासूनच सोयरिक झालेली होती. प्राचीन काळापासून फलटण नगरी इतिहास प्रसिद्ध आहे. या नगरीचा उल्लेख पुराणामध्येही आढळतो. श्रीराम प्रभूंनी वनवास काळामध्ये येथे वास्तव्य केले होते. अर्जुन पुत्र अभिमन्यूचा विवाह विराट कन्या उत्तरेशी ठरविण्यात आला होता. त्या ठिकाणी जाताना पांडवांनी 'फलटण' या नगरीमध्ये मुक्काम केला होता, ती जागा आजच्या कृष्णनाथ मंदिराची मानली जाते.

आदिगुरु दत्तात्रेय, फाल्गू ऋषी, वाल्मीक ऋषी, श्रीराम प्रभू, श्रीकृष्ण चक्रवर्ती यांच्या वास्तव्याने व चरणस्पर्शाने ही भूमि पावन झालेली आहे.

१३ व्या शतकातील महानुभव वाड्.मयात सध्याच्या फलटणचा फलेठाण असा उल्लेख आहे. तर काही इतर वाड्.मयात याचा फलपत्तन असा उल्लेख आहे. माण, खटाव व फलटण या भागावर पूर्वी वाकाटकांची सत्ता होती. प्रवरसेन याच्या एका मुलाच्या अधिकाराखाली असलेल्या कुंतल देशात सातारा, कोल्हापूर, सोलापूर या कृष्णा नदीच्या उत्तर खोऱ्यातील प्रदेशाचा अंतर्भाव होत असे. यामधील काही भागावर राष्ट्रकूट नृपती मानांक (इ.स.३५० ते ३७५) यांनी वाकाटकांचा पराभव करुन आपली सत्ता या प्रदेशावर स्थापन केली. मानपूर नामक नगर स्थापन करून ते आपल्या राजधानीचे स्थान बनवले. हे मानपूर म्हणजेच माण नदीच्या तीरावरचे सध्याचे माण की जे फलटणच्या दक्षिणेस आहे. राष्ट्रकूटानंतर हा भाग यादवांच्या अधिपत्याखाली जवळपास ३०० ते ३५० वर्षे होता. या कालावधीतच फलटणचा सर्वांगीण असा पुरातन विकास झाला असावा असे येथील प्राचीन मंदिरांच्या अस्तित्त्वावरुन लक्षात येते. ज्या राजवटीत स्थैर्य व शांततेचा जास्त कालावधी असतो त्या राजवटीत स्थापत्य, शास्त्र, कला, संगीत, साहित्य, शिल्पकला इत्यादी क्षेत्रात भरभराट होते.

मु.ग.पानसे यांच्या 'यादवकालीन महाराष्ट्र' या पुस्तकामध्ये या विकासाचा उल्लेख आहे. त्यानुसार आधीचे महानुभव चांगदेव राऊळ जेथे राहत होते त्या फलटण नगराच्या पौळीला (गावाला बांधलेली तटबंदी) चार दिशांना चार महाद्वारे होती. पौळीच्या आत देवालय, गोपुरे, धवलारे, मठ अशा विविध इमारती होत्या.

म्हणजेच नगर संरक्षणाची व्यवस्था १० व्या ११० व्या शतकापासून प्रचारात असली पाहिजे. वरील वर्णनावरुन असे दिसते की, फलटण शहराची रचना फार नियोजनबद्ध होती. त्याकाळी या नगराच्या परिसराचा विचार करता साधारणत: ७ ते ८ चौ.कि. मध्ये हे नगर वसले असावे. येथील बाणगंगेच्या तीरावरील मंदिरे फलटणच्या ईशान्येस नरसोबाच्या मळ्यातील सध्या अस्तित्त्वात असलेले महादेव मंदिर, तसेच दक्षिणेकडे असलेले आबासाहेब मंदिर व उत्तरेकडे महतपुरा पेठेत असलेले नागनाथ महादेव मंदिर यांच्या सध्याच्या स्थानावरुन तत्कालीन नगराच्या विस्ताराची कल्पना येते. तसेच सध्याच्या फलटण शहराच्या मध्यभागी असलेल्या जबरेश्वर मंदिरातील गाभाऱ्याच्या प्रवेशद्वारावरती असलेल्या महावीर व अन्य तीर्थंकाराच्या प्रतिमांवरुन येथे त्याकाळी जैन धर्माचाही प्रभाव होता असे अनुमान निघते.

श्री चक्रपाणी प्रभू यांचा जन्म इथेच झाला. पिताजी जनकनायक व माता जनकाईसा यांचा वाडा आजच्या शुक्रवार पेठेत पश्चिम भागात होता. महानुभाव पंथाची काशी म्हणूनही फलटण नगरी प्रसिद्ध आहे.

अशा या ऐतिहासिक वारसा लाभलेल्या नगरीमध्ये 'नाईक निंबाळकर' हे घराणे तेराव्या शतकापासून कार्यरत होते.

या प्रदीर्घ कालखंडामध्ये या घराण्यात अनेक महापुरुष होवून गेले. त्यामध्ये वनंगपाल, वणगोजीराव, बजाजीराव, जानकोजीराव, साध्वी सगुणामाता, पुण्यश्लोक श्रीमंत मुधोजी महाराज, श्रीमंत मालोजीराजे असे अनेक कर्तबगार राजे महाराजे नाईक निंबाळकर घराण्यात होवून गेले. नाईक निंबाळकर संस्थानची राजधानी फलटण होती. या फलटण शहराला सुद्धा रामायण, महाभारत काळापासूनची ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे.

तिसऱ्या शतकापासून तेराव्या शतकाच्या मध्यापर्यंत फलटणवर सातवाहन, वाकाटक, चालुक्य, बदामी, राष्ट्रकूट, कल्याणी (चालुक्यवंशीय), शिलाहार, यादव (देवगिरी) या घराण्यांची राजवट होती. इ.स. ११७३ ते ११९२ पर्यंत यादव घराण्यातील भिल्लम (५ वा)

हा स्वतंत्र राजा म्हणून कार्यरत असताना त्यांच्या राजवटीखालील एक भाग म्हणून फलटण परिसर होता. त्यानंतर याच देवगिरीच्या यादव घराण्यातील शिंगणराजाच्या राज्यात विजापूर, सोलापूर, गुलबर्गा बरोबरच फलटणचाही समावेश होता. त्याने या प्रदेशावर ३६ वर्षे राज्य केले. त्याच्या काळात या भागात (फलटणमध्येही) त्याने अनेक हेमांडपंथी मंदिरे, तसेच तलाव बांधले. त्यांच्यानंतर महादेव यादव (१२६१-१२७०) आणि रामचंद्रदेव यादव (१२७१-१३१२) यांचे राज्य होते. रामचंद्र यादव ह्याचा पराभव अल्लाउद्दीन खिलजी याने १२९६ मध्ये केला. मलिक कफूर याने हिंदू यादव घराण्याची उर्वरित राजवट संपवून इ.स. १३१८ पासून महाराष्ट्रात मुस्लीम राजवटीचा प्रारंभ केला.

इ.स. १३२५ ते १३५१ मध्ये दिल्लीत महंमद तुघलक याची राजवट असताना त्यांचा एक प्रबळ सरदार हसन गंगू उर्फ झाफर खान याने स्वतंत्रपणे आपले राज्य घोषित केले. ३ ऑगस्ट १३४७ पासून त्याने देवगिरी येथे अल्लाउद्दीन बहामन शाह म्हणून आपली राजवट महाराष्ट्रात सुरू केली. त्यात फलटण होते. हेच बहामनी राज्य म्हणून त्याने संपूर्ण महाराष्ट्रात सर्वत्र विकसित केले. त्याचे राज्य त्याने महाराष्ट्राबरोबरच कानडी, तेलगू भाषिक प्रदेशापर्यंत विस्तारित केल्यानंतर मराठी, कानडी, तेलगू भाषिक प्रदेशावर देखरेख करणे सोयीचे व्हावे म्हणून त्याने देवगिरी सोडून गुलबर्गा येथे आपली राजधानी इ.स.१३५२ मध्ये सुरू केली. तत्पूर्वी इ.स. १३५१ मध्ये महंमद तुघलक याचे निधन झाले होते. त्यामुळे बहामन शहाने आपले साम्राज्य स्वतंत्रपणे विस्तारित केले होते. या हसन गंगू बहामनीच्या साम्राज्यात फलटणचे निंबाळकर, मुधोळचे घोरपडे, म्हसवडचे राजेमाने, मलवडीचे घाटगे, कोरेगावचे बर्गे आणि काही इतर मराठा सरदार होते. यातून एक गोष्ट स्पष्ट होते की, अल्लाउद्दीन हसन बहामन आणि त्याचे सरदार यांनी स्वतंत्र राजवट सुरू करून तुघलक यांची राजवट त्यावेळी नाकारली. पण तुघलक राजवटीच्या आधीसुद्धा फलटणच्या निंबाळकरांनी स्वतःचे बस्तान निंबळक येथे बसविले होते.

इ.स. १२७० च्या आसपास (तेराव्या शतकात) उत्तरेकडील राजस्थान मधल्या धार येथील राज्यकर्ते परमार घराण्यातील एक पराक्रमी पुरुष निंबराज हा मजल दरमजल करीत दक्षिणेतील महाराष्ट्रात आला. हे परमार घराणे धार येथे ९ व्या शतकापासून राज्य करीत होते. परंतु बाराव्या शतकात दिल्लीच्या सुलतान तुघलकने अनेक हिंदू राज्यांवर हल्ले केले. त्यामध्ये धार पण होते. त्यामुळे काही राजपूत घराणी आपले नशीब अजमविण्यासाठी

दक्षिणेत आली, त्यामध्ये निंबराज परमार होते. त्यांनी शिंगणापूर पायथ्याशी शंभू महादेवाचे जे विस्तीर्ण जंगल होते तेथील निंबळक वस्तीवर आपल्या निवडक लोकांसह राहिले व आजूबाजूची वाडी, वस्ती, गावे लढाया करून घेत राहिले. या गावामुळे पुढे त्यांना 'निंबाळकर' हे नाव रूढ झाले. या निंबराजने जवळपास ११ वर्षे आपले लहान राज्य स्थापन केले, ती त्यांची म्हणजे या घराण्याची पहिली जहागिर होय. इ.स. १२८४ मध्ये त्यांनी फलटण जहागिरीची स्थापना केली.

इ.स. १२९१ मध्ये निंबराज यांचे निधन झाले. त्यानंतर त्यांचा मुलगा पोदकाला उर्फ जगदेवराव उर्फ धारापतराव उर्फ पोडरवल (१२९१ ते १३२७) हा सत्तेवर आला. हा अत्यंत पराक्रमी राजा होता. त्यांच्या कालावधीत दिल्लीचा सुलतान महंमद तुघलक याने दक्षिणेवर स्वारी केली व देवगिरी (दौलताबाद) ताब्यात घेतली. या युद्धात जगदेवराव यांनी महंमद तुघलक याला मदत केली, पण जगदेवराव युद्धात मारले गेले (१३२७). त्यानंतर त्यांचा मुलगा निंबराज-२ (१३२७ ते १३४९) सत्तेवर आला. जगदेवराव यांचे लढाईतील कर्तृत्व लक्षात घेऊन महंमद तुघलकाने निंबराज-२ यांना फलटणची जहागिरी दिली. तसेच 'नाईक' ही बहुमानाची पदवी दिली. मोरचेल व सोन्याचा तोडा ही राजचिन्हे वंश परंपरेने वापरण्यास परवानगी दिली. या सनदेनंतर या घराण्याने 'नाईक निंबाळकर' असे नाव धारण केले तेच आजतागायत रूढ झाले आहे.

निंबराज - २ यांचा सन १३४९ मध्ये मृत्यू झाल्यानंतर वणंगभूपाल यांनी इ.स.१३४९ ते १३७४ पर्यंत फलटण जहागिरीचे राजे म्हणून काम केले. पुढे इ.स.१३७४ ते १४०० पर्यंत वणंगपाल यांनी राज्यकारभार केला. नंतर इ.स.१४०० ते १४३० पर्यंत वणगोजी यांनी राज्यकारभार केला. पुढे इ.स.१४३० ते १४३५ या काळात मालोजी (पहिला) यांनी राज्यकारभार पाहिला. इ.स.१४३५ ते १४६५ या काळात बाजीसाहेब यांनी राज्यकारभार केला. पुढे इ.स.१४६५ ते १४८० पर्यंत पवारराव नाईक तसेच इ.स.१४८० ते १५१२ पर्यंत बाजी नाईक, इ.स.१५१२ ते १५२७ पर्यंत मुधोजी नाईक, इ.स.१५२७ ते १५६० पर्यंत बाजी धारराव, इ.स.१५६० ते १५७० पर्यंत मालोजी (दुसरा) यांनी राज्यकारभार पाहिला. इ.स.१५७० ते १६३० मध्ये जगपाळराव उर्फ वणगोजी नाईक दुसरे हे वयाच्या २० व्या वर्षी फलटणच्या गादीवर बसले व राज्यकारभार पाहू लागले. जगपाळराव नाईक शूर, धाडसी व फौजबंद होते. हिंगणी बेरडीचे भोसले सरदार चैत्रात शंभू महादेवाचे यात्रेस नियमाने येत

असत. त्यावेळी त्यांचा मुक्काम फलटणला नाईक निंबाळकरांच्याकडे होत असे.

एकदा बाबाजी भोसले आपल्या मालोजी व विठोजी या दोन्ही मुलांच्या समवेत कामाच्या निमित्ताने जगपाळरावांना भेटले. जगपाळराव व मालोजी हे समवयस्क होते. भोसले बंधूंची इभ्रत, तडफदारपणा व हिम्मत पाहून त्या उभयतांना जगपाळरावांनी आपल्या पदरी बाराशे होनांची आसामी दिली. त्यापूर्वी मालोजी हा देवगिरीस जाधवांचे पदरी नोकरी करीत होता. फलटणच्या नाईक निंबाळकरांनी मालोजी व विठोजी भोसले या दोघांना नोकरी दिली. त्यामुळे नाईक निंबाळकर व भोसले यांचा ऋणानुबंध वाढला व तेव्हापासून भोसल्यांचे महत्त्व वाढले. जगपाळराव आजूबाजूस प्रदेश वाढवीत होते व त्याकामी त्यांना मालोजी व विठोजी भोसले या दोघांचा चांगला उपयोग होत होता.

इ.स. १५९० च्या सुमारास जगपाळरावांची फौज कोल्हापूरकडील काही प्रांत जिंकीत असता त्यांच्यावर आदिलशहाची फौज चालून आली. त्यावेळी भोसले बंधूंनी जिवाची पर्वा न करता शौर्य दाखवून जगपाळरावांना मदत केली. त्यामुळे भोसल्यांची प्रतिष्ठा नाईक निंबाळकरांचे पदरी वाढली. तसेच या पराक्रमाची हकिगत निजामशाहीतही पोचली. आदिलशहाच्या विरोधातील हा पराक्रम असल्यामुळे निजामशाहीने या पूर्वी भोसलेबंधूंची निजामशाहीत जी वतने जप्त केली होती ती मोकळी करून भोसल्यांना आपल्याकडे सन्मानाने बोलवून परत केली. भोसले बंधूंना राजे हा किताब दिला. भोसले बंधू जगपाळरावांच्या परवानगीने परत निजामशाहीत दाखल झाले.

अशाप्रकारे भोसल्यांचा भाग्योदय झालेला पाहून जगपाळरावांनी आपली उपवर बहीण मालोजीस दिली. हीच शहाजींची आई उमाबाई होय. भोसल्यांचे कुळ उच्च आहे आणि निंबाळकर जसे परमार घराण्यातून दक्षिणेतून आले तसेच भोसले हे उदयपूरच्या राजघराण्यातील आहेत, अशी नाईक निंबाळकरांची खात्री होती. राजस्थानमधील उदयपूर या राज्यावर 'शिसोदे' हे राजपूत घराणे राज्य करीत होते. या घराण्यातील सुजनसिंह व क्षेमसिंह हे दोन राजपुत्र १४ व्या शतकात आपल्या राज्याचा त्याग करुन दक्षिणेत आपले नशीब काढण्यासाठी आले होते. त्यापैकी सुजनसिंह बहामनी राज्याचा संस्थापक हसन गंगू बहामनी यांच्या पदरी नोकरी करीत होते. आपल्या पराक्रमाने ते बहामनी राज्याचे मोठे सरदार बनले होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या भोसले घराण्याचे सुजनसिंह हे मूळ पुरुष होत. छत्रपती शिवाजी महाराजांचे पणजे बाबाजी भोसले हे सुजनसिंहापासूनच्या १४ व्या पिढीतले पुरुष

होत. आदिलशाही व निजामशाही यांच्या सीमेवर असणाऱ्या पांडे पेडगावची छोटी जहागिर त्यांना मिळाली होती. याशिवाय वेरूळ, हिंगणी, देऊळगाव राजा, जिंती, मुंगी पैठण, खानवट इत्यादी गावच्या पाटीलक्याही या बाबाजी भोसलेंनी मिळविल्या होत्या. एक गोष्ट मात्र निश्चित आहे की, नाईक निंबाळकरांशी नाते संबंध असल्यामुळे भोसले घराण्याचाही लौकिक वाढला. नाईक निंबाळकरांसारख्या वजनदार सरदारांचे साहाय्य मिळाल्यामुळे शहाजीराजे व छत्रपती शिवाजीराजे यांचे पुढील हिंदवी स्वराज्य स्थापनेसाठीचे प्रयत्नांना पाठबळ मिळाले.

जगपाळराव हा त्या काळी मातब्बर मराठा सरदार होता. पुढे त्याच्याच पुढाकाराने लखोजी जाधवांनी आपली मुलगी जिजाबाई शहाजी यांना दिली. जगपाळराव नंतर मुधोजीराजे (दुसरे) हे सन १६३० मध्ये फलटणचे संस्थानाधिपती झाले. त्यांचे व शहाजींचे संबंध चांगले होते. त्यांच्या पहिल्या पत्नी मैनाबाईंना साबाजीराव व जगदेवराव ही मुले होती. धाकटी पत्नी यांचेपासून बजाजी व जिऊबाई अशी संतती होती. पण हे तिन्ही पुत्र एकमेकात सदैव भांडत असत. त्यामुळे थोरल्या पत्नी मैनाबाई या आपल्या दोन्ही पुत्रांना घेऊन विजापूरला बादशहा मोहम्मद आदिलशहा यांचेकडे गेली व आपल्यावरच्या अन्यायाची कैफियत सादर केली. त्यानुसार आदिलशहा यांनी या दोन्ही मुलांसाठी अनुक्रमे दहिगाव व भाळवणी, जि.सोलापूर येथील जहागिर दिली. त्यामुळे मुधोजीराजे (दुसरे) व आदिलशहा यांचे संबंध ताणले गेले. या नाराजीतून मुधोजीराजे (दुसरे) यांनी आदिलशहाच्या मुलुखातील काही गावांवर हल्ले केले. ही बाब १६३१ मध्ये आदिलशहाला कळाल्यावर त्याने आपले जादा सैन्य पाठवून मुधोजीराजे (दुसरे) यांच्या सैन्यावर सातारा नजिक जोरदार हल्ला केला. त्यात मुधोजीराजे (दुसरे) यांचा पराभव झाला. आदिलशहांनी मुधोजीराजे (दुसरे) यांना अटक करून साताराच्या किल्ल्यातील तुरुंगात ठेवले. या काळात त्यांच्या धाकट्या पत्नी रेऊबाई व त्यांची मुले बजाजी व जिऊबाई जिवास अपाय होऊ नये म्हणून सातारा येथे होत्या. तर थोरल्या पत्नी मैनाईबाईंचा मुक्काम फलटण येथेच होता.

पुढे शहाजीराजे भोसले विजापूरच्या नोकरीत राहिल्यावर त्यांनी आपले वजन खर्च करून मुधोजीराजे नाईक निंबाळकर यांची सन १६३८ मध्ये सुटका केली. त्यामुळे शहाजीराजे भोसले यांच्याबद्दल मुधोजीराजे नाईक निंबाळकर यांना आदर वाटू लागला. त्यानंतर मुधोजीराजे नाईक निंबाळकर यांनी आपली मुलगी जिऊबाई शहाजीराजे भोसले यांचे

चिरंजीव शिवाजीराजे यांना दिली. हे लग्न इ.स. १६ एप्रिल १६४० रोजी पुणे येथे राजमहालमध्ये (सध्याचा लालमहाल) झाले. जिऊबाईंचे सासरघरी 'सईबाई' असे नाव ठेवले गेले. या लग्नास मुधोजीराजे (दुसरे) उपस्थित होते किंवा कसे याबाबत स्पष्टता आढळून येत नाही.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेच्या कार्यास मुधोजीराजे नाईक निंबाळकर मदत करीत असावेत अशी शंका विजापूरच्या आदिलशहास आली. तसेच मुधोजीराजेंच्या मनात असे होते की, फलटणचा कारभार आपल्यानंतर बजाजी यांस मिळावा. पण ही गोष्ट त्यांच्या दोन्ही मोठ्या मुलांना मान्य नव्हती. तरीसुद्धा मुधोजींनी विजापूर दरबारची परवानगी मिळविली, तेव्हा मुधोजीराजेंचे व त्यांच्या दोन मुलांचे साबाजी व जगदेवराव यांचे संबंध फारच बिघडले. ते विजापूरची मदत घेऊन मुधोजीराजेंवर चालून आले. तेव्हा शिरवळजवळ भोळी येथे लढाई होऊन मुधोजीराजे एका वडाच्या झाडाखाली मुलाच्या हातून सन १६४४ मध्ये मारले गेले. त्यास बापमारीचा वड असे म्हणतात.

या लढाईत बजाजी नाईक निंबाळकर यांना कैद करुन विजापुरास नेले. तेथे त्यांना जिवे मारण्याची आज्ञा झाली. त्यावेळी माने, घाटगे, घोरपडे व काळोजी शिंदे या मातब्बर मराठी सरदारांनी बादशहाला विनंती करुन मारण्याचा हुकूम रहित करुन घेतला. पुढे शिवाजी महाराजांनी आपली कन्या सकुबाई; बजाजी यांचा मोठा मुलगा महादजी यांस दिली. हे लग्न पुणे मुक्कामी झाले. या लग्नसंबंधामुळे भोसले व नाईक निंबाळकर ही दोन्ही घराणी अधिकच जवळ आली. बजाजी यांचे निधन इ.स. १६७६ ला झाले. त्यानंतर त्यांचा तिसरा मुलगा वणगोजी नाईक यांनी इ.स. १६७६ ते १६९३ पर्यंत राज्यकारभार केला. त्यानंतर बजाजी यांचे पुतणे जानोजी हे गादीवर आले. त्यांनी इ.स. १७४८ पर्यंत संस्थानचा कारभार पाहिला.

जानोजी यांच्यानंतर त्यांचा मुलगा मुधोजी (तिसरे) इ.स. १७४८ ला गादीवर बसले. मुधोजींच्या पत्नीचे नाव सगुणाबाई होते व त्या मलवडीच्या (ता.माण, जि.सातारा) घाटगे घराण्यातील होत्या. इ.स. १७६५ मध्ये मुधोजीराव यांचे निधन झाले. त्यानंतर त्यांच्या राणी सगुणाबाई उर्फ आईसाहेब यांनी काही काळ राज्यकारभार केला. त्या अत्यंत परोपकारी व दयाळू होत्या. माधवराव पेशवे व सगुणाबाई यांचे संबंध बिघडल्यामुळे पेशव्यांनी फौज पाठवून त्यांची जहागिरी जप्त केली व फलटणच्या गादीवर निंबाळकर घराण्यातील एक दूरचा नातेवाईक बसविला. पुढे इ.स. १७७४ ला सगुणाबाईंनी मालोजी तिसरा यांस दत्तक

घेतले व त्यास सवाई माधवराव पेशव्यांनी मंजुरी दिली. तथापि हे मालोजी अल्पायुषी ठरले. त्यानंतर त्यांचे दत्तक पुत्र जानराव गादीवर बसले. पण ते अज्ञान असल्यामुळे राणी सगुणाबाईंनी इ.स. १७९१ पर्यंत संस्थानचा कारभार केला.

धर्मशीलपणा व उत्कृष्ट राज्यकारभार या बद्दल श्रीमंत सगुणाबाई उर्फ आईसाहेब यांची ख्याती आजतागायत फलटण येथील आबालवृद्धांच्या तोंडी आहे. सगुणाबाई रामभक्त होत्या. त्यांनी फलटणला श्रीराम मंदिर बांधून त्यामध्ये श्रीराम, लक्ष्मण व सीता यांच्या मूर्ती बनारसमधून खास तयार करून आणल्या व त्यांची प्राणप्रतिष्ठा केली. सगुणाबाईंच्या निधनानंतर म्हणजे इ.स. १७९१ ते इ.स. १८२५ पर्यंत जानराव नाईक निंबाळकर यांनी राज्यकारभार केला. त्यांच्यानंतर फलटणचा कारभार जानरावांची पत्नी साहेबजीबाई ह्याच पहात होत्या. त्यांनी जानरावांच्या भावाचा नातू महादजी यांस दत्तक घेऊन त्यांचे नाव मुधोजी ठेवले होते. ते अज्ञान असल्यामुळे साहेबजीबाईनी उत्तमरीतीने राज्यकारभार चालविला. त्यांनी अतिशय खडतर काळात फलटण संस्थानचा कारभार उत्तम प्रकारे केला. त्या इ.स. १८५३ मध्ये मृत्यू पावल्या. त्यानंतर ब्रिटिश सरकार तर्फे संस्थानचा कारभार चालविण्यात येवून १०-२-१८६० रोजी मुधोजीराजे यांना गादीचे अधिकार देण्यात आले. असा हा फलटण संस्थानचा प्राचीन व मध्ययुगीन काळाचा गौरवशाली इतिहास आहे. १८१८ ला मराठी सत्ता संपुष्टात आली. त्यानंतर संपूर्ण भारतात इंग्रजी सत्ता दृढमूल झाली. महाराष्ट्रातील जी अठरा संस्थाने १८२० ला एस्.एस्.सी. स्टेट म्हणून संबोधण्यात आली; त्यामध्ये फलटणचा समावेश होता. १८६० ते १९१६ पर्यंत श्रीमंत मुधोजीराजे यांनी राजकारभार करुन फलटण हे एक आदर्श संस्थान बनविले. सुमारे सातशे वर्षे एकाच नाईक निंबाळकर घराण्यात अविच्छिन्न परंपरेने चालत आलेल्या फलटण संस्थानची राजपरंपरा ही अशी आहे.

इ.स. १२८४ ला स्थापन झालेल्या या संस्थानवर १९४८ पर्यंत एकूण २५ अधिपतींनी राज्यकारभार केला होता. श्रीमंत मालोजीराजे मुधोजीराजे नाईक निंबाळकर हे या संस्थानचे २५ वे अधिपती म्हणून १९१७ मध्ये सत्तेवर आले. १९४७ साली हिंदुस्थान देश स्वतंत्र झाल्यावर हे संस्थान १९४८ मध्ये श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर यांनी भारतीय संघराज्यात सामील केले. त्यामुळे श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर हे या संस्थानचे शेवटचे (२५) वे अधिपती ठरले.

फलटण संस्थानचे ६६४ वर्षातील अधिपती

नाव	कालावधी
१) श्रीमंत निंबराज पवार (पहिले)	१२८४-१२९१
२) श्रीमंत पोड्खल जगदेव पवार	१२९१-१३२७
३) श्रीमंत निंबराज नाईक निंबाळकर (दुसरे)	१३२७-१३४९
४) श्रीमंत वनंग भूपाल नाईक निंबाळकर	१३४९-१३७४
५) श्रीमंत वनंगपाल नाईक निंबाळकर	१३७४-१४००
६) श्रीमंत वनगोजीराव नाईक निंबाळकर (पहिले)	१४००-१४३०
७) श्रीमंत मालोजीराव नाईक निंबाळकर (पहिले)	१४३०-१४३५
८) श्रीमंत बाजीसाहेब नाईक निंबाळकर	१४३५-१४६५
९) श्रीमंत पोवारराव नाईक निंबाळकर	१४६५-१४८०
१०) श्रीमंत बाजीसाहेब नाईक निंबाळकर	१४८०-१५१२
११) श्रीमंत मुधोजीराव नाईक निंबाळकर (पहिले)	१५१२-१५२७
१२) श्रीमंत बाजीधारराव नाईक निंबाळकर	१५२७-१५६०
१३) श्रीमंत मालोजीराव नाईक निंबाळकर (दुसरे)	१५६०-१५७०
१४) श्रीमंत वनगोजीराव नाईक निंबाळकर (दुसरे)	१५७०-१६३०
१५) श्रीमंत मुधोजीराव नाईक निंबाळकर (दुसरे)	१६३०-१६४४
१६) श्रीमंत बजाजीराव नाईक निंबाळकर (पहिले)	१६४४-१६७६
१७) श्रीमंत वनगोजीराव नाईक निंबाळकर (तिसरे)	१६७६-१६९३
१८) श्रीमंत जानोजीराव नाईक निंबाळकर	१६९३-१७४८
१९) श्रीमंत मुधोजीराव नाईक निंबाळकर (तिसरे)	१७४८-१७६५
२०) श्रीमंत सगुणाबाई नाईक निंबाळकर	१७६५-१७९१
२१) श्रीमंत जानोजीराव नाईक निंबाळकर	१७९१-१८२५
२२) सातारा छत्रपती यांचे अखत्यारित	१८२५-१८२७
२३) श्रीमंत बजाजीराव नाईक निंबाळकर (दुसरे)	१८२७-१८२८
२४) श्रीमंत साहेबजीबाई नाईक निंबाळकर	१८२८-१८५३
२५) ब्रिटीश रिजंट यांचे अखत्यारित	१८५३-१८६०
२६) श्रीमंत मुधोजीराजे नाईक निंबाळकर	१८६०-१९१६
२७) ब्रिटीश सरकार प्रशासक	१९१६-१९१७
२८) श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर	१९१७-१९४८

टीप-१. (इ.स.१७७४ - ७७ या काळात श्रीमंत सगुणाबाई आईसाहेब यांनी मालोजी तिसरे यांना दत्तक घेतले. परंतु तरीही श्रीमंत सगुणाबाई आईसाहेब यांनीच जहागिरीचे काम पाहिले होते.)

टीप - २. (१ जानेवारी १८२५ रोजी श्रीमंत जानोजीराव नाईक निंबाळकर यांच्या निधनानंतर फलटण संस्थान सातारा छत्रपती यांच्या ताब्यात दि.३ सप्टेंबर १८२७ पर्यंत होते. श्रीमंत बजाजीराव नाईक निंबाळकर (दुसरे) यांना दत्तक म्हणून मंजुरी मिळाल्यानंतर ते फलटण संस्थानचे २२ वे अधिपती झाले. त्यांचे निधन १७ मे १८२८ ला झाले. त्यानंतर पुन्हा या संस्थानचा कारभार सातारचे छत्रपती यांचेकडे गेला. त्यांच्यावतीने श्रीमंत साहेबजीबाई नाईक निंबाळकर फलटण संस्थानचा कारभार इ.स.१८५३ पर्यंत पाहत होत्या. तर इ.स.१८५३ ते १८६० या काळात ब्रिटीश सरकारतर्फे संस्थानचा कारभार रिजंट यांनी पाहिला होता.)

यापैकी फलटण संस्थानचे २४ वे अधिपती कै.श्रीमंत मुधोजीराव नाईक निंबाळकर उर्फ बापूसाहेब यांनी फलटण संस्थानच्या कारभारास गतिमान स्वरूप दिले. १०-२-१८६० रोजी श्रीमंत मुधोजीराव यांना संस्थानचे अधिकार मिळाले. १९१६ पर्यंत त्यांनी पुरोगामी राज्यकारभार केला. त्यांची ५६ वर्षाची कारकिर्द म्हणजे फलटण संस्थानच्या सर्वांगीण प्रगतीचा नवा चेहरा व सुधारणांचा पाया होता.

श्रीमंत मुधोजीराजेंमुळे फलटण संस्थान आदर्श :

श्रीमंत मुधोजीराजे यांनी फलटण संस्थानमध्ये आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक सुधारणा करून फलटण संस्थानचे आधुनिकीकरण केले. त्यामुळे मुंबई प्रांतातील एक प्रगतीशील संस्थान असा फलटण संस्थानचा लौकिक झाला. त्यांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखले होते. ज्ञान ही शक्ती व संपत्ती आहे. ती आपल्या प्रजेला मिळाली पाहिजे हा त्यांचा ध्यास होता. शिक्षणामुळे व्यक्तिमत्वाचा विकास होतो, तसेच समाजातील अवतीभवतीची निरीक्षण शक्ती वाढते, चांगले काम आणि वाईट काम याची पारख होते. स्वतः मुधोजीराजे यांच्या विद्यार्थी दशेत हे त्यांच्या शिक्षकांकडून त्यांना समजले होते. म्हणून त्यांनी मराठी माध्यमाप्रमाणे इंग्रजी माध्यमाच्याही शाळा आपल्या संस्थानामध्ये सुरू केल्या. त्यातील विद्यार्थ्यांना लागणाऱ्या पाठ्यपुस्तकांसाठी त्यांनी फलटणमध्ये मुधोजी बुक-डेपोही (पुस्तक भांडार) सुरू केला होता.

फलटणमध्ये मागासवर्गीयांची मुले या शाळांमध्ये जात नाही ही वस्तुस्थिती समजल्यावर इ.स. १८९२-९३ मध्ये त्यांनी संस्थानमधील सर्व शाळांमधून मागासवर्गीयांच्या मुलांना मोफत शिक्षणाची सोय केली. परंतु नंतर याहीपुढे जाऊन त्यांनी सन १९०७ मध्ये फलटण संस्थानात सर्वच प्राथमिक व माध्यमिक शिक्षण मोफत देण्याचा जाहीरनामाच काढला. त्यामुळे संस्थानात इयत्ता १ ली ते मॅट्रिक पर्यंतच्या शिक्षणाची मोफत सोय सर्व समाजातील सर्व स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी झाली. अत्यंत पुरोगामी व महत्त्वाची बाब म्हणजे संस्थानच्या एकूण महसूली उत्पन्नातील ५१ टक्के खर्च शिक्षण खात्यावर करण्याचे आदेश त्यांनी दिले व राबविलेसुद्धा !

शिक्षण प्रसारास उत्तेजन मिळावे म्हणून मुधोजीराजे यांनी हुषार विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्त्या ठेवल्या होत्या. मॅट्रीकच्या परीक्षेत मुधोजी हायस्कूलमधून पहिल्या येणाऱ्या विद्यार्थ्यास शिष्यवृत्ती मिळत होती. संस्कृत घेऊन मॅट्रिकच्या परीक्षेत पहिल्या येणाऱ्या विद्यार्थ्यांस १ हजार रुपयांची शिष्यवृत्ती देण्यात येत होती. काही शाळांना मुधोजीराजे स्वत: भेटी देत असत व शिक्षणाचे महत्त्व मुलांना व त्यांच्या पालकांना पटवून देत असतं. अशा प्रकारे आधुनिक शिक्षणाचा पाया त्यांनी फलटण संस्थानमध्ये घालून ठेवला होता.

श्रीमंत मुधोजीराजे यांनी केवळ मुलांच्याच शिक्षणाकडे नव्हे तर मुलींच्या शिक्षणाकडेही समतोलपणे लक्ष दिले. इ.स. १८८२ पासून त्यांनी स्त्रियांसाठी शिवणकाम, भरतकाम, तसेच अन्य व्यावसायिक शिक्षण सुरू केले. मुलींसाठी स्वतंत्र शाळाही सुरू केल्या. फलटण संस्थानात प्राथमिक अे.व्ही.स्कूल व वैदिक शाळा होती. त्यामुळे पुढील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची गैरसोय होत होती म्हणून इ.स. १८९४ मध्ये त्यांनी फलटण येथे स्वतंत्र हायस्कूल सुरू केले. मुधोजी हायस्कूल म्हणून सुरू झालेले हे हायस्कूल सध्या महाराष्ट्रातील सर्वात मोठे व प्रसिद्ध असे हायस्कूल आहे.

फलटण संस्थानमधील प्रजा ही प्रामुख्याने शेती व्यवसायावर अवलंबून होती. त्यामुळे जमीन महसूल हे संस्थानचे प्रमुख उत्पन्न होते. त्याकाळी संस्थानच्या जमाबंदीचे काम मामलतदार करीत असत. परंतु १८८३ - ८४ मध्ये प्रथमच श्रीमंत मुधोजीराजे यांनी स्वत: काही गावांना भेटी देवून तेथील पाहणी करुन तिथले जमाबंदीचे काम ते स्वत:च करीत असत. फलटण संस्थानच्या इतिहासात ही पहिलीच घटना होती की, स्वत: राजानेच खेडेगावात जाऊन जमाबंदी केली.

शेतकऱ्यांना अल्पदराने कर्ज देणे व तगाई देणे हेही प्रथमच मुधोजीराजेंनी केले. अनेक वेळा कमी पावसामुळे संस्थानमध्ये दुष्काळ पडत असे. इ.स. १८७६ मध्ये फलटण संस्थानमध्ये मोठा दुष्काळ पडला होता. या भीषण परिस्थितीत त्यांनी प्रजेला वाऱ्यावर सोडले नाही. त्यांना संस्थानचा निधी तगाईच्या रुपाने देण्यात आला. त्यावेळी बाणगंगा नदीवर बंधारा बांधणे, फलटण - पंढरपूर रस्त्याच्या दुरुस्तीचे काम, संस्थानमधील अंतर्गत रस्त्याची कामे काढून त्या माध्यमातून लोकांना रोजगार उपलब्ध करुन देण्याचे अत्यंत महत्त्वाचे जीवन मरणाचे काम मुधोजीराजेंनी केले.

शिक्षण, शेती, शेतीचे पाणी, पिण्याचे पाणी, संस्थानच्या दुष्काळी भागासाठी तलाव, छोटी धरणे याकडेही त्यांनी जाणीवपूर्वक लक्ष दिले. इ.स. १८६८ मध्ये त्यांनी काळाची पावले ओळखून फलटणमध्ये म्युनिसिपालिटी (नगरपालिका) स्थापन केली. त्याचा कारभार लोकशाही पद्धतीने चालण्यासाठी त्यांनी नागरिकांमधून सदस्य नेमले. या नगरपालिकेसाठी सुशोभित व सुसज्ज अशी देखणी इमारतही त्यांनी बांधून दिली.

फलटण संस्थानच्या आदर्श, लोकशाहीवादी कारभाराकडे इंग्रज सरकारचे लक्ष वेधले गेले. त्यामुळे तत्कालिन मुंबई सरकारने त्यांना मुंबई लेजिस्लेटिव्ह (कायदे मंडळात) असेंब्लीत सन्मानाने सदस्यत्व दिले. तसेच सन १९११ मध्ये त्यांना ब्रिटीश सरकारने सी.एस.आय. (Companions of the order of the star of India) हा मानाचा किताब दिला. अशा या प्रगतशील संस्थानचा कारभार पुढे तेवढ्याच ताकदीने किंवा त्याहीपेक्षा अधिक प्रगतीने त्यांचे सुपुत्र मालोजीराजे नाईक निंबाळकर यांनी सन १९१७ पासून पाहायला सुरूवात केली (२५ वे अधिपती म्हणून).

***



फलटण नगर परिषद.

२. नारायणराव ते मालोजीराजे

फलटण संस्थानचे २४ वे अधिपती श्रीमंत मुधोजीराजे (४ थे) उर्फ बापूसाहेब नाईक निंबाळकर यांचे दिनांक १७-१०-१९१६ रोजी निधन झाले. परंतु त्यापूर्वीच त्यांचे चिरंजीव श्रीमंत युवराज व्यंकटराव राजे यांचे १८८७ ला दुःखद निधन झाले होते. सदर श्रीमंत युवराज व्यंकटराव राजे शरीरयष्टीने दणकट व बळकट असे होते. त्यांचा स्वभाव शूर व धाडसी होता. ते उत्तम अश्वारोहक होते. तिरंदाजीमध्ये ते प्रविण होते. व्यायामाची आवड व युद्ध कलेमध्ये निपुण होते. एकदा संस्थानचा हत्ती बिथरला होता. माहूतालाही तो आवरत नव्हता. तेव्हा व्यंकटरावांनी आपल्या ताकदीने व शक्ती युक्तीने त्या हत्तीवर ताबा मिळवला होता. अचानकपणे उद्‌भवलेल्या युवराजांच्या दुःखद निधनामुळे श्रीमंत मुधोजीराजे यांना फलटण संस्थानला योग्य वारस हवा होता. त्यामुळे कै.श्रीमंत व्यंकटरावराजे यांच्या निधनानंतर त्यांनी आपला वारस शोधण्यास सुरूवात केली. कारण त्या काळातील ब्रिटीश मुंबई इलाख्यातील अत्यंत प्रगतशील असे फलटण संस्थान होते आणि त्याला त्यावेळी ६०३ वर्षाचा ऐतिहासिक वारसा होता. त्यामुळे आपल्या माघारी हे संस्थान योग्य वारसाच्या हाती जावे ही श्रीमंत मुधोजीराजेंची इच्छा होती. त्यांच्या पत्नी व फलटण संस्थानच्या राणीसाहेब श्रीमंत आनंदीबाई यांनी आपापल्या नातेवाईकांमध्ये, भावकीत वारसाचा शोध घ्यायला सुरूवात केली.

संस्थानला योग्य वारस शोधतेवेळी श्रीमंत मुधोजीराजे यांना त्यांच्याकडेच लष्करात फौजदार म्हणून काम करीत असलेले व त्यांच्या भावकीतलेच श्रीमंत रघुनाथराव संभाजीराव उर्फ बाबासाहेब नाईक निंबाळकर यांचेकडे लक्ष गेले. त्याआधीही त्यांनी आपल्या जवळच्या नातेवाईकांची सर्व लहान मुले पारखली होती. ही मुले त्यांनी नुसती पाहिलीच नाहीत तर त्यांना स्वतः काही प्रश्न विचारले. त्यांची देहयष्टी, बोलणे, चालणे, आवडीनिवडी, सवयी याचा बारकाईने अभ्यास केला होता. पण अखेर त्यांनी पाहिलेल्या सर्व मुलांमध्ये वर उल्लेख केलेले श्रीमंत रघुनाथराव नाईक निंबाळकर यांचे द्वितीय चिरंजीव नारायण या मुलाकडे त्यांचे लक्ष

वेधले गेले. हा नारायण अधिक चुणचुणीत, बुद्धिमान, गोरा व देखणा वाटल्यामुळे मुधोजीराजे यांनी आपल्या अगदी जवळच्या नातेवाईकांची किंवा परंपरेने ज्या घरातील दत्तक मुले इतरत्र घेतली गेली होती; त्या घरांचा विचार न करता त्यांनी 'नारायण' हाच आपला व संस्थानचा वारस होऊ शकेल हे मनोमन पक्के केले.

या नारायणचे वडिल श्रीमंत रघुनाथराव नाईक निंबाळकर हे फलटण संस्थानशी व राजघराण्याशी अत्यंत एकनिष्ठ होते. ते त्यांच्या पत्नी श्रीमंत सीताबाई उर्फ काकीसाहेब व ३ मुले यांचेसह फलटण मधील 'धन्या'च्या वाड्यात राहत होते. त्यांच्या पत्नी श्रीमंत सीताबाई उर्फ काकीसाहेब या अत्यंत साध्या राहणीच्या व पुण्यशील अशा होत्या. त्यांचे माहेर निंभोरे गाव. हे फलटणच्या पश्चिमेस फलटण पासून १० कि.मी. वर फलटण- पुणे मार्गावर आहे. निंभोरे येथील श्रीमंत खंडेराव रणनवरे हे नारायणरावांचे आजोबा. हे रणनवरे मूळचे मुधोळ संस्थानातील साळुंखे सरदार होते. या रणनवरे यांचा एक पूर्वज महापराक्रमी होता. त्याच्या लग्नात शत्रूकडून हल्ला झाला होता. त्यावेळी त्यांनी कपाळाला बाशिंग असताना सुद्धा जो पराक्रम दाखविला व हल्ला परतवून लावला तो पाहून त्यांना 'रणनवरे' या नावाने ओळखले जाऊ लागले. त्या वंशातील एक सुपुत्र म्हणून नारायणराव यांचा त्यांच्या आजोळी म्हणजे निंभोरे ता.फलटण येथे ११ सप्टेंबर १८९६ (गणेश चतुर्थी दिवशी) रोजी जन्म झाला.

नारायणराव यांची राजयोगाची लक्षणे लहानपणापासून दिसत होती. ते फलटण संस्थानला दत्तक गेले तेव्हा ४ वर्षांचे होते. ते राहत होते त्या घरी कधी जमिनीवर बसले नाहीत. दुपट्यावर दुपटी टाकून मऊ आसन केल्यावरच ते त्यावर बसत होते. रात्री झोपताना सुद्धा समई रात्रभर तेवत राहिली पाहिजे असा त्यांचा हट्ट होता. ते आजोळी जन्मले (निंभोरे येथे) तेव्हा लहान असताना त्यांच्या आजोळ घरापाशी फलटण, बारामती भागातील एक प्रख्यात योगी हरिबुवा महाराज फिरत फिरत गेले होते. तेव्हा बाहेर अंगणात वाळवण घालत असलेल्या श्रीमंत सीताबाई यांना त्यांनी जवळ बोलावले व अंगणात वाळवण घातलेल्या हरभऱ्यापैकी मूठभर हरभरे तिच्या ओटीत घातले. माहेरच्यांना हा शुभशकुन वाटला आणि नारायणराव फलटण संस्थानला दत्तक गेले तेव्हा हा शुभशकुन खऱ्या अर्थाने अमृतयोग ठरला. तसेच

लहानपणी धन्यांच्या वाड्यात आपल्या सवंगड्यांबरोबर खेळतानाही ते उंच आसनावर बसत व सांगत की, ''मी राजा आहे. मला मुजरा करा.'' हेही पुढे नारायणरावांचे चिरंजीव श्रीमंत मालोजीराजे झाले त्यावेळी खरे ठरले.

नारायणरावांचा दत्तक विधी :

अशा खानदानी घराण्याची पार्श्वभूमी लाभलेले नारायणराव ४ वर्षाचे असतानाच त्यांचा दत्तक विधी श्रीमंत मुधोजीराजे यांनी अत्यंत थाटामाटात दरबारी पद्धतीने दिनांक १८ डिसेंबर १८९९ रोजी फलटण येथे केला. हिंदू धर्मशास्त्रा प्रमाणे दत्तक विधान झाल्यावर नारायणरावांचे नाव श्रीमंत मालोजीराजे उर्फ नानासाहेब असे करण्यात आले. या दत्तक विधान शाही समारंभास मुंबई इलाख्यातील अनेक राजे महाराजे, राजघराण्यातील अनेक नातेवाईक, सरदार, वतनदार, ब्रिटीश शासनातील सरकारी अधिकारी व प्रमुख प्रजानन मोठ्या संख्येने उपस्थित होते.

त्याआधी या दत्तक विधानास मुंबई सरकारने श्रीमंत मुधोजीराजे यांच्या अर्जानुसार या दत्तक विधानाला मंजूरी दिली होती. परंतु परवानगी आधी त्यांच्या अधिकाऱ्यांनी श्रीमंत मालोजीराजे यांची शारीरिक व मानसिक, बौद्धिक क्षमता तपासणी केली होती. त्यासाठी त्यावेळच्या प्रथेप्रमाणे फलटण संस्थानने मुंबई सरकारला आवश्यक तो नजराणा दिला होता.

***

३. श्रीमंत युवराज मालोजीराजे यांचे शिक्षण व विवाह

श्रीमंत मुधोजीराजे यांनी राजघराण्याच्या अधिकृत निवासासाठी फलटणमध्ये २२ मार्च १८२१ रोजी राजमहल बांधायला सुरूवात केली. त्याच्या पहिल्या भागाचे बांधकाम २८ ऑगस्ट १९०९ रोजी व दुसऱ्या भागाचे बांधकाम १२ जानेवारी १९११ रोजी पूर्ण झाले. या दोन्ही भागाचे एकत्रित राजमहालाचे नामकरण मुधोजी मनमोहन पॅलेस असे करण्यात आले.

युवराज मालोजीराजे राजघराण्यात दत्तक आले त्यावेळी त्यांचे वय अवघे ४ वर्षे होते. त्यामुळे त्यांना राजघराण्याचे रितीरिवाज, प्रथा, परंपरा, दरबारी कामाची ओळख व नंतर राज्यकारभाराचे प्रशिक्षण, संस्थानची व राजघराण्याची पार्श्वभूमी, इतिहास व नातीगोती यांची माहिती यासाठी त्यांच्या सर्वांगीण शिक्षणासाठी श्रीमंत मुधोजीराजे यांनी दत्तक विधानानंतर लगेचच सुरूवात केली.

सुरूवातीला श्रीमंत मालोजीराजे यांचे प्राथमिक शिक्षण मुधोजी हायस्कूलचे तत्कालिन मुख्याध्यापक गोपाळ रघुनाथ भिडे (बी.ए.संस्कृत तज्ञ) यांच्याकडून राहत्या सरकारी वाड्यातच झाले. श्रीमंत मुधोजीराजे यांचे श्रीमंत मालोजीराजे यांच्या शिक्षणावर बारीक लक्ष असायचे. पुढे माध्यमिक शालेय शिक्षणासाठी त्यांना कोल्हापूर येथे मेजर कँडी यांनी सुरू केलेल्या सरदार हायस्कूलमध्ये दाखल करण्यात आले. तिथे मराठी, इंग्रजी, संस्कृत भाषा, गणित, विज्ञान, इतिहास, इत्यादी विषयांचे उत्तम शिक्षण त्यांना मिळाले.

कोल्हापूर येथील शिक्षणाच्या काळात श्रीमंत मालोजीराजेंना कोल्हापूरचे राजर्षि छत्रपती शाहू महाराज यांचे कार्य जवळून पाहण्याची सुवर्णसंधीच मिळाली. त्या वयात राजर्षि शाहूंच्या कार्याचा, विचारांचा प्रभाव श्रीमंत मालोजीराजे यांचेवर पडला होता असे त्यांच्या पुढील राजकारभारातील निर्णयावरून लक्षात येते. राजा हा जनतेचा सेवक असतो. राजेपद, ऐश्वर्य हे विलासी जीवन, मौजमजेत जगण्यासाठी नसून प्रजेच्या कल्याणासाठी आहे हे श्रीमंत मालोजीराजेंना राजर्षि शाहूंकडून समजले.

कोल्हापूर येथील शिक्षणानंतर श्रीमंत मालोजीराजे यांना गुजरात राज्यातील राजकोट येथील राजकुमार शाळेत दाखल केले होते. राजकोट येथील ही शाळा अतिशय प्रसिद्ध अशी होती. कारण भारतातील बहुतेक राजे रजवाडे, संस्थानिक, प्रमुख मोठे सरदार, मानकरी यांच्या मुलांसाठीच ही शाळा इंग्रजांनी सुरू केली होती. संस्थानच्या प्रगतीसाठीचे, राज्यकारभारातील प्रशासनाचे शिक्षण तर या शाळेत मिळतच होते, तथापि पाश्चात्य पद्धतीचे रितीरिवाज, पाश्चिमात्य आधुनिक इंग्रजी, विज्ञान, गणित, जागतिक इतिहास, युद्धनीती, साहित्य, कला, संस्कृती, इत्यादींचे सविस्तर शिक्षणही या शाळेत मिळत होते. त्याबरोबरच घोडेस्वारी, टेनिस, पोलो, शूटींग, पोहणे, शिकारीचेही शिक्षण व नक्षीकाम, संगीत, चित्रकला, यांचाही थोडाफार अभ्यास श्रीमंत मालोजीराजेंना मिळाला होता. या सर्वांचा उपयोग त्यांना फलटण संस्थानची सूत्रे हाती घेतल्यानंतर प्रत्यक्ष कारभार करताना फार मोठ्या प्रमाणावर झाला होता.

युवराजांचा विवाह :

कोल्हापूर, राजकोट येथील शिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करून श्रीमंत मालोजीराजे फलटणला आले. साहजिकच त्यांच्या विवाहासाठी श्रीमंत मुधोजीराजेंनी अनुरूप वधूचा शोध घ्यायला सुरूवात केली. फलटण संस्थानची प्रसिद्ध ऐतिहासिक पार्श्वभूमी लक्षात घेता अनेक राजघराण्यांकडून, सरदार, जहागिरदार, नाते संबंधातील पै-पाहुणे यांचेकडून अनेक प्रस्ताव आले. तथापि श्रीमंत मुधोजीराजेंनी अथक परिश्रम करून फलटण जवळीलच बारामती तालुक्यातील माळेगावचे जहागिरदार श्रीमंत शंभूसिंहराजे अमृतसिंह राजे जाधवराव यांची तृतीय कन्या अबई यांची पसंती केली.

हे जाधवराव घराणे तसे इतिहास प्रसिद्धच आहे. शिव काळातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्याचे सेनापती धनाजी जाधवराव यांचे हे घराणे होय. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पश्चातसुद्धा इस्लामी राजवटीवर ज्यांचा धाक होता त्या प्रसिद्ध संताजी - धनाजी जोडीतले धनाजीराव यांचे हे घराणे. तसे श्रीमंत मुधोजीराजेंनाही याच घराण्यातील श्रीमंत राजेरत्नसिंह अमरसिंह जाधवराव यांची कन्या म्हणजे श्रीमंत शंभूसिंहराजे जाधवराव यांची बहिण अबई दिली होती. त्यामुळे

श्रीमंत मालोजीराजेंच्या या विवाहामुळे जाधवराव- नाईक निंबाळकर घराण्यातील नात्यांची पुनरावृत्तीच झाली.

या वधू परीक्षेचा कार्यक्रम पुणे येथे झाला. श्रीमंत मुधोजीराजे यांनी स्वतः जातीने नियोजित वधू अबईसाहेब यांना विविध प्रश्न विचारून त्यांचा स्वभाव, बोलण्याची ढब, नम्रता याची चाचपणी केली. शेवटी त्यांनी अबईसाहेबांना आपल्या करारी आवाजात विचारले, 'मुली, तू फलटणला येशील का ?' त्यावेळी न घाबरता अबईसाहेब म्हणाल्या, 'नेलं तर येईन की.' श्रीमंत मुधोजीराजेंना हे उत्तर भावले व त्यांनी अबईसाहेबांची नाईक निंबाळकर राजघराण्याची सून व भावी राणीसाहेब म्हणून निवड केली.

तशा अबईसाहेब दिसायला सुंदरच होत्या. सडपातळ, मध्यम उंची, गोरा रंग व खानदानी रूबाब त्यांच्याकडे होताच. पण श्रीमंत मुधोजीराजे यांनी केवळ बाह्य सौंदर्याला महत्त्व न देता अंतरंगाच्या सौंदर्यालाही महत्त्व दिले. म्हणून त्यांनी आपले सुपुत्र युवराज श्रीमंत मालोजीराजे यांच्यासाठी सुयोग्य सहचारिणी, जीवनसाथी म्हणून अबईसाहेबांची सुयोग्य, अनुरूप अशी निवड केली. त्यानंतर अबईसाहेबांना रितीरिवाजानुसार कुंकू लावण्याचा समारंभ माळेगाव येथे पार पडला. त्यानंतर फलटण येथे दिनांक १८-१२-१९१३ रोजी हा शाही विवाह सोहळा मोठ्या थाटामाटात संपन्न झाला. अनेक संस्थानचे राजे, महाराजे, जहागिरदार, सरदार, मानकरी, दरबारी व मोठ्या संख्येने फलटणची प्रजा या शाही विवाह सोहळ्यासाठी उपस्थित होती. या विवाह सोहळ्यावेळी युवराज श्रीमंत मालोजीराजे यांचे वय १७ वर्षे होते तर सूनबाई अबईसाहेबांचे वय १२ वर्षे होते.

श्रीमंत मुधोजीराजे हे जुन्या वळणाचे असले तरी अत्यंत हौशीपण होते. त्यांनी आपल्या सूनबाईंसाठी हिऱ्या-मोत्यांचे, माणिक पाचूचे, सोन्याचे विविध प्रकारचे दागिने केले होते. लग्नानंतर त्यांनी अबईसाहेबांचे नामकरण लक्ष्मीदेवी असे केले. श्रीमंत मालोजीराजे यांचे दत्तकपूर्व नाव 'नारायण' असल्यामुळे सर्व उपस्थितांनी अगदी यथार्थपणे हा 'लक्ष्मी-नारायणाचा जोडा जमला' असे उत्स्फूर्त उद्‌गार काढले होते.

त्यावेळच्या रितीरिवाजाप्रमाणे राजवाड्यात घरातील स्त्रियांना कडक पडदा पद्धत

होती. तरीही श्रीमंत लक्ष्मीदेवी राणीसाहेब यांना शिकविण्यासाठी एका वृद्ध शिक्षकाची नियुक्ती केली होती. हे शिक्षक २५ फूट अंतरावरून पडद्याच्या आत असलेल्या लक्ष्मीदेवींना शिकवित असत. गुरूजींनी शिकवलेले पाटीवर लिहून राणीसाहेब ही पाटी दासी सोबत गुरूजींना दाखवत असत. असे शिक्षण १ वर्ष झाल्यानंतर फलटणच्याच श्रीमती यमुनाबाई जोशी यांची शिक्षिका म्हणून नियुक्ती झाली. तसेच एक युरोपियन बाई त्यांना इंग्रजी शिकविण्यासाठी नियमितपणे येत असत. मुळात श्रीमंत मुधोजीराजे यांना शिक्षणाची खूपच आवड असल्यामुळे त्यांनी खानदानी रितीरिवाज सांभाळून कां होईना पण सूनबाईंच्या अर्थात राणीसाहेबांच्या शिक्षणावर कटाक्षाने भर दिला होता.

***

४. श्रीमंत मालोजीराजेंची कारकीर्द सुरू

श्रीमंत मालोजीराजे यांच्या विवाहानंतर तीनच वर्षांनी श्रीमंत मुधोजीराजे यांचे वयाच्या ७९ व्या वर्षी १७ ऑक्टोबर १९१६ रोजी निधन झाले. परंतु त्यानंतर लगेचच ब्रिटीश सरकारने त्यांना राज्याचे (संस्थानचे) 'राजा' म्हणून अधिकार दिले नाहीत. त्यामुळे फलटण संस्थानचा राज्यकारभार पाहण्यासाठी काही काळ ब्रिटीश सरकारने आपला प्रशासक नेमला होता. त्यानंतर कार्तिक शुद्ध प्रतिपदा म्हणजे त्यावेळचा दिवाळी पाडवा. (दि. १५-११-१९१७). यादिवशी (वयाच्या २१ व्या वर्षी) श्रीमंत मालोजीराजे यांचा दरबारी पद्धतीने राज्याभिषेक झाला. फलटण संस्थानचे २५ वे वंशज म्हणून त्यांनी या दिवशी फलटण संस्थानच्या राज्यकारभाराची सूत्रे आपल्या हाती घेतली.

पण तत्पूर्वी श्रीमंत मुधोजी महाराजांचे निधन झाल्यानंतर राणीसाहेब लक्ष्मीदेवी यांच्या संपूर्ण शिक्षणाची जबाबदारी श्रीमंत मालोजीराजे यांनी घेतली. त्यांनी अधुनमधून स्वतः त्यांना इंग्रजीचे शिक्षण दिले. संगीताची आवड व्हावी म्हणून पेटी (हार्मोनियम) वाजविण्याचेही शिक्षण दिले. महालातच त्यांनी त्यांना नेमबाजीचेही शिक्षण दिले. रात्रीच्या वेळी एक दिवा लावायचा व छऱ्याच्या बंदुकीने त्या दिव्यातील ज्योतीवर छऱ्याचा नेम धरायला शिकविले. छऱ्याने ज्योत मालवेपर्यंत त्यांचे हे शिक्षण चालू असायचे.

सुरूवातीला अबोल असणाऱ्या राणीसाहेब लक्ष्मीदेवी यांनाही पुढे शिक्षणाची आवड निर्माण झाली. श्रीमंत मालोजीराजे यांनी त्यांना घोड्यावर बसायला शिकविले. टेनिस, बॅडमिंटन, संगीत, पेटी व दिलरूबा वाजविणे, चित्रे काढणे, इत्यादी शिक्षणासाठी त्यांनी तज्ज्ञ शिक्षकांची नेमणूक केली होती.

तसेच व्यवहारात, राजघराण्यात कसे वागावे, आप्त, स्वकीय, मित्र परिवार यांचेबरोबर कसे वागावे, हेही त्यांना श्रीमंत मालोजीराजेंनी शिकविले. त्यामुळे माझे पती श्रीमंत मालोजीराजे हेच माझे आई-वडिल, जवळचे मित्र व माझे गुरू होत अशी विनम्र भावना त्या नेहमीच व्यक्त करीत. पुढे पुढे राणीसाहेब लक्ष्मीदेवी यांचे इंग्रजी व

मराठीमधून जाहीर भाषणे करण्यापर्यंतचे धाडस या सर्वांगीण शिक्षणामधून निर्माण झाले होते.

राज्यारोहण आणि क्रांतिकारक निर्णय :

१९१७ च्या दिवाळी पाडव्याला राज्यारोहण समारंभातच श्रीमंत मालोजीराजेंनी आपल्या प्रशासनाची, राज्यकारभाराची, सामाजिक द्रष्टेपणाची, दूरदर्शीची दिशाच स्पष्ट केली. मुधोजी मनमोहन राजवाड्यातील दरबार हॉल गर्दीने गच्च भरला होता. आसपासचे राजे रजवाडे, सरदार, मानकरी, नातेवाईक व मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. ''आपला नवा राजा'' काय बोलणार याची सर्वांना उत्सुकता होती.

नव्या राजाने दरबारात प्रवेश करण्यापूर्वी दरबारावर एकवार नजर टाकली तर त्या गर्दीत एकही महिला नव्हती. म्हणून त्यांनी ठरविले की त्यात सुधारणा झाली पाहिजे व त्याचे पहिले पाऊल आपण टाकले पाहिजे. हा मनाशी दृढनिश्चय करून श्रीमंत मालोजीराजे यांनी दरबारी चिकाच्या पडद्याआडच्या कक्षाकडे जाणाऱ्या महिलांच्या घोळक्यातील आपल्या राणीसाहेबांना जवळ बोलावले. तेव्हाच साऱ्यांच्या नजरा आश्चर्याने विस्फारल्या होत्या. राजेसाहेब म्हणाले, राणीसाहेब, आपणही चला आमच्याबरोबर आज दरबारात !

राणीसाहेबांनी राजेसाहेबांची नव्हे तर पतीची आज्ञा मानून त्या त्यांच्याबरोबर दरबारात आल्या आणि दरबारी वडिलधारी मंडळी आश्चर्याचा धक्का सावरीत समाजसुधारणेचे पहिले खंबीर पाऊल टाकणाऱ्या राज दांपत्याकडे बघतच बसले. आजपर्यंतच्या या राजघराण्यातील यापूर्वीच्या २४ राजांच्या दरबारात जे घडले नाही, ते श्रीमंत मालोजीराजेंनी समाज सुधारणेच्या या पहिल्या पावलाने घडवून दाखविले. राजघराण्यातल्या स्त्रियांचे नखसुद्धा सामान्य प्रजेला दिसू न देणाऱ्या काळात हा बदल झाला आणि फलटण संस्थानात स्त्री-पुरुष समानतेचे युग सुरू झाले. खानदानी पडदा पद्धत इतिहासजमा झाली.

राणीसाहेबांबरोबर दरबारात आसनस्थ झाल्यानंतरच्या पहिल्याच अभिभाषणात श्रीमंत मालोजीराजे यांनी प्रजेला संबोधित करताना आणखीन तीन क्रांतिकारक घोषणा केल्या व त्या पुढे अंमलातही आणल्या.

१) फलटण येथील ग्रामदैवत प्रभू श्रीराम मंदीर व श्री दत्त मंदीर व संस्थानच्या

अखत्यारीतील अन्य सार्वजनिक मंदिरातून हरिजन स्त्री-पुरुषांना आजपासून मंदिर प्रवेशाची मुभा देण्यात येईल.

२) दसऱ्याच्या दिवशी पूर्वापार पद्धतीने राजघराण्यात जो होम केला जातो त्या होमात हवन म्हणून बकऱ्याचे शिर कापून टाकण्याची पद्धत ताबडतोब बंद करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे इतर ठिकाणी सुद्धा हत्याराला जेवू घालण्यासाठी बकरी मारण्याची अनिष्ट प्रथा बंद करण्यात येत आहे.

३) फाल्गुन शुद्ध पौर्णिमेला सात सुपात सात कोंबड्या व सात बकऱ्यांची मुंडकी ठेवून त्याचा नैवेद्य (नव्याच्या पुनवेला म्हणून) दाखविण्याची जी प्रथा आहे ती आजपासून बंद करण्यात येत आहे. त्याऐवजी पुरण पोळीचा नैवेद्य सुरू केला जाईल.

श्रीमंत मालोजीराजे हे त्यावेळी जाती विरहित समाजाचे अध्यक्ष होते. म्हणून आपल्या संस्थांनातील सर्व कार्यालयामध्ये, दरबारात व त्यांना भेटणाऱ्यांमध्ये उच्च-नीच जमाती पद्धतच त्यांनी रद्द करून सामाजिक विषमतेवर घाव घातला होता.

त्यांच्या मुधोजी मनमोहन राजवाड्यातील राजघराण्याच्या देव्हाऱ्यात ब्रह्मराक्षसांच्या 'ब्राह्म मूर्ती' होत्या. त्या त्यांनी एक दिवस उचलून सरळ नदीत फेकून दिल्या. त्यांचा विचार स्पष्ट होता. 'आम्ही भुताखेताची पूजा करणार नाही. देवऋषी, जादूटोणा, ज्योतिषी, भुतेखेते व नवसासाठी देवाला काही लाच देणे या अंधश्रद्धा आम्हाला मान्य नाहीत. कुलाचार म्हणून देवीला मांस व दारू यांचा नैवेद्य पाठविण्याची आमच्या घराण्यातील पूर्वीची चाल आम्हाला मान्य नाही. या सर्व अंधश्रद्धा आम्ही बंद करीत आहोत. प्रजा आणि प्रजेसाठी प्रयत्न करणे हाच आमचा परमेश्वर !

रामनवमीचा गुलाल बंद :

फलटणच्या राजघराण्याचे दैवत श्रीराम मंदिर आहे. दरवर्षी रामनवमीला श्रीमंत मालोजीराजे व राजघराण्यातील त्यांचे सर्व कुटुंबिय श्रीराम जन्मोत्सवाला उपस्थित असत. त्यावेळी पूर्वापार पद्धतीनुसार रामजन्म झाल्यानंतर गुलाल उधळला जायचा. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर घातक प्रदूषण होते हे लक्षात आल्यावर त्यांनी ही पद्धत बंद केली व गुलालाऐवजी फुले उधळण्याची मंगल प्रथा सुरू केली, ती आजतागायत चालू आहे.

अघोरी प्रथांचे, अंधश्रद्धांचे, अनिष्ट क्रूर चाली रितीचे निर्मूलन करून सामाजिक क्रांतीची पहाट या सर्व निर्णयांमुळे फलटण संस्थानमध्ये झाली. यातून श्रीमंत मालोजीराजे यांची काळाच्याही पुढे जाऊन निर्णय घेण्याची दूरदृष्टी प्रजेला आणि आसपासच्या संस्थानांनाही दिसून आली.

***



फलटणचे ग्रामदैवत श्रीराम प्रभू

५. फलटण संस्थान - शिक्षणात अग्रेसर

फलटणचे राजघराणे जसे नामांकित व पराक्रमी पुरुषांचे होते तसेच संस्थानच्या समाजाच्या सर्वांगिण विकासासाठीही ते नामांकित व पुरोगामी विचारसरणीचेही होते. स्वतः श्रीमंत मालोजीराजे चांगल्या प्रकारे विद्याविभूषित झाले होते. तसेच त्यांनी राणीसाहेब लक्ष्मीदेवी यांनाही सर्वांगीण शिक्षण देऊन सुसंस्कृत केले होते. त्याआधी कै.श्रीमंत मुधोजीराजे यांनीही फलटण संस्थानमध्ये शिक्षणासाठी खूपच परिश्रम घेतले होते. त्यांनीच १८९३ मध्ये ₹ २२,००० खर्च करून फलटणमध्ये मुधोजी इंग्लिश स्कूल सुरू करून त्याची भव्य इमारतही बांधली.

श्रीमंत मालोजीराजे यांनी संस्थानचा कारभार आपल्या हाती घेतल्यावर संस्थानमधील शिक्षण खात्यावर लक्ष केंद्रीत केले होते. सन १९१८ मध्ये संस्थानात फक्त ३८ शाळा होत्या. एकच हायस्कूल होते. सर्व शाळा व हायस्कूल मधून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या फक्त १८९५ होती. म्हणजेच त्यांच्या दृष्टीने समाजाचा फार मोठा भाग अजूनही अज्ञानी होता. संस्थानमध्ये शिक्षणाचे महत्त्व वाढविले पाहिजे असे श्रीमंत मालोजीराजेंनी ठरवले. त्यानुसार फलटण नगर परिषद क्षेत्रामध्ये त्यांनी ९-९-१९१८ रोजी प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले. त्यामुळे फलटण नगर परिषदेच्या हद्दीत या कायद्यामुळे विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली. सहा वर्षे पूर्ण झालेल्या मुलांना त्यांचे पालक आपणहून शाळेत घालू लागले. त्यामुळे जशी मुलांची संख्या वाढली तशी फलटण शहरातली शाळांची संख्याही वाढली. मुधोजी हायस्कूलमध्येही विद्यार्थ्यांची संख्या वाढली. त्यावेळी श्रीमंत मालोजीराजेंनी मुधोजी हायस्कूल मधील मुलींना व हरिजनांना मोफत शिक्षण देण्याचा निर्णय घेऊन त्याच्या अंमलबजावणीकडे लक्ष देण्यासाठी त्यांनी श्रीमंत राणीसाहेब लक्ष्मीदेवी यांना सांगितले व त्यासाठी संस्थानने दिवाण रावसाहेब गोडबोले यांनाच संस्थानच्या शिक्षण खात्याचे प्रमुख नेमले.

फलटण संस्थान मधील सर्व विद्यार्थ्यांना मोफत शिक्षणाची सोय केली होती. परंतु तरीसुद्धा आर्थिकदृष्ट्या मागास गरीब विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे अशक्य होत होते हे

श्रीमंत मालोजीराजे यांना खटकत होते. म्हणून त्यांनी केवळ आर्थिकदृष्ट्या कमकुवत म्हणून शिक्षणापासून वंचित अशा विद्यार्थ्यांसाठी 'युवराज प्रतापसिंह गरीब विद्यार्थी शैक्षणिक फंड लि.' या नावाची सहकारी संस्था स्थापन केली. त्या मार्फत आपल्या संस्थान मधील शिक्षणाची इच्छा असणारा एकही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये याची दक्षता घेतली. एवढेच नव्हे तर आपल्या राजघराण्यातील लोकांनी संस्थानच्या फलटण शहरातील शाळेमध्ये शिक्षण घेतले पाहिजे तरच प्रजाजनांपुढे कृतीशील आदर्श ठेवता येईल. म्हणून त्यांनी आपली राजकन्या श्रीमंत अक्कासाहेब महाराज यांना मुधोजी हायस्कूलमध्ये दाखल केले होते. तिथेसुद्धा आपली राजकन्या म्हणून कोणत्याही विशेष सवलती, मान सन्मान न देता इतर सर्व मुलींच्यात मिळून मिसळूनच त्यांचे शिक्षण कसे होईल याकडेही श्रीमंत मालोजीराजे व राणीसाहेब लक्ष्मीदेवी यांनी विशेष लक्ष दिले. इतकेच नव्हे तर अक्कासाहेब ज्या वर्गात शिकत असत त्या वर्गाच्या पालक संमेलनासाठी ते 'राजा' म्हणून नव्हे, तर पालक म्हणून उपस्थित राहत असत. सर्वसामान्य पालकांप्रमाणे मुलांचे खेळ पाहणे, सहभोजन यातही सहभागी होत असत. मुधोजी इंग्लीश स्कूलचे १ जानेवारी १८९५ मध्ये मुधोजी हायस्कूल असे नामकरण करण्यात आले होते. त्यामुळे या शाळेवर श्रीमंत मालोजीराजेंचे खास प्रेम होते. म्हणून हे हायस्कूल कला, विज्ञान, क्रीडा याचे केंद्र व्हावे यासाठी त्यांचे सतत प्रयत्न चालू असत.

फलटण तालुक्यातील गरीब मुलांना शिक्षणासाठी फलटण येथे यावे लागत असे. त्यासाठी या विद्यार्थ्यांची फलटण येथेच राहण्याची सोय व्हावी म्हणून श्रीमंत मालोजीराजेंनी 'फलटण बोर्डिंग' हे वसतीगृह फलटण मधील राजवाड्या जवळ गजानन चौक येथे सुरू केले. मुधोजी हायस्कूलच्या प्रशासनाखाली सदर विद्यार्थी वसतिगृहाची देखरेख होत असे. श्रीमंत मालोजीराजे आपल्या वाढदिवसा दिवशी (म्हणजे दरवर्षी गणेश चतुर्थीला) वसतीगृहातील विद्यार्थ्यांसमवेत भोजन करीत असत. अर्थातच सर्व मुलांना या दिवशी गोडाधोडाचे पोटभर जेवण मिळत असे. खुद्द राजाच आपल्या पंक्तीला बसतो आहे हे बघून वसतीगृहातील विद्यार्थ्यांना मायेचा व वात्सल्याचा एक वेगळा अनुभव येत असे.

फलटण संस्थानमधील शिक्षण सर्वांगीण व समाजाच्या सर्व स्तरावर व्यापक

होण्यासाठी श्रीमंत मालोजीराजे यांनी १९३० साली स्वतंत्र शिक्षणमंत्री म्हणून श्री. एस. एम. दाणी, बी.ए.,एलएल.बी. यांची नियुक्ती केली होती. त्यामुळे शिक्षण खाते अधिक लोकाभिमुख झाले होते. त्यातच भर म्हणून श्रीमंत मालोजीराजे यांनी संस्थानतर्फे हुशार, गरीब, होतकरू मुलांना मालोजी शिष्यवृत्ती व मुलींना श्री लक्ष्मी शिष्यवृत्ती सुरू केल्या. त्यामुळे शाळांमध्ये मुलांची, विशेषतः मुलींची संख्या वाढत गेली.

१८९३ मध्ये कै.श्रीमंत मुधोजीराजे (चौथे) यांनी प्रारंभी मुधोजी इंग्लीश स्कूलची नवी इमारत (२२ हजार रु.ची) बांधून संस्थानमध्ये स्वतंत्रपणे प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाची सुरूवात केली होती. १ जानेवारी १८९५ ला याचे नामकरण मुधोजी हायस्कूल असे झाले. पुढे श्रीमंत मालोजीराजे यांनी या शाळेचा खूपच विकास केला. मुधोजी हायस्कूलवर त्यांचे पुत्रवत प्रेम होते. पुढे ८ मार्च १९४८ ला फलटण संस्थान भारतीय संघराज्यात (मुंबई इलाखा, पुढे महाराष्ट्र राज्य) सामील झाल्यानंतर संस्थानच्या सर्व कारभारासह संस्थानचे शिक्षण खातेही मुंबई सरकारकडे गेले. त्यात हे मुधोजी हायस्कूल होते. त्याची रूखरूख श्रीमंत मालोजीराजे यांना खूपच होती. संस्थान विलीन झाल्यानंतरच्या मंत्रिमंडळात श्रीमंत मालोजीराजेंचा समावेश बांधकाम मंत्री म्हणून झाला होता. सदर मुधोजी हायस्कूल हे फलटण संस्थानच्या जनतेचे महत्त्वाचे शिक्षण केंद्र होते. त्यामुळे सदर हायस्कूल जनतेसाठी म्हणून परत फलटणकरांना द्यावे असा हट्टच तत्कालिन मुख्यमंत्री कै.मोरारजीभाई देसाई यांचेकडे त्यांनी धरला व सतत या मागणीचा पाठपुरावा करत राहिले. या सातत्यामुळे शेवटी मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री ना.बाळासाहेब खेर यांनी या शाळेचा प्रत्यक्ष ताबा दिनांक १२ जून १९५१ रोजी एका पत्रान्वये दिला. आता ही शाळा सरकारच्या ताब्यातून मुक्त झाली. तथापि मग या शाळेचे प्रशासन कोणी करायचे असा प्रश्न निर्माण झाला. त्यावेळी फलटण परिसरातील शिक्षण कार्य व्यापक व गतीमान करण्यासाठी उदात्त हेतूने 'फलटण एज्युकेशन सोसायटी' या शिक्षण संस्थेची २७ फेब्रुवारी १९५१ रोजी स्थापना केली. रितसर या संस्थेला मान्यता व नोंदणीही मिळाली. सोसायटीचे तहहयात अध्यक्ष म्हणून श्रीमंत मालोजीराजे यांची निवड झाली. पहिले कार्यवाह म्हणून श्री. मा. म. दोशी तर संस्थेचे नियामक मंडळाचे अध्यक्ष म्हणून डॉ. द. म.

बर्वे यांची निवड झाली. फलटणच्या शिक्षण क्षेत्रातील हा क्रांतिकारक निर्णय होता. पुढे या शाळेचा फलटण एज्युकेशन सोसायटीला समारंभपूर्वक ताबा देण्याच्या ऐतिहासिक कार्यक्रमात मुख्यमंत्री ना.बाळासाहेब खेर यांनी दिनांक २५ ऑगस्ट १९५१ रोजी संस्थेचे अध्यक्ष म्हणून श्रीमंत मालोजीराजे यांचेकडे अधिकृत ताबा दिला. त्यानंतर या दिवसाची, ऐतिहासिक घटनेची स्मृती म्हणून हा २५ ऑगस्ट दिवस 'मुधोजी दिन' म्हणून आजतागायत संस्थेत व संस्थेच्या सर्व शाखेत समारंभपूर्वक विविध कार्यक्रमाने संपन्न होत असतो. अनेक विद्वान प्राचार्यांची या शाळेला परंपरा आहे. त्यातले एक गुणवत्तापूर्ण वैशिष्ट्य म्हणजे या शाळेचे एक प्राचार्य श्री. शं. के. कानिटकर उर्फ प्रसिद्ध कवि 'गिरीश' होते. १९५९ साली भारत सरकारने सर्व राज्यातून ज्यांनी शिक्षण क्षेत्रात बहुमोल कार्य केले आहे अशा प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांचा प्रथमच 'राष्ट्रीय आदर्श शिक्षक' पुरस्कार देण्याचे ठरविले होते. त्यावेळी संपूर्ण देशातून ३२ शिक्षकांची निवड झाली होती. त्यामध्ये फलटणच्या या मुधोजी हायस्कूलचे प्राचार्य श्री. शं. के. कानिटकर उर्फ कवि 'गिरीश' यांची निवड झाली होती. त्यांना तत्कालीन राष्ट्रपती डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या हस्ते दिनांक २५ जानेवारी १९५९ रोजी नवी दिल्ली येथे या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. श्रीमंत मालोजीराजे यांच्या आवडत्या हायस्कूलचा असा राष्ट्रीय सन्मान झाल्याचा त्यांना खूपच आनंद झाला होता.

***



फलटण येथील मुधोजी हायस्कूल, फलटण.

६. फलटण संस्थानमध्ये विद्वानांचे कौतुक

महाराष्ट्राच्या, देशाच्या विविध भागात, विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या विद्वानांना, मान्यवरांना फलटण संस्थानमध्ये बोलावून त्यांच्या कार्याचा, ज्ञानाचा आदर्श फलटणकरांसमोर ठेवायचा याची श्रीमंत मालोजीराजे यांना खूपच आवड होती. ते स्वतः समाजसुधारक होते. त्यामुळे त्यांना इतर समाजसुधारकांच्या बद्दल अभिमान व आदर वाटत असे.

निराधार व गरजू गरीब महिलांच्या शिक्षणासाठी, पुनर्वसनासाठी त्यावेळी महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे कार्य आदर्श असे होते. पुण्यामधील त्यांच्या कार्याची माहिती श्रीमंत मालोजीराजेंपर्यंत पोचली होती. त्यांचा ८२ वा वाढदिवस आपल्या संस्थानतर्फे व्हावा अशी त्यांची कल्पना होती. त्यानुसार त्यांनी महर्षी कर्वे यांना निमंत्रण दिले. त्यासाठी त्यांनी एक प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ रँग्लर र. पु. परांजपे, प्रसिद्ध विचारवंत, संपादक न. चिं. केळकर (तात्यासाहेब) यांनाही सन्मानासाठी बोलावले होते. तसेच प्रसिद्ध मराठी कवि डॉ.माधव त्र्यंबक पटवर्धन उर्फ माधव ज्यूलियन यांना मराठी भाषेच्या अभ्यासातील विद्या वाचस्पती (डि.लिट्.) पदवी मिळाल्याबद्दल त्यांचाही सन्मान करण्याचे ठरविले.

असा हा अभूतपूर्व समारंभ दिनांक १९ एप्रिल १९३९ रोजी फलटण येथे श्रीमंत मालोजीराजेंनी घडवून आणला. या समारंभाचे आणखी एक खास वैशिष्ट्य म्हणजे आपल्या संस्थानातील ज्या प्रजाजनांनी ८१ वर्षे पूर्ण केली आहेत त्यांचाही या समारंभात सत्कार करण्याचे श्रीमंत मालोजीराजेंनी ठरविले. त्यानुसार या समारंभात अशा ५१ प्रजाजनांना महर्षी अण्णासाहेब कर्वे यांच्या हस्ते चांदीचे मोठे भांडे देण्यात आले. प्रत्येकाचे नाव व समारंभाचा उल्लेख कोरून ही भांडी देण्यात आली. या समयसूचक दानशूरपणाबद्दल तिन्ही प्रमुख पाहुण्यांनी श्रीमंत मालोजीराजेंच्या या कल्पनेचे खास अभिनंदन केले.

या समारंभातून श्रीमंत मालोजीराजे यांची गुणग्राहकताही लक्षात येते. त्यादृष्टीने त्यांनी यावेळी केलेले भाषणही दिशादर्शक आहे. ते आपल्या भाषणात म्हणतात,

‘‘वास्तविक अशा मोठ्या महात्म्याला येथे स्वतःच्या घरी आणून त्यांचे स्वागत करण्याची इच्छा करणे यांत विशेष असे काय आहे ? परंतु या साध्या गोष्टीने देखील पुष्कळांचे कुतूहल सकारण अगर निष्कारण जागृत झालेले आम्हास आढळले म्हणून मी यासंबंधी थोडासा खुलासा करण्याची परवानगी घेतो. पुण्यास कर्व्यांचा ८१ वा जन्मदिन साजरा झाला, त्यात आपला थोडासा हातभार लावणे हा मार्ग आम्हाला मोकळा होता. परंतु पहिली गोष्ट म्हणजे तो मार्ग कर्व्यांच्या संबंधाने व त्यांच्या कार्यासंबंधाने आमची जी उत्कट व प्रेमाची भावना आहे, तिच्या दृष्टीने अत्यंत मामुली व विसंगत असा आम्हाला वाटला. दुसरी व विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे आमचे आमच्या प्रजाजनांवर जे प्रेम आहे, त्या दृष्टीने आम्ही जी जी चांगली गोष्ट करतो, तीत आमच्या बरोबरीने भाग घेण्याची संधी त्यांना मिळावी अशी आमची इच्छा असते. आम्हास वाटले की, कर्व्यांना येथे आणले म्हणजे ते कोण व कशा प्रकारचे गृहस्थ आहेत, त्यांचे जीवनकार्य कोणते व त्याकरिता त्यांनी काय केले आहे. या गोष्टी सहज आमच्या संस्थानच्या लोकांना कळतील. कारण आमच्या मते हे सर्व समजणे हेच एक प्रकारचे अप्रत्यक्ष पण मोठे शिक्षण आहे. त्यायोगे विचारांची प्रगती होते. शिवाय कर्व्यांच्या कार्याविषयी सहानुभूती व आस्था उत्पन्न होतात. परंतु या व्यावहारिक फायद्याखेरीज कर्व्यांसारख्या महात्म्याच्या दर्शनाने लोकांचा एक प्रकारचा आत्मिक फायदाही होतो अशी आमची समजूत आहे. अंतःकरणाची भूक व भावना या प्रत्यक्ष दर्शनाने जशा तृप्त व संतुष्ट होतात तशा त्या वर्णने ऐकून होत नाहीत. परमेश्वराचे स्वरूप काय असते याची कल्पना सर्व गीता ऐकून अर्जुनासारख्या श्रेष्ठ व सुसंस्कृत पुरुषासही आली नाही. त्यासाठी शेवटी श्रीकृष्णाला विश्वरूप दर्शनच अर्जुनाला द्यावे लागले व त्यानेच त्याचे मन अखेर शांत झाले. अशी जर

अर्जुनासारख्यांची स्थिती, मग सामान्य जनांची तशी असली तर त्यांत काय आश्चर्य ? पण कर्व्यांना येथे बोलावण्यात आणखी एक हेतू होता तो असा की, त्यांच्या कार्याला आमच्याकडून आजवर अल्पस्वल्प मदत झाली आहे ती किती सत्पात्री झाली आहे हेही आमच्या लोकांच्या लक्षात यावे व त्यायोगे त्यांना संतोष व्हावा. मला वाटते इतका खुलासा केल्यावर आम्ही कर्व्यांना येथे का आणले याचा सर्वांना पूर्ण उलगडा होईल.''

या समारंभात पाहुण्यांचा परिचय व पाहुण्यांचे स्वागत करण्याची जबाबदारी त्यावेळचे मुधोजी हायस्कूलचे प्राचार्य कविवर्य शं. के. कानेटकर उर्फ गिरीश यांच्यावर सोपविलेली होती. कवी गिरीश यांनी अत्यंत मोजक्या शब्दांत पण नेमकी ओळख करून दिली. ते म्हणाले, ''आजच्या या समारंभाला अपूर्व वैभव प्राप्त झाले आहे. विद्वानांचे राजांनी केलेले हे कौतुक अभूतपूर्व होय. दक्षिण महाराष्ट्रातील संस्थानातील या संबंधाचा इतिहास लिहिला गेल्यास त्यात आजचा हा प्रसंग सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल. उत्तम आदर्श व प्रत्यक्ष कृती जनतेपुढे ठेवाव्यात व त्यामुळे प्रजाजनांना ज्ञानाचा लाभ करून द्यावा हे श्रीमंत राजेसाहेबांचे ध्येय आहे. या समारंभाने श्रीमंतांनी जनतेपुढे तीन उच्च आदर्श ठेविले आहेत. गुरुवर्य कर्वे यांनी आजन्म महिलांच्या शिक्षणाचेच कार्य प्रामुख्याने केले आहे. आज या महत्त्वाच्या समारंभामुळे त्यांची ही कामगिरी फलटण संस्थानातील महिला वर्गाच्या मनावर बिंबणार आहे. डॉ.परांजपे यांना येथे आणून संस्थानचे वैभव व किर्ती वाढवावयाची असेल तर डॉ.परांजपे यांच्यासारखे व्हा, असा श्रीमंतांनी विद्यार्थ्यांना संदेश दिला आहे. श्री.केळकरांना येथे बोलावून श्रीमंतांनी प्रजाजनांना असाच आणखी एक संदेश दिला आहे. दोन्ही बाजू तपासून योग्य निर्णय देण्यात व सुवर्णमध्य साधण्यात श्री.केळकरांचा हातखंडा आहे. दोन्ही बाजू पारखून पूर्ण विचारांती योग्य तेच करा हे

सांगण्यासाठीच श्रीमंतांनी श्री.केळकरांना येथे आणले आहे असे मला वाटते.''

वरील समारंभ वैशिष्ट्यपूर्ण व्हावा म्हणून मालोजीराजे यांनी काही विशेष गोष्टी योजिलेल्या दिसतात. फलटण संस्थानातील ८० वर्षे वयाच्या सर्व स्त्री-पुरुषांना महर्षि आण्णासाहेबांच्या हस्ते प्रत्येकी एक मोठे चांदीचे भांडे देणगी दाखल देण्यात आले. या भांड्यावर ज्या प्रसंगी ते देण्यात आले त्या प्रसंगाचा उल्लेख व ज्याला ते देण्यात आले त्याचे नाव कोरले होते. अशा स्त्री पुरुषांची संख्या ५१ भरली. त्यावेळची फलटण संस्थानची लोकसंख्या फक्त ५८ हजार ७६१ होती.

दुसरी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे महर्षि कर्वे यांना एवढ्या समारंभाने बोलविले तेव्हा त्यांच्या कोणत्या संस्थेला किती देणगी देण्यात येणार याची पुण्याहून आलेल्या लोकांना व विशेषतः साहित्यिक वामन मल्हार जोशी यांना फार उत्सुकता वाटत होती. पण हा समारंभ अण्णासाहेबांच्या संस्थेप्रीत्यर्थ नसून व्यक्ती प्रीत्यर्थ होता हे त्यांच्या कोणाच्याच लक्षात आले नाही. याबाबत कमालीची गुप्तता ठेवण्यात आली होती. केवळ निरपेक्ष सार्वजनिक सेवेबद्दल तहहयात वर्षासन ही गोष्टच अपूर्व वाटण्याजोगी होती. महर्षि कर्वे यांना तहहयात ६०० रुपयांचे वर्षासन फलटण संस्थानामार्फत श्रीमंत मालोजीराजे यांनी जाहीर केले. अण्णासाहेबांनी ते वर्षासन स्वीकारले हे श्रीमंत मालोजीराजे व फलटणचे सुदैव होय.

हा सर्व समारंभ व्यवस्थित पार पडल्यानंतर या भावपूर्ण सत्कारास उत्तर देताना महर्षि आण्णासाहेब म्हणाले, ''गेल्या वर्षापासून माझे अनेक सत्कार झाले. परंतु आजच्या समारंभाचे माझ्या मनावर जे चित्र उमटले आहे तसे दुसऱ्या कोणत्याही समारंभाने उमटले नाही. हे मी प्रामाणिकपणाने सांगतो. खरोखर आज येथे जमला आहे अशा प्रकारचा समाज व श्रोता वर्ग मिळणे फार कठीण आहे. आज या प्रसंगी श्रीमंत राजेसाहेब व श्रीमंत राणीसाहेब यांचे आभार कसे मानावेत तेच मला समजत नाही. मला शब्द काही सापडत नाहीत. श्रीमंत राजेसाहेबांनी आज मला असे काही देण्याचे योजिले असेल अशी गोष्ट माझ्या स्वप्नात देखील नव्हती व आली

नसती. श्रीमंतांनी मला सालीना रु. ६०० पेन्शन देण्याचे ठरविले असून त्यापैकी पहिला चेक मी खिशातही घातला आहे. त्याचा विनियोग कसा करायचा ते मी मागाहून ठरवीन. माझ्या खाजगी खर्चाप्रीत्यर्थ या रकमेचा विनियोग व्हावा असे श्रीमंत राजेसाहेबांचे मला आग्रहाचे सांगणे आहे. मात्र श्रीमंत राजेसाहेबांनी आज जी ही देणगी दिली आहे तीत फलटण संस्थानच्या प्रजाजनांचा अंश आहे व त्यातला थोडाबहुत फायदा त्यांना मिळणार आहे, एवढे मी सध्या जाहीर आश्वासन देऊन ठेवतो.''

समारंभाचे अध्यक्ष डॉ.रँग्लर परांजपे आपल्या अध्यक्षीय समारोपाच्या भाषणात म्हणाले, ''आजचा समारंभ मनावर कायमचा ठसा उमटविणारा आहे. त्यात कल्पकता आहे. अण्णांची आदर्श मूर्ती प्रत्यक्ष आपल्या प्रजाजनांसमोर उभी करण्याची ही कल्पनाच पहा ना. पूर्वीच्या जमान्यातील मूकपट व हल्लींचे बोलपट यात जे अंतर तेच अंतर अण्णांबद्दल माहिती वाचणे व त्यांना प्रत्यक्ष पाहणे यात आहे. प्रत्यक्ष पाहिल्याने त्याचा अधिक परिणाम होतो. या समारंभाचा ठसा आपल्या मनावर चिरकाल राहील यात शंका नाही. आजच्या या समारंभातील दुसरी कल्पकता म्हणजे संस्थानातील ८० वर्षावरील वृद्ध मंडळींना पारितोषिके देण्याची. ही बक्षिसे दिली जात असता आम्ही फलटणचे प्रजाजन असतो तर किती बरे झाले असते असे मला वाटत होते. कारण त्यापैकी बरीच बक्षिसे आम्हीच मारली असती. परांजपे व कर्वे कुटुंबात ८० वर्षावरील बरीच मंडळी आहेत. असो. श्रीमंत राजेसाहेबांनी वृद्धांची आठवण करून त्यांना अण्णांच्या हस्ते पारितोषिके दिली हे आजच्या समारंभाचे एक प्रमुख वैशिष्ट्य होय. तसेच अण्णांना दरसाल रुपये ६०० चे तहहयात पेन्शन सुरू करणे ही श्रीमंत राजेसाहेबांनी केलेली तिसरी कल्पकतेची गोष्ट होय. शेवटी या

समारंभापासून आपण योग्य तो बोध घेऊन कार्यप्रवृत्त व्हाल अशी मला आशा आहे. उभयता श्रीमंतांचे मी या समारंभाबद्दल आभार मानतो. या समारंभासाठी जमलेला हा समाज पाहूनच आपल्या संस्थानची सर्वांगीण प्रगती तात्काळ लक्षात येते. पुण्या-मुंबईसारख्या पुढारलेल्या शहरातही ही गोष्ट दृष्टीस पडत नाही. आपल्या संस्थानची यापेक्षा अधिक प्रगती होवो अशी आशा व्यक्त करून व उभयता श्रीमंतांचे पुन्हा एकदा आभार मानून मी आपले भाषण संपवितो.''

अशा प्रकारे श्रीमंत मालोजीराजे यांना विद्वान, शास्त्रज्ञ, पंडित, साहित्यिक, कलावंत अशा थोर गुणी व प्रख्यात व्यक्तींशी सतत संबंध ठेवण्याची व वाढविण्याची मनापासून आवड होती. त्यासाठी ते वाटेल तेवढा खर्च करण्यास तयार असत. फक्त या व्यक्तींनी फलटणला आले पाहिजे याबद्दल मात्र त्यांचा आग्रह असे. त्यांचा ज्ञानाचा फायदा आपल्या प्रजेला झालाच पाहिजे, असे त्यांना वाटत असे. म्हणूनच त्यांनी महर्षी अण्णासाहेब कर्वे यांचा वाढदिवस उशीरा का होईना पण फलटणला साजरा केला. वेदशास्त्र संपन्न सदाशिवशास्त्री भिडे, सोनोपंत उर्फ मामासाहेब दांडेकर, संत गाडगे महाराज यांचेशी श्रीमंत मालोजीराजे यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. कलावंतामध्ये बालगंधर्व, सौ.हिराबाई बडोदेकर, भीमसेन जोशी, पंडित जसराज, श्रीमती पद्मा शाळीग्राम, गुंडोपंत वालावलकर, गोविंदराव टेंबे, खाँसाहेब, श्रीमती जानकी अय्यर अशा प्रसिद्ध गायकांचे श्रीमंत मालोजीराजे चाहते होते. शक्य होईल तेवढ्या कलावंतांना त्यांनी फलटणला आणले. कलावंत व त्यांची कला यांचे दर्शन फलटणच्या आपल्या जनतेला घडविले.

डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांची भेट :

भारताचे दुसरे राष्ट्रपती डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांनाही अशाच पद्धतीने श्रीमंत मालोजीराजे यांनी फलटण संस्थानमध्ये प्रजाजनांच्या भेटीसाठी आणले.

जून १९४१ मध्ये श्रीमंत मालोजीराजे त्यांच्या त्यावेळच्या मुंबईमधील वॉर्डन रोडवरील एका फ्लॅटमध्ये निवासास होते. ते काही कामानिमित्त पुण्यास जायला निघाले असतानाच त्याही गडबडीत त्यावेळच्या बनारस हिंदू विद्यापीठाचे कुलगुरु

डॉ.राधाकृष्णन अचानक तेथे आले. त्यांच्या विद्यापीठाला काही देणगी श्रीमंत मालोजीराजे यांच्याकडून मिळावी यासाठी विनंती करायला डॉ.राधाकृष्णन तिथे आले होते. श्रीमंत मालोजीराजे यांच्या दानशूरपणाची ख्याती अर्थातच संस्थानाबाहेरही अनेक ठिकाणी पोचली होती. ती ऐकूनच डॉ.राधाकृष्णन त्यांच्याकडे आले होते.

डॉ.राधाकृष्णन यांची विनंती श्रीमंत मालोजीराजे यांनी मान्य केली. तथापि त्यांनी त्यांना एक अट सांगितली की, तुम्ही त्यासाठी आमच्या फलटण संस्थानात आले पाहिजे. तिथे आम्हा सर्वांसमोर एक व्याख्यान द्यायला लागेल. कारण त्यामुळे तुमच्यासारख्या विद्वान व कर्तृत्ववान शिक्षण तज्ञाचा उपदेश व आपल्या बनारस हिंदू विद्यापीठाचे कार्यही फलटणकरांना माहित होईल. तसेच आम्ही दरबारातर्फे तुम्हाला द्यायच्या देणगीची लोकांना माहिती होईल. तो एकप्रकारे लोकमताचा पाठिंबा असेल.

अर्थातच कार्यबाहुल्यामुळे डॉ.राधाकृष्णन यांनी श्रीमंत मालोजीराजेंना नम्रपणे सांगितले की, मला बऱ्याच ठिकाणी जायचे आहे. त्यामुळे फलटणला आपल्याकडे येणे जरा कठीण दिसते. त्यावर श्रीमंत मालोजीराजे म्हणाले की, ठीक आहे. मी काय तुम्हाला द्यावयाचा चेक मी आत्तासुद्धा ताबडतोब तुम्हाला देऊ शकतो. पण तुमचे विद्वत्तापूर्ण चार शब्द ऐकण्याची व आपल्याला पाहण्याची संधी माझ्या प्रजाजनांना मिळाली तर मला बरे वाटेल. यावर श्रीमंत मालोजीराजेंची प्रजेबद्दल असणारी मातृतुल्य कळकळ, नम्र परंतु जिव्हाळ्याने केलेली अपेक्षा पाहून डॉ.राधाकृष्णन खरंच भारावून गेले व त्यांनी फलटणला येऊन व्याख्यान देण्याचे मान्य केले. अर्थातच श्रीमंत मालोजीराजे यांना खूप आनंद झाला.

त्याप्रमाणे २८ जुलै १९४१ रोजी डॉ.राधाकृष्णन यांनी फलटण संस्थानला भेट दिली. त्यावेळी श्रीमंत मालोजीराजे यांनी त्यांचे शाही स्वागत केले. डॉ.राधाकृष्णन यांनी मुधोजी हायस्कूललाही भेट दिली. आपल्या व्याख्यानात त्यांनी फलटण संस्थानच्या लोकशाही, समाजवादी व दूरदृष्टीच्या राज्यकारभाराबद्दल, संस्थानच्या सर्वांगीण प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले. ''पूर्व आणि पश्चिम भागाला जोडणारा सांस्कृतिक दुवा म्हणजे डॉ.राधाकृष्णन'' असे यावेळी श्रीमंत मालोजीराजे म्हणाले. त्यांनी फलटण संस्थानतर्फे डॉ.राधाकृष्णन यांना त्यांच्या कार्यासाठी रु. १०,००० ची

देणगी दिली.

फलटणच्या मुधोजी हायस्कूललाही विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या भेटी ते घडवित असत. त्यामध्ये प्रसिद्ध इतिहास संशोधक जदुनाथ सरकार यांनी २ जानेवारी १९३२ रोजी या विद्यालयाला भेट दिली तेव्हा प्रशस्त इमारत, विद्यार्थ्यांची व विशेषतः मुलींची मोठी संख्या व गुणीजन तत्पर शिक्षक वर्ग पाहून ते खूपच प्रभावी झाले होते. प्रसिद्ध साहित्यिक, स्वातंत्र्यसेनानी परमपूज्य पांडुरंग सदाशिव उर्फ साने गुरुजी यांनी १९४६ साली मुधोजी हायस्कूलला भेट देऊन या शाळेचा 'आदर्श शाळा' असा गौरव केला होता. त्यांनी विद्यार्थ्यांसमोर मूर्तिमंत कारुण्य व ओतप्रोत भक्ती भावनेतून भाषण केले होते. फलटणचे अनेक नागरिकही यावेळी उपस्थित होते.

संत गाडगेबाबांनाही मदत :

श्रीमंत मालोजीराजे यांची संत गाडगेबाबांच्यावर अपार श्रद्धा होती. गाडगेबाबांचेही श्रीमंत मालोजीराजेंवर मनापासून प्रेम होते. ह्या प्रेमापोटीच गाडगेबाबांनी पंढरपूर येथील मराठा धर्मशाळेवर श्रीमंत मालोजीराजे यांना आग्रहाने विश्वस्त म्हणून घेतले होते. म्हणूनच महाराष्ट्राची भाग्यलक्ष्मी असा ज्या धरणाचा उल्लेख होतो त्या कोयना धरणाच्या भूमीपूजनासाठी श्रीमंत मालोजीराजेंनी मुंबईचे मुख्यमंत्री मोरारजीभाई देसाई यांचेबरोबर खासकरून गाडगेबाबांनाही निमंत्रित केले होते. मोरारजीभाई देसाई यांच्या हस्ते धरणाचे भूमीपूजन झाले तर श्रीमंत मालोजीराजेंच्या आग्रहास्तव गाडगेबाबांनी कोयनामाईची खणा-नारळाने ओटी भरली होती.

गाडगेबाबा मुंबईला आल्यानंतर बऱ्याचवेळा श्रीमंत मालोजीराजेंच्या बंगल्यावर जात असत. श्रीमंत मालोजीराजेंनी आग्रह केला तरी ते बंगल्यात मुक्काम करायचे नाहीत, तर बंगल्याच्या औट हाऊसमध्ये ते राहायचे. गाडगेबाबांच्या शेवटच्या काळातील आजारपणात श्रीमंत मालोजीराजेंनी खूपच परिश्रम घेतले होते. पण गाडगेबाबा हट्टी होते व ते डॉक्टरांना बोलावू नका असे हट्टाने सांगायचे. मग त्यांच्या जवळच्या सहकाऱ्यांचा नाईलाज होत असे. त्यावेळी श्रीमंत मालोजीराजे त्यांची समजूत काढत असत. त्यांनी सांगितल्यावरून ते नाखुषीने मुंबईच्या सेंट जॉर्ज हॉस्पिटलमध्ये दाखल व्हायचे व बरे झाले की पुन्हा त्यांची भ्रमंती सुरू व्हायची. असे

त्यांचे भावस्पर्शी नाते होते. गाडगेबाबांच्या अनेक कार्यक्रमांना श्रीमंत मालोजीराजे मदतही करायचे व त्यांच्या विधायक कार्यक्रमालाही जायचे.

सर्वधर्मियांशी सलोख्याचे संबंध :

फलटण संस्थानमध्ये हिंदू धर्मियांशिवाय महानुभाव पंथ, मुस्लीम समाज, जैन समाज यांचेही वास्तव्य होते. या सर्वांना त्यांच्या धार्मिक कार्यासाठी, प्रार्थनास्थळांसाठी श्रीमंत मालोजीराजे यांनी सढळ हाताने मदत केली आहे. फलटणमधल्या मारवाडी समाजाचे दैवत असलेल्या श्री बालाजी यांचे मंदिर व त्यासाठी त्यांच्या देवस्थान ट्रस्टला शेकडो एकर जमीन त्यांनी दान म्हणून दिली होती. मुस्लीम समाजाच्या मशिदीसाठीही त्यांनी संस्थानची सरकारी जमीन दिली होती. महानुभाव पंथियांची देशात प्रसिद्ध असलेल्या 'घोड्याची यात्रा' फलटणमध्येच भरत असते. श्रीमंत मुधोजीराजे व नंतर श्रीमंत मालोजीराजे यांनी या पंथासाठीही जमिनी दिल्या. जैन समाजालाही धार्मिक प्रार्थनास्थळासाठी त्यांनी जमिनी दिल्या. या सर्व धर्मियांच्या उत्सवात, मिरवणुकीत श्रीमंत मालोजीराजे स्वतः सहभागी व्हायचे.

जैन समाजाच्या दृष्टीने ऐतिहासिक असा क्षण म्हणजे महात्मा गांधींची फलटण भेट. फेब्रुवारी १९२६ मध्ये (माघ महिन्यात) दिगंबराचार्य चारित्र्य चुडामणी चारित्र्य चक्रवर्ती महान तपस्वी मुनी आचार्य शांतीसागरजी महाराज यांचे फलटणमध्ये प्रथम आगमन फार मोठ्या भव्य स्वरूपात झाले होते. त्यावेळी आचार्यश्रींच्या प्रवचनासाठी नित्य नियमाने श्रीमंत मालोजीराजे उपस्थित असत. आचार्य श्रींचा विहार व त्याच मंडपामध्ये महात्मा गांधींचे आगमन झाले होते. त्यावेळी त्यांचे जैन समाजातर्फे आणि फलटण संस्थानतर्फेही भव्य स्वागत करण्यात आले होते. गांधीजींची निवास व्यवस्था संस्थानच्या अतिथी भवनमध्ये केली होती. महात्मा गांधींचा दर्शन मंडपामध्ये भव्य सत्कार झाला, त्यावेळीही श्रीमंत मालोजीराजे खास उपस्थित होते. सत्कारानंतर महात्मा गांधी व श्रीमंत मालोजीराजे यांची १५ मिनिटे चर्चाही झाली होती. तेव्हापासून म.गांधी यांच्या विचारांचा प्रभाव श्रीमंत मालोजीराजेंच्यावर पडला होता.

पुढे महात्मा गांधींच्या भेटीची स्मृती फलटणकरांसमोर कायम राहावी यासाठी

त्यांनी श्रीराम सहकारी साखर कारखान्याच्या सहकार्याने अध्यक्ष श्रीमंत शिवाजीराजे नाईक निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली महात्मा गांधींचा पूर्णाकृती पुतळा फलटणमधील एका प्रमुख अशा गजानन चौकात उभारला. १५ ऑगस्ट १९७० मध्ये मोरारजीभाई देसाई यांच्या हस्ते व श्रीमंत मालोजीराजे यांच्या अध्यक्षतेखाली या पुतळ्याचे अनावरण झाले.

ब्रह्मश्री दत्त महाराज, कविश्वर पू. पतसीबाबा कारखानीस, मामा देशपांडे, बालयोगी ओतुरकर महाराज, जितेंद्र अभिषेकी, हिराबाई बडोदेकर, कै.कृष्णराव फुलंब्रीकर, पंडित जसराज, श्रीमती पद्मा शाळीग्राम, कै.गुंडोपंत वालावलकर, श्रीमती जानकी अय्यर, कै.गोविंदराव टेंबे, गोहर कर्नाटकी इत्यादी सत्पुरुषांच्या संगीताचा व त्यांच्या अमृतवाणीचा लाभ फलटणकरांना लाभला होता.

प्रसिद्ध कादंबरीकार श्रीयुत ना.ह.आपटे (१९४१) यांचे फलटण येथे 'उत्कृष्ट वाड्.मयाची कसोटी' या विषयावरील विचार ऐकण्याची संधी फलटणकरांना मिळाली होती. प्रसिद्ध विचारवंत डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे, २५ डिसेंबर १९४१ मध्ये 'प्रभात'चे म्युझिकल डायरेक्टर श्रीयुत वसंतराव देसाई, तसेच सर्व्हंटस ऑफ इंडिया सोसायटीचे कै.डॉ.हृदयनाथ कुंझरु, न. चिं. उर्फ तात्यासाहेब केळकर, म.म.दत्तोवामन पोतदार, कै.अ.वि.पटवर्धन, वेदशास्त्र संपन्न सदाशिव शास्त्री भिडे, शं.श्री.देव (धुळे), प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ कै.धनंजयराव गाडगीळ, वि.द.घाटे, वामन मल्हार जोशी व गोपीनाथ तळवळकर आदींचे विचार ऐकण्याची संधी फलटणकरांना मिळाली.

कोलंबिया विद्यापीठाच्या विद्यार्थिनी व संस्कृतच्या डॉक्टरेट मिस डॉ.फ्रान्सिस विल्सन (६ जुलै १९६०), प्रसिद्ध विचारवंत ग.प्र.प्रधान (मी ऐकलेले वक्ते) डॉ.भा.गो.बापट, विस्तार सेवा अधिकारी, भारत सरकार, श्री.य.दि.पेंढारकर तथा कवि यशवंत (सन १९६१), कवि माधव ज्युलियन, प्रा.वसंत कानेटकर, मुधोजी हायस्कूलच्या शिक्षिका सुमति वेलणकर (यांच्या 'वावटळ' या कादंबरीस मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाचा पुरस्कार मिळाला होता. ७ जुलै १९६०), थोर साहित्यिक गोपीनाथ तळवळकर, सर मिर्झा इस्माईल, बॅरिस्टर जयकर, सर अकबर हैदरी, सर कृष्णामाचारी, डॉ.सरोजनी नायडू, रँगलर डॉ.र.पु.परांजपे, सौ.आनंदीबाई जोशी,

श्रीमती अमृता कुंवर, प्रसिद्ध साहित्यिक प्रा.अनंत काणेकर, नटसम्राट बालगंधर्व, प्रसिद्ध इतिहास संशोधक ग.ह.खेर, श्री.महादेवशास्त्री जोशी, मुंबई राज्याचे तत्कालीन शिक्षण विभाग सचिव मा.पी.जे.चिन्मुळगुंद, मुधोजी हायस्कुलचे माजी विद्यार्थी ज्यांना भारत सरकारने त्यांच्या निरलस समाज सेवेबद्दल 'पद्मविभूषण' देवून सन्मानित केले होते ते श्री.गणेश गोविंद तथा काकासाहेब कारखानीस अशा अनेक विभूतींना राजेसाहेबांनी निमंत्रित करुन त्यांचे महनीय विचार ऐकण्याची संधी आपल्या प्रजाजनांना करुन दिली. त्यांच्या पदस्पर्शाने निश्चितच फलटण भूमी पुनीत झाली आहे.

अलिकडच्या काळातील पंडित वसंतराव गाडगीळ (संस्कृत व्याख्यान १२ फेब्रुवारी १९६५), साहित्य परिषदेशी सातत्याने निगडीत असलेले व्यक्तीमत्त्व व संतवाङ्.मयाचे गाढे अभ्यासक हेमंत वि. इनामदार, मराठी विश्वकोशाचे जनक तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, वेदशास्त्र संपन्न श्री.पारीख शास्त्री, ह.भ.प. वामनशास्त्री पुजारी, कवी नारायण सुर्वे, कादंबरीकार शंकर पाटील, प्रा.वसंत कानेटकर, ग्राहक चळवळीचे जनक बिंदु माधव जोशी, इतिहासकार बाबासाहेब पुरंदरे, प्रा.प्र.के.अत्रे, थोर विचारवंत यशवंतराव मोहिते, द.मा.मिरासदार, प्रसिद्ध विचारवंत गं.बा.सरदार, डॉ.सरोजनी नायडू, नरुभाऊ लिमये, स्वा.सै.देशभक्त तुळसीदासजी जाधव, महाराष्ट्राचे माजी मंत्री रत्नाप्पा कुंभार, ग.दि.माडगूळकर, कै.सरदार वल्लभभाई पटेल स्मारक समितीचे जनरल सेक्रेटरी दत्तात्रय उर्फ नानासाहेब कुंटे, कै.स्वामीकार रणजित देसाई, डॉ.भूषण पटवर्धन, भारती विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ.उत्तमराव भोईटे, शिक्षणतज्ज्ञ डॉ.एम.एस.गोसावी (नाशिक), कथाकथनकार आप्पासाहेब खोत, योगाचार्य रामदेवबाबा, थोर समाजसेवक आण्णा हजारे, आर्ट ऑफ लिव्हींगचे श्री.श्री.रवीशंकर महाराज, प्रवचनकार तरुण सागरजी महाराज, साहित्यिक श्रीपाल सबनीस, समाजसेवक डॉ.प्रकाश आमटे व सौ.मंदा आमटे, अनाथांच्या माई सिंधुताई सपकाळ, जगत्‌गुरु शंकराचार्य, माजी सनदी अधिकारी अविनाश धर्माधिकारी, पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ.श्रीधर गुप्ते, विंदा करंदीकर, शंकरराव खरात, अखिल भारतीय साहित्य संस्कृती मंडळाचे माजी अध्यक्ष रमेश मंत्री, डॉ.आ.ह.साळुंखे, प्रसिद्ध लेखक रविंद्र भट, दैनिक लोकसत्ता, पुणेचे निवासी

संपादक अनिल टाकळकर, म.सा.प.पत्रिकेचे संपादक वि.स.वाळिंबे असे कितीतरी मान्यवर फलटण नगरीमध्ये आले होते. त्यांनी आपल्या मौलिक विचारांनी, रसिकवाणीने रसिकांना मंत्रमुग्ध तर केलेच परंतू त्याचबरोबर समाजप्रबोधनाचेही कार्य केले.

खरं तर अशा विविध विषयांच्या विचार मंथनातून वेगवेगळ्या विषयांची जनजागृती निर्माण होण्यास मदतच झाली आहे.

फलटण संस्थान खरोखरच रयतेवर जिवापाड प्रेम करणारे, रयतेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी झटणारे होते. श्रीमंत राजेसाहेब तर साक्षात सरस्वतीचे वरदान लाभलेली ज्ञान रसाची महान विभूती होती. त्यांच्या कार्यकाळामध्ये खरोखरच अनेक तपस्वींचे, महात्म्यांचे, थोर विचारवंतांचे पदस्पर्श फलटण नगरीला झाले हे फलटणकरांचे पुण्यकर्मच होय.

***



डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांची फलटण भेट.
समवेत श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर व मान्यवर.

७. फलटण संस्थानमधील महिलांचे संघटन

श्रीमंत मालोजीराजे यांचे संस्थानमधील लोकशाही, रस्ते, वीज, पाणी, वाहतूक, कृषि, उद्योग, शिक्षण, इत्यादी क्षेत्रात प्रगतीची घोडदौड चालू असताना त्यांच्या लक्षात आले की, संस्थानमधील महिला वर्गही संघटित झाला पाहिजे. नवनव्या सुधारणांची माहिती महिलांना मिळाली तर घराघरातून प्रगती होण्यास मदत होणार आहे. म्हणूनच त्यांनी संस्थानमधील शिक्षणात मुलींना संपूर्ण फी माफ करून शिवाय त्यांना राणी लक्ष्मीदेवी शिष्यवृत्तीही दिल्या. स्वतःच्या राणीसाहेबांची ७०० वर्षे चालत आलेली खानदानी पडदा पद्धत बंद करून त्यांना आपल्या राज्यारोहण समारंभात उघडपणे आपल्याबरोबर दरबारात आणून त्यांनी महिलांच्या क्रांतीचा श्रीगणेशा केला होता.

महिलांच्या, विशेषतः ग्रामीण भागातील, आरोग्याचे फार मोठे प्रश्न होते. त्यातच खेडोपाडी महिलांच्या आरोग्याबाबत अंधश्रद्धेचाही पगडा होता. सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यांच्या बाळंतपणाबाबत नव्या आरोग्य सुधारणांची नांदी आपल्या संस्थानमध्ये सुरू व्हावी यासाठी श्रीमंत मालोजीराजे आणि प्रामुख्याने राणीसाहेब लक्ष्मीदेवी फार आग्रही होत्या. संस्थानात महिलांचे शिक्षण व आरोग्याबाबत संघटन करीत असतानाच या प्रश्नाकडे राणीसाहेबांचे लक्ष वेधले. त्यासाठी त्यांनी फलटणमध्ये सगुणामाता मॅटर्निटी हॉस्पिटल १७ सप्टेंबर १९२८ मध्ये सुरू केले. संस्थानमधील, विशेषतः ग्रामीण भागातील महिलांना बाळंतपण व आवश्यक उपचार या दवाखान्यातून मोफत मिळायची सोय केली होती.

महिलांचे आणखी प्रश्न सोडविण्यासाठी त्यांचे योग्य प्रकारे संघटन झाले पाहिजे असा श्रीमंत मालोजीराजेंचा आग्रह होता. त्यांनी राणीसाहेबांना याकामी लक्ष घालण्यासाठी प्रोत्साहन दिले. त्यानुसार त्यांनी १७ मार्च १९३७ रोजी संस्थानमध्ये महिला मंडळाची स्थापना केली. पुढे ३१ जुलै १९३७ ते २ ऑगस्ट १९३७ अशी ३ दिवसांची अखिल भारतीय महिला परिषदेच्या स्थायी समितीची अर्ध वार्षिक बैठक फलटण येथे श्रीमंत मालोजीराजे व राणीसाहेब यांच्या पुढाकाराने आयोजित केली

होती. या बैठकीसाठी राजकुमारी अमृत कुँवर, सौ.अम्मू स्वामीनाथन, सौ.हंसाबेन मेहता, आदी अखिल भारतीय पातळीवरील पदाधिकारी उपस्थित होत्या. त्यामध्ये राणीसाहेबांनी स्थापन केलेल्या 'फलटण संस्थान महिला मंडळ' ही परिषदेची अधिकृत शाखा म्हणून त्यांना मान्यता देण्यात आली. स्वतः राणीसाहेब या महिला मंडळाच्या पदसिद्ध अध्यक्षा होत्या. त्या काळात २३५ महिला या मंडळात सदस्य झाल्या होत्या. ही एकप्रकारे महिला क्षेत्रातील क्रांतीच होती. नुसती संघटना स्थापन करून राणीसाहेब थांबल्या नाहीत, तर त्यांनी महिला पदाधिकाऱ्यांना बरोबर घेऊन संस्थानमधल्या गावोगावी जाऊन महिलांचे प्रश्न समजून घेतले. शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी प्रमुख खेड्यांमध्ये व्याख्याने आयोजित केली. संस्थानमधील पिंपरद येथे साक्षरतेचे वर्ग सुरू केले. तसेच महिला, मुली यांच्यात वाचनाची आवड निर्माण व्हावी यासाठी राणीसाहेबांनी महिला मंडळामार्फत फलटण, पिंपरद, गुणवरे येथे वाचनालये सुरू केली. स्वतःच्या मुधोजी मनमोहन राजवाड्यामध्ये त्यांनी १९३६ पासून प्रौढ स्त्रियांसाठी शिक्षण वर्ग सुरू केले होते. स्वतःच्या मुलीला, युवराज्ञी सरोजिनीदेवी यांनाही त्यांनी शिक्षणासाठी फलटणमधील व्यंकटेश विद्यालयात घातले होते. मुलींना स्वसंरक्षणासाठी व व्यायाम म्हणून लाठी शिक्षणासाठीही त्यांनी प्रोत्साहन दिले. त्यासाठी त्यांनी लाठी प्रशिक्षण वर्ग राजवाड्यामध्येच सुरू केला व त्यासाठी त्यांनी शाहीर नानिवडेकर यांना या प्रशिक्षणाची जबाबदारी दिली होती. त्या काळात ३० मुलींनी हे प्रशिक्षण घेतले होते. तसेच हिंदी भाषेच्या अभ्यासासाठीही तीन-तीन महिन्यांचे त्यांनी अभ्यासवर्ग सुरू केले होते. महिलांना घरच्या घरी काही औषधोपचार तातडीने करता यावेत यासाठी त्यांनी प्रथमोपचार वर्गही सुरू केले होते. महिलांना जीवनावश्यक वस्तू रास्त भावात घेता याव्यात यासाठी त्यांनी महिला मंडळामार्फत महिला सहकारी सोसायटीही सुरू केली होती.

आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस सोसायटीचे काम दक्षिण व पश्चिम मुंबई इलाख्यामध्ये कोल्हापूर संस्थानमध्ये तेथील ब्रिटीश निवासी अधिकारी एडवर्डस यांच्या पत्नी मिसेस एडवर्डस पाहत होत्या. त्यांची शाखा फलटणमध्ये सुरू व्हावी यासाठी त्यांनी राणीसाहेबांना विनंती केली होती. ती मान्य करून त्यांनी फलटणला अशी शाखा सुरू

केली. या शाखेचे उद्घाटन मिसेस एडवर्ड यांच्या हस्तेच झाले. या संस्थेमार्फत युद्धात जखमी झालेल्या सैन्यांना मदत, कपडे, औषधे दिले जात असे.

संस्थानमधील महिलांच्या संघटनेकडे, जागृतीकडे आस्थेने पाहत असतानाच श्रीमंत मालोजीराजेंनी या चळवळीसाठी दरबारतर्फे खूपच सहकार्य केले. फलटण संस्थानमध्ये सुशिक्षित झालेल्याच स्त्रियांना मतदानाचा हक्क दिला. त्यामुळे फलटण संस्थान कायदे मंडळात १ जागा स्त्रियांसाठी राखीव ठेवल्या. त्या जागेवर या नव स्त्री मतदारांमधून एका महिलेला निवडून द्यायची तरतूद केली. तसेच महिला मंडळासाठी दरबारतर्फे रु. ५०० अनुदानही सुरू झाले. फलटण संस्थान लोकल बोर्डमधून रु. ३०० व दि लक्ष्मी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. यातून रु. १०० अशीही मदत श्रीमंत मालोजीराजेंनी मंजूर केली होती. राणीसाहेबांचे हे सर्व फलटण संस्थानातील महिलांचे गतिमान काम लक्षात घेऊन इंग्लंडचे बादशहा चौथे जॉर्ज यांनी श्रीमंत राणीसाहेबांना सुवर्णपदक व प्रथम दर्जाच्या कैसर - ई - हिंद पदकाने ९ जून १९३८ रोजी गौरविण्यात आले. श्रीमंत मालोजीराजांनी महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या हिंगणे स्त्री शिक्षण संस्थेच्या पुणे येथील सेवासदन संस्थेला रु. १०,००० ची देणगी सन १९४०-४१ मध्ये दिली होती. या संस्थेच्या कार्यातही राणीसाहेबांचा सक्रीय सहभाग होता. काही काळ त्या 'सेवासदन' च्या अध्यक्षाही होत्या.

श्रीमंत राणीसाहेब स्वतः खूप धार्मिक प्रवृत्तीच्या होत्या. ज्ञानेश्वर माऊलींवर त्यांची अतोनात भक्ती होती. आळंदी-पंढरपूर अशी संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी फलटणवरून जात असे. परंतु श्रीमंत राणीसाहेबांच्या खास आग्रहास्तव हा पालखी सोहळा फलटण संस्थानच्या राजधानी म्हणजे फलटण शहरातून पुरातन अशा श्रीराम मंदिर वरून व नंतर राणीसाहेबांच्या आग्रहास्तव श्रीमंत मालोजीराजेंनी बांधलेल्या श्री ज्ञानेश्वर माऊलींच्या मंदिरावरून जाऊ लागली.

फलटण संस्थानतर्फे खास प्रतिनिधी म्हणून राणीसाहेब अहमदाबाद येथे भरलेल्या अखिल भारतीय स्त्री परिषदेला उपस्थित राहिल्या होत्या. फलटण संस्थानमध्ये महिला मंडळाच्या माध्यमातून होत असलेल्या स्त्री उन्नती विषयक कार्याची त्यांनी सविस्तर माहिती या परिषदेत दिली. त्यामुळे त्यांच्या कार्याची माहिती व महती देशस्तरावर गेली. त्याचाच परिणाम म्हणून पुन्हा १९३७ मध्ये अहमदाबाद येथेच

एच-१५५
४

झालेल्या दुसऱ्या अखिल भारतीय स्त्री परिषदेच्या अध्यक्षा म्हणून त्यांना बहुमान मिळाला. फलटण संस्थान विलीन झाल्यानंतर सुद्धा राज्य, देश व फलटण स्तरावर महिलांच्या उन्नतीचे काम सुरूच ठेवले होते. पुढे त्यांच्या पुढाकारानेच १९५५ ला फलटणमध्ये अखिल भारतीय स्त्री परिषद भव्य प्रमाणात यशस्वी झाली होती. या परिषदेसाठी तत्कालिन अखिल भारतीय काँग्रेसच्या अध्यक्षा श्रीमती इंदिरा गांधी खास विमानाने फलटणला आल्या होत्या.

संतश्री ज्ञानदेवांबद्दल कृतज्ञता :

श्रीमंत मालोजीराजे दोन वेळा परदेशी म्हणजे लंडनला गेले होते. पण लंडनमधील गोलमेज परिषदेच्या संदर्भात हे जाणे होते. पण त्यांनी आपल्या श्रीमंत राणीसाहेबांना कधी आपल्याबरोबर परदेशी नेले नव्हते. पण जून १९४७ मध्ये त्यांनी श्रीमंत राणीसाहेब व त्यांचे एक चिरंजीव श्रीमंत उदयसिंहराजे यांना अमेरिकेला पाठविले होते. त्यावेळी श्रीमंत मालोजीराजे यांचे द्वितीय सुपुत्र श्रीमंत शिवाजीराजे अमेरिकेत शेती विषयक उच्च शिक्षणासाठी गेले होते. त्यांना भेटण्यासाठी श्रीमंत राणीसाहेब निघाल्या होत्या. त्यावेळी जाताना कराची विमानतळावरून पुढे जाताना मध्यरात्री त्यांच्या विमानाला अपघात झाला. जबरदस्तीने ते विमान बैरूतला उतरावे लागले. पण या अपघातात श्रीमंत राणीसाहेबांच्या हातात ज्ञानेश्वरी होती. प्रवासात या ज्ञानेश्वरीचे वाचन करीत होत्या. या विमान अपघातातून त्या वाचल्या. आपण 'ज्ञानेश्वरी' मुळेच वाचलो असा त्यांचा दृढ विश्वास होता. श्रीमंत मालोजीराजेंना ही अपघाताची बातमी मिळाल्यावर ते लगेचच मिडल ईस्टचा (मध्यपूर्व) व्हिसा काढून बरोबर १ लाख रुपये घेऊन कराचीला गेले. तोपर्यंत राणीसाहेब व श्रीमंत उदयसिंहराजे बैरूतहून पुन्हा कराचीला आले. ते दोघे सुखरूप आहेत हे स्वतःच्या डोळ्यांनी बघितल्यावर श्रीमंत मालोजीराजे यांना आनंदाश्रूंनी भरून आले होते. ते म्हणाले, ''हात-पाय मोडला असता, अगर डोळा जरी फुटला असता, तरी चालले असते. पण दोघांचाही जीव वाचला, तुम्ही सुखरूप आलात त्यामुळे मला देवाचेच अत्यंत उपकार वाटतात व मला फार-फार आनंद झाला आहे.'' राणीसाहेब ज्या म्हणत होत्या की, ''आम्ही ज्ञानेश्वर माऊलींमुळेच वाचलो''. त्यावर श्रीमंत मालोजीराजे यांचा विश्वास बसला होता. या राजाने यापूर्वी कधीही देवावर, जुन्या

चालीरितीवर, पूजाअर्चा, रूढी परंपरेवर विश्वास ठेवला नव्हता हे विशेष आहे. तसेच त्यानंतर ते नित्यनियमाने 'ज्ञानेश्वरी'चे वाचन करीत होते.

श्रीमंत राणीसाहेबांच्या संत ज्ञानेश्वर माऊलीवरील श्रद्धेमुळे त्या नेहमीच आळंदी वारीला जात असत. एकदा १९७२ मध्ये श्रीमंत मालोजीराजे खूपच आजारी होते. सर्वांचाच धीर सुटला होता. डॉक्टरही पराकाष्ठेचे उपचार करीत होते. त्याच दिवशी आळंदीची वारी होती. आता वारी चुकणार की काय असे सर्वांनाच वाटत होते. जवळच्या सर्वच नातेवाईकांनी, मुलांनी सर्वांनीच सांगितले की, अशा अवस्थेत श्रीमंत मालोजीराजेंना सोडून जाऊ नका. परंतु कसलाही विचार न करता माऊलींवर सर्व काही सोडून त्या तातडीने आळंदीला गेल्या. माऊलींना साकडे घातले व परत आल्या. त्यानंतर खरंच श्रीमंत मालोजीराजेंना बरे वाटले.

ज्ञानेश्वर माऊलींवरची राणीसाहेबांची अतूट श्रद्धा लक्षात घेऊन श्रीमंत मालोजीराजेंनी संत ज्ञानेश्वर माऊलींचे मंदिर फलटणमध्ये लक्ष्मीनगर भागात बांधले. या मंदिरात त्यांनी ज्ञानेश्वर माऊलींची संपूर्ण संगमरवरी देखणी मूर्तीही बसविली. त्यांच्या मंगल व पवित्र अशा पादुकांचीही प्रतिष्ठापना केली. हे ज्ञानेश्वर मंदिर एक प्रकारे फलटणचे अध्यात्मिक वैभवच आहे.

***



फलटण येथील श्री ज्ञानेश्वर मंदीर.



ज्ञानेश्वर मंदिरातील माऊलींची संगमरवरी मूर्ती.

८. अन्य संस्थांनाही सढळ हाताने मदत

श्रीमंत मालोजीराजे यांची दानशूरता वैयक्तिक स्वरूपाची तर होतीच, पण अन्य सार्वजनिक, शिक्षण संस्था, संशोधन संस्था, मंडळे यांनाही त्यांनी सढळ हाताने मदत दिली होती. खालील संस्था व व्यक्ती यांना श्रीमंत मालोजीराजेंनी त्यांच्या कार्यासाठी आर्थिक सहकार्य केले होते. ते खालीलप्रमाणे -

१) भांडारकर ओरिएन्टल रिसर्च इन्स्टिटट्यूट, पुणे. २) मुधोजी क्लब, फलटण. ३) व्हिक्टोरिया डायमंड ज्युबिली लायब्ररी, फलटण. ४) सुगणामाता मॅटर्निटी होम, फलटण. ५) डॉ.सी.ई. वेल, मिशन हॉस्पिटल, मिरज. ६) सेवासदन बिल्डींग, नर्सिंग, मेडिकल एज्युकेशन, पुणे. ७) के.एस. पंडित, गायक, ग्वाल्हेर. ८) व्हिक्टोरिया राणी भूकंप निधी, दिल्ली. ९) वैदिक संशोधन मंडळ, पुणे. १०) प्राचार्य गोविंद चिमाजी भाटे, पुणे. ११) के.एन. पटवर्धन, पुस्तकासाठी, पुणे. १२) प्राचार्य वि.का.राजवाडे धुळे, इतिहास संशोधन मंडळासाठी. १३) प्रा.एन.के. घारपुरे, पुस्तकासाठी, पुणे. १४) लक्ष्मण दत्तात्रय जोशी, पुणे पुस्तकासाठी. १५) सदाशिव रामचंद्र गोडबोले, पुस्तकासाठी, पुणे. १६) मास्टर अनंत केशव कोगजे, गायक, जबलपूर. १७) इंजिनिअर एस.वाय. जोशी, मळवली (लोणावळा) पुस्तकासाठी. १८) वासुदेव कृष्ण भावे, पुणे पुस्तकासाठी. १९) के.के. अय्यंगार, संपादक, युनायटेड इंडिया व इंडियन स्टेटस ग्रंथासाठी, नवी दिल्ली. २०) पी.एस.आठवले, संयोजक प्रसारक प्रतापगड फंड (श्रीमंत ताराराजे राणीसाहेब सातारा संघटक). २१) मुख्य संपादक, इंडियन स्टेटस् व जमीनदार, वतनदार, ग्रंथासाठी, सिकंदराबाद. २२) भोसला मिलिटरी स्कूल, नाशिक. २३) व्यायाम ज्ञानकोश कार्यालय, बडोदा. २४) किंग एम्परर टी.बी. फंड, नवी दिल्ली. २५) महाराष्ट्र कन्याशाळा, पुणे. २६) वूमन्स फेलोशिप सर्व्हिस, मुंबई. २७) आर.के.गाडेकर, शिक्षक, कन्याशाळा, सोलापूर, शिक्षण प्रकल्पासाठी. २८) प्रा.माधव त्र्यंबक पटवर्धन (माधव ज्यूलियन) राजाराम कॉलेज, कोल्हापूर ग्रंथासाठी. २९) हरिजन उन्नती मंडळ, मद्रास. ३०) महाराष्ट्र हिंदू धर्म सभा, कोल्हापूर. ३१) माजी सैनिक संघटना, बेळगाव.

३२) मुंबई इलाखा भूगोल शिक्षक संघटना, पुणे. ३३) ऑल इंडिया ग्लायडींग इन्स्टिटट्यूट, अलाहाबाद, आश्रयदाते म्हणून. ३४) खेमराज राजे स्मृती निधी, सावंतवाडी. ३५) आर.जी. कानडे, साहित्यिक व पत्रकार ग्रंथासाठी. ३६) व्हॉईसरॉय जनरल युद्ध निधी, नवी दिल्ली. ३७) डॉ.एस.आर. माचवे, पुणे अंधशाळा निवास व शिक्षणासाठी. ३८) एस.आर. शेंडगे, सांगली, सामाजिक कार्यासाठी. ३९) अखिल महाराष्ट्र शारीरिक शिक्षण संघ सभा, सातारा. ४०) डेक्कन एज्युकेशन सोसायटी कन्या शाळा, पुणे. ४१) एम.एन. कुलकर्णी, क्लार्क ऑफ द कोर्ट, फलटण वैयक्तिक. ४२) जे.जी. जोगळेकर व व्ही.एन. गोखले, चिकोडी (बेळगाव) ग्रंथ लेखनासाठी. ४३) डी.जी. कुलकर्णी, शिरवळ, वैयक्तिक. ४४) अनंत बाळकृष्ण हिंगणे, सामाजिक कार्यकर्ते. ४५) वाई प्राज्ञ पाठशाळा. ४६) मॉडर्न हायस्कूल. ४७) एम.जी. गोकर्णकर शास्त्रींचे नूतन संस्कृत विद्यालय, सातारा. ४८) फलटण संस्थान हरिजन प्रजा मंडळ, मुंबई. ४९) कृष्णानंद राम मारूती विद्याश्रम, विठ्ठलनगर, पुणे. ५०) नाथाबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई. ५१) भंगी समाज, दादर. ५२) दिल्ली महाराष्ट्र समाज, दिल्ली. ५३) रेडक्रॉस फंड, कोल्हापूर. ५४) आगरकर कन्या शाळा, पुणे. ५५) दक्षिण महाराष्ट्र तृतीय साहित्य संमेलन, कराड. ५६) संस्कृत साहित्य संमेलन, (२ रे) पुणे. ५७) फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे. ५८) रायगड धर्मशाळा. ५९) शिवनेरी जीर्णोद्धार निधी. ६०) जागृती दैनिक, बडोदा. ६१) सावतामाळी वसतिगृह, पुणे. ६२) हरि गंगाधर पत्की, पुणे, पशुधन पुस्तकासाठी. ६३) मुरलीधर शंकर देशपांडे, फलटण, वक्तृत्व कला पुस्तकासाठी. ६४) गोदूबाई केतकर, सातारा, भारतीय नाट्य क्षेत्र उपक्रमासाठी. ६५) य. दि. पेंढारकर, कवि यशवंत, चाफळ यांना मदत. ६६) गोखले मेमोरियल हॉल, पुणे. ६७) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना परदेशी शिक्षणासाठी. ६८) रविकिरण मंडळ, पुणे. ६९) महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणेमधील कवि, लेखक यांचेसाठी.

कर्मवीरांना बहुमोल मदत :

या दानशूरपणातील एक उत्तम उदाहरण म्हणजे शिक्षण क्षेत्रातील भगीरथ म्हणून ज्यांची ख्याती आहे ते रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील ! ते

रयत शिक्षण संस्थेच्या कार्यात काही अडचण निर्माण झाली म्हणून एकदा श्रीमंत मालोजीराजेंच्या भेटीसाठी फलटणला आले. त्यांनी आर्थिक अडचण सांगितल्यावर श्रीमंत मालोजीराजेंनी त्यांच्या तिजोरीत जेव्हढी रक्कम होती ती सगळी कर्मवीरांच्या समोर ठेवली. पण कर्मवीरांनी त्यांच्या संस्थेला जेवढी गरज होती तेवढीच रक्कम घेतली आणि बाकीची रक्कम श्रीमंत मालोजीराजेंना परत केली. 'देणारा' दानशूर असा असावा आणि 'घेणारा' ही प्रामाणिक कसा असावा असाच तो प्रसंग होता.

श्रीमंत मालोजीराजेंना कर्मवीरांच्या शैक्षणिक कार्याचे फार कौतुक होते. कर्मवीरांनाही या राजाबद्दल काही राजकीय मतभेद असूनसुद्धा आस्था होती. श्रीमंत मालोजीराजेंच्या ६१ व्या वाढदिवस समारंभाला कर्मवीर फलटणला आले होते. या राजाचा सत्कार करताना त्यांच्या भाषणात ते म्हणाले, मी रयत शिक्षण संस्था चालवित असलो तरी खऱ्या अर्थाने रयतेसाठी काम करणारे श्रीमंत मालोजीराजे हे खरे 'रयत सेवक' आहेत.

कर्मवीर अण्णांना संस्थेच्या कामासाठी सतत खेडोपाडी प्रवास करावा लागत होता. त्यांची ती धावपळ पाहून श्रीमंत मालोजीराजेंनी कर्मवीरांच्या एका आजारात (१९४२ मध्ये) त्यांना आपल्याकडची एक गाडी ड्रायव्हर सहित दिली होती. कर्मवीरांनी ती नाकारली. पण अखेर श्रीमंत मालोजीराजेंच्या आग्रहास्तव त्यांनी ती गाडी काही दिवस वापरली व नंतर परत फलटणला पाठविली. १९३९ मध्ये कर्मवीरांनी बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या नावाने सातारला 'सयाजीराव हायस्कूल' सुरू करण्याचे ठरविले. सातारच्या चार भिंती परिसरात शाळेच्या बांधकामाचे भूमीपूजन ३ डिसेंबर १९३९ रोजी बडोद्याचे महाराज प्रतापसिंहराजे गायकवाड यांच्या हस्ते व समाजसुधारक महर्षि विठ्ठल रामजी शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. त्यावेळी श्रीमंत मालोजीराजे या कार्यक्रमास उपस्थित होते. त्यांनी या शाळेसाठी रु. ५,००० ची देणगी तर दिलीच, पण शाळेचे बांधकाम पूर्ण होईपर्यंत सातारा येथील आपले निवासस्थान 'फलटण लॉज' मध्ये शाळा सुरू करण्यास परवानगी दिली. त्यामुळे लगेचच सातारचे सयाजीराव हायस्कूल सुरू व्हायला मदत झाली.

पुढे श्रीमंत मालोजीराजेंनी कर्मवीरांना फलटणला बोलावून त्यांच्या कार्याचा

सत्कार तर केलाच, पण सातारमधील आपली १०.५ एकर जागा, फलटण लॉज निवासस्थान बक्षिसपत्राने देणगी म्हणून रयत शिक्षण संस्थेला काहीही अटी न घालता दिले व परत रु. ५,००० ची देणगीही दिली. आज त्या जागेत छत्रपती शिवाजी महाविद्यालय व अन्य महाविद्यालयांच्या भव्य वास्तू आहेत.

पुढे श्रीमंत मालोजीराजे ज्यावेळी महाराष्ट्राचे बांधकाम मंत्री झाले, त्यावेळीही कर्मवीरांनी त्यांना सांगितले की, देवापूर ता.माण जि.सातारा येथील १२३ पडिक जमीन मला, संस्थेसाठी कृषि विद्यालय शेतकऱ्यांच्या पोरांसाठी काढायचे आहे. त्यासाठी शासनाकडून मिळवून द्यावी. श्रीमंत मालोजीराजेंनी शासनात आपले मंत्रिपदाचे वजन वापरून सदर जमीन संस्थेला मिळवून दिली. कर्मवीरांनी तिथे 'कमवा व शिका' योजना सुरू करून शेती करत करत शाळाही सुरू केली.

कर्मवीरांचे एक विद्यार्थी पी.जी.पाटील हे सातारा येथील अण्णांच्या वसतिगृहाचे विद्यार्थी. ते उच्च शिक्षणासाठी सप्टेंबर १९४६ मध्ये लंडनला जाणार होते, पण त्यांना पैशाची खूपच अडचण होती. कर्मवीर त्यासाठी मदत गोळा करत होते. एके दिवशी श्रीमंत मालोजीराजे सातारला पोवई नाक्यावरील 'दिलबहार' या बंगल्यात आले होते. राजघराण्यातील काही लोक तिथे राहत होते. त्यांना भेटायला श्रीमंत मालोजीराजे आले होते. कर्मवीरांना हे समजताच ते पी.जी. पाटील या तरुण विद्यार्थ्याला घेऊन तिथे श्रीमंत मालोजीराजेंना भेटण्यासाठी गेले. खरं तर श्रीमंत मालोजीराजे त्यावेळी आपल्या राजघराण्यातील काही कौटुंबिक भेटीगाठीत व्यस्त होते. पण तरीही कर्मवीर आल्याचे समजताच श्रीमंत मालोजीराजेच त्यांना सामोरे गेले. तिथे कर्मवीरांनी पी.जी. पाटील यांची लंडनला जाण्यातली अडचण सांगितली. श्रीमंत मालोजीराजेंनी क्षणाचाही विलंब न लावता रु. १,००० चा धनादेश लगेचच कर्मवीरांच्या हातात दिला. पुढे हाच तरुण बॅरिस्टर झाला, इंग्रजीचा नामवंत प्राध्यापक, सातारच्या छत्रपती शिवाजी कॉलेजचा प्राचार्य झाला आणि रयत शिक्षण संस्थेचे प्रमुख कार्यवाहही झाले.

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेच्या शिक्षण कार्यावर, वसतीगृहावर श्रीमंत मालोजीराजेंचे विशेष प्रेम होते. १९४८ साली म.गांधी यांच्या हत्येनंतर सातारा, सांगली, पुणे, कोल्हापूर, सोलापूर येथे जनमत प्रक्षुब्ध होते. अनेक

ठिकाणी जातीय वादातून ब्राह्मण लोकांची घरेदारे उध्वस्त केली होती. त्यावेळी तत्कालिन शासनाकडे असा गृहखात्याचा अहवाल आला होता की, त्यामध्ये कर्मवीरांच्या संस्थेतले काही शिक्षक असावेत असा अंदाज व्यक्त केला होता. त्यामुळे मुंबई सरकारने रयत शिक्षण संस्थेचे सरकारी अनुदान स्थगित केले होते. त्यावेळी मुख्यमंत्री बा. गं. खेर व कर्मवीर अण्णा यांच्यातील या विषयीच्या गैरसमजावर आधारित निर्णयाबद्दल श्रीमंत मालोजीराजेंनी पुढाकार घेऊन गैरसमजाचे निराकरण केले. त्यानंतर हे अनुदान पुन्हा सुरू झाले.

श्रीमंत मालोजीराजे यांची रयत शिक्षण संस्थेच्या प्रती असणारी ही विशेष कृतज्ञता लक्षात घेऊन लोणंद, जि.सातारा येथे कर्मवीरांनी सुरू केलेल्या हायस्कूलला त्यांनी श्रीमंत मालोजीराजे यांचे नाव दिले. श्रीमंत मालोजीराजे हे कृतीशील सामाजिक क्रांतीचे उद्‌गाते (Active Social Reformer) आणि रयत शिक्षण संस्थेचे पहिले आश्रयदाते होते असे कर्मवीर नेहमी अभिमानाने सांगत होते.

इतर संस्थांनाही मदत :

सातारा येथील सातारा मराठा विद्या प्रसारक संस्थेलाही श्रीमंत मालोजीराजे यांनी त्यांची सातारा येथील फलटणकर मैदान या नावाने असलेली शुक्रवार पेठेतील २ एकर २५ गुंठे जमीन संस्थेच्या शैक्षणिक कार्यासाठी ९९ वर्षाच्या भाडेविरहित कराराने १९३९ सालामध्ये दिली. परंतु श्रीमंत मालोजीराजे यांनी अत्यंत दक्षतेने या करारपत्रात नमूद केले होते की, जर या संस्थेने या जमिनीवर शैक्षणिक कार्यासाठीच्या इमारती उभ्या केल्या नाहीत तर ही जमीन परत घेण्यात येईल. ४ डिसेंबर १९३९ रोजी या संस्थेच्या सातारा येथील यादोगोपाळ पेठेतील महाराणी जमनाबाई मराठा वसतिगृहाची कोनशिला बडोद्याचे महाराज प्रतापसिंहराजे गायकवाड यांच्या हस्ते बसविण्यात आली होती. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमंत मालोजीराजे उपस्थित होते व त्यांनी भाषणही केले होते. त्यावेळी सदर जमीन या संस्थेस देण्याची घोषणा त्यांनी केली होती.

याशिवाय विलिंग्डन कॉलेज (सांगली), पूना कॅम्प एज्युकेशन सोसायटी (पुणे), गोवर्धन संस्था (महाबळेश्वर), न्यू एज्युकेशन सोसायटी व डेक्कन मराठा एज्युकेशन सोसायटी (कोल्हापूर), फर्ग्युसन कॉलेज (पुणे), वारकरी शिक्षण संस्था (आळंदी), मुधोजी क्लब (फलटण), व्हिक्टोरिया डायमंड ज्युबिली लायब्ररी (फलटण),

अखिल भारतीय इतिहास कॉंग्रेस (पुणे), मिशन हॉस्पिटल (मिरज), सेवासदन (पुणे), के.स.पंडित गायक (ग्वाल्हेर), वैदिक संशोधन मंडळ (पुणे), अनंत केशव कोकजे गायक (जबलपूर), भोसला मिलीटरी स्कूल (नाशिक), महाराष्ट्र गर्ल्स एज्युकेशन सोसायटी (पुणे), हरिजन उन्नती संस्था (मद्रास), माजी सैनिक संघटना (बेळगाव), खेमराज स्मृती प्रतिष्ठान (सावंतवाडी), ऑल इंडिया ग्लायडिंग इन्स्टिटयूट आश्रयदाते (अलाहाबाद), पुणे अंधशाळा (पुणे), डेक्कन एज्युकेशन सोसायटी (पुणे), दिल्ली महाराष्ट्र समाज मंडळ (दिल्ली), रेडक्रॉस सोसायटी (कोल्हापूर), सर एन.डी.टी. वुमेन्स युनिव्हर्सिटी (मुंबई), प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी (पुणे), आगरकर हायस्कूल (पुणे) या प्रमुख संस्था बरोबरच लहान-मोठे लेखक, साहित्यिक, साहित्य संमेलने, व्यायामशाळा, गोशाळा, महिला मंडळे, कृषि प्रदर्शने यांनाही मालोजीराजेंनी उदार हस्ते देणग्या दिल्या आहेत.

मराठा इतिहासाचे आश्रयदाते :

श्रीमंत मालोजीराजे यांच्या नाईक निंबाळकर घराण्याचा ७०० वर्षापूर्वीपासूनचा मराठा राजघराण्याचा इतिहास आहे. तसाच छत्रपती शिवाजी महाराजांचा ३५० वर्षाचा हिंदवी स्वराज्याचा इतिहास व अन्य मराठा साम्राज्ये, कोल्हापूरचे छत्रपती घराणे, सातारचे छत्रपती घराणे, देवास, नागपूर (मध्यप्रदेश), तंजावर (कर्नाटक), इत्यादी भोसले घराणे, अन्य मराठा स्वराज्यातील जहागिरी, संस्थाने, इत्यादींचा इतिहास याचा अभ्यास व संशोधन, लेखन यासाठी श्रीमंत मालोजीराजेंनी अनेक इतिहास संशोधकांना, विशेषतः भारत इतिहास संशोधक मंडळ (पुणे), भांडारकर प्राच्य विद्या संशोधन संस्था (पुणे), डेक्कन कॉलेज (पुणे), राजवाडे इतिहास संशोधन मंदिर (धुळे) या संस्थांना प्रोत्साहन दिले. स्वतःच्या घराण्याची व आपल्याकडे उपलब्ध असणारी इतर घराण्यांची अनेक मूळ कागदपत्रे व योग्य ती मदत वेळोवेळी या संस्थांकडे दिली. भारत इतिहास संशोधक मंडळाचे तर ते कायम आश्रयदाते होते. काही वर्षे ते या मंडळाचे (१९४१ मध्ये) अध्यक्षही होते.

साहित्यिकांनाही लेखनासाठी मदत :

दानशूरपणाबरोबरच श्रीमंत मालोजीराजे सुसंस्कृत व साहित्य, कलाप्रेमी होते. काही साहित्यिकांना पुस्तक लेखन व प्रकाशनासाठी त्यांनी वैयक्तिक मदतीही दिल्या.

होतकरू गायक के.एस.पंडित (ग्वाल्हेर), के.एन. पटवर्धन, प्राचार्य इतिहास संशोधक वि.का.राजवाडे, लक्ष्मण दत्तात्रय जोशी, सदाशिव रामचंद्र गोडबोले, कुमार अनंत केशव कोगजे, गायक (जबलपूर), अभियंता एस.वाय. जोशी, वासुदेव कृष्णा भावे, माधव त्र्यंबक पटवर्धन (माधव ज्यूलियन), रा. गो. कानडे, वृत्तपत्र इतिहास लेखक व्ही.एन. गोखले (चिकोडी) यांचेसह अनेकांना त्यांनी मदत केली होती.

राजमाता जिजाबाईच्या समाधीचा जीर्णोद्धार :

श्रीमंत मालोजीराजे यांना इतिहासाबद्दल व त्यातील इतिहास प्रसिद्ध व्यक्तींबद्दल नितांत आदर होता. १९४३ मध्ये ते एकदा राणीसाहेब श्रीमंत सौ.लक्ष्मीदेवी यांचेसह रायगडला गेले होते. तेव्हा खाली छत्रपती शिवाजी महाराजांच्या मातोश्री राजमाता जिजाऊसाहेब यांची पाचाड (जि.रायगड) येथील समाधीची दुरावस्था त्यांना दिसली. समाधीची भग्नावस्थेतील दुर्दशा त्यांना पाहवली नाही. त्यांनी तातडीने त्यावेळच्या मुंबई इलाख्यातील पुरातत्त्व विभागाशी संपर्क केला. परवानगी घेतली. पाचाडच्या ग्रामस्थांशी चर्चा केली आणि स्वखर्चाने तेथील सर्व परिसर स्वच्छ करून समाधीचा जीर्णोद्धार केला.

संत चोखोबा पायरीचाही जीर्णोद्धार :

पंढरपूर हे विठ्ठल रखुमाईंमुळे भागवत धर्मातील कोट्यावधी वारकऱ्यांचे श्रद्धास्थान. या मंदिरात संत चोखामेळा हा महार असल्याने त्याला तथाकथित बडवे पुजाऱ्यांनी विठ्ठलापर्यंत पोचू दिले नाही. परंतु विठ्ठल दर्शनाची आस आणि माऊलींबद्दल हृदयातील भक्ती यामुळे चोखोबा मंदिराच्या बाहेरच्या पायरीवरच दिवसरात्र माऊलींचे अभंग म्हणत, गुणगान करीत असत. शेवटी त्यांनी त्या पायरीवरच आपले प्राण विठ्ठल चरणी अर्पण केले. असे म्हणतात की, चोखोबांची भक्ती आणि त्यातील आर्त कळवळा पाहून विठ्ठलच मंदिराबाहेर आले आणि चोखोबांना नुसते दर्शनच नाही तर स्वतःच्या गळ्यातला हार त्यांच्या गळ्यात घातला. विठोबाचा हार त्यांच्या गळ्यात पाहून पुजाऱ्यांना वाटले की, त्याने हार चोरला, म्हणून त्याला मरेपर्यंत बडवले. त्यातच महाद्वाराच्या पायरीवर त्याने प्राण सोडले. नंतर काही संतांनी त्या पायरीला चोखोबाची पायरी असे नाव दिले व छोटीशी समाधी बांधली. पण काळाच्या ओघात या समाधीची दुर्दशा झाली.

पंढरपूरच्या दौऱ्यावर असताना श्रीमंत मालोजीराजे माऊलीच्या दर्शनासाठी गेले तेव्हा त्यांना मंदिराच्या महाद्वाराच्या बाहेरच्या समाधीची पडझड झालेली अवस्था दिसली. ती चोखामेळा या दलित भक्ताची समाधी आहे हे कळाल्यावर श्रीमंत मालोजीराजांना खूप वाईट वाटले. आणि मग त्यांनी त्या समाधीचा जीर्णोद्धार केला, तेव्हा लाखो वारकऱ्यांनी, शेकडो संतांनी श्रीमंत मालोजीराजे यांच्या दीनदुबळ्यांबद्दलच्या कळवळ्याबद्दल अभिनंदन केले होते.

चाफळच्या श्रीराम मंदिराला राजवाड्यातले झुंबर :

कोयनानगरला १९६७ साली फार मोठा भूकंप झाला होता. मोठ्या प्रमाणावर जीवित हानी व मालमत्ता उध्वस्त झाल्या होत्या. त्यावेळीही कोयना धरणाच्या प्रेमामुळे तेथील आपद्ग्रस्तांना मदत देण्यासाठीही श्रीमंत मालोजीराजे तिथे आवर्जून गेले होते. त्यावेळी त्यांना समजले की, चाफळ ता.पाटण जि.सातारा येथील श्रीराम मंदिराचीही पडझड झाली होती. हे मंदिर समर्थ रामदास स्वामींनी स्थापित केले होते. मुंबईचे प्रसिद्ध उद्योगपती अरविंद मफतलाल यांनी या मंदिराचा जीर्णोद्धार करून भव्य सभामंडपासह सुरेख मंदिर बांधले आहे. श्रीमंत मालोजीराजेंनी त्या मंदिराला भेट देऊन आल्यानंतर या मंदिर सभागृहात लावण्यासाठी आपल्या फलटण येथील मुधोजी मनमोहन राजवाड्याच्या दरबार हॉलमधील विद्युत चलित अतिशय जुने व देखणे झुंबर दिले. आजही हे झुंबर पाहणे पर्यटकांना आकर्षित करीत आहे.

***



पाचाड (जि.रायगड) येथील राजमाता जिजाऊसाहेब यांची श्रीमंत मालोजीराजे यांनी जीर्णोद्धार केलेली समाधी.

९. फलटण संस्थानची कृषि औद्योगिक प्रगती

फलटण संस्थानचे २४ वे अधिपती कै.श्रीमंत मुधोजीराजे नाईक निंबाळकर यांनी आपल्या कारकिर्दीत शेतकऱ्यांसाठी टंचाईच्या वेळी तगाई सुरू केली होती. १८७६ साली संस्थानमध्ये सार्वत्रिक दुष्काळ पडला होता तेव्हा अनेक कामे, रस्त्याची, पाणी पुरवठ्याची अशी कामे काढून संस्थानतर्फे गरजू शेतकऱ्यांना रोजगार दिला जात होता.

या संस्थानचा (फलटण तालुक्याचा) तीन चतुर्थांश भाग हा दुष्काळी आहे. हिंदुस्थानातील ब्रिटीश सरकारने नीरा नदीवर भाटघर धरण बांधले होते. त्याचे पाणी ब्रिटीश हद्दीतून बारामती, माळशिरस, पंढरपूर येथे त्यांना न्यावयाचे होते. तथापि कालव्याने हे पाणी न्यायचे तर फलटण संस्थानमधून कालवा काढायला लागणार होता आणि मग साहजिकच त्यासाठी फलटण संस्थानची म्हणजे अर्थातच् श्रीमंत मुधोजीराजे यांची परवानगी आवश्यक होती. त्यावेळी मुंबई इलाख्याचे कमिशनर कर्टिस यांनी फलटण संस्थानला परवानगी मागण्याऐवजी फक्त माहितीसाठी म्हणून ही बाब कळविली. अर्थातच श्रीमंत मुधोजीराजे यांनी ही बाब वयोमानामुळे फारशी प्रतिष्ठेची न करता त्यांनी संयमाने एवढेच कळविले की, कॅनॉल फलटण संस्थानच्या हद्दीतून जाणार असल्यामुळे त्याचा फायदा माझ्या संस्थानातील प्रजेला किती व कसा होईल ते पाहिले पाहिजे. या पाण्यावर आमचा अधिकार किती हा करार झाला पाहिजे. त्यासाठी 'उभयपक्षी' विचार विनिमय झाला पाहिजे. पण यातील 'उभयपक्षी' या शब्दाचा त्यावेळेचे कमिशनर कर्टिस यांना राग आला होता. ते अतिशय उर्मट होते अशी त्यांची ख्याती होती. ब्रिटीश सरकार हे एवढे मोठे साम्राज्य असताना एक छोटासा संस्थानिक 'उभयपक्षी' असे बरोबरीच्या नात्याने बोलू शकतोच कसा हे त्यांना आवडले नाही. म्हणून त्याने संस्थानचे पॉलिटिकल एजंट म्हणजे सातारचे कलेक्टर यांना पत्र पाठवून संस्थानची संमती त्वरित देण्याबाबत संस्थानला दमात घेण्याची आज्ञा दिली.

तत्कालिन पोलिटिकल एजंट (कलेक्टर) हे तसे सभ्य गृहस्थ व श्रीमंत मुधोजीराजे यांच्या कारभाराबद्दल समाधानी असलेले असे होते. त्यामुळे त्यांनी कमिशनरचे पत्र फक्त श्रीमंत मुधोजीराजे यांच्या निदर्शनास आणले, पण कारवाई काही केली नाही. पण

पुढे श्रीमंत मुधोजीराजे वयोवृद्ध झाल्यामुळे ब्रिटीश सरकारने संस्थानचा कारभार पाहण्यासाठी एक सल्लागार नेमला. त्यामुळे करार वगैरे काही करण्याची गरज भासली नाही. त्या सल्लागाराच्या संमतीने भाटघर कालव्याचे चर खोदायला सुरूवात केली. पण ते काम थोडेफार रेंगाळलेच. पुढे श्रीमंत मालोजीराजे संस्थानचे २५ वे अधिपती (१९१७ साली) झाल्यानंतर पुन्हा दोन-तीन वर्षांनी मुंबई सरकारने हा प्रश्न फलटण दरबारात मांडला. तेव्हा श्रीमंत मालोजीराजेंच्या लक्षात आले की, हा प्रश्न फक्त राजकीय प्रतिष्ठेचा नाही, तर शेतीच्या कायमस्वरूपी दीर्घकालीन फायद्याचा व उत्तम अशा तंत्रज्ञानाचाही होता. संस्थानचे हक्क, प्रजेचा फायदा, आर्थिक खर्च व योग्य तंत्रज्ञान यातील दोन्ही बाजूंच्या तज्ञांच्या व अनुभवी जाणकार लोकांच्या सल्ल्याने हा प्रश्न सोडविला पाहिजे. फलटण संस्थानचे दिवाण के.व्ही.गोडबोले यांनी यातील कायदेशीर बाबींचा बारकाईने अभ्यास केला. दरम्यान श्रीमंत मालोजीराजेंनी म्हैसूरचे राजे वडियार यांचेशी पूर्व परिचयातून संपर्क साधला आणि त्यांच्या चर्चेतून कल्पक इंजिनिअर सर विश्वेश्वरय्या यांचे नाव पुढे आले. यांनी म्हैसूरपासून १२ मैलावरील प्रसिद्ध असे कृष्णराज सागर हे प्रचंड धरण उभारले होते. तत्कालिन सिंध प्रांतातील सक्कर शहराची पाणी पुरवठा, पुण्याजवळील खडकवासला धरणाचे कळसूत्री दरवाजे, एडन सरकारची लष्कर छावणी येथील पाणीपुरवठा अशी कामे केली होती. तत्कालिन जागतिक स्थापत्य अभियांत्रिकी क्षेत्रामध्ये विश्वेश्वरय्या मोक्षगुंडम् यांची ख्याती होती. त्यानुसार दिवाण के.व्ही.गोडबोले यांच्यामार्फत म्हैसूर दरबारात जाऊन विश्वेश्वरय्या यांचेशी चर्चा केली. अर्थातच ब्रिटीश सरकारनेही या नावाला मान्यता दिली.

त्यानंतर विश्वेश्वरय्या फलटण संस्थानच्या विनंतीवरून फलटणला आले. त्यांनी श्रीमंत मालोजीराजेंशी सविस्तर चर्चा केली. भाटघरपासून पुढे फलटण संस्थानामधून श्रीमंत मालोजीराजेंना कशा पद्धतीने पाणी पाहिजे याची पाहणी केली. त्यानंतर १९२५ साली हिंदुस्थान सरकार व फलटण संस्थान यांच्यात दोघांनाही मान्य होईल असा करार झाला. नंतर विश्वेश्वरय्या यांच्या मार्गदर्शनाखाली निरा उजव्या कालव्याचे काम पूर्ण झाले. एवढे मोठे काम करून सुद्धा विश्वेश्वरय्यांनी फलटण संस्थानमधील पाण्याची तळमळ व कळकळ पाहून श्रीमंत मालोजीराजेंकडून काहीही मानधन घेतले नाही. इतकेच नव्हे तर पुढे फलटण संस्थानच्या विकास आराखड्यातही त्यांनी आपणहून

सहकार्य केले.

कृषि व सहकार क्षेत्राचा विकास :

१९२५ पासून निरा उजवा कालव्याचे पाणी फलटण संस्थानातील शेतकऱ्यांना मिळू लागल्यापासून फलटणच्या शेतीची भरभराट सुरू झाली. नगदी ऊस व कापूस या पिकात वाढ झाली. श्रीमंत मालोजीराजे यांना मुळातच शेतीची आवड असल्यामुळे ते नेहमी म्हणत असत की, शेती ही संस्थानची मुख्य रक्तवाहिनी आहे. तिचा प्रवाह जितका शुद्ध व पुष्ट राहील तितकी संस्थानची भरभराट होईल.

शेतकऱ्यांना पिके घेण्यासाठी अर्थसहाय्य, तसेच शेतकऱ्यांची खाजगी सावकारापासून सुटका करायची असेल तर आपल्या संस्थानमध्ये सहकारी पतपेढ्या व कृषि विकास सोसायट्या झाल्या पाहिजेत यासाठी त्यांनी आधीच प्रयत्न सुरू केले होते. १८ जुलै १९१८ रोजी त्यांनी संस्थानमध्ये दि फलटण बँक लि. ची प्रथम स्थापना केली. ही बँक ग्रामीण भागातील खेडेगावच्या विकास सोसायट्यांना आर्थिक पतपुरवठा कमी व्याजदरात करीत असे. या बँकेचे त्यावेळी भाग भांडवल रुपये १ लाख होते व २००० भागात ते प्रत्येकी रु. ५० प्रमाणे जमा केले गेले होते. पण हे भाग मुख्यतः व्यापाऱ्यांकडून गोळा केले असल्यामुळे साहजिकच व्यापाऱ्यांचे वर्चस्व त्यावर होते. त्यामुळे अपेक्षेइतक्या कमी व्याजात शेतकऱ्यांना कर्ज मिळत नव्हते हे श्रीमंत मालोजीराजेंच्या लक्षात आले. त्यासाठी त्यांनी संस्थानमध्ये गावागावात सहकारी विकास सोसायट्या स्थापन केल्या. त्याच सुमारास मुंबई इलाख्यात बॉम्बे प्रोव्हिन्शियल को ऑपरेटिव्ह बँक लि. ही बँक मुंबई सरकारच्या पुढाकाराने मुंबईत स्थापन झाली होती. राज्याच्या विविध भागातील सहकारी बँकांना कर्ज पुरवठा या बँकेमार्फत व त्यांच्या मार्फत खेडेगावातील विकास सोसायटींना पूर्वीपेक्षा कमी व्याज दरात पीक कर्ज देण्याची सुरूवात झाली होती. अर्थातच श्रीमंत मालोजीराजेंचे याकडे लक्ष गेले. त्यावेळी मुंबईतल्या या राज्य बँकेचे कार्यकारी संचालक वैकुंठभाई मेहता होते. ते त्यावेळी धनंजयराव गाडगीळ यांच्या सहकार्याने राज्यात सहकारी चळवळींचे काम करीत होते. श्रीमंत मालोजीराजेंनी मेहतांची भेट घेतली व संस्थानमधल्या गावोगावच्या शेतकऱ्यांच्या विकास सोसायटींना कमी व्याज दरात कसे पीक कर्ज मिळेल याची चर्चा केली. त्यावेळी मेहता यांनी सल्ला दिला की, तुम्ही सहकारी

तत्त्वावर मध्यवर्ती बँक तयार करा. मी तुम्हाला राज्य बँकेमार्फत रुपये ६ लाख सुरूवातीला देतो. त्याप्रमाणे लगोलग १९२६ साली रुपये २ लाख भाग भांडवलावर संस्थानमध्ये दि श्री लक्ष्मी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., फलटण ही बँक स्थापन केली. मुंबई सरकारचे अर्थसहाय्य मिळाले आणि पहिल्याच वर्षी या बँकेने रुपये ५ लाखाची उलाढाल केली व अनेक सोसायट्यांना कमी व्याज दरात कर्जे दिली. तोपर्यंत फलटण संस्थानमध्ये अशा ४८ विकास सोसायट्या स्थापन झाल्या होत्या. निरा उजवा कालवा आल्यामुळे अनेक गावात पाणी आले आणि त्या पाठोपाठ शेतकऱ्यांना पीक कर्जासाठी पैसेही मिळाले. शेतकऱ्यांशिवाय गावोगावी काही लघु कारागिर होते. उदा. धनगर समाजातील घोंगड्या, लोकरीचे कपडे, शाली, वगैरे तयार करणारे होते. त्यांच्याही सोसायट्या तयार करून त्यांना या बँकेमार्फत कर्ज वाटप करण्यासाठी श्रीमंत मालोजीराजेंनी प्रोत्साहन दिले. तसेच नामदेव शिंपी समाजाचीही सोसायटी तयार करून त्यातून विविध प्रकारची धोतरजोडी, उपरणी, कपडे तयार करण्यासाठी प्रोत्साहन दिले. छोटे दुकानदार, पगारदार नोकर यांच्याही सोसायट्या तयार केल्या. त्यातून अनेक लघु उद्योजक तयार झाले. तसेच शेतमालाची खरेदी-विक्री करणाऱ्यांचीही त्यांनी सोसायटी केली व शेतकऱ्यांच्या मालाची खरेदी-विक्री व्यवस्था सहकारातून सुलभ केली. यामुळे फलटण संस्थानचे सर्व क्षेत्रातील उत्पन्नाचा स्त्रोतही मोठ्या प्रमाणावर वाढला. अशा विणकर सोसायट्यांचे कामकाजाची प्रसिद्धी साऱ्या मुंबई इलाख्यात झाली. त्यामुळे हे काम पाहण्यासाठी मुंबईचे सहकार कमिशनर मिस्टर जे. ए. मरात, मिस्टर व्ही. एस. भिडे (आय.सी.एस.) असे सरकारचे उच्च पदस्थ अधिकारी, तसेच जत, सावंतवाडी, इत्यादी प्रमुख संस्थानांचे अधिपतीही फलटण संस्थानमध्ये १९२७ मध्ये आले होते. या सर्वांनी श्रीमंत मालोजीराजे यांच्या दूरदृष्टीचे कौतुकही केले होते.

साखर कारखाना - एक क्रांती :

१९२५ ला निरा उजवा कालव्याचे पाणी कायमस्वरूपी संस्थानमध्ये शेतकऱ्यांना मिळू लागल्यामुळे शेतकऱ्यांनी अर्थातच नगदी पिक म्हणून ऊसाचे क्षेत्र वाढविले. मोठ्या प्रमाणावर ऊसाचे पिक घेतले. आता या ऊसासाठी आपल्या संस्थानमध्ये साखर कारखाना असावा अशी कल्पना श्रीमंत मालोजीराजेंच्या मनात आली. पण असा कारखाना काढणे म्हणजे त्यासाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक भांडवलही हवे होते.

त्यातून त्यांची आणि तत्कालिन उद्योगपती आपटे व मफतलाल यांचेशी चर्चा केली. आम्ही जागा, शेतजमीन, पाणी, इत्यादी मदत करतो. तुम्ही साखर कारखाना उभारा अशी सूचना केली. त्यानुसार सन १९३३ मध्ये आपटे मफतलाल यांच्या संयुक्त भागीदारीत फलटण शुगर वर्क्स हा फलटण तालुक्यातला व नीरा खोऱ्यातील पहिला साखर कारखाना सुरू झाला. श्रीमंत मालोजीराजेंनी या साखर कारखान्याला ऊस कमी पडू नये यासाठी शेतकऱ्यांकडून ऊसाच्या लागवडीसाठी जमिनी खंडाने मिळवून दिल्या (३० वर्षे मुदतीच्या).

याच सुमारास ऊस संशोधन केंद्र आपल्या संस्थानमध्ये असावे, म्हणजे ऊस उत्पादन, संशोधन याचा फायदा आपल्या शेतकऱ्यांना व पर्यायाने संस्थानमधील साखर कारखान्याला होईल या हेतूने श्रीमंत मालोजीराजेंनी सन १९३१ मध्ये पाडेगाव (फलटण संस्थानातील नीरा नदीच्या अलिकडील पुणे रस्त्यावरील गाव) येथे ऊस संशोधन केंद्र सुरू केले. याचवर्षी मुंबई सरकारने परदेशी आयात साखरेवर मोठा कर लागू केला. त्यामुळे देशातील साखर कारखान्यांना ऊसाचे क्षेत्र वाढवून मोठ्या प्रमाणावर साखर उत्पादन करण्याला मोठा वाव मिळाला. त्यावेळी संस्थानमधील अंदाजित दहा हजार एकर जमीन ५-६ वर्षे शेतसारा व पाणीपट्टी न भरल्याने सरकार दरबारी जप्त झाली होती. ती सर्व जमीन श्रीमंत मालोजीराजेंनी दूरदृष्टीने या साखर कारखान्याला ३० वर्षाच्या कराराने दिली. त्याचा खंड शेतकऱ्याच्या नावे जमा करून त्याची थकबाकी पूर्ण केली. त्यामुळे या सर्व जमिनी पुन्हा मूळ शेतकरी यांच्या नावाने झाल्या, हा सर्वात मोठा सामूहिक फायदा केवळ श्रीमंत मालोजीराजेंच्या दूरदृष्टीने झाला. या कारखान्यामुळे संस्थानमधील अनेकांना रोजगार मिळाला. शेतकऱ्यांच्या ऊसाला चांगला भावही मिळाला. साखरेवर कर लावल्यामुळे संस्थानच्या तिजोरीमधील उत्पन्नही वाढले.

फलटण शुगर वर्क्स लि. हा साखर कारखाना सुरू झाल्यामुळे संस्थानची कृषि औद्योगिक प्रगतीही वेगाने होऊ लागली. आपल्या संस्थानमधील शेतकऱ्यांना शेती उत्पादनाची स्पर्धात्मक माहिती मिळावी यासाठी श्रीमंत मालोजीराजेंनी सन १९२९ साली १ ते ३ डिसेंबर या कालावधीत ३ दिवसांचे शेती प्रदर्शन आयोजित केले होते. या प्रदर्शनात फळांचा विभाग, भाजीपाला, ऊस पीक घेण्याच्या पद्धती, दुधदुभते शास्त्रीय

माहिती, खते व पिकांवरील, जनावरांवरील औषधे, इत्यादी प्रकारचे १४ विभाग होते. शेतकऱ्यांना आधुनिक पद्धतीने शेती करता यावी, शेती फायद्यात यावी याची खूपच माहिती या प्रदर्शनातून मिळाली. शेतीच्या क्षेत्रात त्यावेळी रशियाने केलेल्या औद्योगिक व शेती प्रगतीची माहिती श्रीमंत मालोजीराजेंच्या कानावर आली होती. त्याची सखोल चौकशी केल्यानंतर त्यांनी शेतीची मशागत आधुनिक पद्धतीने पारंपारिक बैलाऐवजी ट्रॅक्टरने केली जाते हे त्यांना समजले. आपण स्वतः आधुनिक शेतीसाठी असा ट्रॅक्टर घेतल्याशिवाय शेतकऱ्यांना याची माहिती व उपयुक्तता पटणार नाही. म्हणून त्यांनी १९३३ साली ९३ हजार रुपये खर्च करून फलटण संस्थानतर्फे एक ट्रॅक्टर विकत घेतला व फलटण संस्थानमधील आधुनिक शेतीचे दालन खुले केले. हा ट्रॅक्टर आशिया खंडातील पहिला ट्रॅक्टर होता. यावरून श्रीमंत मालोजीराजेंची कृषि व सहकारातील दूरदृष्टी दिसून येते.



आशिया खंडातील पहिला ट्रॅक्टर.

दुष्काळातही मदत :

१९४५ साली फलटण संस्थानमध्ये फार मोठा दुष्काळ पडला होता. २ वर्षे पाऊसच झाला नव्हता. त्यामुळे प्रचंड प्रमाणात अन्नधान्याची टंचाई निर्माण झाली. त्यावेळी श्रीमंत मालोजीराजेंनी आपल्या घरादारासह सारे दरबार मानकरी यांना कामाला लावले. स्वतःचे (दत्तक पूर्व) थोरले बंधू केशवराव निंबाळकर यांच्या नेतृत्वाखाली एक पथक तयार करून गावोगावी सधन शेतकऱ्यांकडे पाठविले. गरजेपुरते धान्य ठेवून बाकीचे धान्य सरकार दरबारी जमा केले. पंच कमिट्या स्थापन केल्या. त्यांचे मार्फत गरजूंना

एच-१५५
५

अन्नधान्य, रॉकेल, साखर वाटप केले. संस्थान बाहेरूनही त्यांनी अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तू याची खरेदी केली. स्थानिक प्रमुख व्यापारी आनंदलाल तलुकचंद दोशी व रामचंद्र गुलाबचंद दोशी यांना आणखीन जादा धान्य आणण्यासाठी पंजाबमधील भटिंडा येथे पाठविले व मिळेल त्या दराने धान्य आणा असे आदेश दिले. माझ्या संस्थानमधील एकही घर या दुष्काळात उपाशी राहता कामा नये असे सक्त आदेश त्यांनी आपल्या अधिकाऱ्यांना दिले होते. एवढेच नव्हे तर, भर उन्हातसुद्धा श्रीमंत मालोजीराजे यांनी गावोगावी भेटी देऊन प्रजेची विचारपूस या काळात केली होती. समर्थ रामदासांच्या शब्दात

''**नसे गर्व अंगी, सदा वीतरागी**

क्षमा शांतीचा हा खरा दक्ष योगी ।।''

अशीच त्यांची सर्वत्र ख्याती झाली होती.

जाती निर्मूलन - घरापासून सुरूवात :

श्रीमंत मालोजीराजे पुरोगामी विचारसरणीचे असल्यामुळे त्यांनी आपल्या संस्थानात जातीपातीचे राजकारणही केले नाही. त्यावेळी पुण्यात स्थापन झालेल्या जातपात निर्मूलन समितीचे ते अध्यक्ष होते. बोलघेवड्याप्रमाणे नव्हे तर प्रत्यक्ष कृतीने त्यांनी आपल्या पुरोगामीत्त्वाची प्रचिती दाखवली होती. त्यातले एक उदाहरण त्यांच्या राजघराण्यातीलच आहे. त्यांच्या एकुलत्या एक ज्येष्ठ कन्या श्रीमंत सरोजिनीराजे उर्फ अक्कासाहेब पुण्यात माणिक व्हिला, डेक्कन जिमखाना येथे राज निवासात राहत होत्या व फर्ग्युसन महाविद्यालयात शिक्षण घेत होत्या. त्यावेळी त्यांचा परिचय कॅ. मनोहर नामजोशी (विमान पायलट) यांचेशी झाला. पुढे मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाले. नंतर त्यांनी कॅ.नामजोशी यांचेशी विवाह करण्याचे ठरविले. आपला निर्णय त्यांनी श्रीमंत मालोजीराजेंना सांगितला. त्या काळात आणि प्रसिद्ध अशा ऐतिहासिक खानदानी राजघराण्यात आंतरजातीय विवाह म्हणजे धाडसच होते. राजघराण्यातील नातेवाईक, दिवाण, स्वतः राणीसाहेब यांनी अर्थातच या विवाहाला विरोध करण्याचा प्रयत्न केला. रागावल्या, रूसल्या. पण श्रीमंत मालोजीराजेंनी श्रीमंत अक्कासाहेबांना सांगितले, वर्षभर थांबा. श्रीमंत मालोजीराजेंची ही स्थितप्रज्ञता पाहून सारेच थक्क झाले. एक वर्षानंतर त्यांनी या विवाहाला मान्यता दिली. कॅ.नामजोशी यांचेबरोबर श्रीमंत

अक्कासाहेब यांचा विवाह मग कानपूर येथे झाला. पुणे येथून रेल्वेने त्यांना कानपूरकडे पाठविले. बरोबर माहेरची म्हणून ४ माणसे दिली. कालांतराने राजघराण्यातील लोकांनीही या दांपत्याला स्वीकारले. पुढे हेच कॅ.नामजोशी महाराजांचे लाडके झाले. त्यांना फलटणला विमान घेऊन येता यावे यासाठी मग श्रीमंत मालोजीराजेंनी फलटणला खास धावपट्टी, पायलट विश्रांती स्थान, कर्मचारी निवास यासह विमानतळच १९४० साली बांधला. सुमारे ५०० एकर क्षेत्र असलेल्या या फलटण विमानतळासाठी त्यावेळी १९३९ व १९४० मध्ये रु. २५,०१७ इतका खर्च आला होता. १९४८ साली जेव्हा संस्थान विलीन झाले तेव्हा हा विमानतळ मुंबई व नंतर महाराष्ट्र शासनाकडे वर्ग झाला.

पुढे संस्थानचे युवराज श्रीमंत प्रतापसिंह उर्फ बापूसाहेब महाराज यांनीही आंतरजातीय विवाह केला. त्यालाही श्रीमंत मालोजीराजेंनी मान्यता दिली व या नवदांपत्याला राजघराण्यात सामावून घेतले. महाराष्ट्रात जाती निर्मूलन समितीचे अध्यक्ष म्हणून श्रीमंत मालोजीराजेंनी जाती निर्मूलनाची पावले आपल्या घरापासूनच उमटवली व समाजाला कृतीशील आदर्श घालून दिला.

फलटण संस्थानमधील नागरी सुविधा :

फलटण संस्थानची सर्वांगीण क्षेत्रात प्रगती चालू असताना संस्थानची राजधानी असलेल्या फलटण शहरातील नागरिकांसाठीही विविध नागरी सुविधा निर्माण करण्यासाठीही श्रीमंत मालोजीराजेंनी लक्ष केंद्रीत केले होते.

१) वीज पुरवठा :

फलटण शहराला वीज पुरवठा व्हावा यासाठी त्यांनी डिझेल इंजिन वापरून किशोरसिंह वीज पुरवठा संस्था सुरू केली. शहराजवळ वीज गृह (पॉवर हाऊस) सुरू करण्यात आले. त्यामार्फत फलटण नगरपालिकेला ही वीज देण्यात येत असे. त्यातून नगर पालिकेतर्फे रस्त्यावर पथदिवे, घरगुती वापर यासाठी ही वीज वापरली जायची.

२) नागरी वाहतूक :

फलटणपासून आजूबाजूंच्या शहर, गावापर्यंत नागरिकांना प्रवास करता यावा यासाठी अल्प दरात श्रीमंत मालोजीराजेंनी संस्थानतर्फे किशोरसिंह मोटार सर्व्हिस कंपनी १९२६ पासून सुरू केली. श्रीमंत मालोजीराजेंचे प्रथम सुपुत्र युवराज किशोरसिंहराजे यांचे मार्च १९२४ मध्ये दुःखद व आकस्मिक निधन झाले. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ ही

मोटार वाहतूक कंपनी सुरू केली होती. फलटण- पुणे ही वाहतूक सेवा लोणंद, निरा, वाल्हे, जेजुरी, सासवड मार्गे पुणे व परत फलटण येथे जायची. फलटण- पंढरपूर ही मोटार सेवा नातेपुते, माळशिरस, अकलूज, वेळापूर, पंढरपूर व परत फलटण अशी जायची. फलटण- बारामती व परत, फलटण - सातारा व परत अशीही वाहतूक सेवा सुरू होती.

वाहतुकीच्या मोटार्स दुरूस्ती, देखभाल यासाठी त्यांनी स्वतंत्र यंत्र कार्यशाळा सुरू केली होती. या वाहतूक कंपनीची रोजची सरासरी एकूण वाहतूक ८०० मैल पर्यंत होती.

३) मध्यवर्ती प्रशस्त कार्यालये इमारत :

संस्थानचा दरबारी परिवार कार्यालय, कायदे मंडळ पदाधिकारी, कायदे मंडळाची सभा घेण्यासाठी दरबार हॉल, खजिना कार्यालय, पाटबंधारे व बांधकाम विभाग, लेखा विभाग, जमीन मोजणी मामलतदार, न्यायालय, वसुली विभाग, शेतकरी सल्ला केंद्र, शिक्षण विभाग, महिला मंडळ विभाग, तलाठी सजा कार्यालय अशा विविध शासकीय विभागांची सर्व कार्यालये एकाच छताखाली असावीत अशी श्रीमंत मालोजीराजेंची कल्पना होती. त्यासाठी चांगले रचनाकार, वास्तु विशारद यांना बोलावून आपली कल्पना सांगितली. त्यानुसार १९४१-४२ मध्ये मुधोजी मनमोहन राजवाड्याच्या दक्षिणेस दोन अगदी एकसारख्या अशा भव्य देखण्या इमारती बांधल्या. या प्रशस्त इमारती म्हणजे फलटण मधील एक आकर्षक असे वैभव आहे. या दोन्ही इमारतींची अंतर्गत व बाह्य रचना अगदी एकसारखी अशी आहे. लोक त्याला राजा-राणी बिल्डींग असे म्हणत. त्यावेळी त्याला मध्यवर्ती अधिकार गृह असे नामकरण होते. त्या काळात या दोन्ही इमारतींसाठी सुमारे ४ लाख रुपये खर्च आला होता. या सर्व इमारतींचे काम संस्थानच्या बांधकाम विभागाकडून श्रीमंत मालोजीराजेंच्या मार्गदर्शनाखाली शेकडो कुशल कामगारांच्या कारागिरीतून अत्यंत टिकावू असे झाले आहे. अंदाजित २०० वर्षे टिकेल अशी ही इमारत आजही सुस्थितीत आहे. संस्थान विलीन झाल्यावर १९४८ पासून या दोन्ही इमारती मुंबई राज्य व नंतर महाराष्ट्र राज्य यांचेकडे हस्तांतरित केल्या. आज महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांची कार्यालये येथे आहेत.

४) मध्यवर्ती तुरूंग :

फलटण संस्थानच्या वतीने पूर्वापार पासून मुधोजी मनमोहन राजवाड्यासमोर जुनी

तुरूंगाची इमारत होती. पण ती अधिक प्रशस्त व सुसज्ज अशी बांधण्यासाठी ही इमारत पाडून त्या जागी नव्या मध्यवर्ती तुरूंगाची प्रशस्त इमारत १९४० मध्ये नव्याने बांधली. त्यामध्ये कैद्यांसाठी ४ बराकी, भांडार, स्वयंपाकगृह, इत्यादी दालने नव्याने बांधली. पूर्वीची जुनी इमारत व त्याशेजारची मामलतदार कार्यालयाची जागा वापरात आणली. यासाठी एकूण रुपये १५ हजार खर्च आला होता. संस्थानच्या गृह विभागाच्या कायदा व सुव्यवस्थेसाठी ही सुविधा आवश्यक होती.

५) कुरण बंगला :

फलटणमध्ये आरोग्याच्या दृष्टीने आपत्कालीन साथीचे आजार आल्यास दक्षता म्हणून राजघराण्यातील कुटुंबियांना तातडीने स्थलांतर करता यावे यासाठी पूर्वी फलटण जवळच १ ते दीड किलोमीटर वर बिरोबा कुरण येथे एक छोटी निवासी इमारत होती. त्याचा पुनर्विकास करून प्रशस्त असा नव्याने सन १९४१ मध्ये कुरण बंगला बांधण्यात आला. त्याच्या नुतनीकरणासाठी रुपये ४,४७४ इतका खर्च करण्यात आला होता. एरव्ही संस्थानचे पाहुणे आले तर त्यांच्यासाठी पण हा बंगला अतिथीगृह म्हणून वापरला जायचा.

६) निरगुडी पाणी पुरवठा :

श्रीमंत मुधोजीराजे यांनी फलटण शहराच्या पिण्याच्या पाणी पुरवठ्यासाठी फलटणपासून ७ किलोमीटर अंतरावरील निरगुडी येथून नैसर्गिक उताराने शुद्ध पाणी बंदिस्त दगडी चारीने फलटणला साठवण तलावात आणण्याची महत्त्वाकांक्षी योजना सन १८८७-८८ मध्ये कार्यान्वित केली होती. दक्षिणी संस्थानमध्ये असा उपक्रम फक्त फलटण संस्थानमध्येच होता. तत्कालिन ब्रिटीश प्रशासनाचे अभियंता रावबहादूर वासुदेव बापूजी कानिटकर (पुणे) यांच्या मार्गदर्शनाखाली ही पाणी पुरवठा योजना पूर्ण झाली व त्यासाठी त्यावेळी रुपये ८४ हजार ३०५ इतका खर्च आला होता.

पुढे श्रीमंत मालोजीराजे यांच्या कारकिर्दीत ही पाणी पुरवठा योजना सन १९२१-२२ मध्ये सुधारित पुनरूज्जीवित करण्यात आली. निरगुडी मधील विहिरीतून पिण्याचे पाणी फलटणपर्यंत आणण्यासाठी दोन नवीन डिझेल इंजिन पाईपलाईनसह बसविण्यात आली. परंतु वाढत्या लोकसंख्येमुळे हे पाणी कमी पडू लागले होते. त्यासाठी श्रीमंत मालोजीराजेंनी १९४१-४२ मध्ये या पाणी पुरवठा योजनेसाठी जुनी दगडी चारी काढून

त्या ठिकाणी एक नवीन सिमेंट काँक्रीटची ८००' लांबीची पाईपलाईन बसविली. पाणी विहिरीतून वर खेचण्यासाठी दोन नवीन उपसा यंत्रे बसविली. त्यामुळे विस्तारित फलटणला वाढत्या प्रमाणात पाणी पुरवठा सुरू झाला.

७) नवीन रस्त्यांची कामे :

श्रीमंत मालोजीराजे यांनी दळणवळण वाहतुकीसाठी काही जुन्या रस्त्यांची मोठ्या प्रमाणावर दुरूस्ती केली होती. त्यामध्ये महाड-पंढरपूर रस्ता (लोणंद ते धर्मपुरी पर्यंत), फलटण- शिंगणापूर रस्ता, फलटण- सांगवी पुढे बारामती पर्यंत, साखरवाडी फलटण शुगर वर्क्स परिसरात ३१ मैलाचे पोच रस्ते, जुना फलटण-आदर्की, फलटण- मोगराळे रस्ता व पुढे दहिवडीकडे जाणारा मोगराळे घाट, तसेच फलटण पासून संस्थान हद्दीतील मोठ्या गावांपर्यंतचे पोच रस्ते असे रस्त्यांचे जाळेच निर्माण केले होते.

मुधोजी क्लब विस्तारीकरण :

फलटण राजघराण्यातील लोकांना, तसेच खेळाची आवड असलेल्या प्रजेसाठी प्रशस्त खेळाचे मैदान असलेली एक सुसज्ज इमारत मुधोजी क्लब नावाने श्रीमंत मुधोजीराजे यांनी जानेवारी १९१६ मध्ये बांधली होती. पुढे श्रीमंत मालोजीराजे अधिकार पदावर आल्यानंतर त्यांनी या इमारतीचा विस्तार करून नवीन विविध खेळांसाठी सोयी उपलब्ध करून दिल्या. त्यामुळे सध्याचा मुधोजी क्लब हा दक्षिण महाराष्ट्रातील एक सुसज्ज क्रीडा केंद्र असलेला क्लब म्हणून नावलौकिक मिळवत आहे.

***



फलटण येथील 'अधिकार गृह'.

१०. संस्थानिकांच्या संघटनेतील मुख्य सूत्रधार

श्रीमंत मालोजीराजे हे फलटण संस्थानचे २५ वे अधिपती होते. सन १९१७ ते १९४८ अशी त्यांची ३१ वर्षांची राजेशाहीची कारकीर्द असली तरीही त्यावेळच्या देशातील ५६५ संस्थानिकांमध्ये ही कारकिर्द आगळी वेगळी, अनेक वैशिष्ट्यांनी वैशिष्ट्यपूर्ण ठरली. त्यातील प्रजेला अधिकार व कारभार लोकशाही संकल्पनेतून हे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरले. या पार्श्वभूमीवर दक्षिण मुंबई इलाख्यातील संस्थानिकांना एकत्र करून जो संघ निर्माण झाला त्याचे सूत्रधार श्रीमंत मालोजीराजेच होते, हे फलटण संस्थानला अभिमानास्पद होते.

नरेंद्र मंडळ :

भारतातील ५६५ संस्थानिक स्वायत्त कारभारी होते. पण देशात सत्ता ब्रिटीशांची होती. या संस्थानिकांचे अनेक प्रश्न हिंदुस्थानचा ब्रिटीश प्रमुख व्हॉईसराय यांच्याशी निगडित होते. प्रत्येक संस्थानमध्ये आपला वचक असावा या हेतूने व ब्रिटीश सरकारशी संस्थानचे संबंध सलोख्याचे राहावे, या सरकारला काही महसूली उत्पन्न मिळावे, संस्थानच्या सैन्यदलाबरोबरच आपलेही सैन्यदल तिथे तैनात असावे अशा अनेक हेतूंनी अशा संस्थानमध्ये व्हॉईसरॉय व संबंधित इलाख्याचा गव्हर्नर यांच्या अखत्यारीतील एक पोलिटिकल एजंट नेमला जात असे. या सर्व संबंधात तणाव येऊ नये, संस्थानचे काही सामायिक प्रश्नांची सोडवणूक करणे यासाठी देशात एक नरेंद्र मंडळ असावे अशी शिफारस मॉंटेग्यु चेम्सफोर्ड यांनी केली होती. त्यानुसार ८ फेब्रुवारी १९२१ रोजी असे नरेंद्र मंडळ स्थापन झाले. वर्षातून एकदा किंवा गरज पडली तर दोनदा याची बैठक व्हॉईसरॉय यांच्या अध्यक्षतेखाली होत असे. यावर मुंबई इलाख्यातील फलटण संस्थानचे अधिपती श्रीमंत मालोजीराजे यांनी सन १९३१ पासून सातारा गटातर्फे प्रतिनिधीत्व केले होते. या काळात त्यांनी लहान संस्थानिकांचे प्रश्न व बाजू कौशल्याने मांडली होती. हिंदुस्थान सरकारला याची दखल घ्यावी लागली होती. नरेंद्र मंडळाचा एक अभ्यासू संस्थानिक प्रतिनिधी म्हणून त्यांची अल्पावधीतच ख्याती झाली होती. त्यामुळे इतर संस्थानिक त्यांना मान देत असत.

त्यामध्ये ग्वाल्हेर, बडोदे, बिकानेर, पतियाळा, जयपूर, धार, देवास, इंदोर, कोल्हापूर, सांगली, मिरज, जत, अक्कलकोट, कुरूंदवाड, जमखिंडी, कागल, सोंडूर, औंध, भोर, सावंतवाडी या संस्थानिकांशी त्यांचे स्नेहाचे संबंध निर्माण झाले होते. या विविध संस्थानमधील लोककल्याणकारी कार्याची त्यांना माहिती होत गेली.

२७ मे १९३३ रोजी या नरेंद्र मंडळाचा प्रतिनिधी म्हणून श्रीमंत मालोजीराजे इंग्लंडला गोलमेज परिषदेला गेले होते. लंडनमध्ये झालेल्या परिषदेत त्यांनी भारतीय संस्थानिकांचे प्रश्न हिरीरीने मांडले होते. यावेळी त्यांचेबरोबर फलटण संस्थानच्या राजकुमारी सरोजिनीदेवी व दिवाण रावबहादूर गोडबोले गेले होते. विशेष म्हणजे आपल्या अनुपस्थितीत फलटण संस्थानच्या दैनंदिन राज्यकारभारासाठीचे आपले अधिकार श्रीमंत राणी लक्ष्मीदेवी यांच्याकडे सोपविले होते. त्यांना सल्लागार म्हणून राणीसाहेबांचे वडिल श्रीमंत शंभुसिंग जाधवराव यांची नेमणूक केली होती. श्रीमंत मालोजीराजे यांच्या अनुपस्थितीत राणीसाहेब यांनी प्रगल्भपणाने फलटण संस्थानचा राज्यकारभार अतिशय उत्तम पद्धतीने चालविला. पुरोगामी दृष्टीकोनातून श्रीमंत मालोजीराजेंनी स्त्री शिक्षणाचा आग्रह धरून फलटण संस्थानमध्ये जी क्रांती केली होती, त्याचे पाईक म्हणून त्यांनी श्रीमंत राणीसाहेबांनाही सर्व प्रकारचे शिक्षण दिले होते. त्याचा अर्थातच यावेळी श्रीमंत राणीसाहेबांना फार उपयोग झाला.

लंडनच्या गोलमेज परिषदेत मालोजीराजेंचे प्रभावी भाषण झाले होते. त्यावेळी दक्षिणी संस्थानच्या अधिपतींना इंग्रज सरकारमध्ये 'चीफ' असे संबोधित जात होते. परंतु उत्तरेतील ज्या संस्थानिकांना या दक्षिणेतल्या संस्थानिकांनी मराठेशाहीच्या अमदानीमध्ये पराभूत केले होते, अशा उत्तरेतील पराभूत संस्थानिकांना मात्र महाराजाधिराज, महाराजा, राजराजेश्वर यासारख्या पदव्यांनी ब्रिटीश सरकार संबोधित करीत असत. ही तफावत श्रीमंत मालोजीराजेंनी या परिषदेत प्रभावीपणे मांडली होती. त्याचा परिणाम म्हणून दक्षिणेतील संस्थानिकांना 'राजा' ही वंशपरंपरा पदवी व संबोधन प्राप्त झाले. त्यामुळे दक्षिणी संस्थानिकांच्यात श्रीमंत मालोजीराजेंना विशेष महत्त्व प्राप्त झाले होते. तसेच या मागणीच्या पूर्ततेमुळे १ एप्रिल १९३३ पासून फलटण संस्थानचा दर्जा वाढला व हे संस्थान प्रत्यक्षपणे थेट व्हॉईसरॉयच्या अधिपत्याखाली आले. यामुळे फलटण संस्थानचा मुंबई प्रांताशी

संबंध राहिला नाही.

लोकशाहीचे वारे - श्रीमंत मालोजीराजांचे प्रोत्साहन :

देशातील स्वातंत्र्य चळवळ ज्यावेळी जोरात होती त्यावेळी देशातील काही संस्थानिकांच्या मध्ये पुढे काय धोरण घ्यायचे यावर चर्चा सुरू झाल्या. कारण अनेक संस्थानमधून लोकशाही कारभार असावा, त्यावर लोकनियुक्त मंडळाची देखरेख असावी, या मागण्यांसाठी लोकांच्या काही संघटनांनी आवाज उठविला होता. काँग्रेस पक्षही त्यात आघाडीवर होता. १९२० नंतर महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, नेताजी सुभाषचंद्र बोस, मौलाना अब्दुल कलाम आझाद, यशवंतराव चव्हाण, बॅ. वि. दा. सावरकर अशा अनेकांच्या नेतृत्वाखाली भारताला ब्रिटीशांपासून मुक्त करण्यासाठीचा स्वातंत्र्य लढ्याने काँग्रेसच्या नेतृत्वाखाली देशव्यापी स्वरूप धारण केले होते. मात्र भारतातील संस्थानिकांच्या संस्थानाबाहेर या चळवळी प्रजापरिषदेच्या माध्यमातून चालू होत्या. सुरूवातीला त्याचे वारे संस्थानापर्यंत आले नव्हते. पण १९३० नंतर ज्या तीन गोलमेज परिषदा लंडनमध्ये झाल्या त्यामध्ये भारताला स्वातंत्र्य कशा पद्धतीने द्यायचे याचे मसुदे तयार होत होते व त्याची कल्पना श्रीमंत मालोजीराजेंना होती. तसेच त्याआधीच सन १९२८ च्या गणेश चतुर्थीस म्हणजे श्रीमंत मालोजीराजेंच्या ३२ व्या वाढदिवसानिमित्त त्यांनी ''जबाबदार राज्यपद्धती'' हे आमच्या कारभाराचे अंतिम उद्दिष्ट राहील असे जाहीर केले होते. यावरून लोकशाहीची पावले फलटण संस्थानात आधीपासूनच पडू लागली होती. कारण आज ना उद्या राजेशाही जाणार आहे व लोकांचे राज्य येणार आहे ही पक्की दूरदृष्टी श्रीमंत मालोजीराजेंकडे होतीच. म्हणूनच त्यांनी संस्थानचा दरबार व लोकशाही याचा संगम असलेली 'कायदे मंडळ' रचना आपल्या संस्थानमध्ये (गणेश चतुर्थी) ७ सप्टेंबर १९२९ रोजी स्वीकारली व कायदे मंडळाचे उद्घाटनही केले. त्यासाठी त्यांनी ''लोकांचे सरकार फलटण संस्थान कायदा १९२९'' सुद्धा तयार केला. या कायदेमंडळाबरोबरच त्यांनी उच्च स्तरावरील प्रशासनासाठी एक 'कार्यकारी मंडळ' ही निर्माण केले.

सुयोग्य प्रशासन रचना :

१) श्रीमंत मालोजीराजेंनी कार्यकारी मंडळाची रचना चार सदस्यांची केली

होती. त्यामध्ये संस्थानचा दिवाण हा एक पदसिद्ध अध्यक्ष होता. उर्वरित तीन सदस्यांची ते 'राजा' या नात्याने नियुक्ती करीत असत.

२) फलटण राज्य कायदे मंडळाच्या रचनेत एकूण १९ सदस्य होते. त्यात कार्यकारी मंडळाचे ४, दरबार नियुक्त ७ ते ८, लोकांमधून निवडून आलेले ९ असे सदस्य होते.

यामुळे खऱ्या अर्थाने स्वातंत्र्यलढ्या आधीच फलटण संस्थानमध्ये स्वतंत्र लोकशाही कारभार १९२९ पासून सुरू झाला. कायदे मंडळाच्या उद्‌घाटन प्रसंगी श्रीमंत मालोजीराजे यांनी एक सुखद अनपेक्षित धक्का प्रजाजनांना दिला तो म्हणजे या कायदे मंडळात त्यांनी त्याच दिवशी हरिजन समाजाचा प्रतिनिधी म्हणून माधव संभाजी अहिवळे यांची नियुक्ती केली. इतकेच नव्हे तर, कायदे मंडळाचे उद्‌घाटन झाल्यानंतर सर्व नूतन सदस्यांना दरबारतर्फे मेजवानी दिली, त्यावेळी श्रीमंत मालोजीराजेंनी माधव संभाजी अहिवळे यांना आपल्या मेजावर आपल्या शेजारी जेवायला बसविले. याआधीच श्रीमंत मालोजीराजेंनी संस्थानमधील सर्व मंदिरे हरिजनांना खुली केली होती. त्यांच्या या सामाजिक क्रांतीची प्रशंसा त्या काळात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनीही केली होती.

फलटण स्टेट लोकल बोर्ड :

फलटण संस्थानच्या ग्रामीण भागातील आरोग्य, शिक्षण, सार्वजनिक स्वच्छता, लसीकरण, इत्यादी कामांच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी सन १९३१ ला स्टेट लोकल बोर्डची स्थापना करून लोकशाही प्रक्रियेतील दुसरे पाऊल श्रीमंत मालोजीराजेंनी उचलले. त्यामध्ये एकूण २० सदस्यांची त्यांनी नियुक्ती केली. त्यातील १५ प्रत्यक्ष लोकांमधून निवडून दिले होते व ५ सदस्य दरबारतर्फे दिले होते. यामुळे संस्थानच्या कारभाराचे लोकशाही विकेंद्रीकरण झाले आणि समस्त प्रजाजनांनी श्रीमंत मालोजीराजेंच्या या पुरोगामी पुढाकाराबद्दल आनंद व्यक्त केला. या लोकल बोर्डाला दरबारच्या महसुली उत्पन्नातील काही वाटा त्यांच्या कामासाठी दरवर्षी नवीन अनुदान म्हणून मिळत होता.

कायदे मंडळाचा कायदा १९४२ :

लोकांना राज्यकारभाराचा प्रत्यक्ष सहभाग देण्यासाठी श्रीमंत मालोजीराजेंनी सन

१९४२ मध्ये पुन्हा नव्याने आणखी जादा अधिकार खास कायदा करून फलटण संस्थान कायदे मंडळाला दिले. त्यानुसार या कायदे मंडळात १८ लोकनियुक्त प्रतिनिधींची तरतूद केली. त्यातील कायद्यानुसार यातील १२ सभासद प्रजेतून निवडले जातील व यातीलच २ जागा मागासवर्गीय प्रतिनिधींची निवड करण्याची होती. तसेच यावर ६ सदस्यांची (अशासकीय) नियुक्ती दरबार मार्फत होईल. त्यापैकी १ जागा महिलांसाठी असेल. सुरूवातीस या ६ सदस्यांमध्ये अर्थशास्त्रज्ञ डॉ.धनंजयराव गाडगीळ, शिक्षणतज्ञ जे.पी.नाईक, प्रसिद्ध लेखिका आनंदीबाई शिर्के, कृषि तज्ञ के. एम. जोशी व सर्व्हंटस ऑफ इंडियन सोसायटी पुणेचे श्रीधर गणेश वझे यांची नियुक्ती श्रीमंत मालोजीराजेंनी केली होती. विविध क्षेत्रातील मान्यवरांचे मार्गदर्शन फलटण संस्थानला आणि या लोकनियुक्त कायदे मंडळाला व्हावे असा यामागे श्रीमंत मालोजीराजेंचा उदात्त हेतू होता.

सत्तेचे विकेंद्रीकरण खेड्यापर्यंत :

फलटण संस्थानच्या कारभारासाठी लोकनियुक्त लोकसभा, मंत्रिमंडळ, कायदे मंडळ, लोकल बोर्ड, फलटण नगर परिषद अशा माध्यमातून मालोजीराजेंनी महत्त्वपूर्ण कायद्यांद्वारे लोकसहभागाला उत्तेजन दिले. तशीच सत्तेची केंद्रे खेड्यापर्यंत जाण्यासाठी त्यांनी १९३१ साली ग्रामपंचायत कायदा केला. त्यानुसार १५ सप्टेंबर १९३१ रोजी फलटण संस्थानमधील पहिली ग्रामपंचायत तरडगाव येथे अधिकृतपणे स्थापन झाली. त्यानंतर संस्थानमधील अनेक मोठ्या लोकसंख्येच्या गावी सुद्धा या कायद्यान्वये ग्रामपंचायती स्थापन झाल्या.

फलटण नगर परिषदेतही लोकशाही आणली :

फलटण शहरासाठी (तत्कालिन संस्थान राजधानी) श्रीमंत मुधोजीराजे यांनी स्थानिक विकास कामासाठी १८६८ साली फलटण नगर परिषद स्थापन केली होती. त्यावेळी त्यामध्ये २० सदस्यांची (प्रजेमधून) व ७ सरकारी सदस्यांची नियुक्ती होत होती. संस्थानचा कारभारी (दिवाण) या परिषदेचा नगराध्यक्ष होत असे अशी तरतूद केली होती. नंतर ही सदस्य संख्या १६ करण्यात आली. त्यातील ८ सदस्य हे प्रजेमधून निवडून येत असत. मालोजीराजेंनी १९३९ मध्ये यात बदल करून १२ सदस्य प्रजेमधून निवडून येतील व ४ दरबार नियुक्त असतील. त्यामधून नगराध्यक्ष

निवडला जाईल अशी तरतूद होती. त्यानुसार पहिले लोकनियुक्त नगराध्यक्ष म्हणून नागेश विश्वनाथ बावडेकर यांची निवड झाली होती.

राजकीय संघटनांचा उदय :

सन १९१७ पासून मालोजीराजे यांनी संस्थानमधील प्रजेच्या कल्याणासाठी अनेक पुरोगामी निर्णय घेतल्यामुळे प्रजाजनांना संघटना करुन काही फारशा मागण्या कराव्या लागल्या नाहीत. शिक्षण, वीज, पाणी, कला, क्रीडा, शेती, रस्ता, आरोग्य, उद्योग इत्यादी विविध क्षेत्रातील मूलभूत सुधारणा झाल्या होत्या. स.न. १९३१ नंतर जबाबदार राज्य पद्धतीनुसार लोकशाही व्यवस्थाही मालोजीराजेंनी कार्यरत केली होती आणि त्यात लोकांचे अनेक प्रतिनिधीही काम करत होते. त्यामुळे संस्थान व ब्रिटीश हद्दी यातून बाहेर चाललेल्या राजकीय चळवळीमध्ये फलटणकर सक्रीय नव्हते. तथापि देशात काँग्रेस पक्षाने आवाहन केल्याप्रमाणे सत्याग्रह, मोर्चे, आंदोलने चालूच होते. काँग्रेस पक्षातील काही नेत्यांनी संस्थानमधील प्रजेचा पाठिंबाही स्वातंत्र्य लढ्याला मिळावा यासाठी प्रजा परिषद स्थापन केली होती. पण फलटण संस्थानात त्याचा प्रवेश झाला नव्हता.

परंतु दक्षिण संस्थान प्रजा परिषदेचे नेते वामनराव पटवर्धन यांनी फलटण संस्थानमध्ये या प्रजा परिषदेचे कार्य 'फलटण संस्थान प्रजा परिषद' या नावाने सुरु केले होते. परंतु काही लोकांचा 'संस्थान' या नावावर आक्षेप आल्याने या संघटनेत मतभेद झाले. त्यामुळे 'फलटण संस्थान' हा शब्द वगळून 'दक्षिण संस्थान लोकसभा केंद्र फलटण' या नावाने २४ एप्रिल १९३८ पासून ही संघटना पुढे काही काळ चालू होती. प्रजेच्या आर्थिक, राजकीय व सामाजिक प्रगतीसाठी या संघटनेने मालोजीराजेंकडे संपूर्ण जबाबदार राज्यपद्धती स्वीकारण्याचा आग्रह धरला. त्याला अनुसरूनच मालोजीराजेंनी १९४२ चा कायदे मंडळ कायदा लागू केला. लोकनियुक्त १२ सदस्यातून त्यांनी दोघांना संस्थानचे मंत्री नेमले होते.

प्रजा परिषदेची संस्थानात सुरूवात :

प्रजा परिषद म्हणजे जवळजवळ काँग्रेसचेच प्रतिरूप होते. संस्थानांमध्ये जाऊन लोकांना भारताच्या स्वातंत्र्य चळवळीची माहिती देणे, स्वातंत्र्याबद्दल जागृती करणे व अंतिमतः भारतीय स्वातंत्र्य मिळेल तेव्हा संस्थान वेगळे राज्य किंवा संघराज्य न राहता

भारतात विलीन व्हावे यासाठी जनमत तयार करणे हे त्यांचे उद्देश होते. फलटणमध्ये त्यापूर्वी लोकसभा व शेतकरी संघ या प्रजेच्या व संस्थानच्या कायदे मंडळामध्ये लोकशाही पद्धतीने शेतकरी संघाचे प्रतिनिधी बहुमताने निवडून आले होते. परंतु हा संघ प्रामुख्याने साखरवाडी येथील खाजगी साखर कारखान्यासाठी शेतकऱ्यांच्या ज्या जमिनी कराराने व खंडाने घेतल्या होत्या त्याबाबतच्या लढ्यासाठी खंडकरी शेतकऱ्यांच्या बाजूने काम करत होता. त्यामुळे लोकसभेपेक्षा या संघाचे काम लोकप्रिय होते. अशा परिस्थितीत नंतर लोकसभा विसर्जित झाली.

फलटण संस्थानच्या बाहेर काँग्रेस प्रणित प्रजा परिषदेचे कार्य अनेक संस्थानामध्ये एव्हाना सुरू झाले होते. त्याचे पडसाद फार उशिरा म्हणजे १९४४ च्या आसपास फलटण संस्थानमध्ये उमटले. त्यातच लोकसभा विसर्जित झाल्यामुळे काही तांत्रिक मतभेदामुळे फलटण संस्थान मधील कारभार पुन्हा दरबार मार्फत होऊ लागला. परंतु नव्याने संस्थानमध्ये आलेल्या प्रजा परिषदेमुळे लोकांची पुन्हा लोकशाही कारभाराची मागणी जोर धरू लागली. त्यावेळी प्रजा परिषदेचे राज्यातील नेते शंकरराव देव, भाई छन्नुसिंग, रत्नाप्पाण्णा कुंभार यांनी मार्गदर्शन केल्यामुळे साखरवाडी येथील तरुण कार्यकर्ते रा. ब. भगत यांना चिटणीस करून संस्थानमध्ये प्रजा परिषदेचे काम सुरू झाले. गोविंदराव कबनूर सुरूवातीला काही काळ अध्यक्ष होते. पण नंतर शंकरराव देव अध्यक्ष, संस्थान मधीलच मालोजीराजे यांचे विश्वासू सहकारी डॉ.दत्तात्रय मनोहर बर्वे कार्याध्यक्ष झाले. त्याआधी १९४४ च्या पूर्वार्धात झालेल्या कायदे मंडळ निवडणुकीत शेतकरी संघाने १२ पैकी १० जागा जिंकल्या होत्या. त्यापैकी सखाराम राजाराम भोसले वकील व रामचंद्र हिराचंद शहा वकील यांची मालोजीराजेंनी मंत्री म्हणून नियुक्ती केली होती. पण त्या काळात भोसले वकील मंत्री असताना त्यांच्यावरच्या काही आक्षेपामुळे त्यांना मंत्रिपदावरून कमी केले. त्याचा रोष जनतेत मोठ्या प्रमाणावर होता. नंतर शहा वकील यांनीही मंत्री पदाचा राजीनामा दिला. त्यामुळे पुन्हा दरबारतर्फे मार्च १९४५ मध्ये राज्यकारभार चालू होता. पण लोकांच्यात असंतोष होता. प्रजा परिषदेच्या नेत्यांनी अनेक शिष्टमंडळांसह मालोजीराजेंशी वाटाघाटी केल्या. त्यात त्यांना मालोजीराजेंचा कल लोकशाहीकडेच होता हे जाणवले. फक्त मालोजीराजेंना लोकशाही मूल्य व प्रजेचे हित सांभाळणारे

लोकप्रतिनिधी कायदे मंडळात हवे होते, तसा त्यांचा आग्रह होता.

त्यानुसार संस्थानमधील प्रजा परिषदेचे दिनांक १७ व १८ नोव्हेंबर १९४५ ला अधिवेशन झाले. शंकरराव देव अध्यक्षस्थानी होते. स्थानिक इतर राजकीय पक्षाचे पदाधिकारीही या अधिवेशनात उपस्थित होते. स्थानिक नेते रामचंद्र यशवंतराव भोईटे स्वागताध्यक्ष होते. काही दुखावलेल्या मंडळींकडून ही परिषद व अधिवेशन म्हणजे राजा विरूद्ध प्रजा असा प्रचार केला जात होता. पण श्री.भोईटे यांनी संस्थानमध्ये मालोजीराजे यांनी केलेल्या लोकशाही जबाबदार राज्य पद्धतीचे समर्थन करून अनेक लोकोपयोगी कामे इतर संस्थानांपेक्षा या संस्थानात किती मोठ्या प्रमाणावर झाली व होतात याचे विवेचन केले. हे सर्व पुन्हा जाग्यावर येण्यासाठी संस्थानमधील इतर राजकीय पक्षांनी प्रजा परिषदेत सामील व्हावे. आपले सर्व हक्क आपल्याला परत मिळतील असे आवाहन केले होते. शंकरराव देवांनीही या आवाहनाला प्रतिसाद दिला. या प्रजा परिषदेत एकूण ७ लोकशाही मागण्यांचे ठराव झाले व ते मालोजीराजेंकडे पाठविले. विशेष म्हणजे मालोजीराजे यांच्या नेतृत्वाखाली फलटण नगर परिषदेने प्रजा परिषद अध्यक्ष शंकरराव देव यांचा जाहीर नागरी सत्कार केला. त्यांना मानपत्र देण्यात आले. त्यांनीही आपल्या अध्यक्षीय भाषणात संस्थानिकांची कर्तव्ये, प्रगती व जबाबदारी यावर मत प्रदर्शन केले.

या अधिवेशनाच्या समाप्तीनंतर म्हणजे दुसऱ्या दिवशी १८ सप्टेंबर १९४५ रात्री प्रजा परिषदेचे अध्यक्ष, पदाधिकारी व प्रतिष्ठित नागरिक यांना मालोजीराजे यांनी मेजवानी दिली. राजा व प्रजा यांच्यात दुरावा करणाऱ्यांनाही यातून योग्य उत्तर मिळाले हे विशेष. यानंतर पुन्हा मालोजीराजेंनी नवी घटना स्वीकारून जबाबदार राज्य पद्धती लोकशाही पद्धतीने सुरू केली. त्यामध्ये नागेश विश्वनाथ बावडेकर व रामचंद्र हिराचंद शहा यांना मंत्री म्हणून नियुक्त केले. प्रजा परिषदेचा हा विजय होता. पण ही लोकशाही राज्य पद्धती फार थोडे दिवस म्हणजे ८ मार्च १९४८ पर्यंतच म्हणजे फलटण संस्थान भारतीय संघराज्यात विलीन होईपर्यंतच राहिली.

***

कायदेमंडळ उद्घाटन

(दि.७ सप्टेंबर १९२९ रोजी फलटण संस्थानच्या पहिल्याच क्रांतिकारी निर्णयाच्या कायदेमंडळाला मुंबई इलाख्याचे राज्यपाल यांनी दिलेल्या संदेशाचे वाचन व ब्रिटीश शासनाचे राजकीय प्रतिनिधी (पॉलिटिकल एजन्ट) श्री.जे.मॉन्टीथ यांचे भाषण)

मे.मालोजीराव नाईक निंबाळकर, फलटणचे प्रमुख आणि फलटण संस्थानच्या दरबारारातील सर्व पदाधिकारी, या परिषदेच्या उद्घाटनाच्या शुभप्रसंगी मी आपल्या सर्वांना शुभेच्छा देऊ इच्छितो.

या उत्सवातून फलटणचे राजे म्हणून तुम्ही आपली ही मनीषा प्रकट केली आहे की, राज्याचा घटनात्मक विकास हा संपूर्ण भारताच्या राजकीय प्रगतीच्या बरोबरीने झाला पाहिजे. त्याच बरोबर यातून राज्याच्या कारभाराशी आपल्या प्रजेला जोडून घेण्याची आपली आसही जाणवते. आता आपण सूज्ञपणा दाखवून पदाधिकाऱ्यांवर सोपविलेल्या जबाबदारीचा आणि अधिकारांचा योग्य उपयोग करुन दाखवण्याची क्षमता त्यांनी दाखवायची आहे आणि मला खात्री आहे की आपण त्यांच्यावर टाकलेल्या विश्वासास ते निश्चितपणे पात्र ठरतील. फलटणच्या दरबारी लोकांना माझ्या शुभेच्छा !

या परिषदेचं उद्घाटन करण्यासाठी आपण माझी, म्हणजे आपल्या प्रमुख साहेबाची निवड केलीत हा माझा फार मोठा सन्मान आहे. हे माझं सुदैवच आहे की, फलटणच्या माझ्या पहिल्याच भेटीत मला इतिहासातील एवढ्या मोठ्या घटनेचा उद्घाटक म्हणून निमंत्रित केलेले आहे. आपण मला सांगितल्यानुसार फलटण हे सर्वात जुने नसले तरी सर्वात जुन्या संस्थानापैकी एक आहे. गेल्या कित्येक पिढ्या हे संस्थान आपल्या पूर्वजांच्या देखरेखीखाली भरभराटीला आलेले आहे आणि असे कुणीही म्हणू शकते की, त्यांच्या राजवटीमध्ये इथले प्रजेचा फायदाच झालेला आहे. परंतु पहिल्या महायुद्धापूर्वीपासूनच काळ झपाट्याने बदलत होता आणि १९१४ ते

१९१८ या कालखंडात जे काही घडलं त्याचे परिणाम जगाच्या कानाकोपऱ्यात झालेले आहेत. थेट महामहीम राजांच्या अधिपत्याखाली असलेल्या ब्रिटिश भारतात आपसूक जे बदल घडत गेले त्याचे परिणामही भारतातील राज्यांवर झालेले होतेच. हिज हायनेस यांचे हे शब्द योग्यच होते की फलटण संस्थानाची प्रगती नव्या प्रगत कल्पना आणि लोकांच्या राजकीय आकांक्षांनुसार, तसेच संपूर्ण भारताच्या राजकीय प्रगतीच्या अनुषंगाने व्हायला हवी.

जेव्हा महायुद्धाची आणीबाणी सतत वाढत होती आणि सर्व काही वितळण्याच्या भांड्यात टाकल्यासारखं वाटत होतं, त्या गेल्या डझनभर वर्षात आपल्या कारभाराविरोधात साधी कुजबूजही ऐकू आली नाही किंवा अस्वस्थपणाची चाहूलही आढळली नाही. याचे सर्व श्रेय आपल्या प्रशासनालाच आहे. भविष्यात काय घडेल आणि नव्या कल्पनांचा कोणता आणि कसा बरा - वाईट परिणाम होऊ शकेल याचा बरोबर अंदाज आपण केलात. आपण सूज्ञपणे जी पावले उचललीत त्यासाठी आपले मनापासून अभिनंदन !

मला आपल्या दरबारी अधिकाऱ्यांचेही अभिनंदन करायला हवं, कारण मुख्य साहेबांकडून जे काही प्राप्त होत होतं त्याचा पुरेपूर फायदा आपल्या जनतेनं घ्यावा यासाठी उपलब्ध सर्व संधींचा त्यांनी योग्य वापर केला. पूर्वी म्हटल्यानुसार सूचित केलेल्या मार्गाने प्रगती साधणे हे दरबारी मंडळींच्या गुणवत्तेवर आणि जबाबदारीच्या जाणिवेवर अवलंबून असते. जर त्यांना असं जाणवलं की आपल्या प्रजेच्या हिताचे रक्षण करताना त्यांच्या मनात परोपकाराची भावना आहे, एकंदरीतच सर्व प्रजेची स्थिती सुधारण्याची त्यांची इच्छा तीव्र आहे आणि आपल्या धोरणांमधून प्रजेतील काही विशिष्ट घटकांच्याच भल्याची चिंता करण्याची त्यांची वृत्ती नाही, तर ते निश्चितपणे आपल्या राजाला आपला कारभार सर्वांपर्यंत पोहोचवण्यासाठी मनापासून मदतीचा हात देतात. त्यामुळं त्यांच्यावर जशी मोठी जबाबदारी असते, तशीच त्यांच्यासाठी ही एक मोठी संधीही असते.

आणि म्हणूनच, महाराज, मी पुन्हा एकवार म्हणतो की, आपल्या संस्थानातील अतिशय महत्त्वपूर्ण सुधारणांच्या कार्यक्रमाचं उद्घाटन करण्यासाठी आपण मला पाचारण केलंत याबद्दल मी आपला ऋणी आहे. आपण म्हटलंत त्याप्रमाणं मी इथं

आलोय ते माझ्या वैयक्तिक अधिकारात नसून ब्रिटिश शासनाचा स्थानिक प्रतिनिधी म्हणून आलो आहे. आपण आणि आपले पूर्वज यांनी आपल्या प्रजेच्या भल्यासाठी जे काही काम केलेलं आहे त्यातून आपली प्रजेप्रती असणारी निष्ठाच दिसते. माझ्या भाषणाच्या प्रारंभी मी जो संदेश वाचून दाखवला त्यातूनही हेच स्पष्ट होते. आज ज्या समारंभाचं उद्‌घाटन करण्याची संधी मला मिळाली आहे त्यात मी एका सम्राटाचा प्रतिनिधी म्हणूनच नव्हे, तर व्यक्तीगत पातळीवरही आपल्या यशाचीच इच्छा व्यक्त करतो. फलटण संस्थानचे अधिपती आणि त्यांचे दरबारी यांना मी त्यांच्या कार्यात मन:पूर्वक शुभेच्छा देतो.

***

अत्यंत दूरदृष्टीचे भाषण

फलटण संस्थानचे अधिपती म्हणून श्रीमंत मालोजीराजे यांनी संस्थानच्या कायदे मंडळाचे उद्‌घाटन प्रसंगी केलेले भाषण. (दि.७ सप्टेंबर १९२९)

जे.मॉन्टीथ, कायदेमंडळाचे (फलटण दरबाराचे) सर्व सभासद, बंधू आणि भगिनींनो,

आपण सर्वजण माझ्या विनंतीला मान देऊन या समारंभासाठी हजर राहिलात, त्यासाठी वेळ दिलात, याबद्दल आपले सर्वांचे मी मन:पूर्वक स्वागत करतो आणि आपल्याला धन्यवादही देतो. या समारंभाचा हेतू काय आहे याची आपणा सर्वांना योग्य कल्पना आहे. माझ्या सन्माननीय मित्राला या परिषदेचे उद्‌घाटन करण्याची विनंती करण्यापूर्वी मला वाटतं मी या संस्थानाच्या प्रशासकीय यंत्रणेत जे बदल आजपासून अंमलात आणू इच्छितो त्या संदर्भातली माझी मतं व्यक्त करणं अस्थानी ठरणार नाही. या अतिशय पुरातन, कदाचित सर्वात पुरातन राज्याच्या गादीवर मी १५ नोव्हेंबर १९१७ रोजी आलो. त्या काळात महायुद्ध अगदी जोरात सुरु होते आणि त्या कालखंडात माझी सर्व शक्ती आणि खजिन्यातील जो काही थोडाफार पैसा होता तो ब्रिटिश साम्राज्याच्या सेवेसाठी उपयोगात आणला गेला. युद्ध त्यानंतर एक वर्षात थांबलं, परंतु त्याचे परिणाम युद्धापेक्षा कमी भयंकर मुळीच नव्हते. महायुद्ध आणि

त्याचे दुष्परिणाम हे भारतातील संस्थाने आणि ब्रिटिश अंमलाखालील भारत यांच्यासाठी काळजी वाटावी असेच होते. हा समाज, तसेच ब्रिटिशांच्या अधिपत्त्याखालील भारत आणि संस्थाने यांच्यातील हितसंबंध या घटकांनी मला विचार करायला भाग पाडलं की ब्रिटिश भारतामध्ये जी प्रशासकीय यंत्रणा राबवली जाते ती माझ्या संस्थानातील प्रजेसाठीही योग्य ठरेल का? ब्रिटिशांच्या अंमलाखालील भारतातील प्रशासन यंत्रणेचा आपणही अंमल करावा काय? या विचारात मी असताना गेल्या दोन वर्षात ब्रिटिश भारतात जे काही घडत होते त्यांचा या विचारांवर अधिकाधिक परिणाम होत गेला. आपल्याला आठवतच असेल की मी ही जबाबदारी स्वीकारण्यापूर्वी काही महिने ब्रिटनच्या सत्ताधीशांनी ऑगस्ट १९१७ मध्ये एक महत्त्वपूर्ण घोषणा केली होती. त्यानंतर व्हॉइसराय आणि राज्यसचिव हे ब्रिटिश शासनाला या घोषणेची अंमलबजावणी करण्यासाठी काय करता येईल या संबंधी योग्य त्या शिफारशी करण्यात गुंतलेले होते आणि त्यांनी संयुक्तपणे केलेल्या चौकशीचा परिणाम म्हणून ब्रिटिश भारतात मॉन्टेग्यू चेम्सफोर्ड सुधारणांची अंमलबजावणी सुरु झाली. या सर्वांचा विचार करताना मला खात्री वाटायला लागली की हुकुमशाहीचे आणि निरंकुश सत्तेचे दिवस कितीही चांगले असले तरी संपलेले आहेत. माझ्या ध्यानात आलं की संपूर्ण जगामध्ये आलेली आणि माझ्या राज्याच्या सीमांना भिडलेली ही (परिवर्तनाची) लाट माझ्या राज्यातील प्रजेवर परिणाम केल्याखेरीज राहणार नाही. माझ्या हेही लक्षात आलं की, याचे घातक परिणाम थोपवणं गरजेचं आहे आणि त्यासाठी ब्रिटिश शासनानं जे केलं तेच आपणही करायला हवं. परंतु ब्रिटिश भारतातील समाज आपल्या तुलनेनं अधिक प्रगत होता. म्हणून मी अगदी प्राथमिक पाठापासून प्रारंभ केला. मी अशा एका सल्लागार समितीची स्थापना केली, जिच्या माध्यमातून जनतेला राज्य कारभाराचा थोडासा तरी अनुभव मिळावा आणि परिचय व्हावा. याचा चांगला परिणाम दिसला. परंतु या विषयावरच्या माझ्या विचारांना आणखी नवी चालना / प्रेरणा तेव्हा मिळाली जेव्हा सर हर्कोट बटलर यांच्या अध्यक्षतेखाली भारतीय संस्थानांची चौकशी करणारी समिती नेमली गेली. त्यामध्ये आमचा समावेश झाला. यामुळे भारतीय संस्थानांमधील शासन प्रणालीचा सर्व बाजूंनी बारकाईने विचार आणि अभ्यास करण्याची संधी मला

मिळाली. यामुळं माझी खात्री पटली की प्रत्येक संस्थानाची प्रतिष्ठा, सन्मान आणि क्षमता या ब्रिटिशांच्या अधिपत्त्याखालील भारतात झालेल्या विविध करारांवर आणि आमची त्यांच्याशी असलेली निष्ठा / विश्वास यावर आणि त्याचप्रमाणे संस्थानांनी अवलंबिलेल्या राज्यपद्धतीवर अवलंबून राहाणार आहेत. माझ्या हेही ध्यानी आलं की कोणत्याही संस्थानाच्या अंतर्गत प्रशासनामध्ये हस्तक्षेप करण्यास ब्रिटिश शासन नाखुष आहे आणि घटनात्मक शासन तयार करण्यामुळं संस्थानांमध्ये हस्तक्षेप करण्याची ब्रिटिश शासनाची शक्यताही कमी होणार आहे. मला असंही जाणवलं की संस्थानिकांना आपल्या मनाच्या अतिशय जवळ असणारा हेतू आणि क्षमता मिळवण्याचा तोच एकमेव मार्ग आहे. अर्थात हा एक सर्वसाधारण विचार आहे. माझ्यापुरतं बोलायचं झालं तर देशातील सर्वोच्च शक्तीने या संस्थानच्या कारभारात कधीही आणि कसलाही हस्तक्षेप केलेला नाही. यातून ब्रिटिश शासनाचे प्रशंसनीय हेतू स्पष्ट होतात.

माझं निवेदन बटलर समितीकडं पाठविलं गेल्यानंतर मी गंभीरपणे विचार करायला लागलो की, यापूर्वी सूचित केलेल्या मार्गावरुन वाटचाल करण्याची वेळ खरंच तर नाही ना आलेली? हेही तेवढंच खरं होतं की या संदर्भात माझ्या प्रजेकडून कोणताही आग्रह धरला गेलेला नव्हता. परंतु अशी वेळ येण्यापूर्वीच आपण त्यांना योग्य दिशेने न्यायला हवं असं मला जाणवलं. या संदर्भात मी पहिली गोष्ट केली ती म्हणजे माझी कल्पना आणि योजना माझ्या गेल्या वाढदिवसाची संधी साधून प्रजेसमोर ठेवल्या, आणि टप्प्या टप्प्याने मी समोर ठेवलेले जबाबदार शासनाचे ध्येय त्यांच्या नजरेला आणून देणे. या पुढची पायरी होती संस्थानची स्वत:ची राज्यघटना लोकांना सादर करणे, त्या दिशेने फलटण शासनाचा राज्य - कायदा लागू करणे आणि तोच कायदा आजपासून लागू होत आहे. त्यात ज्या तरतुदी केलेल्या आहेत त्यामधून तुम्हाला समजेल की यातून एक वाजवी आणि निवडक घटक स्वीकारला गेलेला आहे. अर्थात दरबारानं केलेले ठराव हे बहुतांशी शिफारशींच्या स्वरुपाचे आहेत, परंतु ते बंधनकारक बनविणे आणि त्यांची प्रतिष्ठा वाढविणे हे सदस्यांच्या कामाच्या गुणवत्तेवर आणि त्यांना असलेल्या जबाबदारीच्या जाणिवेवर अवलंबून असते हेही तितकेच खरे. परंतु तुमच्या लक्षात येईलच की अशी कार्यकारी परिषद स्थापन करण्यामध्ये यापेक्षाही

अधिक महत्त्वपूर्ण बदल अपेक्षित आहेत. मी माझ्यावरची बरीच जबाबदारी या परिषदेच्या सदस्यांवर टाकली आहे, कारण मला त्यांच्या जबाबदारीच्या जाणिवेची आणि क्षमतेची पूर्ण कल्पना आहे. हे काम करण्यासाठी ते पूर्णपणे योग्य आणि सक्षम आहेत. परंतु हीच स्थिती किमान प्रारंभीच्या काळात तरी कायदेमंडळाची असणार नाही.

या कायद्याचे काळजीपूर्वक अवलोकन केल्यानंतर हे जाणवेल की या संस्थानचे ब्रिटिश शासन आणि इतर संस्थानांशी असलेले संबंध हे कार्यकारी समिती आणि कायदेमंडळ या दोघांच्याही अधिकाराबाहेर ठेवलेले आहेत आणि त्याची कारणे उघड आहेत. सर्वोच्च शासनाशी असलेले माझे दायित्व दुसऱ्या कुणाकडे सोपविणे मला शक्य नाही. कदाचित पुढं मागं अशी वेळ येईलही, परंतु ती नजिकच्या भविष्यकाळात येईल असं वाटत नाही.

मला मान्य करायला हवं की हे पाऊल उचलण्याची प्रेरणा मला ब्रिटिश राज्यघटनेच्या सखोल अभ्यासातून मिळाली. परंतु त्याचबरोबर मी हेही स्पष्ट करु इच्छितो की हिंदू धर्मातील वेद आणि महाभारतासारख्या ग्रंथातील आदेशांमधून मिळालेली प्रेरणा तेवढीच महत्त्वाची आहे. तिथं तुम्हाला जबाबदार शासनाचे अंकुर आणि जबाबदार शासनाची मूलतत्वे आढळतात. जे माझ्या कुटुंबाशी नातेसंबंधाने जोडलेले आहेत असे महान राज्यकर्ते छत्रपती शिवाजी महाराज यांनीही हे तत्व जाणले होते, हे त्यांनी स्थापन केलेल्या अष्टप्रधान मंडळातून स्पष्टपणे दिसून येते. मला हेही मान्य करायला हवं की माझ्या मते आपल्यावर असलेला पाश्चात्य कल्पनांचा प्रभाव लक्षात घेता प्रशासनात सुधारणा करताना त्यांचं अंधानुकरण होता कामा नये. पौर्वात्यांच्या मनाची जडणघडण पाश्चात्यांच्या मनोवृत्तींपेक्षा वेगळी आहे. तेव्हा मी अशी आशा व्यक्त करतो की ज्यांना या कार्यभारात काम करण्याची संधी मिळाली आहे असे माझे सहकारी, अशी यंत्रणा तयार करतील, जी या दोन संस्कृतींमधील उत्कृष्टतेचा संगम असेल.

मी ज्या घराण्यात जन्माला आलेलो आहे ते जवळपास गेली सहाशे वर्षे या संस्थानाचा कारभार करीत आहे. या घराण्याच्या इतिहासात या राज्यकर्त्या घराण्यापासून प्रजा कधीही दूर गेलेली नाही. हे संस्थान ब्रिटिश शासनाच्या

अधिपत्त्याखाली आले, तेव्हापासून इथले प्रजानन ब्रिटिश शासनाशीही प्रामाणिक राहिले आहेत आणि युद्धकालात युद्धासाठी आपला पैसा आणि उत्तम माणसं या शासनाला उपलब्ध करुन या प्रजेनं हे सिद्धही केलेलं आहे. याच अढळ निष्ठा आणि भक्तीमुळं या सुधारणा करायला मी मान्यता दिली आहे. ही माझ्याकडून एक मोफत आणि स्वेच्छा - भेट आहे. भूतकाळात या संस्थानावर / राज्यावर अनेक गुणवंत आणि नामवंत व्यक्तींनी राज्य केलं आणि या संदर्भात मी सगुणाबाई आईसाहेब आणि माझे स्वर्गीय पिताश्री मुधोजीराव यांचा उल्लेख टाळू शकत नाही. त्यांनी १८ व्या शतकाची अखेर आणि १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात या राज्यावर राज्य केलं आणि मी ईश्वरचरणी प्रार्थना करतो की या राज्याचा अधिपती म्हणून मी जे काही केलं आणि भविष्यकाळात करणार आहे त्यामधून मी त्यांचा लायक वारस आहे हे सिद्ध व्हावे.

मित्रहो, मी आपल्याला बराच काळ थांबवून ठेवले आहे आणि त्यासाठी आपण मला माफ कराल अशी अपेक्षा आहे. माझ्यासाठी हा प्रसंग अतिशय महत्त्वपूर्ण आहे आणि तो माझ्याकडून पूर्ण आणि स्पष्ट अभिव्यक्तीस पात्र आहे, परंतु मला जाणवतंय की मी माझ्या या अभिव्यक्तीला योग्य न्याय देऊ शकलेलो नाही. मि. मॉन्टीथ, आपण माझ्या विनंतीला मान देऊन या समारंभाचं उद्घाटन करायला तात्काळ मान्यता दिलीत, याबद्दल मला आपले मन:पूर्वक आभार मानायलाच हवेत. याकडं मी केवळ वैयक्तिक मैत्रीचा भाग म्हणून न पाहाता मी करीत असलेल्या प्रयोगाला ब्रिटिश शासनाची मान्यता असल्याचं हे द्योतक मानतो. या निमित्तानं आज या ठिकाणी जे पाहुणे खास या समारंभासाठी आलेले आहेत त्यांचेही मी मनापासून आभार मानतो. मी व्यक्तीश: श्री.एस.बी.बापट यांचा ऋणी आहे. वय झालेलं असूनही त्यांनी माझ्या विनंतीला मान देऊन या कायदेमंडळाचे अध्यक्ष म्हणून काम करण्यास मान्यता दिली. माझ्या पिताजींच्या कार्यकाळात ते या संस्थानाचे, राज्याचे कारभारी होते आणि त्यांनी आपल्या कार्यक्षमतेतून आणि कामामधून नावही कमावलेले आहे. मला खात्री वाटते की त्यांच्या नेतृत्त्वामध्ये या कार्यकारिणीला एक योग्य आणि विश्वसनीय मार्गदर्शक लाभेल.

कार्यकारी मंडळाच्या सभासदांना काही उपदेशपर शब्द बोलून झालेले आहेत. आता मी माझे हे भाषण समाप्त करतो, आणि मला वाटतं हे करताना ब्रिटनच्या

अधिपतींकडून आलेला, महामहीम ड्यूक ऑफ कॅनॉट यांच्याकडून प्राप्त झालेला संदेश वाचून दाखवणं अतिशय योग्य ठरावे. ते शब्द असे आहेत,

''नव्या कार्यकारिणीतील लोकांचे पहिले प्रतिनिधी म्हणून आपल्यावर एक विशेष जबाबदारी आहे, कारण हे काम करताना तुमचं वर्तन कसं आहे आणि तुम्ही दिलेल्या न्यायामध्ये न्यायीपणा किती आहे यावर आपला सूज्ञपणा आणि न्यायप्रियता अवलंबून आहे. या महान घटनात्मक बदलाचं यश जगाला पटवून देणं आपल्यावरच अवलंबून आहे.''

सभ्य स्त्री - पुरुषहो, मी इथंच थांबतो. आता मी माझ्या मित्राला या परिषदेचं उद्घाटन करावं अशी विनंती करतो आणि हाच माझा बहुमान मानतो.

***

अस्पृश्यता निर्मूलनासाठीचे जहाल भाषण

(अशाच प्रकारे श्रीमंत मालोजीराजे यांनी ९ ऑक्टोबर १९४४ रोजी याच कायदेमंडळासमोर एक जहाल भाषण केले होते. त्यातील काही सारांश भाग).

''नवीन राजवटीत हरिजनांची परिस्थिती इतर समाजाच्या बरोबरीने येईल असे आता कळकळीचे प्रयत्न व्हावयास पाहिजेत. आम्ही कायदेमंडळ सन १९२९ ला स्थापन केले. त्याच दिवशी या प्रश्नास जोराची चालना दिली. परंतु आजवरच्या येथील सरकारला या कामी अधिक सक्ती करण्यात एक प्रकारे अडचण होती. कारण आजवरच्या सरकारचे प्रतिनिधी हे लोकप्रतिनिधी नव्हते. आता फलटण दरबारमधील लोकप्रतिनिधींनी लोकमताला आपल्या उदाहरणाने, उपदेशाने व कायदेशीर उपायांनी योग्य वळण देऊन लोकांकडून अस्पृश्यांना न्याय मिळेल असे केले पाहिजे.

अस्पृश्यता हा हिंदू धर्मावरील कलंक आहे. मनुष्य जातीचा तो उपमर्द आहे. जगात हिंदूंना लज्जेने माना खाली घालावयास लावणारी व राष्ट्रविघातक अशी ही दुष्ट रुढी आहे. दक्षिण अफ्रिकेतील लोक हिंदी लोकांना अस्पृश्याप्रमाणे वागवितात व त्याबद्दल तक्रार केली तर आपल्या पायाखाली काय जळते आहे ते आधी पहा असा आपल्याला टोमणा मारतात. ही परिस्थिती पालटण्यासाठी आपण बुद्धीपूर्वक प्रयत्न

केले पाहिजेत. आपण आपले कर्तव्य न करता, अस्पृश्यांना दुसरे समाज हिंदू धर्माशी संबंध तोडण्यास सांगतात म्हणून तक्रार करण्यात काय अर्थ आहे? जेथे कोल्हे, कुत्री व गाढवे ही शिवलेली चालतात त्या पाणवठ्यावर हरिजांना तेव्हढा मज्जाव असावा ही किती अन्यायाची गोष्ट आहे. परवा मद्रास प्रांतातील एलोर गावी तारीख ३० सप्टेंबर १९४४ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले भाषण आपण वाचावे. अशी आपणास आमची विनंती आहे. म्हणजे त्या समाजाला याविषयी किती तीव्र संताप वाटतो याची आपणास कल्पना येईल. आपल्याच बांधवांना आपल्याविरुद्ध कडक उपाय योजण्याची आवश्यकता भासावी याहून दुसरे दुर्दैव कोणते?''

एकंदरीत श्रीमंत मालोजीराजे यांनी अन्यत्र व विशेषतः फलटण दरबारच्या कायदेमंडळासमोर केलेली भाषणे नेहमीच दिशादर्शक आहेत. असे दिसून येते. पुण्याच्या माधवराव पटवर्धन सभागृहाच्या उद्घाटन समारंभातील भाषण, कै.दत्तोपंत आपटे यांच्या प्रथम स्मृतीदिनानिमित्त पुण्याच्या भारत इतिहास संशोधन मंडळातील भाषण, आळंदीला वारकरी शिक्षण संस्थेच्या रौप्यमहोत्सव प्रसंगी केलेले अध्यक्षीय भाषण अशी त्यांची अनेक भाषणे त्यांच्या विविध विषयांवरील प्रभुत्त्वाची व मार्मिकपणाची साक्ष देतात.

त्यांच्या अनेक भाषणांवर अभिप्राय देताना साहित्यसम्राट न.चिं.उर्फ तात्यासाहेब केळकर एकदा म्हणाले होते, ''एका शब्दाचीही फिरवाफिरव करता येणार नाही इतकी उत्तम अशी श्रीमंतांची भाषणे आहेत.'' एका साहित्यसम्राटाने दिलेले हे प्रशस्तीपत्रक म्हणजे श्रीमंत मालोजीराजे यांच्या भाषणांचा सर्वोच्च सन्मान आहे.

***

११. फलटण संस्थान विलीनीकरण

श्रीमंत मालोजीराजे लंडनच्या गोलमेज परिषदेवरून परत आल्यानंतर त्यांच्या लक्षात आले की, आज ना उद्या ब्रिटीशांची सत्ता जाणार आहे व हिंदुस्थान स्वतंत्र देश होणार आहे. त्यावेळी हिंदुस्थानमध्ये ५६५ लहान-मोठे संस्थानिक होते. महाराष्ट्रातल्या व कर्नाटक, गुजराथ मधल्या संस्थानिकांशी श्रीमंत मालोजीराजे नव्या राजकीय हालचालीसंदर्भात संपर्कात होते.

संस्थानिकांचे म्हणून जे नरेंद्र मंडळ होते त्यामध्येही संस्थांनांचे पुढील भवितव्य काय असावे? यावर विचार मंथन चालू होते. काहींचा विरोध तर काहींचे मौन तर काहींचे नवं हिंदुस्थान सरकार सांगेल तसं असे विविध प्रवाह चर्चेत होते. त्यानुसार मुंबई इलाख्यातील दक्षिणी संस्थानिकांचे सुरुवातीला प्रयत्न या सर्व संस्थानिकांचे स्वतंत्र संघराज्य व्हावे या दिशेने होते. फलटण संस्थानमध्ये श्रीमंत मालोजीराजेंनी इतर मराठी संस्थानच्या खूप आधी लोकांसाठी लोकांच्याच सहकार्याने आपल्या फलटण संस्थानात जबाबदार राज्यपद्धती १९३० सालापासून सुरू केली होती. त्यामुळे पुढे १९४५ च्या सुमारास प्रजा परिषदेतर्फे विविध संस्थांन मधून भारतीय संघराज्यात सामील होण्यासाठीचे प्रबोधन मोठ्या प्रमाणावर चालू होते. तसे फलटण संस्थानमध्येही सुरू होते. अर्थात श्रीमंत मालोजीराजे यांनी प्रजा परिषदेच्या प्रतिनिधींना (२) मंत्रिमंडळात घेऊन आपल्या भावी विचारांची दिशा काय असेल याचा सूचक इशारा दिला होता. १६ मे १९४४ पासूनच फलटण संस्थानमध्ये लोकमतानुवर्ती राज्यकारभाराला प्रारंभ झाला होता. महात्मा गांधी यांनी मुंबई येथून दिनांक १४ जून १९४४ रोजी श्रीमंत मालोजीराजेंना खास पत्र देऊन लोकशाहीच्या या प्रक्रियेबाबत हार्दिक अभिनंदन केले होते.

दक्षिणी संस्थानांचे स्वतंत्र संघराज्य निर्मितीच्या अनेक बैठका श्रीमंत मालोजीराजे यांच्या उपस्थितीत झाल्या. या कल्पनेसाठी राष्ट्रीय काँग्रेसच्या स्वातंत्र्यलढ्यातील नेते पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल यांची भेट घेऊन श्रीमंत मालोजीराजेंनी या प्रस्तावाबाबत साधक बाधक चर्चा केल्या. त्यांचे दिवाण व

सल्लागार के.व्ही.गोडबोलेही श्रीमंत मालोजीराजें बरोबर या सर्व चर्चांमध्ये होते. पंडित नेहरूंनी या प्रस्तावाला विरोध दर्शविला नाही, पण सावध भूमिका घेऊन हा प्रस्ताव संस्थानमधल्या लोकांच्या संमतीशिवाय, त्यांच्या इच्छेशिवाय असता कामा नये. म्हणजे एक प्रकारे पं.नेहरूंनी लोकमताच्या विरूद्ध जाऊन असे संघराज्य होऊ नये असेच सूचकपणे निर्देशित केले होते. श्रीमंत मालोजीराजेंनी दक्षिणेतील संस्थानिकांना सूचना केली की, तुम्ही सर्व महात्मा गांधी यांना भेटावे. त्याप्रमाणे महात्मा गांधी यांना या प्रश्नाची माहिती समजावी यासाठी श्रीमंत मालोजीराजे यांनी त्यांना सविस्तर टिपणी संस्थानिकांच्या नियोजित भेटीपूर्वी चार दिवस आधी महात्मा गांधी पाचगणीत मुक्कामी असताना पाठविली होती. त्यानुसार म.गांधी पाचगणीहून पुण्यात आल्यानंतर २८ जुलै १९४६ रोजी संस्थानिक व त्यांचे सल्लागार यांचेशी त्यांची चर्चा झाली. त्यात सुरूवातीलाच म.गांधींनी नमूद केले की, फलटणच्या राजेसाहेबांनी पाठविलेले टिपण आपण वाचले नाही. पण आपले मत मात्र अशा संघराज्याच्या विरूद्ध आहे असे सांगितले. पण त्यावेळी झालेल्या चर्चेत या विशिष्ट प्रश्नांच्या माहिती अभावी किती गैरसमजाचे मुद्दे आले याबाबत नम्रपणे परंतु सप्रमाण माहिती देणारे पत्र पुन्हा श्रीमंत मालोजीराजेंनी दिनांक ४ ऑगस्ट १९४६ रोजी महात्मा गांधींना पाठविले. त्याचे दिनांक ५ ऑगस्ट १९४६ रोजी पुण्यातूनच म.गांधीचे उत्तराचे छोटेखानी पत्र श्रीमंत मालोजीराजेंना आले. त्यात महात्मा गांधी लिहितात,

''राजेसाहेब, आपले पत्र पावले. त्याबद्दल आभार. त्यासोबतचे दुसरे कागद मी वाचले नाहीत. आपला मुद्दा मी समजलो. मी स्वतः संस्थानिकांच्या प्रश्नात पडलो नाही. म्हणूनच मी सूचना केली की माझ्या शब्दावर आधार राखणे हा आपला खरा मार्ग नसून पंडितजी सांगतील त्याप्रमाणे करणे हा आहे. ते आज संस्थानी प्रजेचा आणि साऱ्या हिंदुस्थानच्या लोकांचा आवाज आहेत.

तात्यासाहेबांनी (न. चिं. केळकर) जर मला सूचना केली नसती, तर आपल्यासमोर मांडलेले विचार मी सांगणार नव्हतो. मी सांगितले त्यामागे काही नाही. माझ्या शब्दांचा अनर्थ होण्याची भीती असेल तर तो थांबविन. अधिक चर्चा न करण्याबद्दल क्षमा असावी.''

महात्मा गांधी यांच्या या विचारांच्या दिशेनंतरही दक्षिणी संस्थानांचे संघराज्य स्थापन

करण्यासाठी प्रयत्न चालूच होते. त्यामध्ये औंध, भोर, फलटण, मिरज, मिरजमळा, सांगली, कुरूंदवाड, रणदुर्ग अशा आठ संस्थानांचा समावेश होता. परंतु फलटण संस्थान मधील प्रजा परिषदेचा याला विरोध होता. त्यामुळे फलटण संस्थान भारतीय संघराज्यात विलीन करावे असा मतप्रवाह मात्र वाढू लागला होता. त्यातच १५ ऑगस्ट १९४७ ला भारतीय स्वातंत्र्य अस्तित्वात आले. त्यानंतर प्रस्तावित संघराज्याच्या मसुद्यावर १७ ऑक्टोबर १९४७ ला भोर येथे वरील सर्व आठ संस्थानिकांच्या सह्याही झाल्या होत्या. २० डिसेंबर १९४७ ला मिरज येथे संघराज्याच्या घटना समितीचे उद्घाटनही झाले. पण नंतर श्रीमंत मालोजीराजेंच्या पूर्णपणे लक्षात आले की, जनतेच्या पाठिंब्याशिवाय संघराज्य यशस्वी होणार नाही. तसेच संघराज्य सर्वार्थाने हिंदुस्थान सरकारच्या विरोधात चालविण्यासाठीची सर्व प्रकारची ताकद या संघराज्यातील छोट्या संस्थानात दिसून येत नाही. हे वास्तव लक्षात येताच दुसऱ्याच दिवशी म्हणजे २१ डिसेंबर १९४७ लाच केवळ श्रीमंत मालोजीराजेंच्या पुढाकाराने हे औटघटकेचे संघराज्य विसर्जितही झाले आणि ८ मार्च १९४८ ला फलटणसह ही सर्व अन्य सात संस्थाने भारतीय संघराज्यात सामील झाली. फलटण संस्थानच्या प्राचीन इतिहासाने एक वेगळेच नव्या इतिहासाचे वळण घेतले.

सन १९१७ साली श्रीमंत मालोजीराजे यांनी फलटण संस्थानचे अधिपती (राजा) म्हणून सूत्रे हाती घेतली तेव्हा संस्थानचे उत्पन्न फक्त वार्षिक रुपये २ लाखाचे होते आणि ८ मार्च १९४८ रोजी फलटण संस्थानचे विलीनीकरण झाले त्यावेळी संस्थानच्या खजिन्यात रोख रक्कम रुपये ६५ लाख होती व शेकडो कोटीची संस्थानची स्थावर मालमत्ता होती. पण या सर्वांसह श्रीमंत मालोजीराजेंनी आपले ७०० वर्षाची प्राचीन परंपरा असलेले फलटण संस्थान भारतीय संघराज्यात विलीन केले. हा देशातील संस्थानांमध्ये एक विक्रमच होता.

निरोपाचे उत्कृष्ट भावपूर्ण भाषण :

(फलटण संस्थानचे २५ वे आणि शेवटचे अधिकृत अधिपती म्हणून आपल्या संस्थानातील प्रजेशी जो संवाद त्यांनी दिनांक ७ मार्च १९४८ रोजी साधला ते भाषण म्हणजे मराठी साहित्यातील एक आदर्श असे निरोपाचे भाषण होते. ते मुद्दामहून येथे अभ्यासकांसाठी घेतले आहे. त्यातून या विलक्षण राजाचे चरित्र व चारित्र्य याचा सुरेख संगम दिसून येतो -)

वसाहत सरकारशी आम्ही नुकत्याच केलेल्या करारानुरूप उद्या दिनांक ८ मार्च १९४८ ला फलटण संस्थानचा राज्यकारभार आम्ही स्वखुषीने मुंबई सरकारच्या स्वाधीन करणार आहोत व अशा रितीने हे महाराष्ट्रातील सर्वात जुने संस्थान कायमपणे मुंबई प्रांतात विलीन होणार आहे, ही गोष्ट आता सर्वांस विदित झालीच आहे. आमच्या पूर्वजांनी ७०० वर्षापूर्वी संपादन केलेल्या व आजवर सतत निंबाळकर घराण्यातच चालत आलेल्या या संस्थानावरील आमचे आधिपत्य, अशा रितीने मुंबई सरकारच्या हाती देताना, आजवर आमचे प्रजाजन असलेल्या लोकांना आपलेपणाने या निवेदनाच्या द्वारे दोन शब्द सांगितल्याखेरीज आमच्याने त्यांची रजा घेववत नाही. संस्थानचे अस्तित्व हे एक प्रदीर्घ नाटक आहे अशी कल्पना केल्यास, त्याची नांदी सातशे वर्षापूर्वी या गादीच्या संस्थापकाने म्हटली असली पाहिजे व त्याचे भरतवाक्य या प्रकटनाच्या रूपाने आम्ही म्हणत आहो, असे समजण्यास हरकत नाही.

हल्लीचा काळ हा एकतंत्री सत्तेचा नसून लोकसत्तेचा आहे, ही गोष्ट आम्ही संस्थानच्या गादीवर १९१७ साली आल्यापासून ओळखून होतो. म्हणून लोकांची कोणतीही तशी मागणी नसतानाही, लोकशाही तत्त्वावर सत्ता संक्रमण करण्याचे प्रयत्न आम्ही फार वर्षापूर्वीच सुरू केले, आणि त्या दृष्टीने १९२८ साली जबाबदार राज्य पद्धतीची जाहीर घोषणा करून लागलीच एक घटना- कायदाही आम्ही जारी केला. त्यानंतर राजकीय हक्कांची पुढील पायरी म्हणून जवळजवळ संपूर्ण जबाबदारी लोकांच्या हाती देण्याच्या उद्देशाने १९४२ साली पुन्हा नवीन घटना कायदा केला. तो कायदा लोकांकडून राबविल्या जाण्याच्या कामी आम्हास जो अनुभव आला, तो लक्षात घेऊन दक्षिणी संस्थानाचे संयुक्त राज्य स्थापन करणे हे अधिक बरे असे वाटून, त्या दृष्टीने नंतर आम्ही प्रयत्न सुरू केले, पण त्या उद्योगात ज्या ठेचा लागल्या त्यापासून धडा घेऊन, शेवटी गेल्या महिन्याच्या १९ तारखेस हे संस्थान मुंबई प्रांतात विलीन करण्याच्या करारावर आम्ही सही केली. अर्थात 'जनता हीच सर्व सत्तेचे उगम स्थान आहे' ही गोष्ट अगोदरच आम्ही मान्य केलेली असल्यामुळे हा निकाल लोकमताचा कौल घेऊनच आम्ही घेतला हे सांगणे नकोच. असा हा थोडक्यात एका लहान संस्थानात लोकशाही निर्माण करण्याच्या प्रयत्नांचा इतिहास आहे.

१८५७ सालच्या स्वातंत्र्ययुद्धानंतर ब्रिटीशांच्या त्यावेळच्या धोरणास अनुसरून

त्यांनी परतंत्र केलेल्या हिंदुस्थान देशात, इतर अनेक संस्थानाप्रमाणे या संस्थानची आहुती पडण्याचे दुर्भाग्य त्याच्या नशिबी न येता, आता पूर्णपणाने देश स्वतंत्र झाल्यावर त्यात विलीन होण्याचे भाग्य संस्थानला लाभत आहे, हे आपणा सर्वांचे सुदैव होय. शिवाय, या प्राचीन संस्थानची तीस वर्षे सेवा करून आणि त्याला राजकीय, आर्थिक व सांस्कृतिकदृष्ट्या अभिमानास्पद स्थान प्राप्त करून देऊन, सातशे वर्षाच्या परंपरेतील शेवटचा अधिपती या नात्याने या गादीचा त्याग स्वखुषीने करण्याचा व स्वतंत्र हिंदुस्थानात हे संस्थान सामील करून टाकण्याचा मान आम्हाला मिळत आहे, ही विशेषच अभिनंदनीय गोष्ट आहे, असे आम्हास वाटते. या तीस वर्षाच्या अवधीत या लहानशा संस्थानची आमच्या अल्पमतीने जितकी सर्वांगीण प्रगती करता येणे शक्य होते, तेवढी करण्याचा आम्ही प्रयत्न केला. डॉ.सर मोक्षगुंडम् विश्वेश्वरय्या यांच्यासारख्या थोर व तज्ज्ञ गृहस्थांच्या निरपेक्ष व स्वयंस्फूर्त मध्यस्थीने, मुंबई सरकारच्या इतकाच या संस्थानला हितावह असा नीरा राईट बँक कॅनालच्या पाण्याबाबत मुंबई सरकारशी करार करून घेता आला. या कराराच्या वाटाघाटीचे काम जवळजवळ वीस वर्षे चालले होते. तसेच या व इतर दक्षिणी संस्थानांचे महत्त्व व त्यांचे स्वायत्त असे राजकीय स्थान सार्वभौम सरकारला पटवून देण्यासाठी, १९३१ पासून गोलमेज परिषदेला व जॉईंट पार्लमेंटरी कमिटीपुढे साक्ष देण्याला या संस्थानचा प्रतिनिधी तीन वेळा लंडनला पाठवून आणि स्वतः आम्हीही १९३३ साली तेथे जाऊन, आम्हाला या संस्थानाची जितकी सेवा करता आली तितकी केली. संस्थानात साखर कारखाना काढण्यास उत्तेजन देण्यात आले. शेतकऱ्यांना इरिगेशन खालची पिके करण्याचे शिक्षण देण्यात आले व ती पिके करण्यास भांडवलाचा पुरवठा करण्यात आला. महात्मा गांधीजींच्या थोर तत्त्वांना अनुसरून हातसूत व हातमागांच्या शिक्षणास व धंद्यास दरबारकडून शक्य तो आर्थिक व इतर प्रकारचे सहाय्य देण्यात आले. परंतु विधायक कार्यक्रमावर लोकांची श्रद्धा नसल्याने त्या सहाय्याचा लोकांनी फायदा करून घेतला नाही, ही गोष्ट वेगळी. फलटण संस्थानची औद्योगिक, आर्थिक व शेतकी विषयक पाहणी हिंदुस्थानातील प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ डॉ.धनंजयराव गाडगीळ व त्यांच्याच सारख्या इतर विषयातील श्रेष्ठ तज्ज्ञांकडून करवून, संस्थानची पुनर्घटना करण्याबाबत एक अहवाल त्यांच्याकडून

तयार करविला. या सर्व गृहस्थांनी जवळजवळ दोन वर्षे विनामूल्य काम करून संस्थानास अत्यंत उपकृत केले आहे. पुढील काळात विमान वाहतूक ही प्रवासाचा राजमार्ग ठरणार, ही गोष्ट दहा वर्षापूर्वीच ओळखून फलटण येथे शहराच्या अगदी लगत सर्व बाजूंनी काटेरी कंपाऊंड घालून एक विमानतळ बांधण्यात आला. केवळ सरकारी अधिकाऱ्यांच्या व नोकरांच्याच नाही तर सरकारी कामकाजासाठी येणाऱ्या सामान्य लोकांसाठीही सर्व आधुनिक सुखसोयींनी युक्त असे एक सुंदर व भव्य अधिकारगृह बांधण्यात आले. एक उत्तम अतिथीगृहही फलटण येथे चालविले जात आहे. उत्कृष्ट धर्मार्थ दवाखाना व सुतिकागृहही लोकांच्या सोयीसाठी चालविले जात आहेत. संस्थानात जवळजवळ सर्व खेड्यात सहकारी संस्था आणि प्राथमिक शाळा स्थापन करण्यात आल्या. प्राथमिक शिक्षण सर्वांस अगदी मोफत, दुय्यम शिक्षण अतिशय स्वस्त आणि मुली व हरिजन यांना तर ते विनामूल्य करण्यात आले. फलटण शहरात स्त्रियांच्या उन्नतीच्या संस्था, महिला मंडळ, सहकारी भांडार, प्रौढ शाळा, क्लब, वगैरे स्थापन करण्यात आले आणि स्त्री-पुरुष विषमता शक्यतो नष्ट करण्यात आली. जातीय वाद उत्पन्न होऊ न देण्याविषयी दक्षता घेण्यात आली. मुंबई प्रांतातील व हिंदुस्थानातील अनेक संस्कृती संवर्धक उद्योगांशी सहकार्य करण्यात आले. हिंदुस्थानात केवळ सार्वजनिक सेवेला आयुष्य वाहिलेल्या काही लोकोत्तर व्यक्तींचा यथामती परामर्श घेण्याचा उपक्रम सुरू करण्यात आला. हरिजनांना अस्पृश्य म्हणून तर वागविण्यात आले नाहीच, उलट १९२९ चा घटना कायदा जारी केल्या दिवसापासून सरकारी समारंभात त्यांना इतर हिंदूंच्या बरोबर एका पंक्तीला व एका टेबलावर जेवणास देखील घेण्यात येऊ लागले. या सर्व प्रयत्नांमुळे, संस्थान लहान असूनसुद्धा त्यांना सर्वत्र कोणते मानाचे स्थान मिळाले, हे आमच्यापेक्षा जाणते लोकच अधिक चांगले सांगू शकतील.

आमच्या कारकिर्दीत दोन जागतिक महायुद्धे झाली. त्यापैकी पहिल्या युद्धातील गोष्टींचे स्मरण लोकास फारसे असणे शक्य नाही. परंतु दुसऱ्या युद्धात मराठा-ऑफिसर्स- रिक्रूटींग कमिटीचे काम आम्ही अंगावर घेतले, हे सर्वांच्या लक्षात असेलच. स्वतंत्र झालेल्या या देशाच्या सैन्यात, आज, त्यावेळी भरती झालेले कित्येक सैनिक व अधिकारी असतील, आणि या दृष्टीने आम्हाला आमच्या

त्यावेळच्या प्रयत्नाबद्दल समाधान वाटते. परंतु या कामापेक्षाही युद्धकाळातील दुसऱ्या एका कामगिरीबद्दल आम्हास अधिक संतोष वाटतो. ती म्हणजे, अत्यंत कठीण अशा धान्य टंचाईच्या वेळी भगीरथ प्रयत्नाने धान्य मिळवून, आम्ही सर्व अधिकाऱ्यांसह दर आठवड्यास बाजारात जातीने उभे राहून, प्रत्येक व्यक्तीच्या पदरात ते धान्य पडेल, अशी व्यवस्था करू शकलो, ही होय. तसेच त्या कठीण काळात आम्ही कित्येक प्रसंगी या संस्थानची थोडी अडचण करूनही, इतर काही संस्थानांना त्यांची अत्यंत निकड जाणून, तात्पुरती धान्याची मदत करण्याचे धाडस केले याबद्दल आता समाधान वाटते. धान्य टंचाईच्या या पहिल्या अनुभवानंतर आम्ही संस्थानातील प्रत्येक गावी जातीने जाऊन धान्य संचय करून, बाहेर हद्दीत धान्य न जाईल याबाबत प्रयत्नांची शिकस्त केली. शिवाय धान्याच्या व्यवहारात दरबारला एक पैचाही फायदा घेणार नाही, असे जनतेस अभिवचन दिले. अशा रितीने हा संकटकाल निभावून नेता आला व आमच्या संस्थानात एकही भूकबळी पडू देणार नाही, ही मनात केलेली प्रतिज्ञा सिद्धीस जाऊ शकली, ही परमेश्वरी कृपाच होय.

परंतु वरील सर्व प्रयत्नांचे श्रेय आम्हाला एकट्याला नाही, हे या ठिकाणी स्पष्ट करणे आमचे कर्तव्य आहे. आमच्या महाभाग पूर्वजांना व विशेषतः पुण्यश्लोक ती. मुधोजीराव उर्फ बापूसाहेब महाराज यांना ते प्रथम दिले पाहिजे. संस्थानातील स्त्रियांच्या उन्नतीचे श्रेय आमच्या राणीसाहेब सौ.लेडी लक्ष्मीदेवी यांना मुख्यतः आहे व औद्योगिक प्रगतीचे, तज्ज्ञ मित्रांना व सल्लागारांना आहे. राज्यकारभार कोणत्याही प्रकारच्या लाचलुचपती पासून अलिप्त व कार्यक्षम ठेवण्याचे श्रेय आमच्या आताच्या व पूर्वीच्या अनेक उत्कृष्ट अधिकाऱ्यांना आहे. त्याचप्रमाणे राज्यकारभार लोकमतानुवर्ती करण्याच्या व या देशात आणि परदेशातही या संस्थानचा लौकिक वाढविण्याच्या कामी, अशाच सहकाऱ्यांची मदत कारणीभूत झाली आहे.

हे संस्थान विलीन करू नये, पूर्ववत ते लोकमतानुवर्ती घटनेखाली स्वतंत्र राखावे, अशी फलटण संस्थानच्या अनेक लोकांनी आम्हास अगदी शेवटी शेवटी विनंती केली. परंतु केवळ मोठी शिल्लक संस्थानच्या खाती आहे व संस्थानला उत्पन्नाचे साधनही मोठे आहे. एवढ्या आधारावर अशा लहान संस्थानाने स्वतंत्र राहण्याचे धाडस करणे योग्य होणार नाही, असे आमचे निश्चित मत बनले होते. कारण अशा

बाबतीत निर्णय घेताना आपण फार दूरवरची व्यापक दृष्टी ठेवण्यास शिकले पाहिजे. उदाहरणार्थ, ज्या कॅनॉलच्या पाण्यामुळे संस्थानला हल्लीची सुस्थिती प्राप्त झाली आहे, ती संस्थानला परमेश्वरी कृपेने जे विशिष्ट भौगोलिक स्थान मिळाले आहे त्याच्या अभावी कधी तरी प्राप्त होऊ शकली असती काय ? तसेच संस्थानच्या पदरी जी शिल्लक आहे व जी उत्पन्नाची साधने आज त्यास उपलब्ध आहेत त्यांच्या आधारावर भाटघरच्या लॉइड- बंधाऱ्यासारखा बंधारा बांधणे कधी शक्य झाले असते काय ? परंतु या सर्व आर्थिक मर्यादांच्या व्यतिरिक्त दुसरेही एक तितकेच महत्त्वाचे कारण, संस्थान स्वतंत्र राखण्याची हाव आम्ही न धरण्यास कारणीभूत झाले होते. ते असे की, इतक्या लहान संस्थानात लोकसत्ताक राज्यकारभार कार्यक्षमतेने व निरपेक्षपणे चालविणाऱ्या पुढाऱ्यांची परंपरा उपलब्ध होणे अशक्य आहे, अशी आमची आजवरच्या अनुभवाने आधीच खात्री झाली होती. तसेच बाहेर हद्दीतल्या थोर राजकीय संस्थांच्या नावाचा उपयोग करणारे ढोंगी व स्वार्थी लोक संस्थानच्या प्रजेला अनेक खोट्यानाट्या थापा देऊन, चिथावण्या देतात, असा आम्हास अनुभव आला होता. अशा लोकांच्या असत्य प्रचाराचा प्रतिकार करण्याची सदिच्छा व उत्साह हे लोकांजवळ नसतात, व अशा कामी जरूर असलेले राजकीय बल दरबारपाशी नसते, आणि याचा व्हावयाचा तो परिणाम होतो. यामुळे संस्थानचा कारभार नैतिकदृष्ट्या कितीही शुद्ध व कार्यक्षम असला व संस्थानची सांपत्तिक स्थिती कितीही चांगली असली, तथापि या आधारावर संस्थान स्वतंत्र राखण्याचा मोह अनिष्ट आहे, अशी आमची खात्री झाली. अखिल हिंदुस्थानच्या हिताच्या दृष्टीने या प्रश्नांचा विचार करता मध्यंतरी या संस्थानसारखी बेटे राहणे हे संरक्षण, वाहतूक, जकाती वगैरे दृष्टीने श्रेयस्कर नाही. देश एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत सलग असणेच चांगले. म्हणून या प्रश्नाचा संस्थानच्या संकुचित हित दृष्टीने विचार करण्यापेक्षा देशाच्या विशाल हितदृष्टीने विचार करणे हेच चांगले, असेही आमचे मत आहे व म्हणून आम्ही लोकांच्या वृथा आशेस व उद्योगास उत्तेजन देऊ शकलो नाही. तरी याबद्दल लोकांनी आम्हाला क्षमा केली पाहिजे.

धार्मिक व जातीय विचारांपासून व प्रचारांपासून हे संस्थान आम्ही गादीवर आल्यावेळेपासून अलिप्त ठेवण्याचा प्रयत्न केला असे, वर सूचित केले आहेच.

आमच्या विचारांना अशी दिशा लागण्यास मुख्यतः खालील कारणे झाली. पहिले असे की, श्री शिवाजी महाराजांचे उदाहरण सर्वांनाच गिरवावेसे वाटते. कारण ते एक असामान्य असे महापुरुष होऊन गेले. शिवाय, त्यांच्या व आमच्या घराण्याचे शिवाजी महाराजांच्या आजोबांपासून अगदी अलिकडे पर्यंत, एकसारखे दर पिढीला शरीरसंबंध झालेले. यामुळे त्याजविषयीच्या आदरात आपलेपणाची भर पडली. महाराजांची किर्ती व नीती अशी की, परधर्मीय अगर परजातीय शत्रूंच्या देखील धर्मभावना दुखवावयाच्या नाहीत व त्यांच्या स्त्रियांचा अवमान कधी करावयाचा नाही. हिंदू मधीलही जातीय तत्त्वावर उत्पन्न झालेले भेदभाव त्यांनी वाढू दिले नाहीत, हेही प्रसिद्ध आहे. राष्ट्र हे सर्वांचे आहे, ही भावना त्यांनीच प्रथम या देशात उत्पन्न केली, आणि त्यांचीच शिकवण शिरोधार्थ मानून आम्हीही राज्यकारभार जातीनिरपेक्षपणे चालविला. श्री शिवाजी महाराजांनी ऐतिहासिक कालात रूढ केलेल्या व आम्ही कित्येक वर्षे आचरीत असलेल्या या तत्त्वाला, आधुनिक सर्वश्रेष्ठ पुढारी महात्मा गांधी यांच्या अत्यंत थोर शिकवणीचा पूर्ण पाठिंबा असल्याचे दिसून आल्यावर तर, आम्हाला आमच्या धोरणाबद्दल आमच्या मर्यादित व महत्त्वहीन कारभारात देखील अधिकच उत्साह वाढू लागला होता. परंतु हे संस्थान याबाबतीत जितक्या उच्च पातळीवर राहावे अशी आमची इच्छा होती तितके ते राहिले नाही, ही गोष्ट आम्हाला खेदाने मान्य केल्यावाचून गत्यंतर नाही. विशेषतः महात्मा गांधींच्या भीषण हत्येनंतर त्यांच्या अहिंसा व जातीय सहिष्णुता या तत्त्वांची या संस्थानात फार पायमल्ली झाली, याचे आम्हाला पराकाष्ठेचे दुःख झाले. इतर ठिकाणांशी तुलना करिता आमच्या येथे अत्याचार कमी झाले. एवढ्याने आमच्या मनाला समाधान वाटत नाही. कारण खरे म्हणजे दंगेखोरांना अत्याचार कमी झाले, यामुळे बरे वाटत नसून उलट आपल्या गुन्हे करण्याच्या कर्तबगारीवर तो शिंतोडा आहे, असे ते समजतात हे आम्हास माहीत आहे. प्रत्यक्ष अपकृत्यापेक्षाही अशा विचारसरणीचाच आम्हाला अधिक विषाद वाटतो. परंतु वरीलप्रमाणे काही अपवादात्मक वाईट गोष्टी घडल्या असल्या, तथापि गेल्या तीस वर्षांच्या दीर्घ कालात आमच्या प्रजेकडून आम्हाला एकंदरीत जे सहकार्य लाभले व आमच्यावर त्यांनी जी निष्ठा ठेविली, त्याबद्दल आम्ही आमच्या प्रजेचे फार ऋणी आहोत, असे याप्रसंगी जाहीर करणे आमचे कर्तव्य आहे. आमच्या कारकिर्दीतील

परवाच्या पहिल्या व शेवटल्याच दंग्यातही- केवळ शांतताप्रिय अशा सर्वसामान्य लोकांनीच नाही तर दंगेखोरांनी देखील पुष्कळ प्रसंगी आमच्या शब्दाला वैयक्तिक राजनिष्ठेने मान देण्याची व अयोग्य कृत्यांपासून तात्पुरते तरी परावृत्त होण्याची जी वृत्ती दर्शविली, त्याबद्दल व्यक्तिशः आम्ही सर्वांचे आभारी आहोत. अर्थात् आमच्याविषयीचा वैयक्तिक आदर हा लोकांच्या अपकारी वृत्तीचे समर्थन करण्यास अगर त्यांच्या गुन्ह्याची तीव्रता कमी करण्यास कारणीभूत होऊ शकणार नाही, हे सांगणे नकोच. या सर्व गोष्टींचा विचार करता हे संस्थान मुंबई सरकारच्या ताब्यात देण्याचा आमचा निश्चय योग्यच होता, अशी आमची खात्री झाली आहे.

जातीय व हिंसक मार्गाचा प्रचार करणाऱ्या संस्थेला, आम्ही स्वतः अगर आमच्या दरबाराने संस्थानात अगर बाहेर कोठेही उत्तेजन दिले नाही, हे नमूद करण्यास आम्हास फार बरे वाटते. अनेकवेळा व अनेक ठिकाणी अशा संस्थांच्या अनेक समारंभाच्या निमित्ताने उपस्थित होण्यास आम्हास आग्रहाची निमंत्रणे येत. परंतु ती नेहमी नाकारण्यात येत असत. अशा संस्थेविषयी सहानुभूती कधीही बाळगली नाही व आता तर आम्ही अशा संस्थेस संस्थानात बंदी घातली आहे.

या निमित्ताने आमच्या प्रजाजनांना आम्हाला या प्रसंगी एक व्यापक सूचना करावीशी वाटते. ती ही की, जातीय वास येणारी कोणतीही सभा, संस्था अगर संघटना संस्थानात यापुढे राहू देण्यात येऊ नये. राष्ट्रीयतेच्या एकाच झेंड्याखाली सर्वांनी एकत्र यावे. हिंदु-मुसलमान असाच केवळ हा प्रश्न नाही. कारण आपणास माहीत आहे की, हिंदु समाजात तर धंद्यावरून जातींचा बुजबुजाट झालेला आहे. ब्राह्मणवर्ग हा अधिक सुशिक्षित व पुढारलेला असल्यामुळे त्यांनी या भेदांचे निराकरण करण्यास प्रथम पुढे यावे, असे आम्हांस वाटते. आता ही गोष्ट खरी आहे की, त्यांच्यातही चित्पावन, देशस्थ, कऱ्हाडे, सहवासी, देवरूखे, सारस्वत, वगैरे अनेक पोटजाती व त्या पोटजातींचे निरनिराळे संघ आहेत आणि या संघाचे गोड शब्दांत समर्थनही करण्यात येत असते. परंतु एक गोष्ट निर्विवाद आहे की, या निरनिराळ्या संघांच्या योगे भेदाचे बीज पेरले जाते व त्या विषवृक्षाची मुळे शेवटी समाजाचा पायाच उखडून टाकतात. ब्राह्मणेतरांत सुशिक्षित मराठे हे अधिक पुढारलेले म्हणून ब्राह्मणानंतर जाती जातींमधील भेद नष्ट करण्याची जबाबदारी त्यांच्यावर पडते. ब्राह्मणेतरांत सोनार,

शिंपी, माळी, साळी, कोष्टी, सुतार, लोहार, इत्यादी असंख्य जाती आहेत. परंतु ही जन्मजात जातीभेदांची अनर्थ परंपरा येथेच थांबत नसून हरिजनांतही महार, मांग, चांभार, धेंड इत्यादी अनेक पोटजाती असून त्या सर्वात उच्चनीच भाव स्पष्ट बोलावयाचे म्हणजे, मुळात जातिभेद हा जरी कदाचित गुणकर्मावर आधारलेला व उच्चनीच भावहित असला तरी अलिकडे तो जन्मावर अधिष्ठित होऊन हिंदु धर्मास शाप झाला आहे. म्हणून मुळातच त्याचे उच्चाटन झाल्याखेरीज देशात शांतता व समता प्रस्थापित होणार नाहीत असे आम्हांस वाटते. आज एखाद्या जातीवर उलटणाऱ्या लोकांनी उद्या आपल्यावर तीच पाळी येणार नाही ना याचा पूर्ण विचार करणे अवश्य आहे.

आता फलटण संस्थानच्या लोकांना आमची शेवटची अशी आग्रहाची विनंती आहे की, यापुढे ते स्वतंत्र हिंदुस्थानच्या लोकसत्ताक राज्याचे नागरिक होणार, त्याअर्थी अशा उच्च नागरिकत्वाचा उपभोग घेण्यास आपण पात्र आहोत, असे त्यांनी आपल्या वर्तनाने सिद्ध करावे आणि परवाच्या दंगलीने व जातीद्वेषाने या संस्थानच्या कीर्तीस जो कलंक लागला, त्याचे परिमार्जन करावे. महात्मा गांधींच्या हत्येने आधीच या देशास, व विशेषतः महाराष्ट्रास, अत्यंत लज्जास्पद परिस्थिती प्राप्त झाली आहे. त्यात नंतरच्या जातीय दंगलीने भर मात्र पडली आहे. हिंदुस्थानचे दिगंतकीर्ती मुख्य प्रधान, पंडित जवाहरलाल नेहरू व त्यांचे सरकार यांनी सर्व परिस्थितीत हिंदुस्थान देश हा secular democratic state म्हणजे जाती धर्म पंथातील सर्व संग्राहक लोकसत्ताक राष्ट्र म्हणूनच राहील, असे अनेकवार घोषित केले आहे. म्हणून त्या ध्येयाशी विसंगत असे वर्तन आपणांकडून कधीही घडता उपयोगी नाही. हे संस्थान अगदी लहान असले तरी, आम्ही त्याचा राज्यकारभार आजवर याच तत्त्वावर चालविला होता, हे सर्वांस माहीतच आहे. यामुळे लोकांना यात नवीन असे काहीच शिकावयाचे नाही. परंतु संस्थानातील काही लोकांची वृत्ती मात्र, अलिकडे ही उच्च भूमिका सोडून वागण्याची दिसून आली, याचे आम्हाला फार दुःख झाले. तरी यापुढे असे कधीही न व्हावे, एवढा सर्वांनी निश्चय करावा अशी आमची विनंती आहे. आता ज्याअर्थी आम्ही उद्यापासून या संस्थानचे अधिपती राहणार नाही, त्याअर्थी ही विनंती आम्ही आपल्यापेक्षा कोणत्याही प्रकारे उच्च आहोत अशा भावनेने करीत नसून,

आपणा सर्वांच्याच योग्यतेचा एक आपला बांधव म्हणून करीत आहो, हे सांगणे नकोच. आजवर संस्थानचे अधिपती आम्ही होतो, तरी देखील सेवक वृत्तीनेच आपले कर्तव्य करीत होतो. यापुढे तर आपल्यातीलच एक सर्वसामान्य नागरिक म्हणून आपली सेवा करण्याची संधी लाभल्याबद्दल आम्हांला अधिकच उत्साह व आनंद वाटत आहे. अर्थात् आमच्या प्रजाजनांशी असलेले आमचे इतके दीर्घकालीन नाते व संबंध यापुढे दुरावणार याचे दुःख आम्हास जाणवत नाही असे नाही. परंतु कवि कुलगुरू कालिदासाचे

पर्यायपीतस्य सुरैर्हिमांशोः । कलाक्षयः श्लाध्यतरो हि वृद्धेः ।

असे एक प्रसिद्ध वचन आहे. त्या न्यायाने आमची अधिकारवृद्धी होण्यापेक्षा आता होणारा अधिकार न्यासच आम्हाला अधिक गौरवास्पद व आनंददायक वाटत आहे. आजवर बऱ्यावाईट प्रकारे आम्ही वाहिलेली राज्यधुरा, हिंदुस्थान सरकारचे पंतप्रधान नामदार पंडित नेहरू, उपपंतप्रधान नामदार सरदार वल्लभभाई व त्यांचे सहकारी, तसेच मुंबईचे मुख्य प्रधान नामदार बाळासाहेब खेर व गृहमंत्री ना.मोरारजीभाई देसाई व त्यांचे सहकारी, अशांसारख्या श्रेष्ठ लोक कार्य धुरंधरांच्या हाती सोपविताना आम्हाला अत्यंत समाधान वाटत आहे. शेवटी, आमच्या या जुन्या व सुसंपन्न संस्थानचा व येथील लोकांचा यापुढे अधिकाधिक उत्कर्ष होवो, अशी श्रीरामचंद्रप्रभूची प्रार्थना करून आम्ही सर्वांची रजा घेतो.

फलटण. — **मालोजीराव**

रविवार, दि. ७ मार्च १९४८ — **राजे, सं. फलटण**

***

१२. रयत सेवक म्हणून दुसरी 'इनिंग'

८ मार्च १८४८ नंतर फलटण संस्थान विलीन झाले. तरी मुंबई इलाख्यातील फलटण तालुक्याच्या प्रजेच्या मनात श्रीमंत मालोजीराजेंबद्दल आपली सुख-दुःखे बघणारा आणि नवे विकास पर्व करणारे असे ते अजूनही महाराजच आहेत अशी प्रतिमा होती. श्रीमंत मालोजीराजेंनीही आपल्या प्रजेबद्दलची कृतज्ञता म्हणून त्यांचा एक जबाबदार नेता, कुटुंब प्रमुख म्हणून फलटण तालुक्याच्या सर्वांगीण विकासात लगेचच रयत सेवक म्हणून झोकून दिले.

मुंबई सरकारचे बोलावणे :

हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर म्हणजे १५ ऑगस्ट १९४७ नंतर राज्य प्रशासनासाठी जे मंत्रिमंडळ होते, त्यात बाळासाहेब खेर मुख्यमंत्री होते. संपूर्ण देशात खांदेपालट झाल्यामुळे राज्याची प्रशासकीय घडी बसविण्यासाठी जवळपास एक वर्ष गेले. त्यानंतर मुंबई इलाख्यातील फलटण संस्थान ८ मार्च १८४८ ला विलीन झाले. त्यावेळेस केंद्रीय गृहमंत्री वल्लभभाई पटेल यांनी मद्रासला राज्यपाल नेमण्यासाठी दोन संस्थानिकांची नावे सुचविण्यास मुख्यमंत्र्यांना सांगितले होते. त्यानुसार त्यांनी फलटण संस्थानचे श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर व गुजरात मधील भावनगरचे महाराज जीवराज मेहता यांची नावे सुचविली होती. तथापि राज्यपाल पदापेक्षा जनतेतील लोकप्रतिनिधी म्हणून कार्य करण्यासाठी या दोघांनीही राज्यपाल पदाची विनंती अमान्य केली.

त्यानंतर एकदा १९४९ मध्येच श्रीमंत मालोजीराजे व त्यांचे दिवाण गोडबोले फलटण तालुक्याच्या काही कामानिमित्त मुंबईला मुख्यमंत्री ना.बाळासाहेब खेर यांचेकडे गेले होते. कामाची चर्चा झाल्यानंतर श्रीमंत मालोजीराजे जायला निघाले तेव्हा मुख्यमंत्री त्यांना पोचवायला कार्यालयाच्या दारापर्यंत आले होते. यावरून श्रीमंत मालोजीराजे यांच्या त्यागाची व कर्तृत्वाची योग्य दखल मुख्यमंत्र्यांनी कशी घेतली हे दिसून येते. दारातून त्यांना निरोप देताना मुख्यमंत्री श्रीमंत मालोजीराजेंना म्हणाले, ''आम्ही आपल्याला मंत्रिपद देऊ करणार आहोत, तेव्हा ही विनंती आपण

मान्य केलीच पाहिजे.'' पण नंतर लगेचच श्रीमंत मालोजीराजे यांनी खेर यांना पत्र पाठविले की,

'साहेब, तुमच्या आस्थेबद्दल आभारी आहे. पण मी आपल्या काँग्रेसचा साधा सभासदही नाही. त्यामुळे मी मंत्रीपद स्वीकारू शकणार नाही.' परंतु हे पत्र मिळण्याआधीच मुख्यमंत्री खेर यांचा दूरध्वनी श्रीमंत मालोजीराजेंना आला. त्यात मुख्यमंत्री म्हणाले, ''काँग्रेसचे सभासद होण्याबाबत आमचा काही आत्ताच आग्रह नाही. तुम्ही रात्रीच मुंबईत पोहचा. तुमचा उद्याच दुपारी शपथविधी आहे.''

त्यानंतर ९ सप्टेंबर १९४९ रोजी श्रीमंत मालोजीराजे यांचा खेर मंत्रिमंडळात समावेश झाला. उद्योग व विकास हे खाते त्यांना देण्यात आले. त्यानंतर ६ महिन्यांनी सहकार खातेही त्यांचेकडे देण्यात आले.

मंत्री म्हणून राज्य पातळीवर कार्य :

यापूर्वी श्रीमंत मालोजीराजे फलटण संस्थानचे राजेसाहेब म्हणून काम करीत होते. पण याला फलटण संस्थान पुरतीच मर्यादा होती. पण आता मुंबई इलाख्याच्या मंत्रिमंडळात समावेश झाल्यामुळे मंत्री म्हणून महाराष्ट्र, मध्यप्रदेश, गुजरात व कर्नाटकचा काही भाग असलेल्या विस्तीर्ण अशा मुंबई इलाख्यात काम करण्याची त्यांना संधी मिळाली.

सहकार मंत्री असताना त्यांनी सहकारी तत्त्वावर साखर कारखानदारी कशी उभी करता येईल यासाठी या क्षेत्रातील काही जाणकारांची समिती नेमली. प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ डॉ.धनंजयराव गाडगीळ व सहकार तज्ञ वैकुंठभाई मेहता यांचा सल्ला घेतला. ऊसाचे क्षेत्र असलेल्या जिल्ह्यात या तज्ञ मंडळीं समवेत दौरा केला. त्याचे फलित म्हणजे १९४९ साली अहमदनगर जिल्ह्यातील 'लोणी' येथे पहिला सहकारी साखर कारखाना शेतकऱ्यांच्या भाग भांडवलातून सुरू झाला. विठ्ठलराव विखे-पाटील यांच्या नेतृत्वाखाली हा साखर कारखाना सुरू झाला. यासाठी सहकार मंत्री म्हणून श्रीमंत मालोजीराजेंचा प्रमुख सहभाग होता. पुढे १९५२ नंतर श्रीमंत मालोजीराजे जेव्हा पुन्हा मंत्री झाले, त्यावेळी त्यांनी हा साखर कारखानदारीचा प्रयोग नीरा, प्रवरा, गोदावरी, गिरणा, कृष्णा खोऱ्यात सुरू केला. त्यासाठी ऊस उत्पादक सभासद होणे आवश्यक होते. म्हणून त्यांनी कालव्यांवरील ऊस ब्लॉक धारण

करणाऱ्यास सहकारी साखर कारखान्याचे भाग घेण्याबाबत सक्ती करणारी योजनाच १९५४ मध्ये मंजूर केली. त्यामुळे नीरा उजव्या कालव्यावर श्रीराम, यशवंत, नीरा डाव्या कालव्यावर सोमेश्वर, माळेगाव, सणसर, प्रवरा उजवा कालव्यावर राहता, गिरणा कालव्यावर गिरणा, कृष्णावर कृष्णा असे साखर कारखाने सुरू झाले. या सर्व कारखान्यांसाठी श्रीमंत मालोजीराजे यांनी सचिवालय पातळीवरून व मंत्रीमंडळ पातळी वरून सर्व प्रकारचे सहकार्य केले. शेतकरी ऊस उत्पादकाला कारखान्यात मालकी हक्क मिळाल्यामुळे त्यांना आर्थिक स्थैर्य मिळाले तर साखर कारखान्यांनाही आर्थिक हमी मिळाली.

कोयना धरणाचे एक शिल्पकार :

१९५२ च्या मार्च महिन्यात श्रीमंत मालोजीराजे यांचेकडे मंत्री म्हणून पाटबंधारे व सार्वजनिक बांधकाम विभागाचा कार्यभार आला. त्यावेळी मुख्यमंत्री ना.मोरारजीभाई देसाई होते. श्रीमंत मालोजीराजे संस्थान काळात शिकारीसाठी महाबळेश्वर, कोयना काठच्या जंगलात शिकारीला जात असत. त्यावेळीही अनेक शेतकऱ्यांनी त्यांना कोयना नदीवर धरण व्हावे अशी मागणी केली होती. हा सगळा परिसर त्यांनी शिकारीच्या निमित्ताने पायी हिंडून पाहिला होता. पुढे ते याच खात्याचे मंत्री झाले. त्याआधी डॉ.धनंजयराव गाडगीळ, उद्योगपती शंकरराव किर्लोस्कर व सेवानिवृत्त अधीक्षक अभियंता मणेरीकर यांनीही १९४२ ते ५२ या काळात या भागात विविध परिषदा, बैठका कोयना धरणासाठी पाठपुरावा म्हणून घेतल्या होत्या. या सर्वांनी आपला अहवाल मुख्यमंत्री मोरारजीभाई देसाई व पाटबंधारे, बांधकाम मंत्री म्हणून श्रीमंत मालोजीराजेंकडे दिला होता. मोरारजीभाईंना कोयनेपेक्षा गुजरातमधील उकाई धरणाबाबत आस्था होती, तर श्रीमंत मालोजीराजेंना कोयना धरणाबाबत होती. त्यामुळे त्यांनी मंत्रिमंडळात उकाई धरणाबरोबरच कोयना धरण विषयही मोरारजीभाईंना घ्यायला लावला.

श्रीमंत मालोजीराजेंनी लक्ष घातल्यामुळे सचिवालयात कोयना धरणाबाबत प्रशासकीय वेग आला. एक महत्त्वाची अडचण अधिकाऱ्यांनी त्यांच्या निदर्शनास आणून दिली ती म्हणजे त्यावेळेच्या पहिल्यांदाच स्थापन झालेल्या नियोजन मंडळाच्या मंजुरीची. त्यावेळी नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष ना.गुलझारीलाल नंदा

होते. मागच्या खेर मंत्रिमंडळात श्रीमंत मालोजीराजेंचे ते सहकारी मंत्री होते. दुसरे सभासद भारताचे अर्थमंत्री बॅ.चिंतामणराव देशमुख होते. ते कोकणातले होते आणि श्रीमंत मालोजीराजेंचे त्यांचे संबंध चांगले होते. त्यामुळे या दोघांच्या सहकार्याने त्यांनी नियोजन मंडळाची मान्यता व केंद्र सरकारच्या अन्य विभागाच्या मान्यताही मिळवल्या. त्यामुळे अखेर कोयना धरण मंजूर झाले व १९५४ मध्ये त्याचा शुभारंभही झाला.

....कर्तव्यदक्ष स्थितप्रज्ञता :

कोयना धरणाबाबत श्रीमंत मालोजीराजे अत्यंत आग्रही होते. सचिवालयामध्ये, नवी दिल्लीत नियोजन मंडळात ते त्यासाठी अत्यंत व्यस्त असायचे. या धरणाच्या कामात ते अगदी झपाटून गेले होते. त्यातला एक प्रसंग अतिशय महत्त्वाचा आहे. १९५३ मध्ये या धरणाच्या कामाचा पाठपुरावा करण्यासाठी श्रीमंत मालोजीराजेंनी सचिवालयात त्यांच्या मंत्री दालनात एक उच्चस्तरीय अधिकाऱ्यांची महत्त्वाची बैठक बोलावली होती. या विभागाचे केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री, परदेशातील काही तंत्रज्ञ, विभागातील उच्च स्तरीय अधिकारी यांचे समवेत ही पूर्वनियोजित बैठक होती. बैठक चालू असतानाच त्यांना एक तातडीचा दूरध्वनी कार्यालयात आला होता. त्यामध्ये त्यांना 'तुमचे जावई मनोहर नामजोशी विमान अपघातात मयत झाले आहेत' असा निरोप होता. अर्थातच कॅप्टन मनोहर नामजोशी एक उत्कृष्ट वैमानिक, त्यांचे एकुलते एक आवडते जावई होते आणि त्यांचा अपघाती मृत्यू हा फार मोठा धक्का त्यांचेसाठी होता. पण ते जराही विचलित झाले नाहीत. त्यांनी त्यानंतर विलक्षण कर्तव्यदक्ष स्थितप्रज्ञतेने बैठकीत भाग घेतला. बैठक यशस्वी झाली आणि कोयना धरणाच्या शुभारंभाचाही त्यात निर्णय झाला. बैठक संपेपर्यंत ही वार्ता त्यांनी कोणालाही सांगितली नाही. बैठक संपल्यावर ही दुःखद बातमी सर्वांना सांगितली आणि लगेचच ते पुढील कार्यवाहीसाठी रवाना झाले.

धरण कामातील मयत कामगारांबद्दल कृतज्ञता :

कोयना धरणाच्या कामामध्ये श्रीमंत मालोजीराजेंनी तन-मन-धनाने काम केले. पण या धरणासाठी जे अभियंते, कामगार काम करत होते, त्यांच्या सुख-दुःखात श्रीमंत मालोजीराजे त्यांच्या पाठीशी उभे राहत असत. त्यातला एक प्रसंग अतिशय

महत्त्वाचा व चिरस्मरणीय आहे. धरणातलं पाणी कोकणात खाली नेण्यासाठी प्रचंड बोगदा तयार करण्यात आला. पोफळी येथे वीजगृहासाठी पाणी देऊन उरलेले पाणी खाली कोकणात सोडायचे असे नियोजन होते. हा बोगदा तयार करणे हे अभियंत्यांपुढे मोठे आव्हान होते. या प्रकल्पात नेहमी कुठे न कुठे अपघात होत असत. सुमारे ३६ अभियंते व कामगार या अपघातात कर्तव्यावर असताना मयत झाले. त्यावेळीही त्या सर्वांच्या कुटुंबियांच्या मदतीसाठी व सांत्वनासाठी श्रीमंत मालोजीराजे धावून गेले होते. धरणाच्या शुभारंभावेळी मान्यवरांची नावे असलेल्या कोनशिला असतातच. पण श्रीमंत मालोजीराजे यांच्या संवेदनशील कल्पकतेमुळे कोयना धरणासाठी बळी गेलेल्या या ३६ कारागिरांची नावे तिथे एका शिल्पात कोरण्यात आली, हे त्यांचे विशेष योगदान आहे.

मंत्रिमंडळात पुन्हा सक्रीय :

१९४९ मध्ये प्रथम मुंबई इलाख्याच्या पहिल्या मंत्रिमंडळात काम करीत असतानाच काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय राजकारणाची दिशा लक्षात घेऊन श्रीमंत मालोजीराजे काँग्रेस पक्षाचे क्रियाशील सभासद झाले व नंतर नेतेही झाले. त्यावेळी महाराष्ट्राच्या राजकारणात यशवंतराव चव्हाण, मोरारजीभाई देसाई, भाऊसाहेब हिरे असे दिग्गज नेते स्वातंत्र्य लढ्यात व नंतर मुंबई इलाख्याच्या सत्तेत होते. श्रीमंत मालोजीराजे व साताऱ्यातील गणपतराव तपासे हे दोन मंत्री स्वातंत्र्य लढ्यात नव्हते, पण त्यांनी स्वातंत्र्य लढ्यात काँग्रेसला मदत केली होती. श्रीमंत मालोजीराजेंना फलटण संस्थानचा इतिहास होता व काँग्रेस पक्षाच्या जाहीरनाम्यातील कितीतरी कार्यक्रम त्यांनी संस्थानमध्ये राबविला होता. त्यामुळे श्रीमंत मालोजीराजेंचा काँग्रेस पक्षात आणि मंत्रिमंडळात एक आदरयुक्त दबदबा होता. १९५२ मध्ये देशात पहिली सार्वत्रिक निवडणूक झाली तशी मुंबई इलाख्यातही झाली. त्यामध्ये फलटण, माण मतदारसंघातून काँग्रेस पक्षाचे उमेदवार म्हणून श्रीमंत मालोजीराजे व गणपतराव तपासे चांगल्या बहुमताने निवडून आले. श्री.मोरारजीभाई देसाई विधी मंडळ पक्षाचे नेते झाले व लगेचच मुख्यमंत्री झाले. या मंत्रिमंडळात श्रीमंत मालोजीराजे सार्वजनिक बांधकाम, पाटबंधारे मंत्री झाले. त्यांनी शेतीच्या पाण्याची टंचाई दूर व्हावी यासाठी राज्यात धरणे, तलाव बांधण्याचे काम सुरू केले. त्यानुसार कोयना धरणाशिवाय

नाशिक जिल्ह्यात गिरणा नदीवर, अहमदनगर जिल्ह्यात घोड नदीवर, नीरा नदीवर वीर, गुजरातमध्ये काक्रापारा, कर्नाटकमध्ये घटप्रभा मलप्रभा, वर्ध्यामध्ये पूर्णा अशी धरणे प्रशासकीय मंजुरी देऊन त्यांचे कामही सुरू केले. सातारा जिल्ह्यातील दुष्काळी अशा माण भागात राणंद, आंधळी अशी लहान धरणेही मंजूर केली. फलटण तालुक्यात सालपे, आदर्की, वडले, बाणगंगा, धुमाळदरा, मिरढे, तांबवे, जावली, हिंगणगांव येथे छोट्या धरणांची निर्मिती केली. त्यामुळे या प्रकल्पांच्या लाभ क्षेत्रात शेती व पिण्याचे पाणी उपलब्ध होऊन हजारो गावांचा विकास झाला.

बांधकाम विभागही त्यांच्याकडेच असल्यामुळे त्यांनी मुंबई येथे सचिवालयासाठी सध्या असलेली मूळ सहा मजली इमारत बांधली हे त्यांचे सर्वात मोठे काम आहे. राज्यात अनेक जिल्ह्यात पूल, रस्ते बांधून त्यांनी राज्यातील रस्ता वाहतूक गतिमान केली. सातारा जिल्ह्यातही त्यांनी नीरा नदीवर सांगवी पूल, फलटण-दहिवडी रस्ता, फलटण-बारामती, लोणंद-पंढरपूर, सातारा-पंढरपूर रस्ते व त्यावरील पूल बांधण्याची फार मोठी कामे केली.

फलटणमध्येही सहकारी साखर कारखाना सुरू :

१९५२ ते १९५७ या काळात श्रीमंत मालोजीराजे यांनी वरीलप्रमाणे राज्यात विकासाचे जाळे निर्माण केले. त्यांचे आणखी एक उल्लेखनीय कार्य म्हणजे धरणाखालील बागायती क्षेत्राचे बारमाही व हंगामी पिकासंबंधीचे नियोजन. सहकारी साखर कारखान्यांना उत्तेजन म्हणून त्यांनी शासनास प्रत्येक सहकारी साखर कारखान्यात प्रत्येकी रुपये १० लाखाचे भाग भांडवल गुंतविण्यास भाग पाडले. त्यामुळे साखर कारखानदारीला कायम स्वरूपाची आर्थिक संजीवनी मिळाली व राज्यात सहकारी साखर कारखाने उभे राहण्यासाठी स्पर्धा सुरू झाली. स्वतःचा तालुकाही यामध्ये मागे राहू नये यासाठी त्यांनी फलटणमध्ये १९५४ मध्ये श्रीराम सहकारी साखर कारखाना सुरू केला. तालुक्यातील प्रतिष्ठित अशा सखाराम गणपतराव परकाळे, दिनकरराव गणपतराव पवार, माणिकचंद नानचंद दोशी, रामभाऊ गावडे, माधवराव बळवंतराव बेडके, ॲड.सखाराम राजाराम भोसले, माधवराव गणेश दाते, कोंडीराम कृष्णाजी बोरावके, तुकाराम रामचंद्र शिंदे, बापूसाहेब बाळासाहेब रणवरे, बापूसाहेब फडतरे, साहेबराव खाशाबा भोसले,

विश्वंभर शंकर झिरपे, रा.ब. भगत, बाबुराव खटके, गंगाराम रामचंद्र दोशी अशा मातब्बरांना १० लाख रुपये भाग भांडवल गोळा करण्याची जबाबदारी दिली. पण प्रत्यक्षात ५ लाख रुपयेच भाग भांडवल जमा झाले. मग स्वतः श्रीमंत मालोजीराजे, त्यांची कन्या श्रीमंत सरोजिनीदेवी अक्कासाहेब व राजघराण्यातील इतर मान्यवरांनी मिळून ५ लाख रुपये भाग भांडवल दिले. श्रीमंत मालोजीराजेंचे द्वितीय सुपुत्र श्रीमंत शिवाजीराजे नुकतेच अमेरिकेत राहून त्यांनी शेतीविषयक पदवी घेतली होती. ते परत आल्यावर त्यांचेकडे या कारखान्याची संपूर्ण जबाबदारी दिली व त्यांनीही ती समर्थपणे (२२ वर्षे) सांभाळली. कारखाना उभारणीच्या काळातच महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्राची चळवळ सुरू झाली होती. त्यामुळे अनेक अडचणी आल्या. पण तरीही श्रीमंत मालोजीराजे व श्रीमंत शिवाजीराजे यांनी अथक परिश्रमातून हा कारखाना अनेक दिव्यातून जात उभारलाच. ३ ऑक्टोबर १९५७ ला या कारखान्याचा शुभारंभ केंद्रीय अर्थमंत्री मोरारजीभाई देसाई यांच्या हस्ते झाला. यामुळे फलटण तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या जीवनात नवे आर्थिक परिवर्तन झाले. तालुक्याच्या सर्वांगीण विकासालाही पाठबळ मिळाले, चालना मिळाली.

श्रीराम सहकारी साखर कारखान्यामध्ये श्रीमंत मालोजीराजे यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकरी ऊस उत्पादकांना कारखान्यातर्फे ऊसाचे बी-बियाणे, औषधे, खते यासाठी अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले. तसेच ज्या शेतकऱ्यांना (जिराईत भागातील) ऊस लागवडीसाठी त्यांच्या शेतात विहिरी खोदकामासाठीही त्यांनी कारखान्याच्या माध्यमातून अर्थसहाय्य दिले. ज्या शेतकऱ्यांना बोअरवेल पाहिजे होती त्यासाठीही बोअरिंग मशिन देऊन अर्थसहाय्य दिले. शेतकऱ्यां बरोबरच कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांच्या कल्याण विषयक कामांनाही श्रीमंत मालोजीराजे यांनी प्राधान्य दिले. त्यासाठी त्यांनी कारखान्याचे चेअरमन श्रीमंत शिवाजीराजे यांना सक्त सूचना दिल्या. त्यामुळे या कारखान्याच्या आवारात अधिकारी, कामगार यांच्यासाठी स्वतंत्र निवासस्थाने बांधली गेली. कल्याण आणि क्रीडा मंडळाची सभागृह असलेली स्वतंत्र इमारत बांधण्यात आली. त्यामुळे अधिकारी, कामगार व त्यांचे कुटुंबिय यांचे विविध घरगुती कार्यक्रम, श्रीगणेश उत्सव, विविध करमणुकीचे कार्यक्रम, तसेच सभासद व शेतकरी यांच्याकडील

विवाह समारंभ, आदींसाठी उत्तम सोय झाली. अधिकारी, कामगार व त्यांची मुले यासाठी स्वतंत्र क्रीडांगण व व्यायामशाळाही सुरू झाली. आरोग्याच्या बाबतीतही श्रीमंत मालोजीराजे संस्थानिक असताना जसे सतर्क होते तसेच साखर कारखान्याच्या शेतकरी सभासद, कामगार यांच्या आरोग्याबाबतीतही ते आग्रही होते. त्यामुळेच त्यांच्या मार्गदर्शनाखाली स्वतंत्र मुधोजी रूग्णालय उभारले. १७-१-१९६३ रोजी या रूग्णालयाचा महाराष्ट्राचे तत्कालिन गृहमंत्री ना. पी. के. उर्फ बाळासाहेब सावंत यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. त्याचा फायदा शेतकरी सभासद, कामगार यांच्या कुटुंबियांबरोबरच फलटण तालुक्यातील सर्वसामान्य जनतेला होऊ लागला.

श्रीमंत मालोजीराजेंच्या प्रोत्साहनातून उभ्या राहिलेल्या या कारखान्यास तत्कालिन केंद्रीय अर्थमंत्री ना.मोरारजीभाई देसाई, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व नंतर केंद्रीय मंत्री झालेले यशवंतराव चव्हाण, सहकार मंत्री ना.यशवंतराव मोहिते, गृहमंत्री ना.बाळासाहेब देसाई, काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा श्रीमती इंदिरा गांधी, मंत्री ना.रत्नाप्पाण्णा कुंभार, मंत्री ना.जीवराज मेहता, राजमाता श्रीमंत छत्रपती सुमित्राराजे भोसले अशा अनेक मान्यवरांनी भेटी देऊन कारखान्याला शुभेच्छा दिल्या होत्या.

सोमेश्वर साखर कारखाना :

श्रीमंत मालोजीराजे यांच्या प्रेरणेने अनेक जिल्ह्यात सहकारी तत्त्वावर साखर कारखाने निघाले. त्यामध्ये नीरा नदीच्या खोऱ्यात सुरू झालेल्या सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याची हकिगत विलक्षण आहे. त्यांच्या आवाहनास अनुसरून मुगुटराव काकडे-देशमुख व त्यांच्या बारामती, नीरा, जेजुरी, वाल्हे सर्व जि.पुणे या भागातून हजारो शेतकऱ्यांनी कारखान्यासाठी आवश्यक तेवढे बीज भाग भांडवल गोळा केले. पण कारखान्याची जागा निश्चित करण्यात मात्र टोकाचे मतभेद झाले. एकमताने किंवा बहुमताने निर्णयच होत नव्हता. बऱ्याचशा लोकांनी कोऱ्हाळे बु।। येथेच कारखाना उभा करावा अशी आग्रहाची भूमिका घेतली. वाद काही मिटेना. शेवटी या कारखान्याचे मुख्य प्रवर्तक म्हणून हे वादग्रस्त प्रकरण श्रीमंत मालोजीराजेंकडे आले. मग या संदर्भात विचार विनिमय करण्यासाठी त्यांनी भाग भांडवल धारक शेतकऱ्यांची सभा वडगांव निंबाळकर ता.बारामती जि.पुणे येथे बोलावली. दोन्ही बाजू ऐकून घेतल्यावर श्रीमंत मालोजीराजे यांनी अभ्यासपूर्ण प्रभावी भाषण केले. त्यात त्यांनी

शेतकऱ्यांना पुढाऱ्यांना कळकळीचे आवाहन केले की, ''कारखाना उभारणीसाठी शासनाने नियुक्त केलेल्या स्थळ पाहणीचा अहवाल हा तांत्रिकदृष्ट्या योग्य आहे. त्यानुसार कोणालाही भाग भांडवल परत मिळणार नाही व कारखाना योग्य अशा म्हणजेच सोमेश्वर येथेच उभारला जाईल. आपले भविष्य, प्रगती व गरज लक्षात घेऊन आता कोणीही जागेबाबत वाद उत्पन्न करू नये.'' त्यांच्या भाषणाचा प्रभाव म्हणून सर्व वाद मिटले व कारखाना सोमेश्वर येथेच निश्चित झाला व पुढे सुरूही झाला.

लघु उद्योगांनाही मदत :

फलटणमध्ये बाबुराव वैद्य नावाच्या एका गृहस्थाने रबरी फुगे, वस्तू बनविण्याचा एक छोटासा उद्योग सुरू केला होता. त्यासाठीही श्रीमंत मालोजीराजेंनी त्यांना मोठी मदत केली होती. इतकेच नव्हे तर स्वतःचे चिरंजीव श्रीमंत शिवाजीराजे यांनाही त्यात सहभागी केले होते. पण काही कारणाने वैद्य यांचा हा लहानसा उद्योग यशस्वी झाला नाही. तथापि वैद्य नंतर पुण्याला गेले व हाच उद्योग पुण्यात सुरू केला. तो चांगला चालला व त्यालाही श्रीमंत मालोजीराजेंनी शासनातून सहकार्य केले. सुप्रसिद्ध उद्योगपती वसंतराव वैद्य यांचा हा स्वस्तिक रबर उद्योग पुढे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय ख्यातीचा उद्योग झाला.

***



फलटण येथील श्रीराम सहकारी साखर कारखाना.

१३. काँग्रेस पक्षासाठी विशेष योगदान

श्रीमंत मालोजीराजेंनी १९४९ मध्ये मंत्री झाल्यावर काँग्रेस पक्षाचे सभासद म्हणूनही पक्षाचे काम सुरू केले होते. पुढे ते काँग्रेस पक्षाचे प्रमुख नेते झाले. १९५२ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी सगळा महाराष्ट्र काँग्रेसच्या प्रचारांनी पिंजून काढला होता. त्यांना काँग्रेस पक्षात आदरयुक्त सन्मान होता. त्यावेळी पहिले मुख्यमंत्री बाळासाहेब खेर, नंतरचे मुख्यमंत्री मोरारजीभाई देसाई व द्वैभाषिक मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचेशी राज्यशासन, प्रशासन व काँग्रेस पक्ष अशा माध्यमातून जवळचे संबंध निर्माण झाले. तसेच वरिष्ठ पक्षनेते महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल, इंदिरा गांधी यांच्याशीही त्यांचे चांगले संबंध निर्माण झाले होते. त्याचा उपयोग नेहमीच ते महाराष्ट्रातल्या विविध कामांसाठी करून घेत होते. १९५२ ते १९५७ या काळात त्यांनी महाराष्ट्रात काँग्रेसचा पाया अधिकच भक्कम केला.

१९५४-५५ च्या आसपास संयुक्त महाराष्ट्राचा लढा महाराष्ट्रात तीव्र होत होता. मुंबईत भाई डांगे, आचार्य प्र. के. अत्रे, सेनापती बापट, एस. एम. जोशी, प्रबोधनकार ठाकरे, भाई माधवराव बागल, वा. रा. कोठारी, नीळकंठराव खाडिलकर, अहिल्याबाई रांगणेकर आदी नेत्यांनी लढ्याचे रणसिंग फुंकले होते. या सर्वांनी संयुक्त महाराष्ट्र समिती स्थापन केली होती. मुंबई राज्य द्वैभाषिक असावे कां नसावे, यावर प्रारंभी या लढ्याचा जोर होता. १९५४ मध्ये आंध्रप्रदेशची स्थापना झाली व उर्वरित भारतातील राज्यात भाषावर प्रांत रचनेची चळवळ सुरू झाली होती. श्रीमंत मालोजीराजे त्यावेळी मंत्री होते. त्यामुळे मंत्रिमंडळात, विधी मंडळात आणि काँग्रेसमध्ये या विषयावर चर्चा होत होतीच. प्रादेशिक भाषेच्या विकासासाठी व त्या अनुषंगाने भाषिक संस्कृतीसाठी भाषावार प्रांत रचना व्हावी असा त्यावेळी मतप्रवाह होता. पण आपल्या भारत देशाला स्वातंत्र्य मिळून अजून एक दशकही झाले नाही. मग अशावेळी भाषिक प्रांतवादापेक्षा आधी भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेच्या राष्ट्रवादाला धोका निर्माण होऊ शकतो अशा मताचे श्रीमंत मालोजीराजे होते. केंद्र

सत्ता कोणत्याही परिस्थितीत अखंड व बळकट असावी असेही त्यांचे प्रांजळ मत होते.

त्यादृष्टीने त्यांनी ६ डिसेंबर १९५५ रोजी सातारा जिल्हा काँग्रेस समितीची खास बैठक फलटण येथील मुधोजी मनमोहन राजवाड्यात आयोजित केली होती. या बैठकीला यशवंतराव चव्हाणही उपस्थित होते. तसेच तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, गणपतराव तपासे अशी मोजकी नेते मंडळी उपस्थित होती. महाराष्ट्रात संयुक्त महाराष्ट्र लढा, भाषिक प्रांतरचना वाद, मुंबई द्वैभाषिकाची राजधानी ठेवायची की केंद्रशासित ठेवायची अशा प्रश्नावर वातावरण तप्त होते. यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पातळीवर पंडित नेहरूंचे नेतृत्व मानणारे, पण श्रीमंत मालोजीराजे मोरारजीभाई देसाई यांचे नेतृत्व मानणारे अशी परिस्थिती होती. परंतु संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न काँग्रेस श्रेष्ठींकडूनच सोडविला जाईल यावर दोघांचे एकमत होते. तेव्हा तूर्तास द्वैभाषिक राज्य ठेवावे, शंकरराव देव व मामासाहेब देवगिरीकर यांचे नेतृत्व झुगारावे असा निर्णय या बैठकीत झाला. हे वृत्त वाऱ्यासारखे महाराष्ट्रात गेले आणि मुधोजी मनमोहन राजवाड्यात हा निर्णय झाला, म्हणून प्रामुख्याने श्रीमंत मालोजीराजेंवरही खूप टीका झाली. संयुक्त महाराष्ट्र समितीने त्यावेळी मुधोजी मनमोहन राजवाड्यावर मोर्चा काढून त्यांचा निषेधही केला होता. विरोधकांनी सगळ्याच मंत्रिमंडळाची राजीनाम्याची मागणी केली होती. तथापि प्रदेश काँग्रेसच्या बैठकीत श्रीमंत मालोजीराजे म्हणाले होते, ''आम्ही यशवंतराव चव्हाणांसहित सर्वांनी राजीनामे देण्यासाठी लिहून ठेवले होते. पण महाराष्ट्रात या प्रश्नावर पेटलेल्या आगीच्या डोंबात आणखी तेल पडावयास नको म्हणून आम्ही राजीनामे दिले नाहीत. सत्याग्रह व राजीनामे याशिवाय आम्ही मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र मिळवून दाखवू. आम्हालाही मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राबद्दल प्रेम आहे. तो मक्ता फक्त विरोधकांनाच दिलेला नाही.'' असा होता श्रीमंत मालोजीराजेंचा राजकीय निर्भिडपणा. त्यांचे ठाम म्हणणे होते की, पं.जवाहरलाल नेहरू व काँग्रेस अध्यक्षा श्रीमती इंदिरा गांधी यांचे मत परिवर्तन आम्ही जरूर करू. संयुक्त महाराष्ट्र व मुंबई मिळविण्याचा हाच राजमार्ग आहे.

वरील सर्व गोष्टींचा परिणाम सन १९५७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत श्रीमंत

मालोजीराजे यांना भोगावा लागला. संयुक्त महाराष्ट्र समितीच्या चळवळीला पाठिंबा दिला नाही म्हणून विरोधी पक्षांनी श्रीमंत मालोजीराजे, यशवंतराव चव्हाण व गणपतराव तपासे यांना पाडण्यासाठी सर्व विरोधी पक्षांची ताकद सातारा जिल्ह्यात पणाला लावली. पण यशवंतराव चव्हाण कराडमधून अल्प मतांनी निवडून आले. श्रीमंत मालोजीराजेंचा पराभव झाला व त्यांच्या जागी कम्युनिस्ट पक्षाचे कॉम्रेड हरिभाऊ निंबाळकर निवडून आले. महाराष्ट्रातही काँग्रेसला बरेच अपयश आले. संयुक्त महाराष्ट्र समितीला त्यावेळी १३० जागा मिळाल्या. परंतु अखेर काँग्रेसच सत्तेवर आली. पण श्रीमंत मालोजीराजे नाऊमेद झाले नाहीत. महाराष्ट्रात ठिकठिकाणी झालेली पक्षाची पडझड लक्षात घेऊन त्यांनी पुन्हा काँग्रेस पक्ष बांधणीच्या कामाला सुरूवात केली. श्रीमंत मालोजीराजे यांची पक्षनिष्ठा, त्यांनी केलेला त्याग, सर्वांशी समन्वय राखण्याची वृत्ती व अविश्रांत काम करण्याची तयारी, पक्षासाठी तन-मन-धनाने काम करण्याची प्रवृत्ती लक्षात घेऊन त्यांचेवर काँग्रेसच्या अत्यंत कठीण काळात महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्षपदाची जबाबदारी दिल्लीतील पक्षश्रेष्ठींनी त्यांचेवर दिली आणि श्रीमंत मालोजीराजेंनीही आव्हान म्हणून हे पद स्वीकारले.

१९५७ ते १९६२ या काळात श्रीमंत मालोजीराजे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष असताना त्यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या धुमाळीत विस्कटलेले लोकमत काँग्रेस पक्षाच्या बाजूने वळविण्याचा ताकदीने प्रयत्न केला. त्यासाठी त्यांनी महाराष्ट्रभर काँग्रेसची भूमिका पटवून देण्यासाठी दौरा केला. हळूहळू त्यांच्या, काही दुरावलेले मातब्बर नेते काँग्रेसमध्ये पुन्हा आणण्याच्या प्रयत्नांना, यश येत गेले. त्यासाठी त्यांना द्वैभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचे आणि दिल्लीतील पक्षश्रेष्ठींचेही सहकार्य मिळाले. त्यामुळे प्रमुख स्वातंत्र्य सैनिक नेते तुळशीदास जाधव, आनंदराव चव्हाण, यशवंतराव मोहिते, दादासाहेब जगताप, शंकरराव मोहिते-पाटील, सोमेश्वरची काकडे मंडळी, भवानीनगरचे जाचक बंधू, मराठवाडा व विदर्भातील काही विरोधी पक्षांचे नेते, प्रमुख कार्यकर्ते काँग्रेस पक्षात आले. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जाऊन त्यांनी काँग्रेस पक्षाची हळूहळू पूर्ववत भक्कम बांधणी केली.

***

१४.

प्रतापगडावरील शिवस्मारक - काँग्रेसला नवसंजीवनी

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर व महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षाची पडझड थांबवत असताना श्रीमंत मालोजीराजे यांना सतत वाटत होते की, महाराष्ट्रातल्या जनतेचा आवाज संयुक्त महाराष्ट्र आहे. त्यासाठी पक्षश्रेष्ठींना न दुखावता मराठी माणसाच्या भावना पंडित नेहरूंपर्यंत कशा पोचतील हे पाहिले पाहिजे. त्यासाठी महाराष्ट्रातल्या काँग्रेसला नवसंजीवनी मिळाली पाहिजे. त्यादृष्टीने ते विचार करीत असतानाच त्यांच्या राजघराण्यातील स्नुषा श्रीमंत सौ.जयश्रीमालादेवी विक्रमसिंहराजे नाईक निंबाळकर यांनी एक प्रसंग त्यांना सांगितला. त्यानुसार त्या एकदा प्रतापगडावर (सातारा जिल्हा) गेल्या होत्या. तेव्हा गडाच्या पायथ्याशी सरदार अफजलखानाची कबर उत्तम अवस्थेत सुशोभित अशी आहे. पण गडावर श्री भवानी मातेचे मंदिर व सभोवतालचा परिसर मात्र सुस्थितीत व सुशोभित असा नाही. परंतु ज्या शिवछत्रपतींनी प्रतापगडावर व परिसरात अलौकिक असे युद्ध करून स्वराज्यासाठी नेत्रदिपक विजय मिळविला त्या शिवछत्रपतींचे गडावर गेल्या ३०० वर्षात काहीच स्मारक नाही याचे आश्चर्य वाटते, अशी भावना व्यक्त केली. श्रीमंत मालोजीराजेंनाही आश्चर्य वाटले. म्हणून लगेचच प्रतापगडावर शिवछत्रपतींचा भव्य पराक्रमी लढाऊ असा अश्वारूढ पुतळा बसविला पाहिजे असे ठरविले व कामाला लागले. त्यासाठी त्यांच्याच पुढाकाराने, त्यांच्याच अध्यक्षतेखाली 'सातारा जिल्हा शिवस्मारक समिती' स्थापन झाली. त्यावेळी मुंबई राज्याचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण होते. त्यांना व मंत्रिमंडळाला ही सर्व कल्पना श्रीमंत मालोजीराजेंनी सांगितली. सर्वांनी त्याला मान्यता दिली व श्रीमंत मालोजीराजेंनाच याबाबतचे सर्व अधिकार दिले. मराठी माणसाचा आवाज आणि प्रेरणा असलेल्या या स्मारकासाठी त्यांनी अविरत परिश्रम घेतले. प्रसंगी लागेल तो खर्च ते स्वत: करीत होते. अखेर त्यांच्या कल्पनेनुसार रणांगणात उडी घेत असलेला

अश्वारूढ असा भव्य पुतळा तयार झाला. पण तेव्हा गडावर जाण्यासाठी रस्ता सुस्थितीत नव्हता. त्यामुळे सर्वात प्रथम त्यांनी सरकारच्या मदतीने गडावर मोटारी जातील असा रस्ता केला. शिवछत्रपतींचा पुतळा अगदी भव्य असा झाला होता. तो जसाच्या तसा वरती नेणे त्या काळात शक्य नव्हते. मग त्याचे सुट्टे भाग करून ते प्रतापगड खोऱ्यातील शेतकरी, तरुण कार्यकर्ते यांच्या एकजुटीने गडावर नेण्यात आले आणि मग शिवस्मारकाच्या जागेवर उभारलेल्या भव्य चबुतऱ्यावर पुतळ्याचे सुट्टे भाग जोडून अखंड पुतळा उभारला तेव्हाच श्रीमंत मालोजीराजेंना स्वस्थता मिळाली.

महाराष्ट्रातल्या काँग्रेसची अवस्था, संयुक्त महाराष्ट्रासाठी मराठी माणसाची अस्मिता हे सारे श्रीमंत मालोजीराजेंच्या लक्षात होते. त्यामुळे अतिशय धूर्तपणे, दूरदृष्टीने त्यांनी विचार करून या भव्य पुतळ्याचे उद्‌घाटन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याच हस्ते करण्याचे ठरविले. यशवंतराव चव्हाण, मोरारजीभाई देसाई यांचेशी चर्चा करून पंडित नेहरूंना त्यांनी स्वत: जाऊन अधिकृत निमंत्रण दिले. पंडितजींनीही महाराष्ट्राची अस्मिता लक्षात घेऊन हे निमंत्रण स्वीकारले.

संयुक्त महाराष्ट्र समितीच्या नेत्यांना व कार्यकर्त्यांना या कार्यक्रमाची माहिती मिळाली. पंडित नेहरू प्रतापगडावर जाताना त्यांच्यापुढे जोरदार निदर्शने करण्याची तयारी सुरू झाली. ७०-७५ हजार निदर्शक जमवण्याची घोषणा झाली. शिवछत्रपतींच्या पुतळ्याला मराठी माणसांचा विरोध राहणार नाही, परंतु पंडित नेहरूंनी द्वैभाषिक माथी मारले आणि संयुक्त महाराष्ट्र होऊ दिला नाही या रागापोटी संयुक्त महाराष्ट्र समितीने सांगितले की, पंडित नेहरूंना आम्ही येऊ देणार नाही. परंतु यशवंतराव चव्हाण, श्रीमंत मालोजीराजे आणि अन्य नेत्यांनी विरोधी पक्षनेत्यांशी अनेकवेळा चर्चा केली. महाराष्ट्राची अस्मिता, मराठी माणसाचा स्वाभिमान म्हणून या कार्यक्रमाकडे पाहावे अशी विनंती सातारच्या राजमाता श्रीमंत छत्रपती सुमित्राराजे भोसले, श्रीमंत मालोजीराजे, यशवंतराव चव्हाण यांनी केल्यानंतर कार्यक्रमास गालबोट न लागता शांततेने निदर्शने करण्याची तयारी विरोधी पक्षनेत्यांनी दाखविली. त्याप्रमाणे श्रीमंत मालोजीराजेंनी पंडित नेहरूंना कोणत्या रस्त्याने कसे न्यायचे, प्रतापगडावर कोठून पोचवायचे याचे गनिमी काव्याने नियोजन केले आणि त्यात ते

यशस्वी झाले. त्यामुळे ३० नोव्हेंबर १९५७ रोजी पंडित नेहरूंच्या हस्ते शिवछत्रपतींच्या या भव्य पुतळ्याचे शानदार उद्घाटन झाले. प्रतापगडाच्या पायथ्याशी वाई पसरणी घाटात निदर्शकांना अडकवून ठेवले. पं.नेहरूंचा जाण्याचा हा मार्ग बदलून त्यांना व अन्य पाहुण्यांना, प्रमुख कार्यकर्त्यांना कास पठारच्या कडेने तयार केलेल्या दुसऱ्या रस्त्याने प्रतापगडावर नेण्यात आले. ऐनवेळी हा बदल केल्यामुळे कार्यक्रम निर्विघ्नपणे पार पडला, याचे श्रेय सर्वांनी श्रीमंत मालोजीराजेंना दिले आणि पंडित नेहरूंनाही ते समजले. परंतु निदर्शकांचे म्हणणेही चतुराईने यशवंतराव चव्हाण व श्रीमंत मालोजीराजेंनी पंडित नेहरूंच्या कानावर घातले. पंडितजींनाही एवढ्या मोठ्या संख्येने (७० ते ७५ हजार) निदर्शकांची तयारी पाहिल्यानंतर त्यांना संयुक्त महाराष्ट्र प्रश्नावर आणि मुंबई महाराष्ट्रातच ठेवण्याबाबतची मराठी माणसांची भावना तीव्रतेने लक्षात आली. एका अर्थाने प्रतापगडचा हा कार्यक्रम यशस्वी झाल्यामुळे महाराष्ट्रातील काँग्रेसमध्येही एक नवी संजीवनी निर्माण झाली आणि यामुळे पंडित नेहरूंचे मतपरिवर्तन होण्यास मदत झाली आणि संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीचे मराठी माणसाचे स्वप्न साकार होण्याची प्रक्रिया सुरु झाली. या कार्यक्रमातील सर्वच तयारी आणि श्रीमंत मालोजीराजेंचा यातील उत्साह याकडेही पंडित नेहरूंचे लक्ष वेधले गेले. दिल्लीत याल तेव्हा जरूर भेटा असे जाताना पंडित नेहरूंनी श्रीमंत मालोजीराजेंना सांगून त्यांच्यावरचा विश्वास व्यक्त केला. याचा अर्थातच पुढे महाराष्ट्राला व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसला योग्य तो लाभ झाला.

या समारंभात शिवस्मारक समितीचे अध्यक्ष म्हणून श्रीमंत मालोजीराजे यांनी जे स्वागतपर भाषण केले ते तत्कालिन परिस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रशासन, राज्यपद्धती व पंडित नेहरूंचे नेतृत्व याबाबत आदर्श मार्गदर्शक असे भाषण झाले होते. ते याप्रमाणे -

प्रतापगडावरील शिवस्मारकामुळे स्वराज्याची प्रेरणा कायम राहील

श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समितीतर्फे आपणा सर्वांचे या ठिकाणी स्वागत करण्यास मला आनंद होत आहे. अनेक अडचणींना तोंड देऊन व कष्ट सोसून आपण सर्वजण श्री

छत्रपती शिवाजी महाराजांच्या या कर्मभूमीत त्यांचा आशीर्वाद मागण्यासाठी, अनेक कामे मागे असताना या समारंभास हजर राहिला, याबद्दल मी आपणा सर्वांचा ऋणी आहे. श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या या अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण करण्याचे आमचे आमंत्रण स्वीकारून, श्री.पंडित जवाहरलाल नेहरू, आपले भारताचे पंतप्रधान या ठिकाणी येऊन यांनी आम्हास अत्यंत उपकृत केले आहे. त्यांचे ऋण शब्दांनी व्यक्त करणे अतिशय कठीण आहे. तरीपण मी आपणा सर्वांतर्फे व स्मारक समितीतर्फे त्यांचे थोर ऋण या ठिकाणी नमूद करू इच्छितो व त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो.

अनेक वर्षांपासून महाराष्ट्रात छत्रपतींच्या स्मारकाबद्दलच्या निरनिराळ्या योजनांचे विचार चालू होते. महत्त्वाच्या ऐतिहासिक स्थळी अशी स्मारके उभारून महाराष्ट्रातील या युग पुरुषाची व स्वराज्य संस्थापकाची स्मृती जागृत ठेवून, आपणा सर्वांना ती स्फूर्ती स्थाने व्हावीत व भारतातील स्वातंत्र्याची ज्योत तेवत राहावी, अशी मनिषा अनेकांच्या हृदयात वसत होती व आहे. अशा स्थळांपैकी प्रतापगडासारख्या ऐतिहासिक महत्त्वाच्या ठिकाणी भव्य स्वरूपात एक स्मारक होत आहे, हे पाहून आपणा सर्वांना आनंद होत असेल, यात नवल नाही. प्रतापगडावर स्मारक करण्यात एक प्रकारचे औचित्य आहे. स्वराज्याचा ध्वज या ठिकाणी छत्रपतींनी 300 वर्षांपूर्वी उभारला व याच प्रतापगडाच्या परिसरात स्वराज्याचे बीज रोवले. अशा ठिकाणी जी एक महत्त्वपूर्ण घटना घडली, त्यामुळेच स्वराज्यास बळकटी आली. छत्रपतींची प्रतापगडावर पहिली राजधानी स्थापन झाली. छत्रपतींनी आपले स्फूर्तीस्थान असणाऱ्या तुळजाभवानीच्या देवीची स्थापना या प्रतापगडावर केली. 300 वर्षांपूर्वी प्रतापगडाचा परिसर स्वातंत्र्य मिळविणाऱ्या अनेक देशभक्तांनी गजबजून गेला होता. भारतभूमी दीर्घकाल परकीय

आक्रमणामुळे हतबल व निराश परिस्थितीत असताना, स्वराज्य स्थापनेचा शुभारंभ करणारा हा महान युगपुरुष महाराष्ट्रात शिवाजी महाराजांच्या रूपाने अवतीर्ण झाला. आज 300 वर्षानंतर याच प्रतापगडाच्या पायथ्याशी, शिवचरणी, आपण सर्वजण स्वतंत्र भारताचे नागरिक आपल्या नेत्याबरोबर या भारताच्या महान सुपुत्राचा सन्मान करीत आहोत. या स्मारकाबाबतचा इतिहास, तसेच स्मारक समितीचा अहवाल व इतर आमच्या अडीअडचणींचा पाढा आपणापुढे सांगून मी आपला वेळ घेऊ इच्छित नाही.

१९५५ मध्ये त्यावेळच्या मुंबई राज्याचे राज्यपाल डॉ.हरेकृष्ण मेहताब यांनी प्रतापगडावर छत्रपतींचे स्मारक असावे, या कल्पनेस चालना दिली. त्यासाठी एक समिती नेमली व त्या समितीची पहिली बैठक ८ जून १९५५ रोजी सकाळी राजभवनात होऊन, या स्मारकाची योजना ठरविली गेली. त्या योजनेप्रमाणे प्रतापगडावर छत्रपतींचा अश्वारूढ पुतळा उभारणे, पुतळ्याभोवती बाग करणे, गडावर येण्यासाठी रस्ता तयार करणे अशा महत्त्वाच्या बाबी ठरविण्यात आल्या. नंतर सदर पुतळ्याचा अनावरण समारंभ भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याच हस्ते व्हावा असेही ठरले. स्मारक समितीने निरनिराळ्या शिल्पकारांकडे चौकशी करून लवकर व चांगले काम ज्या शिल्पकाराकडून होईल त्यांच्याकडे ते सोपवून कामाला सुरूवात केली. मुंबईतील प्रसिद्ध शिल्पकार श्री.कामत यांनी या कामाची जबाबदारी घेऊन हा भव्य पुतळा फार मेहनत घेऊन, अत्यंत थोड्या अवधीत तयार केला. पुण्याचे श्री.एन. जी. पवार इंजिनिअर यांनी पुतळ्याचा चबुतरा व त्याभोवतीचे किल्ल्याचे तटवजा बांधकाम अतिशय अडचणीच्या परिस्थितीत, गडावर सामानसुमान नेण्याची अत्यंत कठिण परिस्थिती असता, फार सुबक रितीने केले, याबद्दल त्यांना व

पुतळ्याचे काम करणाऱ्या श्री.कामतांना मी धन्यवाद देतो. या स्मारकाच्या कामासाठी अनेक मंडळींनी देणग्या देऊन आम्हांस सक्रिय मदत केली, याबद्दल सर्वांना धन्यवाद देणे व त्यांचे आभार मानणे अत्यंत जरूर आहे. मी त्याप्रमाणे त्यांचे येथे जाहीर आभार मानतो. तसेच प्रतापगडावर जाणारी मूळ पाऊलवाट होती, त्या ठिकाणी मुंबई सरकारने जनतेच्या सोयीसाठी, अल्पावधीत सुंदर रस्ता तयार करून दिला, याबद्दल समितीतर्फे मी मुंबई सरकारचे व त्यांच्या पी.डब्ल्यू.डी. खात्याचे आभार मानतो. आज आम्ही केलेल्या स्मारकाचे काम आपणांपुढे आहे. आज आपणास हे जे दृश्य दिसत आहे त्यावरून या स्मारकासाठी किती मंडळींनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या मदत केली असेल व येथील मावळे कामगारांनी किती कष्ट घेतले असतील, याची कल्पना आपणास येईलच. जेव्हा हा पुतळा गडावर चढविण्यात आला तेव्हा येथील मावळ्यांनी खालपासून वर पोचेपर्यंत, कोठेही न टेकवता वाजत गाजत व मोठ्या उत्साहाने व भक्तीभावाने वर आणला व या श्रमाची मजुरी नाकारली. हे केवढे श्री शिवाजी महाराजांवर अलोट प्रेम ! मी अशा सर्व कार्यकर्त्यांना व कामगारांना मनःपूर्वक धन्यवाद देतो. अनेकांचे कष्ट व त्याग छत्रपतींच्या पुण्याईने आम्हास लाभले व यापुढेही लाभतील, अशी आशा प्रगट करतो.

आज या पुतळ्याचा अनावरण समारंभ, भारताचे पंतप्रधान पंडित नेहरू यांच्या हस्ते होत आहे. आज आपणास भारताच्या दोन युग प्रवर्तकांच्या भेटीच्या आनंदाचा सोहळा पाहण्यास मिळत आहे. हे आपल्या सर्वांचे सद्‌भाग्य असून, हा अविस्मरणीय प्रसंग महाराष्ट्राच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नमूद होईल यात शंका नाही. हिंदवी स्वराज्याचे छत्रपतींचे अपुरे कार्य आज पंडितजींनी पुरे केले आहे. अनेकांच्या जीवनाशी समरस होऊन, जनतेला निर्भय, समृद्ध व सुसंस्कृत जीवन स्वराज्यात

मिळवून देण्याचा प्रयत्न छत्रपतींनी त्या काळात केला व त्यांच्याच उद्दिष्टांची पूर्ती पंडितजी आज भारतात करीत आहेत. अशा आमच्या स्वतंत्र भारताचे पंतप्रधान व जगाचे शांतीदूत असणाऱ्या पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते पुतळ्याचे अनावरण होणे, ही खरोखर अद्वितीय अशी घटना आहे. स्वराज्य स्थापना करणाऱ्या या दोन युग प्रवर्तकांची आज प्रतापगडावर या निमित्ताने भेट होत आहे. यातून नवचैतन्याची ज्योत, या नवोदित स्वराज्यात जागृत राहावी, सर्वांच्या हृदयात आपल्या स्वराज्याबद्दल प्रेम व निष्ठा निर्माण व्हावी, भारत अपेक्षेप्रमाणे समृद्ध व्हावा व प्रतापगडाचे स्फूर्तीस्थान भारतातील प्रत्येकाच्या हृदयात प्रेमाचे, सत्याचे व शांतीचे स्फूर्तीस्थान ठरावे, भारत पुन्हा जगाच्या इतिहासात आपले उज्ज्वल यश मिळवो व प्रतापगडचे हे स्मारक आपण सर्वांना स्फूर्तीस्थान ठरो अशी माझी परमेश्वराजवळ प्रार्थना आहे. या आजच्या दिवसाची आठवण म्हणून या पुतळ्याची प्रतिकृती मी पंडितजींना सादर अर्पण करीत आहे. त्याचा त्यांनी स्वीकार करावा, अशी नम्र विनंती आहे.

***



किल्ले प्रतापगड येथील छत्रपती शिवरायांच्या अश्वारुढ पुतळ्याचे अनावरण करताना तत्कालिन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु. सोबत श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर राजेसाहेब, फलटण.

१५. दैनिक विशाल सह्याद्री - काँग्रेस पक्षाचे मुखपत्र

१९५५ ते १९५७ मध्ये संयुक्त महाराष्ट्र समितीचा खरा प्रचार त्यावेळी आचार्य प्र. के. अत्रे यांचा दै.मराठा (मुंबई) व वा. रा. कोठारी यांचा दै.प्रभात (पुणे) यातून होत होता व त्यामुळे काँग्रेस विरोधी जनमत तयार होत असे. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष झाल्यानंतर व प्रतापगडावर शिवस्मारक उद्‌घाटन समारंभ अत्यंत यशस्वी झाल्यानंतर श्रीमंत मालोजीराजेंच्या लक्षात आले की, जनमत तयार करण्यासाठी या कार्यक्रमातून जसे जनमत तयार झाले तसेच, काँग्रेस पक्षानेही स्वतंत्र दैनिक वृत्तपत्र सुरू केले पाहिजे. म्हणजे काँग्रेस पक्षाची ध्येय धोरणे, कार्यक्रम, बातम्या, लेख, इत्यादी माहिती महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जनतेपर्यंत पोचेल. त्यादृष्टीने त्यांनी यशवंतराव चव्हाण यांचेशी चर्चा केली. त्यांनाही हा विचार पटल्यानंतर श्रीमंत मालोजीराजेंनी त्यादृष्टीने काँग्रेस पक्षाचे एक प्रमुख नेते व पत्रकार अनंतराव पाटील, नरूभाऊ लिमये यांचेशी सविस्तर चर्चा केली. यशवंतराव चव्हाणांनी व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस पक्षाने याबाबत सर्व अधिकार श्रीमंत मालोजीराजेंनाच दिले होते. पुण्यातून प्रकाशित होणाऱ्या या नियोजित दैनिकाचे नाव 'विशाल सह्याद्री' असे ठेवले व पहिले संपादक म्हणून अनंतराव पाटील यांनाच जबाबदारी दिली. त्यासाठी स्वतंत्र 'विशाल सह्याद्री ट्रस्ट' तयार करण्यात आला. दैनिकासाठी लागणारा पत्रकार, सेवक, छपाईसाठी स्वतंत्र मुद्रणालय, कागद, इत्यादी जुळवाजुळव अनंतराव पाटील यांनी करायची व यासाठीची आर्थिक जुळवाजुळव श्रीमंत मालोजीराजे यांनी करायची असे ठरले. त्याप्रमाणे त्यांनी अहोरात्र कष्ट करून 'विशाल सह्याद्री' सुरू करण्यासाठी धाडसाने प्रयत्न केले. त्यासाठी त्यांनी आपले वजन वापरून बडोद्याचे महाराज फत्तेसिंहराव गायकवाड यांच्याकडून रुपये एक लाखाचे कर्ज बिनव्याजी मिळविले. स्वतःही गुंतवणूक केली. या ट्रस्टचे पहिले अध्यक्ष म्हणून त्यांनी श्रीमंत महाराज फत्तेसिंहराव गायकवाड यांचीच निवड केली. स्वतःसह रा. ब. उर्फ नानासाहेब घोरपडे व के. के. शहा यांची विश्वस्त म्हणून निवड केली. या सर्वांच्या प्रयत्नातून ३० मे १९५८ ला अखेर पुण्याहून दै.विशाल सह्याद्री प्रकाशन सुरू झाले. सातत्याने

२४ वर्षे त्यांनी हे दैनिक अनेक अडचणीतून सुरू ठेवले व काँग्रेस पक्षाचा प्रचार अधिक गतीमान केला. विशेष म्हणजे कागद खरेदी, मुंबई दिल्ली प्रवास, डी.ए.व्ही.पी. चे काम असो, श्रीमंत मालोजीराजे त्यासाठी कधीही निधीची अडचण येऊ देत नसत. प्रसंगी स्वत: त्यासाठी खर्च करीत असत.

१९६१ च्या पानशेत महापुरामुळे विशाल सह्याद्री मुद्रणालय पाण्याखाली गेल्यामुळे खूपच नुकसान झाले होते. तरीही श्रीमंत मालोजीराजे डगमगले नाहीत. फिनिक्स पक्षाप्रमाणे त्यांनी पुन्हा सगळी जुळवाजुळव करून विशाल सह्याद्री सुरू ठेवला. याच काळात पंतप्रधान पंडित नेहरू पुण्याच्या पूरग्रस्त भागाची पाहणी करण्यासाठी आले होते. तेव्हा श्रीमंत मालोजीराजेंनी त्यांना पूरग्रस्त सह्याद्री कार्यालयाला भेट देण्याची विनंती केली. प्रतापगडावरील भव्य शिवछत्रपतींच्या पुतळ्याच्या उद्‌घाटन समारंभातील श्रीमंत मालोजीराजेंची तळमळ त्यांनी पाहिली होती. तसेच काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षा श्रीमती इंदिरा गांधी यांनी त्यांच्या महाराष्ट्र दौऱ्यात (१९६० साली) फलटणला भेट देऊन श्रीमंत मालोजीराजेंचे कार्य जवळून पाहिले होते व त्याची माहिती त्यांनी पंडितजींना दिली होती. त्यामुळे पंडित नेहरूंनी त्यांची विनंती आदराने मान्य करून विशाल सह्याद्रीच्या नुकसानीची पाहणी केली व योग्य मदतीचे आश्वासन दिले.

संयुक्त महाराष्ट्राची घोषणा - श्रीमंत मालोजीराजे साक्षीदार :

१९५९ साली श्रीमती इंदिरा गांधी राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षा झाल्यानंतर १९६० मध्ये त्यांनी महाराष्ट्रातील राजकीय परिस्थितीची जातीने पाहणी करण्यासाठी महाराष्ट्राचा दौरा केला होता. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीचे श्रीमंत मालोजीराजे अध्यक्ष असल्यामुळे ते श्रीमती इंदिरा गांधी यांच्याबरोबर संपूर्ण दौऱ्यात सहभागी होते व जागोजागी ते राजकीय परिस्थितीची, काँग्रेस पक्षाची माहिती त्यांना देत असत. या दौऱ्याची सुरूवात फलटणपासूनच झाली होती. इंदिराजी विमानाने फलटणच्या विमानतळावर आल्या होत्या. त्यावेळी विमानतळाचा प्रशस्त परिसर व श्रीमंत मालोजीराजे यांनी केलेले भव्य स्वागत पाहून त्या भारावून गेल्या होत्या. हा विमानतळ श्रीमंत मालोजीराजेंच्या फलटण संस्थानच्या खाजगी मालकीचा होता व संस्थान विलीन झाल्यावर त्यांनी तो सरकारजमा केला हे समजल्यावर श्रीमती इंदिरा

गांधी यांचा श्रीमंत मालोजीराजेंबद्दलचा आदर वाढला होता. त्यांच्या दौऱ्याची सांगता सभा नाशिक येथील गोल्फ क्लब मैदानावर झाली. या सगळ्या दौऱ्यात त्यांना मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र व्हावा ही लोकभावना प्रकर्षाने जागोजागी अनुभवाला आली. स्वत: श्रीमंत मालोजीराजेही ही लोकभावना त्यांना गाडीत बरोबर असताना सांगत होते. त्याचाच परिणाम म्हणून श्रीमती इंदिरा गांधी यांनी १ मे १९६० रोजी महाराष्ट्र व गुजरात राज्याची स्थापना होईल अशी घोषणा केली. त्यामुळे यशवंतराव चव्हाणांबरोबरच पंतप्रधान पंडित नेहरू व काँग्रेसच्या अध्यक्षा श्रीमती इंदिरा गांधी यांना मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेची जरूरी व आवश्यकता व त्याचा काँग्रेसला होणारा लाभ पटवून देण्यात श्रीमंत मालोजीराजेंचाही प्रमुख सहभाग होता.

विनोबा भावे यांच्या भूदान चळवळीसही पाठिंबा :

आचार्य विनोबा भावे यांची भूदान चळवळ संपूर्ण भारतात सुरू होती. केंद्रशासन, काँग्रेस पक्ष यांनी या चळवळीला पाठिंबा दिला होता. १९५९ मध्ये त्यांचा महाराष्ट्रात दौरा सुरू झाला होता. साहजिकच महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीचे अध्यक्ष श्रीमंत मालोजीराजेंनी या दौऱ्यात त्यांना अनेक जिल्ह्यातून सक्रीय सहकार्य केले होते. या चळवळीमुळे सामाजिक विषमता कमी होऊन सर्वत्र बंधुभावाची भावना निर्माण होत होती. आचार्य विनोबा भावे व त्यांचे सहकारी यांनी याकामी श्रीमंत मालोजीराजेंनी फलटणमधून सहकार्य करावे अशी विनंती केली होती. तेव्हा श्रीमंत मालोजीराजेंनी आपल्या राजवाड्यात घरच्यांशी व कार्यकर्त्यांशी चर्चा केली. त्यानुसार काँग्रेस नेते शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखाली सुमारे १२०० एकर जमीन समारंभपूर्वक पूर्वीच्याच कुळांच्या नावे करून त्यांना कायमचे शेतमालक केले. एवढेच नव्हे तर श्रीमंत मालोजीराजेंनी वेळ देऊन विनोबाजी यांच्या पदयात्रेतही सहभाग घेतला. त्यामुळे श्रीमंत मालोजीराजे यांचा राज्यात जनसंपर्कही वाढला व अर्थातच याचा फायदा निश्चितच काँग्रेस पक्षाला झाला.

***

१६. उच्च व कृषि शिक्षणासाठीही विशेष प्रयत्न

फलटण संस्थानचे २४ वे अधिपती श्रीमंत मुधोजीराजे नाईक निंबाळकर यांनी त्यांच्या काळात (१८५३ ते १९१६) फलटण संस्थानमध्ये प्राथमिक, माध्यमिक शिक्षणाची सुविधा दिल्या होत्या. त्यामुळे फलटण तालुक्यात शिक्षणाचा बऱ्यापैकी सार्वत्रिक प्रसार झालाच होता. त्यानंतर श्रीमंत मालोजीराजे सन १९१७ मध्ये अधिपती झाल्यानंतर त्यांनीही शिक्षणाचे महत्त्व ओळखून तालुक्यातील मुला-मुलींसाठी नव्याने अनेक शाळा सुरू केल्या. विशेषतः मुलींच्या शिक्षणासाठी फलटण दरबारातर्फे मोफत सोयी उपलब्ध करून दिल्या होत्या. फलटण संस्थान विलीन झाल्यानंतर म्हणजे ८ सप्टेंबर १९४८ नंतर सुद्धा लोकप्रतिनिधी म्हणून शिक्षणाच्या विविध सुविधा फलटण एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून उपलब्ध करून दिल्या. फलटण, माण तालुक्यात त्यांनी नव्याने काही प्राथमिक व माध्यमिक विद्यालये सुरू केली.

त्यातील सर्वात महत्त्वाचे त्यांचे शैक्षणिक कार्य म्हणजे फलटणमध्ये २० जून १९५७ रोजी सुरू केलेले मुधोजी महाविद्यालय. त्या काळात फलटण, बारामती, खंडाळा, माळशिरस, माण व खटाव तालुक्यातील गरीब विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची सुविधा मिळावी असा त्यांचा ध्यास होता. सुरूवातीला या महाविद्यालयासाठी जागा नव्हती, पण श्रीमंत मालोजीराजेंनी त्यांच्या फलटण येथील मुधोजी मनमोहन राजवाड्यात या महाविद्यालयाला काही दालने उपलब्ध करून दिली. तेव्हा हा राजवाडा संस्थान विलीन झाल्यावर त्यांनी स्वत:कडे न ठेवता नाईक निंबाळकर देवस्थाने चॅरिटेबल ट्रस्टकडे हस्तांतरित केला होता. त्यामुळे पहिली ३ वर्षे या महाविद्यालयाचे व्यवस्थापन या ट्रस्ट मार्फत होत होते.

या महाविद्यालयाचे उद्‌घाटन दिनांक २३-६-१९५७ रोजी त्यावेळचे मुख्यमंत्री ना.यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते झाले होते. या समारंभास कर्मवीर भाऊराव पाटील व बॅ. पी. जी. पाटील उपस्थित होते. याच समारंभात त्यांनी फलटण संस्थान मधील अधिपती श्रीमंत मुधोजीराजे व श्रीमंत मालोजीराजे यांच्या पुरोगामी धोरणाच्या, शैक्षणिक कार्याचा गौरव करून आता या नव्या पिढीतल्या महाविद्यालयांसाठी स्वतंत्र

शिवाजी विद्यापीठ व्हावे अशी इच्छा व्यक्त केली होती. समारंभ संपल्यानंतर जाताना कर्मवीरांनी आपल्याबरोबर आणलेल्या एका युवकाला यशवंतराव चव्हाणांच्या साक्षीने श्रीमंत मालोजीराजेंच्या समोर उभे केले व म्हणाले, हा आमच्या सातारा येथील कमवा व शिका योजनेतला शाहू बोर्डिंगचा गरीब विद्यार्थी आहे. दुष्काळी भागातला आहे. ही आमच्या वटवृक्षातली एक पारंबी तुमच्या हवाली करत आहे. त्याला आपल्या महाविद्यालयात घ्यावे. कर्मवीरांचे आणि श्रीमंत मालोजीराजेंचे संबंध खूप चांगले होते. त्यामुळे श्रीमंत मालोजीराजेंनी ही विनंती लगेचच मान्य केली व त्या युवकाला दुसरे दिवशीपासूनच प्राध्यापक म्हणून हजरही करून घेतले. पुढे हाच युवक प्राध्यापक १९६३ ला याच महाविद्यालयाचा प्राचार्य झाला. पुढे हाच प्राध्यापक राज्यात, देशात, परदेशात उत्तम, प्रभावी व रसाळ वक्ता, लेखक, विचारवंत म्हणून कीर्तीमान झाला. मराठवाडा विद्यापीठाचा कुलगुरुही झाला. त्याचे नाव प्राचार्य शिवाजीराव भोसले. कर्मवीरांनी दिलेली त्यांच्या रयत वटवृक्षातील पारंबी पुढे स्वतःच्या ज्ञान साधनाने, व्यासंगाने, चौफेर वाचनाने स्वतःच वक्तृत्वातले वटवृक्ष झाले. हे सारे कर्मवीर व श्रीमंत मालोजीराजे यांचेमुळेच घडले. तसेच त्यांच्यामुळे फलटणच्या मुधोजी महाविद्यालयाचा लौकिक महाराष्ट्रात सर्वत्र झाला.

आज हे मुधोजी महाविद्यालय फलटणमधील बाणगंगा नदीच्या काठावर सुरेख, प्रशस्त अशा सुसज्ज इमारतीत कार्यरत असून शिवाजी विद्यापीठ क्षेत्रातील अत्यंत महत्त्वाचे दर्जेदार असे महाविद्यालय झाले आहे. म्हणूनच प्रख्यात विचारवंत व प्रसिद्ध वक्ते प्राचार्य शिवाजीराव भोसले जिथे जिथे जात होते तिथे तिथे लोकांना सांगत होते, 'मी मुधोजी महाविद्यालयाचा प्राचार्य आहे व होतो याचा मला नेहमीच अभिमान वाटतो. कारण बाणगंगेच्या काठावर रयतेचे राजे असलेल्या श्रीमंत मालोजीराजेंनी त्यांच्या लोककल्याणाच्या साधनेतून उभारलेले हे ज्ञानगंगेचे तीर्थक्षेत्र आहे.'

कृषिक्षेत्रातही शेती शाळा :

फलटणच्या शिक्षण क्षेत्रात कृषि शिक्षणही असले पाहिजे यादृष्टीनेही श्रीमंत मालोजीराजेंचे प्रयत्न सुरू झाले. शेती हा त्यांच्या आवडीचा व जिव्हाळ्याचा विषय होता. द्राक्षाच्या, अंजिराच्या, गुलाबाच्या अनेक नवीन जाती त्यांनी अमेरिकेहून आणल्या होत्या व स्वतःच्या शेतीत त्याची लागवड केली होती. शेती किफायतशीर

अशी होण्यासाठीचे अनेक नवे तंत्रज्ञानही त्यांनी फलटणमध्ये आणले होते. फलटणला दिल्ली म्हशी त्यांनीच प्रथम आणल्या. तसेच मंत्रिपदाच्या काळात हरियाणा जातीच्या जास्तीत जास्त दूध देणाऱ्या गायीही त्यांनी मोठ्या प्रमाणावर मुंबई इलाख्यात आणल्या होत्या.

शेती आधुनिक पद्धतीने, नव्या तंत्रज्ञानाने होण्यासाठी त्यांनी संस्थान काळात शेतकऱ्यांसाठी उत्तम प्रकारचे बी-बियाणे मिळावे म्हणून संस्थानच्या मालकीचे बीज गुणन केंद्र सुरू केले होते व त्यासाठी त्यांनी ११४ एकर जमीन राखीव ठेवली होती. संस्थान विलीन होताना ही जमीन शासनाकडे हस्तांतरित झाली होती. आपल्या तालुक्यातील व परिसरातील शेतकऱ्यांच्या मुलांना शेतीचे अद्ययावत शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी १९५७ साली ही जमीन परत फलटण एज्युकेशन सोसायटीला शेती शाळेसाठी म्हणून राज्य शासनाकडून मिळवली. ही जमीन मिळाल्यानंतर मुधोजी हायस्कूलच्या प्रत्येक वर्गाच्या एका तुकडीला 'शेती' हा विषय सुरू केला. त्यावेळी हे सर्व विद्यार्थी या शेती फार्मवर प्रात्यक्षिकासाठी येत होते. या प्रशस्त कार्यामुळे विद्यार्थ्यांना शेती विषयाची गोडी वाढत गेली आणि शेती विषयाचे महत्त्व कळल्यामुळे विद्यार्थ्यांची संख्याही मोठ्या प्रमाणावर वाढू लागली. स्वतंत्र शेती शाळाच करावी असे श्रीमंत मालोजीराजेंनी फलटण एज्युकेशन सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांना सांगितले. ते स्वतःच या संस्थेचे तहहयात अध्यक्ष असल्यामुळे पुढे या कार्याला गती आली.

स्वित्झर्लंड या शेतीसाठी अत्यंत प्रगत असलेल्या देशातील स्विस एड ॲब्रॉड या सेवाभावी संस्थेला भारतातील एखाद्या सेवाभावी शिक्षण संस्थेला शेती आणि शिक्षण मध्ये एकत्रित काम करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर मदत करायची होती. त्यादृष्टीने त्या देशाचे तज्ज्ञांचे पथक भारतात पाहणी करीत असताना महाराष्ट्रातील फलटणच्या शेती शाळेच्या प्रकल्पाची माहिती मिळाली. मुधोजी हायस्कूल मधील शेती विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यांची वाढती संख्या, शेतीवर केलेले विविध प्रयोग, फलटण एज्युकेशन सोसायटीचा प्रदीर्घ अनुभव, कामकाज पद्धती या सर्व बाबींचा 'स्विस एड ॲब्रॉड' या संस्थेने दूरदृष्टीने विचार केला व फलटण एज्युकेशन सोसायटीला मदत करण्याचा निर्णय घेतला. या मदतीतून श्रीमंत मालोजीराजे यांच्या मार्गदर्शनातून शेती

विभागाची पुढील काळातील गरज लक्षात घेऊन शेती विभागासाठी स्वतंत्र इमारत, विद्यार्थी वसतिगृह, दुग्धशाळा, पशुसंवर्धन विभाग, कुक्कुटपालन, सेवकांसाठी निवासस्थाने, प्रयोगशाळा, सभागृह, कार्यालय यासाठी आकर्षक व सुसज्ज इमारती बांधण्यात आल्या. वसतिगृहासाठी लागणारी आवश्यक भांडी, शेतीसाठी ट्रॅक्टर व इतर औजारे, शालेय फर्निचर याचीही तरतूद करण्यात आली. त्यामुळे ही शेती शाळा फलटणचे एक वैभवच झाले आहे. अशा या सुसज्ज सर्व सोयींनी युक्त अशा विभागाचे तत्कालिन केंद्रीय अर्थमंत्री ना.मोरारजीभाई देसाई यांच्या हस्ते श्रीमंत मालोजीराजे यांच्या अध्यक्षतेखाली उद्घाटन झाले. यानंतर हा सर्वच विभाग स्वतंत्र करून स्वतंत्र शेती विद्यालय करण्यासाठी फलटण एज्युकेशन सोसायटीने राज्य शासनात प्रस्ताव दिला. श्रीमंत मालोजीराजेंनी शासनात सातत्याने प्रयत्न करून शासन मान्यता आणली व १ मे १९७० पासून स्वतंत्र असे श्रीमंत मालोजीराजे शेती विद्यालय सुरू झाले. त्यामुळे कृषि विषयक शिक्षणातले त्यांचे एक स्वप्न पूर्ण झाले.

श्रीमंत मालोजीराजे यांच्यानंतर फलटण एज्युकेशन सोसायटीने संस्थेचे विद्यमान अध्यक्ष मा.श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर, संस्थेचे चेअरमन श्रीमंत रघुनाथराजे नाईक निंबाळकर, संस्थेचे सचिव श्रीमंत संजीवराजे नाईक निंबाळकर, या श्रीमंत मालोजीराजेंच्या पुढच्या पिढीने सातत्याने प्रयत्न करून १९८३ साली शेती शाळेत कनिष्ठ महाविद्यालय, ४ नोव्हेंबर २००३ पासून महात्मा फुले कृषि विद्यापीठांतर्गत उद्यान विद्या महाविद्यालय, तसेच कृषि पदवी व पदविका, दुग्ध व्यवसाय व पशुसंवर्धन पदविका, माळी प्रशिक्षण व तंत्र शिक्षण विभागाच्या किमान कौशल्यावर आधारित विविध अभ्यासक्रम सुरू केले. याकामी शेती शाळेचे प्राचार्य अरविंद निकम यांनीही विशेष योगदान दिले आहे.

***



श्रीमंत मालोजीराजे शेती विद्यालयाच्या उद्‌घाटनप्रसंगी व्यासपीठावर मोरारजीभाई देसाई, श्रीमंत शिवाजीराजे नाईक निंबाळकर, श्रीमंत विक्रमसिंहराजे नाईक निंबाळकर. मार्गदर्शन करताना श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर राजेसाहेब, फलटण.



फलटण येथील श्रीमंत मालोजीराजे शेती विद्यालय.

१७. .....अखेरचे पर्व....महानिर्वाण

१९६२ साली महाराष्ट्र राज्याच्या विधानसभा निवडणुकीत पुन्हा काँग्रेसतर्फे त्यांना फलटण-खंडाळा विधानसभा मतदार संघातून उमेदवारी मिळाली. त्यामध्ये ते मोठ्या मताधिक्याने निवडून आले. त्यावेळी पुन्हा महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाला निर्विवाद सत्ता मिळाली आणि यशवंतराव चव्हाण पुन्हा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. श्रीमंत मालोजीराजेंना १९५७ मध्ये संयुक्त महाराष्ट्र समितीच्या झंझावातामुळे पराभव पत्करावा लागला होता. पण त्यातूनही श्रीमंत मालोजीराजे सावरले आणि त्यांना महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्षपद देण्यात आले. या काळात त्यांनी काँग्रेसचा नेटाने महाराष्ट्रात प्रचार केला. काँग्रेस वाढविली. बहुजन समाजातील अनेक नेते विरोधी पक्षात होते त्यांना काँग्रेसमध्ये आणले. या काळात प्रतापगडावर शिवछत्रपतींचा पुतळा उभारून त्याचे उद्घाटन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचे हस्ते, काँग्रेस पक्षासाठी स्वतः झीज सोसून पक्षाचे मुखपत्र म्हणून दै.विशाल सह्याद्री स्थापना, १ मे १९६० रोजी होणाऱ्या संयुक्त महाराष्ट्राची घोषणा काँग्रेस अध्यक्षा श्रीमती इंदिरा गांधी यांच्या दौऱ्यात करून घेण्यासाठी महाराष्ट्रातल्या मराठी माणसाची अस्मिता त्यांच्या कानावर घालणे अशी महत्त्वपूर्ण कामे त्यांच्याकडून झाली. पण तत्कालिन राजकीय डावपेचामुळे १९६२ साली आमदार म्हणून निवडून येऊनसुद्धा त्यांना राज्याच्या मंत्रिमंडळात घेतले गेले नाही. तरीसुद्धा काँग्रेसचे काम करणे त्यांनी सोडले नाही.

१९६७ पर्यंत त्यांनी काँग्रेसच्या माध्यमातून पुन्हा जोर धरून सातारा जिल्ह्यातील फलटण व खंडाळा, माण तालुक्यात धरणे, तलाव, रस्ते, शासकीय इमारती, शाळांच्या इमारती, इत्यादी सार्वजनिक कामे केलीच होती. १९६७ ला पुन्हा महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीमध्ये त्यांनी काँग्रेस पक्षाकडे स्वत:ला उमेदवारी न मागता त्यांचे चिरंजीव श्रीमंत शिवाजीराजे नाईक निंबाळकर यांना काँग्रेस पक्षातर्फे उमेदवारी मागितली होती. श्रीमंत शिवाजीराजे यांनी श्रीराम सहकारी साखर कारखाना, मालोजीराजे सहकारी बँक, निरा व्हॅली डिस्टीलरी,

फलटण एज्युकेशन सोसायटी, गावोगावच्या ग्रामपंचायती, विकास सोसायट्या, दुध डेअरी, इत्यादी संस्थांच्या माध्यमातून लोकसेवा, विधायक कार्य केले होते. कार्यकर्त्यांची भक्कम फळी तयार केली होती. त्यामुळे आपला उत्तराधिकारी म्हणून तसेच काँग्रेससाठी १९४९ पासून केलेले राज्यभर कार्य, पक्षाची बांधणी व त्यासाठी अक्षरशः तन-मन-धनाने केलेली सेवा व त्याग लक्षात घेऊन श्रीमंत शिवाजीराजे यांना आमदारकीची संधी काँग्रेस पक्षश्रेष्ठी देतील असा विश्वास श्रीमंत मालोजीराजेंना वाटत होता. काँग्रेस श्रेष्ठीनींही तसे सुतोवाच केलेही होते. पण शेवटी राजकारण कधी, कसे वळण घेईल हे भल्याभल्यांनाही कळत नाही. कळले तर वळत नाही. तसेच झाले. सातारा जिल्हा काँग्रेसने श्रीमंत शिवाजीराजे यांना उमेदवारी दिली नाही. श्रीमंत मालोजीराजे व फलटण, खंडाळा तालुक्यातले अनेक कार्यकर्ते व्यथित झाले. श्रीमंत मालोजीराजेंसह बहुतांश कार्यकर्त्यांनी काँग्रेस पक्षाला रामराम केले. संघटना काँग्रेस हा राष्ट्रीय काँग्रेसला समांतर पक्ष त्यावेळी उदयाला आला होता. मूळ काँग्रेसच्या विचारसरणीचे पाईक असलेले श्रीमंत मालोजीराजे या संघटना काँग्रेसच्या महाराष्ट्र प्रदेशचे अध्यक्ष झाले. श्रीमंत शिवाजीराजे यांनी मात्र अपक्ष म्हणून १९६७ ची निवडणूक लढवली. श्रीमंत मालोजीराजे व त्यांच्या सर्व नेत्यांनी, कार्यकर्त्यांनी प्रचार करूनसुद्धा श्रीमंत शिवाजीराजे फक्त १४०० मतांनी पराभूत झाले. श्रीमंत मालोजीराजेंना हा प्रचंड धक्काच होता.

पण तरीही श्रीमंत मालोजीराजेंनी हार मानली नाही. पुन्हा लोकांसाठी त्यांनी व श्रीमंत शिवाजीराजे यांनी कारखान्याच्या व अन्य संस्थांच्या मदतीने आपले कार्य व संघटना काँग्रेसचे संघटन सुरू ठेवले. पण पुढे भारतीय राजकारणात प्रचंड उलथापालथ झाली. पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधींनी १९७५ साली देशात आणीबाणी जाहीर केली. काँग्रेस पक्षातही पुन्हा दुफळी झाली. संघटना काँग्रेससह देशातील चार प्रमुख पक्ष जनता पक्षात विलीन झाले. त्यामुळे श्रीमंत मालोजीराजे आपोआपच जनता पक्षाचे सदस्य झाले. १९७५ च्या आणीबाणीनंतर झालेल्या निवडणुकीत श्रीमती इंदिरा गांधी पराभूत झाल्या. त्याचा फटका काँग्रेस पक्षालाही बसला. १९७७ साली जनता पक्षाची केंद्रात सत्ता आली व मोरारजीभाई देसाई

पंतप्रधान झाले. त्याच्या आधी महाराष्ट्रात इंदिरा काँग्रेस व काँग्रेस (रेड्डी) यांचे संयुक्त सरकार आले होते. त्यामध्ये वसंतदादा पाटील मुख्यमंत्री व नाशिकराव तिरपुडे उपमुख्यमंत्री होते. १९७८ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत जनता पक्षाला १३० जागा मिळूनही त्यांना महाराष्ट्रात सत्ता मिळू शकली नाही म्हणून हे संयुक्त काँग्रेस आघाडीचे सरकार सत्तेवर होते. परंतु हे सरकार फार काळ टिकले नाही. कारण काँग्रेस (रेड्डी) गटाने या सरकारचा पाठिंबा काढून घेतला त्यामुळे हे सरकार पायउतार झाले. तेव्हा शरद पवार यांनी राज्यातील जनता पक्ष, शेकाप पक्ष व अन्य दोन पक्षांच्या सहकार्याने पुरोगामी लोकशाही दल म्हणून सत्ता स्थापन केली व ते राज्याचे मुख्यमंत्री झाले.

परंतु जनता पक्षाचा प्रचार श्रीमंत मालोजीराजेंनी मोठ्या नेटाने केला होता. त्यामध्ये त्यांचे चिरंजीव श्रीमंत शिवाजीराजे यांना जनता पक्षाची उमेदवारी मिळाली आणि जनता पक्षाचे आमदार म्हणून ते फलटण-खंडाळा विधानसभा मतदार संघातून विजयी झाले. १९६७ साली त्यांचा झालेला पराभव श्रीमंत मालोजीराजेंना फार धक्कादायक होता. परंतु १९७८ साली त्यांचे चिरंजीव श्रीमंत शिवाजीराजे यांच्या विजयामुळे श्रीमंत मालोजीराजेंना पुन्हा विजयाचा आनंद घेता आला. पण श्रीमंत शिवाजीराजेंना पुलोद सरकारमध्ये मंत्रीपद मिळाले नाही याची त्यांना खंत होती.

पण हा राजघराण्यातला आनंद फार काळ टिकला नाही. कारण १२ मे १९७८ पासून श्रीमंत मालोजीराजेंची तब्येत खराब झाली. स्थानिक डॉक्टर्सनी अनेक उपचार केले. श्रीमंत मालोजीराजे नेहमी पुण्यात तब्येतीचा काही प्रश्न आला तर पुण्याचे प्रसिद्ध डॉक्टर ह.वि.सरदेसाई किंवा डॉ.ग्रँट यांना ते तब्येत दाखवित असत. त्याप्रमाणे त्यांना पुण्याला नेण्यात आले. परंतु १४ मे १९७८ रोजी त्यांचे पुणे मुक्कामी निधन झाले. फलटणकरांच्यावर हा अनपेक्षित आघातच होता. १९१७ ते १९४८ पर्यंत फलटण संस्थानचे राजेसाहेब म्हणून व संस्थान विलीन झाल्यावर १९४८ ते १९७८ पर्यंत लोकप्रतिनिधी, लोकसेवक म्हणून हा रयतेचा राजा सदैव लोककल्याणासाठी कार्यरत राहिला. त्यांच्या जाण्याने फलटण-खंडाळा तालुक्याचेच नव्हे तर महाराष्ट्रातल्या अनेक भागात एक पोकळीच निर्माण

झाली. या राजाचे निवासस्थान असलेला ऐतिहासिक मनमोहन राजवाडा सुना-सुना झाला.

श्रीमंत मालोजीराजे यांच्या जाण्याने महाराष्ट्राचा एक शिल्पकार हरपला. तसेच सन १२८४ पासून अस्तित्वात असलेल्या, महाराष्ट्रातील सर्वात जुन्या ऐतिहासिक परंपरा लाभलेल्या इतिहास प्रसिद्ध अशा नाईक निंबाळकर घराण्यातील अधिकृत अशा २५ व्या महाराजांचे महानिर्वाण झाले आणि संस्थानच्या इतिहासातील एक शेवटचे पर्व थांबले. परंतु त्यांनी विविध क्षेत्रात महाराष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीसाठी दिलेले योगदान लक्षात घेता त्यांची 'महाराष्ट्राचे शिल्पकार' म्हणून महाराष्ट्रातील जनतेच्या मनात कायम स्मृती राहील हे निर्विवाद आहे.

***

१७ (१) विधिमंडळातील निवडक भाषणे

श्रीमंत मालोजीराजे महाराष्ट्र राज्याचे बांधकाम, पाटबंधारे मंत्री असताना सत्तारूढ व विरोधी पक्षाच्या आमदारांनी विचारलेल्या प्रश्नांना ते मुद्देसूद, अभ्यासपूर्ण अशी उत्तरे देत असत. त्यातून त्यांचा अभ्यास व राज्याच्या समतोल प्रगतीचे भान दिसून येते. त्यानुसार विधानसभेतील काही निवडक भाषणे.

सर्व प्रकारच्या इरिगेशनमुळे राज्यात १३ लक्ष ६० हजार एकर जमीन १९५६ पर्यंत ओलिताखाली येणार

(अधिवेशन दिनांक २५ मार्च १९५३)

अध्यक्ष महाराज, सन्माननीय सभागृहापुढे ६८ मेजर इरिगेशन व पाटबंधारे या सदराखाली जी मागणी करण्यात आली तिच्यावर कपात सूचना मांडण्यात येऊन कालपासून बरीच चर्चा झाली आहे. माझ्या समोरच्या सन्माननीय मित्रांनी येथे असे सांगितले की, सरकारने पाटबंधाऱ्याची जी कामे हाती घेतलेली आहेत ती अत्यंत अपुरी असून आणखी बरीच कामे सरकारने हाती घेणे जरूर आहे. परंतु ही कामे कोणत्या दृष्टीने अपुरी आहेत हे मात्र त्यांनी सांगितले नाही व त्यांच्या सर्व भाषणाचा आढावा काढल्यानंतरसुद्धा ही कामे कशी काय अपुरी आहेत ते मला समजले नाही. ही कामे अपुरी आहेत असे नुसते म्हणून भागणार नाही. हाती घेतलेली कामे कशी अपुरी नाहीत हे दाखविण्यासाठीच मी काही माहिती या सभागृहापुढे ठेवणार आहे.

आपल्या भारतामध्ये मुंबई, मद्रास आणि उत्तर प्रदेश हे तीन मोठे प्रांत आहेत. तेव्हा या तीन राज्यात किती लोकसंख्या आहे, तेथे काय परिस्थिती आहे व या राज्यांनी किती योजना पार पाडल्या आहेत याची मी आता तुलना करणार आहे. आपल्या मुंबई राज्याची लोकसंख्या ३ कोटी ६० लाख, मद्रासची ५ कोटी ७० लाख आणि उत्तर प्रदेशची लोकसंख्या ६ कोटी ३२ लाख आहे. मी हे ढोबळ आकडे

दिलेले आहेत. पंचवार्षिक योजनेप्रमाणे मद्रासमधील इरिगेशनच्या योजनांकरिता २५ कोटी रुपये, उत्तर प्रदेशात १४ कोटी रुपये आणि आपल्या मुंबई राज्यात २२ कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत. यावरून लोकसंख्येचे प्रमाण लक्षात घेता सर्व राज्यांपेक्षा आपल्या राज्यातच जास्त खर्च केला जाणार आहे हे सन्माननीय सभागृहाच्या लक्षात येईल. मद्रासमध्ये थोडासा जास्त खर्च केला जाणार आहे परंतु तेथे लोकसंख्यासुद्धा जास्त आहे. परंतु उत्तर प्रदेशात आपल्यापेक्षा कमी खर्च करण्यात येणार आहे. तेव्हा मुंबई राज्यात इरिगेशनवर कमी खर्च होणार आहे असे मला वाटत नाही.

या इरिगेशनच्या योजना दुष्काळी भागात काढणे अत्यंत आवश्यक आहे असे काही सन्माननीय सभासदांनी येथे सांगितले आहे. परंतु जिथे निसर्ग रचना अनुकूल असेल तेथेच या योजना हाती घेता येतात. जेथे नद्या उगम पावतात तेथील डोंगराळ भागांत किंवा जेथे त्या समुद्राला मिळतात त्या भागात अशा योजना हाती घेता येतात. मद्रासमध्ये ज्या योजना पार पाडल्या गेलेल्या आहेत त्या सर्व तेथील नद्या जेथे समुद्राला मिळतात तेथे पार पाडलेल्या आहेत. त्याचप्रमाणे उत्तर प्रदेशातील नद्यांना बाराही महिने पाणी असून त्या उथळ असतात. आपल्या येथे मात्र अगदी निराळी परिस्थिती आहे. आपल्या येथे बऱ्याचशा नद्यांना फक्त पावसाळ्यामध्ये चार महिने पाणी असते. हा पाऊससुद्धा आपल्याकडे अनियमित असतो. त्याचप्रमाणे आपल्या राज्यातील बराचसा भाग डोंगराळ आहे. गुजरातेत मात्र समुद्राला मिळणाऱ्या काही नद्या आहेत. या सर्व गोष्टी लक्षात घेऊन मद्रासमध्ये जितक्या योजना आहेत तितक्या योजना जर या सरकारने हाती घ्यावयाचे असे ठरविले तर ते कितपत पार पाडता येईल हे आपण बघितले पाहिजे.

या सरकारने राज्यसूत्रे हातात घेण्यापूर्वी इंग्रजांचे येथे राज्य असताना १०० वर्षाच्या काळात असल्या योजनांवर १८ कोटी रुपये खर्च करण्यात आलेला आहे. परंतु आता या सरकारच्या कारकिर्दीत पाच वर्षाकरिता २२ कोटी रुपयांची रक्कम मंजूर करण्यात आलेली आहे. तेव्हा पूर्वी पाच वर्षात १ कोटी रुपये खर्च करण्यात येत होते व आता एका वर्षात साडेचार कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत.

त्यानंतर आतापर्यंत जी जमीन पाण्याखाली आली आहे ती फक्त ४ ते ६ टक्के

आहे असे येथे सांगण्यात आले आहे. ही गोष्ट खरी आहे. परंतु आता विहिरी वाढविण्याचे व इरिगेशनच्या योजना पार पाडण्याचे प्रयत्न चालू आहेत व त्याचे फळ पदरात पडेपर्यंत आपण दम धरला पाहिजे. योजना कागदावर आखल्याबरोबर लगेच पुढच्या वर्षी त्याचे फळ आपल्या पदरात पडणे शक्य नाही. गेल्या पाच-सहा वर्षात या सरकारने काय केले आहे असा प्रश्न अनेक सन्माननीय सभासदांनी येथे विचारला आहे. परंतु कोणतीही योजना हाती घेतल्यानंतर ती पुरी होईपर्यंत काहीतरी काळ जातोच व आपल्या सरकारने ज्या निरनिराळ्या योजना हातात घेतल्या आहेत त्या १९५६ सालापर्यंत पुऱ्या होणार आहेत. त्यानंतर एकूण किती जास्त क्षेत्र पाण्याखाली येऊ शकेल हे आपण पाहिले पाहिजे.

१९४६ साली ४ लक्ष ६० हजार एकर जमीन पाण्याखाली भिजत होती. त्याऐवजी १९५६ साली ९ लक्ष ३५ हजार एकर जमीन अधिक पाण्याखाली येणार आहे. हा आकडा लक्षात घेण्यासारखा नाही असे जर कोणाला म्हणावयाचे असेल तर गोष्ट वेगळी. जे काम होण्यासाठी एक शतक लागले त्याच्या दुप्पट काम या १० वर्षात होणार आहे ही गोष्ट दुर्लक्ष करण्याजोगी आहे असे म्हणता येणार नाही. एकंदर मायनार इरिगेशनचे काम एकत्र घेतले तर १९४६ साली १ लक्ष ७८ हजार इतकी जमीन भिजत होती. पोस्टवार स्कीमखाली जी ४० कामे पुरी झाली आहेत त्यामुळे २३ हजार एकर जमीन भिजणार आहे असे येथे सांगण्यात आले आहे, पण तो आकडा चुकीचा आहे. या स्कीममुळे एकंदर ४५ हजार एकर जमीन भिजणार आहे. त्यानंतर एक स्पेशल स्कीम हातात घेऊन भारत सरकारकडून १ कोटी रुपयांचे कर्ज घेऊन ६२१ कामे पुरी झाली आहेत व ६३१ कामे पुरी व्हावयाची आहेत. त्याखाली १ लक्ष ५९ हजार एकर जमीन पाण्याखाली येणार आहे. ही कामे जूनअखेर पुरी होणार आहेत. त्यानंतर भारत सरकारकडून १ कोटी ११ लक्ष रुपयांचे कर्ज घेऊन व या सरकारने आपले स्वतःचे दीड कोटी रुपये घालून दुष्काळी भागात जी कामे चालू केली आहेत त्यामुळे १ लक्ष ५६ हजार एकर इतकी जमीन भिजणार आहे. ही सगळी कामे पुरी झाली नाहीत तरी निम्म्यापेक्षा अधिक क्षेत्र पाण्याखाली येईल. दुष्काळामध्ये काही कामे हाती घेतली जातात ती तशीच पडून राहतात, असे होऊ नये म्हणून पुरी होण्यासारखी जी कामे आहेत ती आधी हातात घेतलेली आहेत. अशा रितीने सगळे

मिळून मायनर इरिगेशनखाली ३ लक्ष ६० हजार एकर जमीन पाण्याखाली येणार आहे. आणि एकंदर इरिगेशनमुळे १२ लक्ष ९६ हजार म्हणजे १३ लक्ष एकर जमीन १९५६ सालानंतर पाण्याखाली येणार आहे, ही गोष्ट या सभागृहाने लक्षात घेतली पाहिजे. असे असताना हे कार्य फारच थोडे आहे, सरकारने इरिगेशनच्या बाबतीत चालविलेले प्रयत्न अपुरे आहेत असे येथे बऱ्याचशा सन्माननीय सभासदांनी सांगितले.

सन्माननीय सभासदांना मी एवढेच सांगू इच्छितो की, कोणती कामे नव्याने हाती घेण्यात आली आहेत आणि कोणती कामे दुरूस्तीच्या स्वरूपाची आहेत याची आकडेवारी पाहण्यापेक्षा या योजनांमुळे प्रत्यक्ष किती जमीन भिजणार आहे हे पाहणे अधिक फायद्याचे आहे. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे मायनार इरिगेशनमुळे १ लक्ष ६८ हजार इतकी जमीन भिजत होती त्याऐवजी आता ३ लक्ष ६० हजार इतकी जमीन भिजणार आहे. तेव्हा प्रत्यक्ष किती क्षेत्र पाण्याखाली आलेले आहे हे पाहिले तर त्याबद्दल कोणालाही समाधान वाटेल अशी प्रगती या सरकारने केली आहे असे मला सांगावयाचे आहे.

***

१७ (२)

वीज पुरवठ्यासाठी भारत सरकार ९ टक्के तर आमचे मुंबई सरकार एकंदर खर्चाच्या १५ टक्के खर्च करणार.

(१८ एप्रिल १९५६ विधानसभा बांधकाम मंत्री म्हणून राज्यातील वीज पुरवठ्याबाबतचे भाषण)

अध्यक्ष महाराज, पहिल्या प्रथम मी सभागृहाच्या नजरेस एक गोष्ट आणू इच्छितो की, मध्यवर्ती सरकारचा वीज पुरवठ्यासंबंधीचा जो १९४८ सालचा कायदा आहे त्यास अनुसरून मुंबई प्रांतात १९५४ साली बॉम्बे इलेक्ट्रिसिटी बोर्ड स्थापण्यात आले आणि त्या कायद्याप्रमाणे ह्या बोर्डाचे काम चालते. त्या कायद्याप्रमाणे गेल्या वर्षी फेब्रुवारी महिन्यात ह्या बोर्डाने आपले बजेट तयार करून ते विधिमंडळापुढे ठेवावयास हवे होते. पण ते बजेट कोणत्या फॉर्ममध्ये तयार करावयाचे ते फॉर्म निश्चित झालेले नसल्यामुळे बोर्डाने पूर्वी जे मुंबईचे ग्रीड खाते होते व त्या खात्याने जे बजेट तयार केले होते तेच आपले बजेट म्हणून पुढे चालविले आणि त्यानंतर कायद्याप्रमाणे बजेट सप्लिमेंटरी नोट तयार करून ती विधीमंडळापुढे मांडू असे बोर्डाने सांगितले व त्याप्रमाणे यावर्षी मागच्या सालचे बजेट सप्लिमेंटरी नोट आणि या सालचे बजेट ही दोन्ही या सन्मान्य सभागृहापुढे ठेवण्यात आली आहेत.

या बोर्डाचे एकंदर भांडवल कोणते धरावे, भांडवलावर खर्च कोणता धरावा याबद्दलची रूपरेषा तयार करण्यात दोन महिने घालवावे लागले. पूर्वी ज्या सरकारी वीज पुरवठ्याच्या योजना होत्या त्या सर्व योजना, दोन तीन योजना सोडून, बोर्डाकडे सुपूर्त करण्यात आल्या आणि त्या योजनांवर जो काही खर्च झाला तेवढ्या खर्चाचे आकडे काढून भांडवल खर्च म्हणून समजण्यात आला व हा सर्व खर्च बोर्डाला कर्ज म्हणून देण्याचे ठरले. तरीसुद्धा त्या आकड्यात अजून जर काही चूक असेल तर ते आकडे पुन्हा तपासावेत अशी विनंती सरकारने अकौंटंट जनरलला केलेली आहे व तपासून झाल्यावर ते दुरूस्त आकडे मान्य करण्यात येतील व तेवढे बोर्डाला दिलेले कर्ज असे मानण्यात येईल.

यानंतर व्याजाचा दर आकारणीबद्दल जो काही गैरसमज झालेला आहे त्याबद्दल

मला थोडासा खुलासा करावयाचा आहे. बॉम्बे इलेक्ट्रिक ग्रिड खाते १९४४ साली निघाले. परंतु १९५४ साली एक जी.आर. काढून सरकारने असे ठरविले की, १९३७-३८ सालापासून ज्या काही व्यापारी तत्त्वावर योजना होत्या त्यांना दिलेल्या भांडवलावर साडेचार टक्के व्याज आकारावे. हा जो जी.आर. आहे तो इलेक्ट्रिसिटी बोर्डापुरताच नसून सरकारच्या सर्व योजनांना तो लागू करण्यात येतो. अशा योजनांना आतापर्यंत सव्वाचार टक्के व्याज आकारले जात होते ते यापुढे साडेचार टक्के आकारले जाणार आहे. पण बॉम्बे ग्रीडचा जन्म १९४४ पूर्वी झालेला नसल्यामुळे काही खर्चच झाला नाही. तेव्हा गव्हर्नमेंट ऑफ इंडियाचे लोन असो किंवा बँकेचे लोन असो किंवा इतर एखाद्या एजन्सीकडून काढलेले कर्ज असो त्या सर्व कर्जातून ज्या योजना होतात त्यांना हा दर लावला जाणार आहे. आणि आता येथे जी वाटाघाट झाली ती विचारात घेऊन ह्या व्याज आकारणीबद्दल विचार होईल.

माझे सन्माननीय मित्र डॉ.अमूल देसाई यांनी जवळजवळ एक तास भाषण केले ते सर्व बहुतेक टीकात्मक असेच होते. पण त्यांनी जर हा कायदा वाचला असता आणि यासंबंधी माहिती गोळा करण्यासाठी श्रम घेतले असते तर त्यांनी असे भाषण केले नसते याबद्दल माझी खात्री आहे. पी.डब्ल्यू.डी. आणि बोर्ड यांनी संगनमत करून काही तरी आकडे तयार केले असल्याचा आरोप आहे. तसेच व्याजाचे दर कमी करण्याची जरूरी नाही असे चित्र यांनी लोकांपुढे उभे केले. डिप्रीसिएशनच्या बाबतीतही त्यांनी टीका केली. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की डिप्रीसिएशन हे ह्या कायद्याच्या ६७ व्या कलमाप्रमाणे धरावे लागते व डिप्रीसिएशन कसे आकारावयाचे हे त्या कलमात दिलेले त्यांना दिसेल. त्याचप्रमाणे ह्या कायद्याचे जे सातवे शेड्यूल आहे त्यात कसा काय हिशोब धरावा हे दिलेले आहे त्याप्रमाणे हे आकडे तयार केलेले आहेत.

यानंतर त्यांनी बजेटमध्ये एक मोठी चूक दाखविली. केवळ टीकेसाठी टीका ते करीत नाही असे ते म्हणतात. परंतु त्यांनी ही जी चूक म्हणून दाखविली आहे ती खरोखरी चूक आहे की नाही हे जर पाहिले तर त्यांचे भाषण केवळ टीकेसाठी आहे असे म्हटल्याशिवाय राहवत नाही. पान २७ वर बजेटमध्ये जे आकडे दिलेले आहेत ते कबूल आहेत हे समजायला मार्ग नाही असे ते म्हणाले. पण त्या हेडच्या वर ‘पेज’

असे स्पष्टपणे म्हटलेले असल्यामुळे त्यांनी पहिल्या आयटेममधला आकडा ४६, ४७ म्हणजे पान ४६ ते ४७ वर ही माहिती मिळेल असे वाचावयास हवे. तो आकडा म्हणजे कोणत्याही संख्येची टक्केवारी नसून पानांचा नंबर आहे हे अगदी स्पष्ट असताना ती संख्या किती कोटींची किंवा लाखांची किंवा हजारांची आहे अशी शंका घेण्याचे कारण नव्हते. ह्यावरून, अध्यक्ष महाराज, त्यांनी केलेली टीका केवळ टीका करावयाची म्हणूनच केली असे जर कोणी म्हटले तर ते चुकीचे होईल असे मला वाटत नाही. तेव्हा त्यांनी अशी अवास्तव टीका करावयास नको होती.

बोर्डाला दिलेल्या कर्जाबाबत सांगावयाचे म्हणजे २ कोटी ७२ लक्ष रुपये इतकी रक्कम बोर्डाला नको होती व २ कोटी २८ लक्ष इतकी रक्कम पुरेशी आहे असे खुद्द बोर्डाने सांगितल्यावरून कमी रक्कम बदलून दाखविलेली आहे. तेव्हा इतकीच रक्कम सरकारने का दिली असे विचारण्याचे कारण नाही. एकंदर किती पैसा लागेल याचा विचार करून काही योजनांसाठी बोर्डाने पैसा मागितला होता, परंतु पुढे त्यांनी तो आकडा बदलून इतक्या रकमेची गरज नसून २ कोटी २८ लक्ष इतकी रक्कम बोर्डाने मागितली यात काहीच चूक नाही.

यानंतर काही कॉलम्समध्ये पुरेशी माहिती दिलेली नाही असे सन्माननीय सभासद डॉ.अमूल देसाई म्हणाले. हे बोर्ड १९५४ साली स्थापन झाले. त्यापूर्वी या योजनांवर सरकारच्या खात्याकडून खर्च झाला होता. त्या वेळच्या हिशोबाची पद्धत वेगळी होती. त्यामुळे हे आकडे वर्गवारी करून सांगणे कठीण आहे. बोर्डाच्या स्थापनेपासून हिशोब लिहिण्यास सुरूवात झाली तेव्हा आज जे कॉलम्स रिकामे दिसत आहेत ते पुढे बरोबर रितीने व रकमांचे आकडे स्पष्ट झाल्यानंतर भरले जातील ही गोष्ट मी त्यांच्या लक्षात आणू इच्छितो. त्याचप्रमाणे एक दोन ठिकाणी छपाईच्या चुका झालेल्या आहेत, त्या बाबतीत योग्य असा शेरा मारावयास हवा होता की ही जी माहिती अॅव्हेलेबल नाही, पण तेवढा एक शेरा मारलेला नाही ही चूक झालेली आहे. बोर्डाचे आणि सरकारचे भांडण दिसते असे सन्माननीय सभासदांच्या बोलण्यात आले. त्यांनी जरी तसे म्हटले असले तरी बोर्ड आणि सरकार यांचे भांडण असण्याचे काहीच कारण नाही. बोर्डाचे जे म्हणणे होते ते सरकारने ऐकून योग्य त्याप्रमाणे पुढील हुकूम काढले आहेत आणि दोघांमध्ये भांडण नसून अगदी मोकळ्या मनाने सरकारने त्या सर्व

गोष्टीचा पत्रव्यवहार व इतर सगळ्या गोष्टी सभागृहापुढे मांडलेल्या आहेत. त्यात चोरून ठेवण्यासारखे काहीच नाही.

यानंतर त्यांच्या म्हणण्यात असे आले की, बोर्डाचा एकंदर कारभार आणि बजेट पाहिले तर ह्या बोर्डाला सारखी तूट येत राहणार असे दिसते. ह्या बाबतीत मला त्यांच्या नजरेस एक गोष्ट आणावीशी वाटते की, ह्या ज्या वीज योजना असतात त्यात पहिल्या काही वर्षात तूट येते. या योजना सुरू होऊन पाच-सहा वर्षे लोटली म्हणजे ही तूट नाहीशी होते. जसजसे ह्या योजनांकडून वीज पुरविण्याचे काम सुरू होते तसतशी तूट कमी कमी होत जाऊन पुढे काही वर्षांनी फायदा होण्याचीही शक्यता निर्माण होते. त्यादृष्टीने विचार केला तर ह्या योजनात सारखी तूट येत राहणार असे विधान करण्याचे धाडस सन्माननीय सभासदांना कसे होते हे मला समजत नाही. या बाबतीत बोर्डाने लक्ष घालून व आपली कार्यक्षमता दाखवून १९४६ सालापासून आतापर्यंत आपल्याला जो तोटा येत होता तो, विजेचे दर न वाढविता, कमी कसा करता येईल हे बघितले आहे. पूर्वी हा तोटा ४० लाख रुपयांच्या घरात होता तो बोर्डाने कार्यक्षमता दाखविल्यामुळे गेल्या वर्षी २६ लाख रुपये आला व या वर्षी २३ लाख रुपये येणार आहे. अशा रितीने हा तोटा कमी कमी करून सरते शेवटी ना नफा ना तोटा अशा पद्धतीने ही योजना पार पाडण्याचा बोर्डाचा विचार आहे. त्याचप्रमाणे एक बाजूने विजेचे दर जास्त आहेत व ते कमी केले पाहिजेत असे म्हणावयाचे व दुसऱ्या बाजूने ही योजना तोट्यात येता कामा नये असे म्हणावयाचे, हे एकमेकांशी विसंगत दिसते असे मला म्हणावयाचे आहे. सद्याच्या परिस्थितीत तोटा एकदम कमी करावयाचा म्हटले तर विजेचे दर वाढवावे लागतील. परंतु बोर्डाचे विजेचे दर न वाढविता व लोकांवरील बोजा न वाढविता आपला कारभार केलेला आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे. त्याचप्रमाणे डिप्रीसिएशन व व्याज याकरिता ज्या रकमा दाखविल्या आहेत त्या कायद्याप्रमाणे बरोबर आहेत.

काही सन्माननीय मित्रांनी शेतीकरिता विजेचे दर अधिक आहेत असे म्हटले आहे. शेतीच्या कामाकरिता पंप वगैरे वापरण्यासाठी जी वीज लागते ती सिझन पुरती लागते. ती बाराही महिने सारखी लागत नाही. त्यामुळे १२ महिन्यात जितकी वीज खपली पाहिजे तितकी जर खपली नाही तर बाराही महिने वीज तयार करण्यासाठी जो खर्च

करण्यात येईल त्यात बोर्डाला फार मोठा तोटा सोसावा लागेल. तेव्हा १२ महिन्यासाठी येणारा खर्च विचारात घेऊन शेतकऱ्यांनी अमूक एक ''मिनिमम चार्ज'' दिला पाहिजे असे ठरविण्यात आले आहे. पूर्वी हा चार्ज महिन्याला घेतला जात होता. आता तो वर्षाचा ठरविण्यात आलेला आहे. परंतु शेतकऱ्यांकडून सीझनच्या वेळी जी जास्त वीज वापरली जाते ती लक्षात घेता हा वर्षाचा चार्जसुद्धा त्यांना कमीच पडतो. त्याचप्रमाणे पूर्वी प्रत्येक योजनेचा दर निरनिराळा होता. आता त्यांच्या ५ श्रेणी केल्या आहेत. तसेच गुजरातच्या उत्तर विभागाचे दोन भाग पूर्वी पाडले होते व जवळच्या भागांना कमी दराने वीज दिली जात असे व लांबच्या भागांना जास्त दराने वीज दिली जात असे. परंतु आता जवळच्या भागासाठी असलेल्या विजेच्या दरात थोडीशी वाढ करून व लांबच्या विभागासाठी असलेल्या वीजेचे दर कमी करून या दरात सारखेपणा आणण्याचा प्रयत्न केला आहे.

आता भांडवलावरील व्याजाचा दर सुरूवातीपासून ४३ टक्के याप्रमाणे युनिफॉर्म करण्यात आल्यामुळे जास्त तोटा होणार आहे व बजेटमध्ये मात्र थोडा तोटा दाखविण्यात आला अशी एक टीका करण्यात आली. परंतु ता. १४ माहे मार्च १९५६ च्या पत्राप्रमाणे हा दर युनिफॉर्म धरावा असे बोर्डाला सरकारकडून सांगण्यात आले व त्यावेळी बजेट तयार झालेले होते. बजेट मध्ये २३ लाख रुपये तोटा येणार आहे असे दाखविण्यात आले आहे. परंतु व्याजाचा दर सुरवातीपासून साडेचार टक्के करण्यात आल्यामुळे प्रत्यक्ष ३३ लाख रुपये तोटा येईल. आता केवळ हा तोटा दाखविण्याकरिता असलेल्या अगदी थोड्या वेळात बजेट पुन्हा छापणे शक्य नव्हते तेव्हा या बजेटला एक नोट जोडून, त्या नोटसह हे सन्माननीय सभागृहापुढे ठेवण्यात आलेले आहे.

सन १९५४ मध्ये बोर्ड हे अस्तित्वात आले व अवघ्या दोन वर्षात बोर्डाने अत्यंत चांगले काम करून पूर्वी येत असलेला तोटा कमी करीत आणलेला आहे. यावेळी आपले मुंबई सरकार वीज पुरवठ्यासाठी किती खर्च करीत आहेत याचे काही आकडे सन्माननीय सभागृहापुढे ठेवले तर ते वावगे होणार नाही असे मला वाटते. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये वीज पुरवठ्याची आपल्या सरकारने ४० कोटी रुपये खर्च करण्याचे ठरविले आहे. त्याचप्रमाणे एकट्या कोयना योजनेतील वीज उत्पादन

योजनेसाठी आपले सरकार २९ कोटी रुपये खर्च करणार आहे व त्याशिवाय ३ कोटी रुपये कऱ्हाडपासून सोलापूरपर्यंत वीज देण्याकरिता खर्च करावयाचे आहेत. याशिवाय बोर्डाकडे ९ कोटी रुपये निरनिराळ्या योजनाकरिता आहेत. आपल्या या खर्चाची तुलना भारत सरकारच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या आराखड्याबरोबर केली तर आपल्याला असे दिसून येईल की, भारत सरकार पुढील पाच वर्षात वीज पुरवठ्यासाठी एकंदर खर्चाच्या ९ टक्के खर्च करणार आहे तर आपले सरकार १५ टक्के खर्च करणार आहे. अशा रितीने हे बोर्डाचे काम अत्यंत चांगल्या रितीने चालले आहे. पुढच्या वर्षी हे बोर्ड आपले बजेट आणखी समाधानकारक प्रगती दाखवून मांडू शकेल. या बोर्डाचा जो रिपोर्ट सन्माननीय सभागृहापुढे आला आहे तो स्टँड आहे. तो काही तरी रिपोर्ट ठेवला पाहिजे म्हणून ठेवला आहे असे म्हणणे बरोबर होणार नाही. हा जो मी खुलासा केला आहे त्यामुळे सन्माननीय सभासदाचे समाधान होईल अशी माझी आशा आहे.

***

१७ (३)

कोयना व उकाई धरणामुळे महाराष्ट्र व गुजरात प्रदेशात वीज पुरवठा व जलसिंचन मोठ्या प्रमाणात होणार

(१८ ऑगस्ट १९५२ रोजी महाराष्ट्र विधानसभेत
कोयना व उकाई पाटबंधारे योजनेवरील अभ्यासपूर्ण भाषण)

अध्यक्ष महाराज, माझे सन्माननीय मित्र श्री.यशवंतराव मोहिते यांनी ता. ३-७-१९५२ रोजी कोयनेसंबंधी ठराव मांडला व त्यानंतर ता. १२-७-१९५२ रोजी कॅपिटल औटले ऑन इलेक्ट्रिसिटी स्कीम अंडर आयटेम- ८१-अे या आयटेमवर चर्चा झाली. त्यावेळी कोयना योजनेबद्दल मुंबई सरकारने प्लॅनिंग कमिशनकडे शिफारस केली आहे असे मी जाहीर केले होते. ही गोष्ट मी त्या दिवशी जाहीर केल्यानंतर वास्तविक पाहता आज या प्रश्नावर पुन्हा चर्चा व्हावयास नको होती. तथापि हा ठराव चालू ठेवण्याची सन्माननीय सभासद श्री.यशवंतराव मोहिते यांची इच्छा दिसली व मीही त्या गोष्टीला संमती दिल्यामुळे बऱ्याच लोकांनी भाषणे करून ह्या ठरावावर आपापली मते या सभागृहापुढे प्रदर्शित केली. कोयना योजना हातात घेतली तर वीज पुरवठा आणि पाणी पुरवठा ही दोन्ही भरपूर होऊ शकतील असा जो एक समज सन्माननीय सभासद श्री.मोहिते यांनी पसरविला आहे त्यासंबंधाने मी थोडीशी माहिती सभागृहाला सांगणार आहे. गुपचुप कमिटीच्या रिपोर्टमध्ये कोयना योजना पाण्यासाठी उपयोगात येईल असे जरी म्हटले असले तरी ती योजना प्रामुख्याने वीजेसाठीच जास्त उपयुक्त असून वीजेचा पुरवठा भरपूर झाला म्हणजे विजेच्या सहाय्याने पाणीपुरवठा करता येईल असे त्या रिपोर्टात म्हटले आहे. ही गोष्ट अत्यंत कष्टसाध्य आणि अन-इकॉनॉमिक आहे असेही त्या रिपोर्टात म्हटले आहे. या बाबतीतले त्या रिपोर्टातले दोन-तीन उतारे मी या सभागृहाला वाचून दाखवितो.

"The Krishna Valley is flanked by high hills and spurs and is extremely narrow in its upper reaches and it is only when it broadens out in the Bijapur District that an extensive area of land becomes available for irrigation. Unfortunately, however, it

is not practicable to conduct water by gravity to the Bijapur plateau both because its elevation is almost the same as that of the bed of the River Krishna near its source and because the physical features of the country through which the River Krishna passes render any extensive system of gravity canals impracticable."

इरिगेशनच्या दृष्टीने कृष्णा नदीचा फारसा उपयोग नाही असे यात म्हटले आहे, त्यानंतर पुढे असे म्हटले आहे :

"Of the three rivers, viz- the Koyna, Krishna and the Bhima, the Koyna alone possesses the requisite static potential for generating hydro-electric power by virtue of its high elevation and its proximity to the Western Ghats, across which its waters could be dropped through, a fall of over 1,300 feet thus making power generation an economical proposition. Power for irrigation in the Bijapur District which involves a lift of nearly 300' will have to be supplied at a very low rate- perhaps at a rate even below the actual cost of production."

ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची असल्यामुळे सन्माननीय सभासदांनी ती लक्षात घेतली पाहिजे.

"...If irrigation is to pay the cultivator. This will be possible only if a part of the power generated is used by domestic and industrial consumers who can a afford to pay higher rates than the agriculturists.

तेव्हा, पहिल्यापासून कोयनेच्या पाण्याचा उपयोग वीज निर्मितीसाठी कितपत आहे आणि इरिगेशनसाठी कितपत आहे व तो तसा कितपत करता येईल इकडे या सरकारचे लक्ष आहे. १९५० साली ज्यावेळी कोयना योजना तयार केली त्यावेळी १ लाख ५६ हजार मिलीयन क्युबिक फीट पाणी साठविण्यासाठी धरण योजना आखली होती. परंतु पुढे ही योजना ज्यावेळी प्लॅनिंग कमिशनकडे पाठविण्यात आली तेव्हा अशा रितीने कोयनेच्या पाण्याचा उपयोग करण्यापूर्वी कोयनेच्या धरणामुळे कृष्णेच्या पाण्यावर परिणाम होईल म्हणून याबाबतीत ज्या ज्या इतर स्टेटस्‌चा संबंध येत आहे

त्या सर्वांना एकत्र बसवून या पाण्याची वाटणी करून घेणे जरूर आहे असे त्यांनी सुचविले. त्याचप्रमाणे ज्या वेळी आम्ही वाटणी करून घेतली तेव्हा आपल्याला फक्त ६७ हजार ५०० मिलियन क्युबिक फिट पाणी घाटाखाली सोडण्याची परवानगी मिळाली. यापेक्षा आपण जास्त पाणी घाटाखाली सोडावयाचे नाही असा या पाण्यावर निर्बंध घालण्यात आला. त्यामुळे आता या कोयनेच्या पाण्यामुळे जी वीज उत्पन्न होईल ती फक्त मुंबई, पुणे आणि महाराष्ट्र येथील उद्योगधंद्यांना पुरेल एवढीच उत्पन्न होईल. कोयनेचे १ लाख ५६ हजार मिलियन क्युबिक फिट पाणी आपल्याला वीजेसाठी उपयोगात आणता येईल. तसेच कृष्णा आणि भीमा या नद्यांनासुद्धा बंधारे घालून त्या नद्यांच्या पाण्याचा उपयोग करून कोयनेमधून अधिक वीज निर्माण करता येईल अशी जी आपली पूर्वीची कल्पना होती ती, आपल्याला आता सोडून द्यावी लागली आहे. ही गोष्ट जर सन्माननीय सभासदांनी लक्षात घेतली तर बरे होईल. विजेचे उत्पादन आता पूर्वीपेक्षा कमी होणार आहे आणि त्यामुळे विजेच्या सहाय्याने लिफ्ट इरिगेशन करण्याची सोय या योजनेत सध्या ठेवलेली नाही. परंतु कोयना योजनेत जी वीज उत्पन्न होणार आहे तिचा आपल्या विजेचा तुटवडा असल्यामुळे आणि वीजेच्या बाबतीत कोयना योजना क्रमाक्रमाने अधिक वीज पुरवठा करणारी असल्याने व दुसरी कोणतीही योजना इतकी वीज निर्माण करू शकणार नाही, म्हणून कोयनेची वीजेची योजना म्हणून शिफारस करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे उकाई योजना ही शेतीची योजना म्हणून अंमलात आणण्याजोगी आहे अशी शिफारस करण्यात आलेली आहे. उकाई योजनेपासून सुद्धा वीज उत्पन्न होऊ शकेल असे पहिल्या प्रथम वाटत होते. परंतु कोयनेच्या मानाने तापीवरील उकाई योजनेपासून निर्माण होणारी वीज जास्त खर्चाची पडणार असल्यामुळे उकाई योजनेची फक्त शेतीस पाणी पुरवठ्याची योजना म्हणून शिफारस करण्यात आलेली आहे. तेव्हा उकाई योजना अंमलात आणल्यानंतर त्या योजनेचा पुन्हा वीज निर्मितीची योजना म्हणून उपयोग करण्यात येईल अशी जी शंका प्रदर्शित करण्यात येते ती बरोबर नाही असे मला म्हणावयाचे आहे.

त्यानंतर गुजरात, महाराष्ट्र आणि कर्नाटक हे भाऊ-भाऊ आहेत आणि म्हणून आपल्या सरकारला जो पैसा मिळत आहे तो सरकारने या सर्व भावांत सारखा वाटून

द्यावा असे सन्माननीय सभासद श्री.तुळशीदास जाधव यांनी सांगितले आहे. ही सूचना करीत असताना एकीकडे मला प्रांतीयवाद आणावयाचा नाही असे ते म्हणत होते आणि दुसरीकडे वाटणीची भाषा करून भाऊबंदकी ते निर्माण करीत होते. तेव्हा हा प्रांतीयवाद नाही तर काय आहे असे मला त्यांना विचारावयाचे आहे. अन्नधान्याच्या बाबतीत आपला प्रदेश हा तुटीचा प्रदेश आहे हे सर्वांना माहित आहेच. आज आपल्याला जवळजवळ १० लाख टन अन्नधान्य बाहेरच्या देशातून आणावे लागत आहे. तेव्हा अशावेळी आपल्या राज्यात अधिक धान्य कसे उत्पादन होईल आणि त्यासाठी कोणती योजना चांगली आहे याचाच आपण विचार केला पाहिजे. तेव्हा यादृष्टीने विचार करता उकाई योजना हीच सर्वात मोठी आहे असे मी म्हणेन. येथे उकाई चांगली की कोयना चांगली हा प्रश्नच येत नाही. उकाईची योजना चांगली आहे असे मी म्हटले म्हणजे दुसऱ्या योजना सर्वस्वी त्याज्य आहेत असा त्याचा अर्थ होत नाही. त्याचप्रमाणे कोयना ही विजेची योजना म्हणून चांगली आहे असे जेव्हा मी म्हणतो तेव्हासुद्धा त्या योजनेमुळे दुसऱ्या योजना त्याज्य आहेत असाही अर्थ होत नाही. किंबहुना कोयनेप्रमाणे कमी खर्चात जास्तीत जास्त वीज उत्पन्न करणारी जर दुसरी वीज योजना असती, तर मग दोन्हीत चांगली किंवा कमी दर्जाची योजना कोणती असा प्रश्न उद्‌भवता असता. तुलनात्मक विचारासाठी दुसरी योजना नसता सरकारकडून प्रॉयॉरिटी कशी ठरविली गेली व याबाबतीत सरकारचे जे धोरण आहे त्यासंबंधी जी टीका झाली त्याचा मी नंतर उल्लेख करणार आहे. आता मला एवढेच सांगावयाचे आहे की, सगळ्या योजना या आपापल्या परीने चांगल्याच असतात आणि त्यामुळे त्या सर्व घेतल्या जातील असे मी आश्वासन देत आहे. कोणतीही योजना टाकावू आहे असे मी म्हणत नाही, परंतु अन्नधान्याचे उत्पादन वाढविणे हा आजचा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न असल्यामुळे उकाई योजना ही महत्त्वाची आहे.

ही उकाई योजना जर अंमलात आणली तर त्यामुळे ११ लाख एकर जमीन पाण्याने भिजेल. आता सुरत मधील भागात पाऊस जास्त पडत असल्यामुळे इरिगेशनच्या दृष्टीने उकाई योजनेचा फारसा उपयोग होणार नाही असा एक मुद्दा सन्मानीय सभासद श्री.मोहिते यांनी काढला आहे. परंतु एखाद्या ठिकाणी पाऊस पुष्कळ पडत असेल तर

इरिगेशनची आवश्यकता नसते असे नाही. कित्येक वेळा तेथे पाऊस भरपूर पडत असूनसुद्धा एखादा दुसरा पाऊस कमी पडला तर त्यामुळे पिकांची हानी होते. कोल्हापूर हा पावसाळी प्रदेश आहे हे सन्माननीय सभासदांना माहित असेलच. परंतु तरीसुद्धा तेथे इरिगेशनच्या सोयी करून घेण्यासाठी लोकांची जोरात खटपट सुरू आहे. अशा रितीने इरिगेशन हे भरपूर पाऊस पडणाऱ्या प्रदेशातसुद्धा आवश्यक असते ही गोष्ट सन्माननीय सभासदांच्या लक्षात येईल.

त्याचप्रमाणे या भागात नेहमी भरपूर पाऊस पडतो हे जे सन्माननीय सभासद श्री.यशवंतराव मोहिते यांचे म्हणणे आहे ते सर्वस्वी बरोबर नाही, असे मला म्हणावयाचे आहे. तेथे काही ठिकाणी भरपूर पाऊस पडतो, काही ठिकाणी बेताचा पाऊस पडतो आणि काही ठिकाणी अत्यंत कमी पाऊस पडतो तेव्हा त्या दृष्टीने उकाई ही अत्यंत महत्त्वाची आहे हे सन्माननीय सभासदांच्या लक्षात येईलच. सन्माननीय सभासद श्री.यशवंतराव मोहिते यांनीसुद्धा उकाई योजनेला विरोध केलेला नाही.

अशा रितीने उकाई योजनेबद्दल ज्या गोष्टी मी सांगितल्या आहेत त्यावरून उकाई योजनेचे महत्त्व किती आहे हे सन्माननीय सभासदांच्या लक्षात आलेच असेल.

या योजनेप्रमाणे एकंदर अंदाजे ११ लाख एकर जमीन लागवडीखाली येणार आहे. या जमिनीपैकी ३३ हजार एकर जमीन साखरेसाठी लागणाऱ्या ऊसाच्या लागवडीखाली येणार असून साखर तयार करणारे ५-६ कारखाने आपल्याकडे निघू शकतील. आपल्या महाराष्ट्रात ऊस किती होतो आणि साखरेच्या कारखान्यासाठी त्यातील ऊस किती जातो याचे प्रमाण काढले तर असे दिसून येईल की, नुसत्या ऊसाच्या पिकावर हे कारखाने निघू शकत नाहीत, तर त्याला इतर अनुषंगिक गोष्टी लागतात. त्या सर्व गोष्टी उपलब्ध असू शकल्या तरच हे कारखाने निघू शकतील. कदाचित पुढे ऊसाचे प्रमाण जास्त होईल आणि अधिक कारखाने निघू शकतील हा पुढचा प्रश्न आहे. पण सध्या ५-६ कारखाने निघू शकतील अशी परिस्थिती आहे असे मला सांगावयाचे आहे. ज्याप्रमाणे ३३ हजार एकरामध्ये ऊसाची लागवड होणार आहे त्याप्रमाणे भाजीपाला ३३ हजार एकर होईल, भात २२५ हजार एकर होईल, गहू २०६ हजार एकर होईल, डाळी वगैरे कडधान्ये १५६ हजार एकर आणि इतर धान्ये ५८ हजार एकरात होऊ शकतील.

ज्यावेळी विरोधी पक्षाकडून या ठरावावर चर्चा केली गेली, त्यावेळी दोन्ही स्कीमची तुलना करण्यात आली होती आणि आता उत्तर देताना त्यासंबंधी बोलले की पॉईंट ऑफ ऑर्डर उपस्थित करण्यात येतो याचे मला आश्चर्य वाटते. तेव्हा मला असे सांगावयाचे आहे की, एकंदर अंदाजे या ११ लाख एकर जमिनीपैकी ३३ हजार एकर जमिनीत ऊस निर्माण होणार आहे ही गोष्ट लक्षात घेतली तर उकाई ही योजना कारखान्यांना वीज पुरविण्यासाठी निर्माण होत आहे असा गैरसमज पसरविणे बरोबर होणार नाही. ही योजना मी आता सांगितल्याप्रमाणे अन्नधान्याची परिस्थिती सुधारण्यासाठीच आहे. तेव्हा मध्यवर्ती सरकारने या दोन्ही योजना हाती घेतल्या तर बरे होईल. पण त्यांना तसे न करता एकच योजना हाती घ्यावयाची असेल तर या दोन्ही योजनांची तुलना करून कोणती प्रथम घ्यावयाची हे त्यांनी ठरवावे या उद्देशाने या दोन्ही योजना सरकारने रेकमेंड केल्या आहेत. सभागृहापुढे असलेल्या रेझोल्यूशनचा आपण नीट अभ्यास केला तर आपणाला असे दिसून येईल की, यामध्ये कोणत्या योजनेला प्रायॉरिटी द्यावी याचा उल्लेख केलेला नाही. त्या रेझोल्यूशनमध्ये पुढीलप्रमाणे म्हटले आहे -

"This Assembly recommends to Government to move the Government of India to give priority to it."


यामध्ये कोणत्या योजनेला प्रायॉरिटी द्यावयाची याचा काही उल्लेख नाही. या रेझोल्यूशनचा नीट अर्थ लावला तर त्याचा अर्थ पुढीलप्रमाणे निघू शकेल -

"This Assembly recommends to Government to move the Government of India to include the Koyna Valley Scheme in the First Five Year Plan."

कोयना योजनेचा पंचवार्षिक योजनेमध्ये अंतर्भाव करावा एवढेच यामध्ये म्हटले आहे. ही योजना इतर योजनेपेक्षा चांगली आहे, तेव्हा इतर योजना हाती न घेता कोयना घ्यावी असा अर्थ यातून निघत नाही. अशी परिस्थिती असताना उकाईची माहिती मिळाली म्हणून तिला प्रायॉरिटी देऊ नये आणि कोयनेला द्यावी असे म्हणणे बरोबर होणार नाही. ज्या सन्माननीय सभासदांनी हा ठराव सभागृहापुढे मांडला आहे त्यांनी पंचवार्षिक योजनेमध्ये कोयना योजनेचा समावेश करा असे म्हणता म्हणता उकाई ही योजना मुंबई प्रांताला फायद्याची नाही हा मुद्दा निरर्थक उपस्थित केला आहे.

तेव्हा मला स्पष्टपणे सांगावयाचे आहे की, त्यांचे हे म्हणणे बरोबर नाही. उकाई ही योजना मी मघाशी सांगितल्याप्रमाणे अन्नधान्याची परिस्थिती सुधारण्यासाठीच आहे. तेव्हा या दोन्ही योजना हाती घेतल्या तर त्यामुळे फायदा होणार असल्याने त्या रेकमेंड केल्या आहेत. दोन्ही योजना त्या सरकारला हाती घ्यावयाच्या नसतील तर त्यांना जी योग्य वाटेल ती त्यांनी घ्यावी एवढ्याच दृष्टीने मी हा खुलासा केला आहे. मी केलेल्या खुलाशाने विरोधी पक्षातील सन्माननीय सभासदांचे समाधान होईल अशी आशा व्यक्त करून मी आपले भाषण पुरे करतो.

***



श्रीमंत मालोजीराजें यांच्या मंत्रीपदाच्या कारकिर्दीत कार्यारंभ झालेले, महाराष्ट्राचे वरदान असलेले 'कोयना धरण'.

१७ (४)

मुंबई राज्य अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण व्हावे यासाठी नर्मदा योजना महत्त्वाची

(२ एप्रिल १९५३ रोजी विधानसभेमधील भाषण)

अध्यक्ष महाराज, माझे सन्माननीय मित्र श्री.तडवी यांनी या सन्माननीय सभागृहापुढे जो ठराव मांडला आहे तो असा आहे की, बडोदा व भडोच या जिल्ह्यातील बऱ्याच भागांत वरचेवर पडणारा दुष्काळ टाळण्याच्या दृष्टीने व मुंबई राज्य अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण करण्याच्या दृष्टीने नर्मदा इरिगेशन स्कीम ही प्लॅनिंग कमिशनमध्ये घेण्यात यावी अशी शिफारस मुंबई सरकारने केंद्रीय सरकारला करावी. या ठरावाला पाठिंबा देण्याकरिता बऱ्याच सन्माननीय मित्रांनी भाषणे केली आहेत. सरकारची या बाबतीत जी भूमिका आहे ती सांगण्यापूर्वी नर्मदा नदी व तिच्यावरील प्रोजेक्टची माहिती मी या सन्माननीय सभागृहापुढे मांडणार आहे.

भारतामध्ये ज्या मुख्य नद्या आहेत त्यात नर्मदा नदीचा नंबर पाचवा आहे. ही नदी विंध्य पर्वतात उगम पावून विंध्य प्रदेश, मध्यप्रदेश व मुंबई राज्य अशा तीन भागातून वाहत जाते व शेवटी खंबायतच्या आखातात समुद्राला मिळते. हिची सर्व लांबी ८१३ मैल आहे. प्रथम ही विंध्य पर्वतात उगम पावून ४० मैल वाहत जाऊन मध्यप्रदेशात शिरते. त्यानंतर पश्चिमेकडे एक वळण घेऊन उत्तरेकडे जबलपूर जवळील संगमनेर दगडांच्या खडकावरून वाहत जाते. त्यानंतर विंध्य व सातपुडा यांच्यामध्ये असलेल्या सुपीक मैदानातून वाहत जाऊन पुन्हा ७० मैल डोंगराळ प्रदेशातून वाहत जाते. त्यानंतर मंदार व पुनासा यांच्या बाजूने पुन्हा डोंगराळ भागातून वाहत जाऊन बडोदा व भडोच या दोन जिल्ह्यातून सुमारे १०० मैल वाहत जाऊन शेवटी समुद्राला मिळते. अशा तऱ्हेचा हिचा ८१३ मैल लांबीचा प्रवास आहे. एवढ्या मोठ्या विशाल नदीचे पाणी शेतीच्या किंवा विद्युत उत्पादनाच्या दृष्टीने उपयोगात आणता येईल की काय हे पाहण्यासाठी मुंबई व मध्यप्रदेश सरकारने सेंट्रल वॉटर वर्क्स, इरिगेशन, नॅव्हिगेशन कमिशनला विनंती केली. त्यानंतर या नदीवर जर निरनिराळ्या योजना आखून त्या पार पाडावयाच्या झाल्या तर त्यासाठी ९६ लाख रुपये खर्च येईल असा अंदाज

करण्यात आला. परंतु ही फार मोठी रक्कम असल्यामुळे एक कमिटी नेमून व ६ लाख रुपयांची मंजूरी देऊन या नदीवर थोडेसे पाटबंधारे बांधता येतील की काय याबद्दल त्या कमिटीने रिपोर्ट सादर करावा असे ठरविण्यात आले. त्या कमिटीने सुद्धा आपल्याकडे असलेल्या तंत्र विशारदांचा अभाव व अपुरा पैसा यांचा विचार करता या नदीवरील योजनांसाठी ९६ लक्ष रुपये खर्च करण्याऐवजी ६० लक्ष रुपये खर्च केले तर निरनिराळ्या अनेक ठिकाणी पाटबंधारे बांधता येतील असे सुचविले. तेव्हा निरनिराळ्या ८-९ ठिकाणी पाटबंधाऱ्याच्या योजना आखण्याकरिता त्या ठिकाणांची पाहणी करण्यात आली आणि त्यातल्या त्यात पाटबंधाऱ्याची चार कामे हाती घेण्यात आली असून त्यासंबंधीची तपासणी सुरू झालेली आहे. मध्यप्रदेश आणि मुंबई सरकार या दोघांमध्ये या कामापासून जो फायदा होईल त्या प्रमाणात खर्चाचीही वाटणी करण्यात आलेली आहे. नर्मदा खोऱ्यात कोणकोणत्या ठिकाणी ही कामे सुरू करण्यात आली आहेत त्यांची मी नावे वाचून दाखवितो. घुघरी, बिलधरा, बार्गी, तावा, होशंगाबाद, पुनासा आणि हरिणफाळ यांच्यामध्ये एक तलाव आणि राजपिपलाजवळ दोन तलाव अशाप्रकारे एकंदर ८-९ डॅम्स बांधण्याची तरतूद करण्यात आलेली असून त्यापैकी चार ठिकाणी प्रोजेक्टस हाती घेण्यात आली आहेत.

पहिले प्रोजेक्ट मध्यप्रदेशातील बार्गी येथे हाती घेण्यात येणार आहे. याची उंची ११० फूट असून लांबी सुमारे एक मैल आहे. दोन्ही बाजूंना कॅनॉल्स होणार असून १८ एकर लक्ष जमीन भिजण्याची शक्यता आहे. २८ हजार ८०० किलोवॅट वीज निर्माण होईल असा अंदाज आहे. जागेची सर्व्हे वगैरे सर्व पुरी झाली असली तरी पैशाच्या अडचणीमुळे हे काम बंद करण्यात आले आहे. हायड्रॉलॉजिकल ऑब्झरवेशनचे काम चालू साली हाती घेण्याचा विचार आहे. त्यानंतर तावा हे इटार्सीजवळ आहे. या बंधाऱ्याची उंची १७० फूट असून २८०० फूट लांबी आहे. यापासून एक कॅनॉल होणार असून त्यामुळे सव्वा आठ लक्ष एकर जमीन भिजेल व २० हजार किलोवॅट वीजेचे उत्पादन होईल. या संबंधीचा सर्व तऱ्हेची सर्व्हे पुरी होऊन रिपोर्ट तयार करण्याचे काम चालू आहे. यानंतर पुनासाच्या प्रोजेक्टची उंची २३० फूट असून या ठिकाणी कॅनॉलचे थोडेसे पाणी आहे, परंतु लिफ्ट करून पाणी देण्याची शक्यता आहे.

या प्रोजेक्टमुळे एकंदर ३ लक्ष किलोवॅट वीज निर्माण होऊ शकेल. या प्रोजेक्ट संबंधीची इस्टिमेट व रिपोर्ट तयार करण्याचे काम हाती घेतलेले आहे. याला काही वेळ लागेल. यानंतर मुंबई प्रांतामध्ये राजपिपला येथे दोन डॅम्स होणार आहेत. याची उंची १०० फूट असून लांबी एक मैल आहे. दोन बाजूंनी कॅनॉल्स निघणार असून १८ लक्ष एकर जमीन भिजेल असा अंदाज आहे. सर्व तऱ्हेची सर्व्हे पुरी झालेली असून इस्टिमेट आणि रिपोर्ट याचे काम चालू आहे.

तेव्हा या नर्मदा इरिगेशन वॉटर प्रोजेक्टचे जे काही काम चाललेले आहे आणि जी कामे पुरी होणार आहेत ती लक्षात घेऊन सन्माननीय सभासद श्री.तडवी यांनी खरोखरीच आपला ठराव मागे घ्यावा असे मला सुचवावयाचे आहे. या एकंदर प्रोजेक्ट संबंधीची माहिती मी सभागृहाला सांगितली आहे. तेव्हा सन्माननीय सभासद यांनी हा ठराव मागे घ्यावा अशी विनंती करून मी रजा घेतो.

***

उपसंहार

१८. मान्यवरांच्या शब्दात श्रीमंत मालोजीराजे

परंपरागत ७०० वर्षाच्या ऐतिहासिक अशा मध्ययुगीन नाईक निंबाळकर घराण्यातील राजगादीवर 'राजा' म्हणून १९१७-१९४८ (३१ वर्षे) व नंतर संस्थान विलीन केल्यानंतर १९४८ ते १९७८ (३० वर्षे) श्रीमंत मालोजीराजे नाईक निंबाळकर यांनी फलटण संस्थान, फलटण-खंडाळा-माण तालुका तसेच महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी जे बहुमोल योगदान दिले आहे त्याबद्दल अनेक क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचेबद्दल मनापासून गौरवोद्‌गार काढले आहेत. त्याचे हे संकलन....

✻ राजा म्हणून व नंतर लोकप्रतिनिधी म्हणून श्रीमंत मालोजीराजे यांनी फलटण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष म्हणून फलटण तालुक्यात मुधोजी महाविद्यालय सुरू करून बहुजन समाजातील मुला-मुलींना शिक्षणाची द्वारे खुली करून दिली. अनेक पिढ्यांना उपयोगी होईल असे हे काम आहे. यापूर्वीही फलटण संस्थान त्यांनी कृषि, औद्योगिक, सहकारी, शिक्षण, पाटबंधारे क्षेत्रात अग्रेसर ठेवले होते. मंत्री म्हणूनही त्यांनी राज्याच्या विविध भागात धरणे, तलाव, रस्ते, सार्वजनिक इमारती, सहकारी क्षेत्रात साखर कारखाने अशी अनेक कामे केली आहेत.

- यशवंतराव चव्हाण.

✻ भूदान चळवळीकडे एक यज्ञ म्हणून श्रीमंत मालोजीराजे पाहत होते. त्यांच्या संस्थानमधील १२०० एकर जमीन शंकरराव देव यांच्या अध्यक्षतेखालील एका समारंभात पूर्वीच्याच कुळांचे नावे करून त्यांना कायमचे मालक केले. खऱ्या अर्थाने ते प्रजाहितदक्ष लोकसेवक आहेत.

- आचार्य विनोबा भावे.

* राजेसाहेबांचे व्यक्तिमत्व प्रसन्न आणि प्रगल्भ होते. समाज आणि राष्ट्रहितैषी होते. फलटण शहर आणि तालुक्याच्या, महाराष्ट्राच्या विकासासाठी त्यांनी केलेले रचनात्मक कार्य त्यांच्या दूरदृष्टीचे प्रतिक होते. मंत्रीपदावरूनही त्यांनी महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी जे योगदान दिले ते त्यांच्या कर्तृत्व संपन्नतेची साक्ष देणारे आहे. लोकशाही मूल्ये जपणारे, उदारमतवादी आणि परमतसहिष्णू वृत्तीचे राजेसाहेब आम्हा कुटुंबियांचे आदराचे, जिव्हाळ्याचे, सुख-दुःखात समरस होणारे आणि मार्गदर्शन करणारे ऋणानुबंधी होते. अनेक प्रसंगात त्यांच्या मोठ्या मनाचे दर्शन घडले आहे. समयसूचकता, समन्वय आणि सामंजस्य ही त्यांच्या क्रियाशीलतेची त्रिसूत्री होती. सामाजिक, शैक्षणिक, सहकारी, औद्योगिक, सांस्कृतिक क्षेत्रातील त्यांचे कार्य बहुमोल आणि संस्मरणीय आहे.

- राजमाता श्रीमंत छत्रपती सुमित्राराजे भोसले.

* स्वतः राज्य पदावर असूनही श्री.मालोजीराव यांनी शेतीकडे विशेष लक्ष दिले आहे व संस्थानमधील शेती आदर्श आहे. माझ्या सातारा येथील रयत शिक्षण संस्थेच्या कार्याबद्दल त्यांना खूप आत्मीयता होती. त्यांनी मला फलटणमध्ये बोलावून माझ्या कार्याचा सत्कार व आदर केला. देणगीही दिली. सातारमधील त्यांचा बंगला, साडेदहा एकर जमीन व रोख रुपये ५,००० त्यांनी न मागता आम्हाला दिले. विशेष म्हणजे या देणगीसाठी त्यांची कोणतीही शर्त, अट नव्हती. रयत शिक्षण संस्थेचे ते खऱ्या अर्थाने पहिले आश्रयदाते होते. सर्वच समाजाबद्दल सारखेच प्रेम व सहकार्य असलेले ते खरे रयत सेवक होते.

- कर्मवीर भाऊराव पाटील (संस्थापक, रयत शिक्षण संस्था, सातारा.)

* आपले फलटण संस्थान, एवढे मोठे राजवैभव, अधिकार याचा त्याग करून सामान्य लोकप्रतिनिधी म्हणून मालोजीरावांनी जी लोकसेवा केली ती अतुलनीय आहे. फलटण संस्थान विलीन केल्यानंतरही त्यांनी फलटणच्या जनतेकडे यत्किंचितही दुर्लक्ष केले नाही. मालोजीराव हे खऱ्या अर्थाने आगरकर, रानडे, गोखले, इत्यादी जुन्या उदारमतवादी समाजसुधारकांच्या परंपरेतील आहेत.

कुलीन वंशातील व्यक्तीत शालीनता व शील कसे रूजलेले असते याचा मला नेहमीच प्रत्यय आला आहे. मालोजीरावांच्या संभाषणात गोडी, सल्लामसलतीत चातुर्य, आणीबाणीच्या प्रसंगी अवधान व धैर्य, सरलता अनुभवास येते. खाजगी कौटुंबिक जीवनातही वात्सल्य, मार्दव, समानता व कर्तव्य दक्षता हे गुण उज्ज्वल रूपाने प्रकट झालेले आढळतात. त्यांचे जीवन यशस्वी व भाग्यशाली कसे झाले याचे मर्म या सद्‌गुणांमुळे लक्षात येते. म्हणूनच ते लोकोत्तर पुरुष आहेत.

- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, वाई.

✻ भारतातील अनेक राजे चंगळवादी होते. पण मालोजीराजे गांधीवादी होते. राजकारणात माणसे बाजूला नेणे, जवळचे व दूरचे असा फरक करणे, आत एक आणि बाहेर एक असे धोरण पत्करणे अनेक लोकांच्या स्वभावात असते. अनेकांना बाहेरून जगासाठी, आतून जातीसाठी जगणे आवडते. राजेसाहेबांच्या जीवनात हा कोतेपणा नव्हता, ही क्षुद्रता नव्हती. त्यांचे अनेकांशी अनेक बाबतीत मतभेद झाले, संघर्ष झाले. पण त्यांच्या मुखातून निंदेचा उद्‌गारही कधी बाहेर पडला नाही. सदैव समतोल व समचित्त असा हा सत्पुरुष होता.

प्रतापगडावर संयुक्त महाराष्ट्राच्या संघर्ष काळात मालोजीराजेंनी अपार कष्ट घेऊन छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य अश्वारूढ पुतळा उभारला व त्याचे अनावरण पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचे हस्ते जिद्दीने यशस्वी केले. हे काम सोपे नव्हते. त्यांची ही धडपड पं.नेहरूंच्या मनात ठसली होती. ती त्यांनी नंतर इंदिराजींनाही सांगितली होती. म्हणून इंदिराजींनी महाराष्ट्राचा दौरा फलटणपासून सुरू केला. संपूर्ण दौऱ्यात त्यांनी मालोजीराजेंना बरोबर घेतले होते. पंडितजींचा प्रतापगडावरचा कार्यक्रम व नंतर इंदिरा गांधींचा फलटणपासून सुरू झालेला महाराष्ट्र दौरा व यातून मालोजीराजेंनी चतुराईने या दोघांच्या कानी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र ही मराठी माणसाची अस्मिता असल्याचे पद्धतशीरपणे घातले. संयुक्त महाराष्ट्र होण्याच्या घटनेची ही पाऊलवाट होती. मालोजीराजेंमुळे हा राजमार्ग झाला आणि मराठी माणसाचे स्वप्न पूर्ण झाले.

- प्राचार्य शिवाजीराव भोसले, प्रसिद्ध विचारवंत, फलटण.

* मालोजीराजेंचा सहवास म्हणजे ज्ञानार्जनाची पाणपोई असे. अनेक विषयांवर त्यांचा अभ्यास होता. असा ज्ञानी, असा संयमी, असा कनवाळू राजा ज्या फलटणकरांना लाभला, ते धन्य होत. अशी व्यक्ती ज्यांच्या जीवनाला स्पर्श करून गेली त्यांच्या जीवनाचे सार्थक झाले. अशा व्यक्तींचे ज्यांना केवळ दर्शन झाले त्यांनासुद्धा ते अविस्मरणीय वाटले, यात नवल नाही.

महाराजसाहेबांचे वागणे आणि बोलणे म्हणजे मूर्तीमंत मार्दव होते. त्यांचा आवाज चढलेला मी तर कधी ३०-३५ वर्षाच्या सहवासात ऐकला नाही. पण कोणा इतरांकडून देखील असा चढलेला आवाज ऐकलेला नाही. आपल्यापेक्षा कितीतरी लहान व्यक्तींना देखील त्यांचे संबोधन अतीव आदरयुक्त असे. डॉक्टरांपासून ते अगदी घरकाम करणाऱ्या पर्यंत सर्वांना मान देत असत. यात त्यांचे सुसंस्कृत मन प्रतीत होत असे. १९५० पासून माझे वडिल श्री. वि. न. सरदेसाई (आय.सी.एस.) त्यांचे हाताखाली फलटण संस्थानमधील खात्याचे सचिव होते. त्यांचेकडून श्रीमंत मालोजीराव यांच्याबद्दल खूप चांगले वारंवार ऐकायला मिळायचे. एक सच्ची, प्रामाणिक, साधी सरळ, न्यायी, कर्तृत्ववान व्यक्ती म्हणून त्यांचे चित्रण माझ्या मनात कायमचे कोरले गेले होते. माझे वैद्यकीय शिक्षण पूर्ण झाल्यावर मी पुण्यातच वैद्यकीय व्यवसाय सुरू केला. तेव्हापासून माझेही त्यांचेशी आणि श्रीमंत राणीसाहेब लक्ष्मीदेवी यांचेशी अगदी घरगुती संबंध आले होते. मी वडिलांकडून माझ्या विद्यार्थीदशेत महाराजांच्या बद्दल जे जे ऐकले होते व त्यानुसार त्यांच्या व्यक्तीमत्त्वाबद्दल जे चित्रण माझ्या मनावर कोरले होते त्यात मला तसूभरही फरक पुढील अनेक वर्षात दिसला नाही.

- डॉ. एच. व्ही. सरदेसाई, पुणे. (श्रीमंत मालोजीराजेंचे कौटुंबिक डॉक्टर)

* १९५० ते १९७८ पर्यंतच्या काळात मालोजीराजेंचा महाराष्ट्राच्या राजकारणात एक वेगळाच ठसा होता. सहकारमंत्री म्हणून त्यांनी महाराष्ट्रातील साखर कारखान्यांबाबत व विशेषतः मी यशवंतराव मोहिते यांच्याबरोबर कृष्णा सहकारी साखर कारखान्याच्या उभारणीबाबत काम करताना खूपच मार्गदर्शन, सहकार्य केले. राजकारणाइतकेच किंबहुना त्याहीपेक्षा जास्त अधिक मोलाचे काम त्यांनी सामाजिक

आणि शैक्षणिक क्षेत्रात केले. मुळातच त्यांचा पिंड सुधारक आणि प्रागतिक विचारांचा होता. तरुण वयात राजा झाल्यावर पहिल्याच दिवशी त्यांनी दरबारातील गोषा पद्धत बंद करणे, बकरी मारण्याची परंपरा बंद करणे, जातिभेद निर्मूलन, हरिजन मंदिर प्रवेश अशी क्रांतिकारक कामे केली.

अशा या जाणत्या राजाचा लोकसंग्रह प्रचंड होता. विद्येचा, कलेचा, समाजसेवेचा त्यांनी सदैव आदर केला. एक गुणज्ञ, प्रज्ञावंत, कर्तृत्ववान नेता आणि प्रशासक म्हणून त्यांचे नाव महाराष्ट्राच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनीच लिहिले जाईल.

- डॉ. नीळकंठ कल्याणी, पुणे. ('भारत फोर्ज' चे संस्थापक)

✲ श्रीमंत महाराजसाहेब शिस्तीचे कडक पुजारी होते. आम्हाला राजघराण्यातील मुले म्हणून वेगळे शिक्षण वगैरे असे नव्हते. सामान्य घरातील मुलांप्रमाणेच आम्हाला शाळेत व इतरत्र वागणूक मिळावी असाच त्यांचा आग्रह असायचा. माझे परदेशातील उच्च शिक्षण पूर्ण करून परत स्वदेशी आल्यानंतर त्यांच्या मंत्री पदामुळे कोठेही उत्तम नोकरी मिळू शकली असती. पण त्यांनी तसे करू दिले नाही. ते म्हणायचे, 'जोपर्यंत मी मंत्रिमंडळात आहे तोपर्यंत माझ्या मुलांनी सरकारी नोकरी पत्करू नये' असे स्पष्ट आदेशच त्यांनी सरकारी अधिकाऱ्यांना दिले होते. मी फलटण तालुक्यात राहून शेतकऱ्यांची सेवा करावी, नवीन साखर कारखाना ते काढत होते त्यात मदत करावी असे त्यांनी मला स्पष्टपणे सांगितले.

एकदा आमचे सख्खे चुलते श्रीमंत बुवासाहेब काका यांनी संस्थानमधील एका प्रजाजनावर अन्याय केल्याची तक्रार आली. चौकशीअंती ही खरी निघाल्यावर महाराजसाहेबांनी त्यांना, म्हणजे त्यांच्या सख्ख्या भावाला, श्रीमंत बुवासाहेबांना बंदिस्त करून ठेवले होते. या प्रसंगावरून माझ्या मनावर खोल ठसा उमटला होता की, ''अपराधी कोणीही असो, मग तो नात्यागोत्याचा असो वा रक्तामांसाचा संबंधी असो, त्याला शिक्षा ही झालीच पाहिजे.'' त्यांचा हा गुण आम्ही कधीच विसरू शकणार नाही.

- श्रीमंत शिवाजीराजे नाईक निंबाळकर (श्रीमंत मालोजीराजेंचे सुपुत्र, माजी आमदार व श्रीराम साखर कारखान्याचे चेअरमन.)

* १९५६-५७ मधील संयुक्त महाराष्ट्र लढ्याचेवेळी आम्ही श्रीमंत मालोजीराजे यांच्यावर भरपूर टीका केली होती. त्यावेळी ते काँग्रेसचे मंत्री व नेते होते. पण नंतर त्यांनी काँग्रेस सोडली. त्यांचे चिरंजीव श्रीमंत शिवाजीराजे १९६७ मध्ये काँग्रेसच्या विरोधात अपक्ष म्हणून फलटण मधून आमदारकीसाठी उभे राहिले होते. त्यावेळी आम्ही त्यांच्या प्रचारार्थ फलटणला गेलो होतो. त्यावेळी श्रीमंत मालोजीराजे यांच्या कार्याबद्दल सविस्तर माहिती मिळाली. तेव्हा त्यांच्यापासून इतके दिवस अलिप्त राहिल्याबद्दल खंत वाटली. असा राजा दहा हजार वर्षात झाला नाही व पुढील दहा हजार वर्षात होणार नाही असे आमचे ठाम मत आहे.

- आचार्य प्रल्हाद केशव अत्रे (झुंजार नेते व 'दै.मराठा' चे संपादक.)

* श्रीमंत मालोजीराजेंना आपल्या घराण्याचा व शिवछत्रपतींच्या घराण्याबद्दल खूप अभिमान होता. या घराण्याच्या इतिहासाबद्दलही त्यांना खूप प्रेम होते. यासंबंधी अनेक कागदपत्रे घेऊन ते पुण्यात भारत इतिहास संशोधन मंडळात येत असत. तिथं प्रा. ग. ह. खरे यांच्यासह माझ्याशी त्यांची या घराण्यातील इतिहासाबद्दल चर्चा होत असे. शिवछत्रपतींच्या आधीपासून भोसले व नाईक-निंबाळकर यांचे पुरातन नात्याचे संबंध होते. मी त्यावेळी त्यांना म्हणालो होतो, ''शिवाजी महाराजांच्या स्वातंत्र्य युद्धाची प्रेरणा नाईक निंबाळकर घराण्यातून आणि रक्तातून आली आहे. सुलतानी सत्तेविरूद्ध पहिलं धाडसी बंड उठवलं ते बारा वजीरांचा काळ असलेल्या फलटणच्या वणगोजी नाईक निंबाळकरांनी ! ह्या बंडाचं स्फुल्लिंग फलटणमध्ये होतं. प्रेरणा फलटणात आहे.''

यानंतर अनेकवेळा त्यांच्या आमच्या भेटी होत असत. संस्थानी सत्तेच्या मर्यादा लक्षात घेऊन अति सावध दक्षतेने त्यांनी फलटण संस्थानमध्ये राजा असताना व राजेपण नसतानाही रचनात्मक व विधायक, लोककल्याणकारी कार्य केले. प्रतापगडचा शिवस्मारक शुभारंभ कार्यक्रमात त्यांनी स्वतःचं काळीज ओतलं होतं. तसंच काळीज दुसऱ्यांदा कोयना धरणाच्या शुभारंभ कार्यक्रमात दिसलं.

- शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे (शिवचरित्राचे अभ्यासक.)

✼ श्रीमंत मालोजीराजेंचा ज्येष्ठ नातू म्हणून मला त्यांच्या नात्याचा सहवास लाभला हे माझे भाग्य आहे. त्यांची ‘राजा’ म्हणून कारकीर्द ऐतिहासिक अशीच झाली. पण संस्थान विलीन झाल्यानंतरही लोकसेवक म्हणून त्यांनी केलेले सर्वांगीण विकासाचं कार्य ही माझी प्रेरणा होती. ज्यांनी आपल्या दिव्य दूरदृष्टीने काळाची पावले ओळखली अशा मोजक्या ‘राजा’ मध्ये ते होते. त्यांनी गादीवर बसताच आपल्या व्यापक सहानुभूतीने अलौकिक धैर्याने व निष्ठाशील कर्तृत्वाने प्रजेचे मन जिंकले. तसेच राजसिंहासनावरून हसतमुखाने खाली उतरले व आनंदाने लोकयात्रेत सहभागी झाले.

मी त्यांचा नातू आहे. एवढेच माझे भाग्य नाही, तर त्यांनी संस्थानमध्ये शेतकरी, पाणी, कारखाने, शिक्षण, कृषि शिक्षण, इत्यादी क्षेत्रात जनतेसाठी काम केले त्याची प्रेरणा घेऊनच व आमचे काकाश्री कै.श्रीमंत शिवाजीराजे नाईक निंबाळकर यांच्या आशीर्वादाने आजपर्यंत मी जे काम केले त्यात यश आले हे माझे भाग्य आहे. फलटण, खंडाळा, सातारा जिल्हा यासाठी निरा-देवघर, धोम-बलकवडी धरण व अन्य छोट्या पाटबंधारे योजना, औद्योगिक वसाहती, ग्रामीण व शहरी विभागातील सुखसोयींसाठी नागरी सुविधा, कृषि शिक्षणातील महाविद्यालयीन कार्य, बँका, पतसंस्था, दूध संस्था, विकास सोसायट्या व अन्य संस्थांमधून विधायक कार्यासाठी कार्यकर्त्यांचे जाळे व तरुण कार्यकर्त्यांचा अफाट लोकसंग्रह यासाठी माझी प्रेरणा म्हणजे श्रीमंत मालोजीराजे हेच निःसंशय !

- ना.श्रीमंत रामराजे नाईक निंबाळकर

(सभापती, महाराष्ट्र विधान परिषद, मुंबई.)

✼✼✼

। संदर्भ साधने

१) फलटण संस्थानचे वार्षिक प्रशासकीय अहवाल - १८८५ - ८६. मुधोजी मनमोहन राजवाडा, फलटण.

२) फलटण स्टेट गॅझेट - १९२९ - १९४२. मुधोजी मनमोहन राजवाडा, फलटण.

३) मुंबई प्रांताचा वार्षिक प्रशासकीय अहवाल - १८७६, १८८२ - ८३. मुंबई पुरातत्त्व विभाग, मुंबई.

४) डॉ.गावडे सदाशिव मा. फलटण संस्थानचा इतिहास (१३ व्या शतकापासूनचा) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे 'विद्या वाचस्पती' पदवी साठी सादर केलेला प्रबंध - २००१.

५) पटवर्धन वि. अ.- संस्थानांतील लोकशाहीचा लढा. (१९४०)

६) तारकुंडे सि. रा. - क्षत्रिय घराण्याचा इतिहास. (१९२८)

७) पटवर्धन वि. अ. - दक्षिण महाराष्ट्रातील संस्थानांच्या विलीनीकरणाची कथा, पुणे. (१९६६)

८) पारसनीस डी. बी. - इतिहास संग्रह, ऐतिहासिक चरित्रे व ऐतिहासिक टिपणे, सातारा.

९) गो. स. सरदेसाई - ऐतिहासिक घराण्यांच्या वंशावली.

१०) वा. सी. बेंद्रे - विजापूरची आदिलशाही.

११) भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे. - मराठ्यांच्या इतिहासाची ऐतिहासिक कागदपत्रे.

१२) सरदेसाई गो. स. - मराठी रियासत, पुणे - १९९३.

१३) पाटील बाळासाहेब - सत्यवादी वृत्तपत्र, दक्षिण संस्थान खास अंक, कोल्हापूर - जुलै - १९४०.

१४) रयत सेवक श्रीमंत मालोजीराजे - संपादक श्रीमंत शिवाजीराजे नाईक निंबाळकर, नोव्हेंबर १९९७. प्रकाशक - मालोजीराजे स्मृती प्रतिष्ठान, फलटण.

१५) 'शिवाजीराजे' - श्रीमंत शिवाजीराजे नाईक निंबाळकर यांचे चरित्र - प्राचार्य विश्वासराव देशमुख, फलटण - २०१०. प्रकाशक - मालोजीराजे स्मृती प्रतिष्ठान, फलटण.

१६) प्राचार्य विश्वासराव देशमुख - 'मालोजीराजे' ग्रंथ, फलटण - २०१५. प्रकाशक - मालोजीराजे स्मृती प्रतिष्ठान, फलटण.

१७) डॉ.सुवर्णा नाईक निंबाळकर - शिवपत्नी सईबाई चरित्र, पुणे - २०२०. प्रकाशक - संस्कृती प्रकाशन, पुणे.

१८) महाराष्ट्र विधानमंडळ ग्रंथालय, विधानभवन, मुंबई. प्रकाशक - महाराष्ट्र विधीमंडळ, महाराष्ट्र शासन.



श्रीमंत मालोजीराजेंनीच कल्पकतेने बांधलेल्या संस्थानकालीन अधिकारगृहाच्या भव्य इमारतीबाहेर उभारलेला श्रीमंत मालोजीराजेंचा पूर्णाकृती पुतळा.
(अनावरण - ८ जानेवारी १९८३.)



रविंद्र सीताराम बेडकिहाळ

* जन्मदिनांक - २२ एप्रिल १९४४
* रयत शिक्षण संस्थेतील आजीव सदस्य, कै.सी.श्री.बेडकिहाळ आणि निवृत्त शिक्षिका श्रीमती उषा सी. बेडकिहाळ यांचे ज्येष्ठ चिरंजीव.
* गेली ५५ वर्षे पत्रकारितेत कार्यरत.
* विद्युतशास्त्र पदविकेपर्यंतचे शिक्षण असूनसुद्धा पत्रकारिता, साहित्य, शिक्षण क्षेत्र व सामाजिक कार्याची विशेष आवड.
* दै.संध्या, नवशक्ती, केसरी, लोकसत्ता, लोकमत, ऐक्य, ग्रामोद्धार, तरूण भारत (बेळगांव), श्रमिक एकजूट इत्यादि वृत्तपत्रांतून पत्रकारिता व विविध विषयांवर लेखन.
* १९८० पासून स्वत:चे साप्ताहिक लोकजागर नियमित चालू. ३५ वर्षे स्वत: संपादक. 'लोकजागर'चा स्वतंत्र दिवाळी अंक गेली ४० वर्षे प्रकाशित होत आहे.
* सदस्य - महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, महाराष्ट्र शासन.
* संस्थापक अध्यक्ष - महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधी.
* अध्यक्ष - महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र संपादक सहकारी संघ मर्या.
* रयत शिक्षण संस्था मध्यविभाग, सल्लागार समिती सदस्य.
* भारती विद्यापीठ (पुणे) नियामक मंडळ निमंत्रित सदस्य.
* महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, सातारा जिल्हा प्रतिनिधी.

● विशेष कार्य ------------------------------

* महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधी या संस्थेच्या माध्यमातून राज्यातील अनेक आपद्ग्रस्त पत्रकार व त्यांचे कुटुंबीय यांना मदत. तसेच मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक 'दर्पण'कार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचे त्यांच्या जन्मगावी पोंभुर्ले, ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग येथे पहिल्या राष्ट्रीय स्मारकाची उभारणी. ३५ वर्षे 'दर्पण'कारांच्या स्मरण कार्यात सातत्याने सक्रीय.
* विद्यार्थी वर्गास व नव्या पिढीस 'दर्पण'कारांचे चरित्र, कार्य माहिती व्हावे म्हणून 'आचार्य बाळशास्त्री जांभेकर चरित्र व कार्य' हा ग्रंथ प्रकाशित. या पुस्तकास राज्यशासनाचा उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार प्राप्त.
* आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचे महाराष्ट्रातील पहिले शैक्षणिक स्मारक म्हणून फलटण, जि.सातारा येथे जून १९९७ पासून 'आचार्य बाळशास्त्री जांभेकर माध्यमिक विद्यालय' सुरु केले.
* विविध विषयांवर आजपर्यंत २०० पेक्षा जास्त व्याख्याने.
* विविध विषयांवरील लेख, कथा, कविता, मुलाखती गेली ५५ वर्षे अनेक प्रसारमाध्यमांतून प्रसिद्ध.
* मुलांसाठी राजर्षि शाहू महाराज (चरित्र), माझं आभाळ (कविता संग्रह), 'गुंफण' प्रातिनिधीक कवितासंग्रह प्रकाशित. अनेक पुरस्कारांनी सन्मानित.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

मुद्रणस्थळ : शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे.